म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल वा.
दा. क्र. ६९०

IRBK-0100690

5 AUG 1975

# श्री सयाजी साहित्यमाला पुष्प १८ वें.

ग्रं. क्र. ६९० ... कां. ...
वि. ...

# अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें.

लेखक व प्रकाशक,

विनायक सदाशिव वाकसकर, बडोदें.

अनुक्रम ...........
क्रमांक २५६६

संवत् १९८१. इ. स. १९२५.

IRBK-0100690

किंमत एक रुपया

मुद्रक

श्रीनिवास केशव चित्रे बी. ए.

आत्माराम छापखाना, खारीवाव,

बडोदें.

# जाहिरात

आपल्या देशी भाषांच्या साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें श्रीमंत पतितपावन महाराजसाहेब श्री सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेर बहादूर, जी. सी. आय्. ई. ह्यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "**श्री सयाजी साहित्यमालेंत**" विविध-विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

"**अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें**" हें स्वतंत्र पुस्तक असून तें रा. रा. **विनायक सदाशिव वाकसकर, बडोदें,** ह्यांचेकडून लिहवून मालेंतील इतिहास–गुच्छांत अठ्याणणवावें पुष्प ह्मणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा,
विद्याधिकारी कचेरी,
बडोदें, ता. ३० जुलाय्
सन १९२५.

न. शि. शास्त्री. भा. म.

नं. के. दीक्षित.
विद्याधिकारी,
बडोदें, राज्य.

# प्रस्तावना

सकृत् दर्शनीं अगदीं क्षुल्लक दिसणाऱ्या व्यक्तींनींही इतिहासांत एकाद वेळांच कां होइना पण अमूल्य कामगिरी केलेली असते. अशा अनेक व्यक्ती मराठ्यांच्या इतिहासांत पदोपदीं आढळतात. त्यांचीं मिळतील तेवढीं चरित्रें मिळवून तीं वाचकांस सादर करण्याचा हेतु अल्पांशानें या पुस्तकरूपानें सिद्धीस जात आहे या बद्दल आनंद वाटतो.

देवी अहल्याबाईसारख्या व्यक्ती जगत्प्रसिद्ध असूनही त्यांची अवश्य ती माहिती बहुजनसमाजास नसते असें प्रत्ययास आल्यावरून तशीं एक दोन चरित्रें मुद्दामच यांत घातलीं आहेत. हें पुस्तक विद्यार्थी वर्गासाठींच मुद्दाम लिहिलें असल्यानें यांत चालेपर्यंत जुना पत्र व्यवहार जसाचातसा उद्धृत करूं नये असा आरंभीं संकल्प होता. पण अस्सल पत्रांतील भाषेहून सुंदर व परिणाम-कारक भाषा मला लिहितां न आल्यानें कांहीं ठिकाणीं अस्सल पत्रांतीलच उतारे निरुपायानें घेतले आहेत.

यांतील कांहीं चरित्रें निरनिराळ्या ठिकाणीं प्रथम प्रसिद्ध करून त्यांतील चुका दाखवून, अधिक भर घालण्यासाठीं जाहीर विनंती केली होती. पण तिचा म्हणण्यासारखा उपयोग झाला नाहीं. तथापि तीं या पुस्तकांत घेतांना जरूर ती सुधारणा त्यांत केलेली आहे. हें पुस्तक म्हणजे रा. रा. गो. स. सरदेसाई यांच्या रियासतीचें छोटेंसें बालक आहे, हें स्पष्टपणे सांगितल्यानें या पुस्त-काच्या चांगुलपणाचें श्रेय वाचकांनीं कोणास द्यावें हें निराळे सांगावयास नको.

श्रीमंत गायकवाड सरकारांच्या विद्याखात्यानें या पुस्तकास आश्रय दिल्या-मुळें हें प्रसिद्ध करतां आलें या बद्दल लेखक त्यांचा आभारी आहे. तसेंच आत्माराम छापखान्याचे मालक रा. रा. श्री. के. चित्रे यांनीं हें पुस्तक आपलें स्वतःचेंच काम समजून छापून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानणें अवश्य आहे.

गणेश चतुर्थी श्री शिव शक २५२.
तारीख २३ ऑगस्ट सन १९२५.

**विनायक सदाशिव वाकसकर.**

# अनुक्रमाणिका.


| | चरित्र. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | रामचंद्र बाबा सुखटणकर. ... ... ... | १ |
| २ | रामदासपंत. ... ... ... ... | ९ |
| ३ | चंगिसखान. ... ... ... ... | १७ |
| ४ | अहल्याबाई. ... ... ... ... | २० |
| ५ | खंडो बल्लाळ. ... ... ... ... | ३२ |
| ६ | नानक. ... ... ... ... ... | ४१ |
| ७ | अहंमदशहा अबदाली. ... ... ... | ५३ |
| ८ | रामशास्त्री. ... ... .. ... | ७० |
| ९ | भास्करराम. ... ... ... ... | ७८ |
| १० | मुजफरखान गारदी. ... ... ... | ८४ |
| ११ | तुळाजी आंग्रे. ... ... ... ... | ९१ |
| १२ | रंगो बापूजी. ... ... ... ... | १०० |
| १३ | इभराहिमखान गारदी. ... ... ... | १३२ |
| १४ | सखाराम हरि. ... ... ... ... | १४३ |

वंशावळी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | होळकर. | २९. | २ | रंगो बापूजी. | १३१ |

# प्रस्तुत ग्रंथकाराचीं इतर पुस्तकें.

१ राधेय कर्ण चरित्र द्वितीयावृत्ति छापली जात आहे. १–०–०.

२ मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्य. ०–२–०.

मुद्रण ता. २३–८–२५.

# अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें.

## रामचंद्रबाबा सुखटणकर.

मृत्यु, ता. ४-१०-१७५४.

धृतराष्ट्रासि रुचेसी सांगे अत्युग्र नीति तो कणिक ।

वणिक ग्राहकहस्तीं देतो विषसर्पिशर्कराकणिक ॥ मोरोपंत.

पूर्व संकल्पानुसार आज श्री. रामचंद्रबाबा शेणवी या मुत्सद्याचें चरित्र वाचकांस सादर करावयाचें आहे. रामचंद्रबाबा हा सारस्वतजातीचा असून जुन्या कागदपत्रांतून यास ' रामचंद्रबाबा शेणवी ' या संज्ञेनें संबोधिलेलें आहे. रामचंद्रबाबाचें सबंद नांव रामचंद्र मल्हार सुखटणकर असें आहे. हा मूळचा कोंकणांतील आरवली गांवचा कुळकर्णी असून तेथचा राहणारा होता. परंतु कालमानानुसार नुसत्या कुळकर्णावर उदरनिर्वाह होईना ह्मणून ह्मणा, अगर मोठमोठ्या राज्यांच्या वडामोडी करण्याचें बुद्धींत सामर्थ्य असल्यानें, आरवलीसारख्या भिकार गांवांत कुळकर्णासारखा बुद्धिहीनतेचा धंदा करण्याचा साहजिकच कंटाळा आल्यानें ह्मणा, हा आपली जन्मभूमि सोडून साताऱ्यास आला. या वेळीं शाहूमहाराज राज्य करीत असून, बाळाजी विश्वनाथ हा त्यांचा पेशवा होता. राजगुरु कचेश्वरबाबा ओतुतकर हा त्यावेळीं साताऱ्यास फार प्रसिद्ध असून त्यानें रामचंद्रबाबास प्रथम आश्रय दिला इतकेंच नव्हें, पण बाळाजी विश्वनाथाशीं त्याची ओळखही करून दिली. कारण राजगुरूसारख्या इसमांस ही गोष्ट कांहीं अशक्य नव्हती.

२ ज्याप्रमाणें जोमदार वेलीला उंच चढण्याला एखाद्या झाडाचा आधार लागत असतो, त्याचप्रमाणें हुषार व तरतरीत मनुष्यालाही पुढें येण्यास कोणी तरी कारणीभूत व्हावा लागतो. मनुष्य कितीही हुषार असला तरी त्याची हुषारी लक्षांत घेऊन तिचें चीज करणारा जर कोणी नसला, तर तो मनुष्य मागेंच राहतो. रामचंद्रबाबा साताऱ्यास आल्यावर कचेश्वरबाबानें त्यास हाताशीं धरून मुख्य प्रधान बाळाजी विश्वनाथ याच्याशीं त्याची ओळख करून देतांच, रामचंद्रबाबाच्या कर्तेपणाचें चीज होण्याला प्रारंभ झाला. रामचंद्रबाबाची हुषारी पाहून बाळाजी विश्वनाथानें हळूहळू त्याला एकापेक्षां एक अधिक महत्त्वाचीं कामें सांगण्यास प्रारंभ केला. अनेक भरंवशाचीं कामें व राज्यकारभाराचे महत्त्वाचे प्रश्न जों जों रामचंद्रबाबा कुशलतेनें पार पाडूं लागला, तों तों त्याचें कर्तृत्व विशेषच दृगोचर होऊं लागलें. बाजीरावानें माळवा प्रांत काबीज केल्यावर पेशवा, शिंदा, होळकर आणि पवार या चौघांमध्यें माळव्याची वांटणी समाधानकारक रीतीनें करण्याचें काम फार बिकट होतें. ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें व प्रांत हस्तगत करण्यांत गाजविलेल्या पराक्रमाप्रमाणें त्या प्रांताची वांटणी होणें इष्ट होतें. हे चौघेही फौजबंद सरदार असल्यामुळें एकानेंही नाखुष होतां कामा नये अशाप्रकारची वांटणी रामचंद्रबाबानें मोठ्या कुशलतेनें केली, व चौघेही सरदार खूष झाले. ही वांटणी सन १७३४ च्या सुमारास झाली असावी.

३ नानासाहेब, सदाशिवराव, रघुनाथराव इत्यादि प्रसिद्ध पुरुषांचें बालपणीचें शिक्षण रामचंद्रबाबाच्याच देखरेखीखालीं झालें. बाजीरावाच्या पश्चात् पेशवाईचा बोजा सहन करण्यास नानासाहेबांस जी हिंमत प्राप्त झाली होती, ती विशेषतः रामचंद्रबाबाचेच साहाय्यावर होय. पेशवाईची सुव्यवस्था लाविण्यास रामचंद्रबाबाचें साहाय्य नानासाहेबांस फारच झालें होतें, यांत संशय नाहीं. शिंदेहोळकरांच्या पराक्रमानें मराठ्यांची सत्ता परमुलखांत म्हणजे उत्तरेकडे दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली, त्यामुळें तिकडील प्रांताची व्यवस्था लाविण्यास कोणातरी मुत्सद्याची जरूरी भासूं लागली. या वेळीं पेशव्यांनीं रामचंद्रबाबास शिंद्याबरोबर उत्तरेकडे पाठविलें.

बाजीरावापासूनच साधारणत: रामचंद्रबाबा लढाईत व मुलुखगिरींत हजर राहूं लागला होता. लढाईचा परिणाम तहांत होतो; व तहाच्या वेळीं चाणक्ष मुत्सद्दी जर तह ठरविण्यास नसले तर विजयी पक्षाचा पराक्रम व त्याची मनुष्यहानि पराजितपक्ष बुद्धीच्या जोरावर कवडीमोल ठरवीत असतो; ह्मणून तह ठरवितांना अत्यन्त बुद्धिमान् व दूरदर्शी माणसें दोन्ही पक्षांकडून पुढें येतात. बाबा जरी तरवारबहादुर नसला तरी बौद्धिक झगड्यांत तो कोणासही हार जाणारा नव्हता, आणि ह्मणूनच पेशवे त्यास मुलुखगिरीचे वेळीं जवळ ठेवीत असत. उत्तरेकडेस कार्यक्षेत्र वाढूं लागतांच नानासाहेबानें बाबास राणोजी शिंद्याबरोबर तिकडेस पाठविलें, व राणोजीच्या अखेरीपर्यंत तो शिंद्याकडेस कारभारी या नात्यानें होता.

४ राणोजी शिंदे हा शूर, परंतु भोळा होता; मल्हाररावाप्रमाणें धूर्त नव्हता. त्यामुळें उत्तरेकडील कारभारांत मल्हाररावाप्रमाणें राणोजी श्रीमंत न होतां कफल्लकच राहिला; परंतु राणोजीचा कारभारी रामचंद्र मल्हार मात्र फारच श्रीमंत झाला. द्रव्याच्या बाबतींत मल्हारराव होळकर व रामचंद्र मल्हार आपसांत समजत असत, व मुलुखगिरीच्या वेळीं मल्हाररावाबरोबर राणोजी तलवार गाजवीत असे. याचा साहजिकच असा परिणाम झाला कीं, रामचंद्रबाबा लक्षावधी रुपयांचा धनी झाला इतकेंच नव्हे, पण मल्हाररावाच्याच तंत्रानें शिंद्यांचा कारभार तो करूं लागला. राणोजीच्या हयातीपर्यंत हा प्रकार चालू होता; परंतु राणोजीच्या पश्चात् त्याचा मुलगा जयाप्पा यास हें रामचंद्रबाबाचें सांपत्तिक वर्चस्व सहन झालें नाहीं.

५ जयपुरचा राजा सवाई जयसिंग यास ईश्वरसिंग व माधवसिंग असे दोन मुलगे होते. या दोघां भावांत जयपुरच्या गादी संबंधीं तंटा लागला. तेव्हां पहिल्या प्रथम नानासाहेबाच्या आज्ञेप्रमाणें शिंदेहोळकरांनीं ईश्वरसिंगास साहाय्य केलें व त्यास जयपुरच्या गादीवर बसविलें; परंतु पुढें कांहीं दिवसांनीं मल्हारराव होळकरानें माधवसिंगास हाताशीं धरून त्याचे तर्फेनें ईश्वरसिंगावर चाल केली, व त्यास इतका त्रास दिला कीं, अखेरीस ईश्वरसिंगानें मल्हाररावाच्या जाचास कंटाळून आत्महत्या केली. या भानगडींत मल्हाररावास

अर्थात्च माधवसिंगाकडून पुष्कळच द्रव्यप्राप्ती झाली असली पाहिजे. हें मल्हाररावाचें कृत्य जयाप्पा शिंद्यास अगदींच आवडलें नाहीं. त्याचें म्हणणें असें होतें कीं, एकदां आपण जो पक्ष स्वीकारिला तोच अखेरीपर्यंत धरून राहणें हें आपलें कर्तव्य आहे. मल्हाररावाचें म्हणणें, जिकडून पैसा मिळेल तिकडेच आपण मदत करावी, असें पडलें. उत्तरेकडील सर्व कारभार नानासाहेब रामचंद्रबाबाचे सल्ल्यानें उरकीत असे; व या प्रकरणांत नाना-साहेबानें मल्हाररावास यत्किंचितही ठपका दिला नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याचेंच करणें योग्य होतें, असें पर्यायानें जयाप्पास दर्शविल्यानें जयाप्पास रामचंद्रबाबा-बद्दल वैषम्य वाटूं लागलें, व हाच कलिपुरुष असून द्रव्यप्राप्तीसाठीं असलीं अपमानकारक लफडीं उत्पन्न करितो, अशी त्याची दृढ समजूत झाली. नाना-साहेब पेशवा फार मोठा मुत्सद्दी होता हें खरें आहे, पण तो तितकाच द्रव्यलोभीही होता. द्रव्यासाठीं तो वाटेल तेव्हां वाटेल त्याची कुमक करीत असे. वस्तुतः द्रव्यापेक्षां शब्दांची किंमत अधिक आहे; पण हें तत्त्व नाना-साहेबानें पाळिलेलें दिसत नाहीं. किंबहुना थोरल्या माधवरावाशिवाय इतर कोणत्याच पेशव्यास आपल्या शब्दाची किंमत मुळींच वाटत नसे. रजपूत लोकांचीं मनें मराठ्यांविषयीं कलुषित होण्यास या असल्या अनिश्चित् व धरसोडीच्या कारभारापासूनच प्रारंभ झाला, असें म्हणावयास हरकत नाहीं; व याच द्रव्यलालसेचा घोर परिणाम पानपतावर मराठ्यांच्या मदतीस एकही रजपूत राजा आला नाहीं असा झाला.

६ रामचंद्रबाबानें पुण्यास एक विस्तृत जागा खरेदी करून तेथें सात मजली वाडा बांधिला. हा वाडा पुढें स. १७६३ मध्यें इतर वाड्यांबरोबर आग लागून जळाला. बाबानें उत्तर हिंदुस्थानांत कित्येक देवस्थानें व घांटही बांधिले. याशिवाय दानधर्मही अतोनात केला. बाबाचा हा एकंदर बडेजाव जयाप्पास सहन झाला नाहीं, व ही एवढी संपत्ति बाबानें अन्यायानेंच मिळविली असली पाहिजे, अशी त्याची खात्री होऊन त्यानें आपल्या कार-भारांतून बाबास मोठ्या प्रयासानें पेशव्यांकडून दूर करविलें. शिंद्याच्या

कारभारांतून बाबांस काढूं नये, असें मल्हाररावानें परोपरीनें पेशव्यास कळविलें, पण मल्हारराव जों जों आग्रह करी तों तों जयाप्पास बाबांच्या सचोटी-बद्दल अधिकाधिक संशय येऊं लागला, व त्यानें हट्टास पेटून अखेरीस बाबांस आपल्या कारभारांतून दूर केलें. जयाप्पाचें हें कृत्य मल्हारराव होळकरांस मुळींच रुचलें नाहीं; व शिंदे होळकरांच्या वैरांत बाबाच्या बर-तर्फीनें एक नवीनच अधिक भर पडली. परंतु या बद्दल नातू आपल्या महा-दजीच्या चरित्रांत पृष्ठ २० वर असें ह्मणतात, " जयाप्पाचे कारकीर्दींत मह-त्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे रामचंद्रबाबा शेणवी यास शिंद्याचे दिवाणगिरीवरून पेशव्यानें दूर केलें ही होय. हा गृहस्थ जयाप्पास आवडत नव्हता; व त्याला दूर करावे अशी मल्हारराव होळकराचीही मसलत पडल्यावरून पेशव्यानें त्यास दूर केलें. याला बाजीरावानें राणोजीपाशीं नेमिलें होतें. रामचंद्रबाबानें पेशव्याचा चुलतभाऊ सदाशिवराव याला पुढें करून लाखो रुपये नजर देऊन आपलें पद पुनः मिळविण्याविषयीं खटपट केली; परंतु ती व्यर्थ झाल्यामुळें अभिमानास पेटून सदाशिवरावानें बाबास आपला दिवाण नेमिलें. ही गोष्ट जरी वस्तुतः महत्त्वाची नव्हती तरी पुढें पेशव्यांचे घरांत जे बखेडे झाले व मल्हारराव व सदाशिवराव यांचें जें वैमनस्य पडलें तें या बाबाच्या कारणामुळें पडलें. रामचंद्रबाबा हा मोठा कारस्थानी कारकुन होता. " असो.

७ रामचंद्रबाबा सारख्या कर्त्या पुरुषास नुसतें बसून राहून कसें चैन पडणार ! त्यानें थोडक्याच दिवसांत सदाशिवरावभाऊस वश करून घेतलें, व त्याचे मार्फतीनें पेशव्यांस द्रव्याची मदत करून तो पुनः पेशव्यांच्या कारभारांत शिरला. याच सुमाराला नानासाहेब व भाऊसाहेब यांच्यांत कांहीं घरगुती कारणांमुळें गैरसमज उत्पन्न झालेला होता, या गैरसमजाचा फायदा घेऊन रामचंद्रबाबानें भाऊसाहेबास कोल्हापुरची पेशवेगिरी मिळवून देण्याची खटपट केली. ही हकीकत नानासाहेबास कळतांच तो मोठ्या विचारांत पडला; परंतु लवकरच त्यानें आपला कारभारी महादोबा पुरंदरे यास युक्तीनें घरीं बसवून त्याचें काम भाऊसाहेबास सोंपिलें. महादोबानेंहि पेशव्यांच्या घरांत फूट पडूं नये, ह्मणून आनंदानें घरीं बसण्याचें कबूल केलें.

८ रामराजाचे करकीर्दीत बहुतेक सरदार डोईजड झाले होते; कारण रामराजांत कर्तृत्व बेताचेंच होतें; व त्याची आजी ताराबाई निष्कारण राज्यकारभारांत ढवळाढवळ करून पेशव्यास त्रास देत होती. सरदारांनीं आपल्याच तंत्रानें वागावें व रामराजास अगर पेशव्यास त्यांनी मुळींच मानूं नये, अशी तिची सरदारांस फूस व शिकवणी असे, असें ह्मणतात. अशा डोईजड सरदारांपैकींच प्रतिनिधि हा होता. प्रतिनिधीचा कारभारी यमाजी शिवदेव या नांवाचा एक कारस्थानी पुरुष होता. पेशव्यानें हळूहळू सर्व सरदारांची रग जिरविली. या प्रतिनिधीची मस्ती जिरविण्यासाठीं सदाशिवरावभाऊ व रामचंद्रबाबा रामराजास बरोबर घेऊन पेशव्यांचे संमतीनेंच निघाले. यांनीं प्रतिनिधीच्या सांगोलें नामक ठाण्यावर चाल केली व यमाजी शिवदेवास हतवीर्य करून सांगोलें आपल्या कबजांत घेतलें. यामुळें प्रतिनिधि शरण आला; व रामचंद्रबाबा आणि सदाशिवरावभाऊ यांनीं रामराजाच्या संमतीनें तेथेंच ह्मणजे सांगोल्यासच राज्याची कांहीं व्यवस्था ठरविली. ही व्यवस्था ठरवितांना नानासाहेब तेथें नव्हता. बहुधा त्याच्या सल्ल्यावांचूनच ही व्यवस्था ठरविली गेली असावी. सातारच्या राज्याची व्यवस्था सांगोल्यासच ठरविण्याचें कारण असें होतें कीं, साताऱ्यास अशी व्यवस्था ठरविल्यास मुख्य अडथळा ताराबाई कडूनच झाला असता. सांगोल्यास ताराबाई मुळींच नसल्यानें ही तिची अडचण तेथें नव्हती. शिवाय ही जी नवीन व्यवस्था ठरविली तिच्यायोगें निम्मी गुजराथ पेशव्यास मिळावयाची असून इतरही बाबतींत त्याचा बराच फायदा होणार होता. परंतु कांहींही असलें, तरी हा आपणास न विचारितां परभारेंच झालेला प्रकार नानासाहेबास मुळींच रुचला नाहीं; व याप्रकाराचे मूळाशीं बाबाचाच वरचढपणा असला पाहिजे, असें त्याच्या मनानें घेतलें.

९ रामचंद्रबाबानें सदाशिवरावास छत्तीस लक्ष रुपये—नजर ह्मणा, भेट ह्मणा अगर लांच ह्मणा––दिले; परंतु पुढें पेशव्यास त्याचेपासून द्रव्यप्राप्ति मुळींच होईना. द्रव्यप्राप्तीचीं साधनें मात्र तो पेशव्यास अचुक दाख-

वीत असे. पुण्यांतील सरदारांवर पट्टी बसवून रक्कम वसूल करावी, अशीही एक–प्राप्ती वर कर किंवा अधिक नफ्यावर कर यासारखी–युक्ति बाबानें पेशव्यांस सुचविली होती. सारांश, दुसऱ्यासून पैसे कसे वसूल करावेत, हें पेशवे बाबापासूनच शिकले; परंतु यायोगें त्यांचा फार बदलौकिक झाला. रजपुतान्यांतील मराठ्यांची अब्रू या पैशामुळेंच कवडीमोल झाली, व इतरही अनेक ठिकाणीं मराठ्यांस उघडपणें "द्रव्यलोभी" हें विशेषण मिळूं लागलें.

१० रामचंद्रबाबास पेशव्यानें लवकरच कारभारांतून दूर केलें; कारण पेशव्यास अशी भीति पडली कीं, हा सदाशिवरावास हाताशीं धरून आपलें वजन कारभारांतून नाहींसें करील. शिवाय आतां बाबाकडून द्रव्यप्राप्तीचीही आशा उरली नव्हती. बाबानें पेशव्यांचा कारभार सुमारें तीन वर्षें केला असावा. कारभारांतून कमी झाल्यावर बाबा घरींच बसला होता. रामचंद्रबाबा यानें कांहीं तीर्थाटणेंही केलीं असावींत असें वाटतें. पंढरपुराहून तो पुण्यास आला, व नवज्वराचे आजारानें आजारी झाला. पहिले तीन चार दिवस आजारांत तो सावध होता, पण पुढें बेशुद्ध झाला; व आजाराच्या सातवे दिवशीं ह्मणजे तारीख ४ आक्टोबर सन १७५४ रोजीं रात्रीं सुमारे १० वाजतां मृत्यु पावला. त्याची पत्नी द्वारकाबाई इनें सहगमन केलें. बाबास औरस संतति नव्हती. त्यानें एक मुलगा मांडीवर घेतला होता, तोच सदाशिव रामचंद्र होय. यासच मत्स्याहारी म्हणून पत्रांतून संबोधिलें आहे.

११ कोणताही राज्यकारभार अत्यंत यशस्वी होण्यास त्यांतील जमा-खर्चावर योग्य देखरेख ठेवण्याची चोख व्यवस्था असावी लागते. नानासाहेब पेशव्याचा कारभार जो इतका सुव्यवस्थित झाला त्याला मुख्य कारण त्याच्या राज्यांत आयव्ययावर फार चांगली देखरेख होती हें होय. ही जमाखर्चाची पद्धति नानासाहेबाच्या कारकीर्दींत प्रथम स. १७५० मध्यें उत्पन्न झाली असून, तिचा मुख्य उत्पादक रामचंद्रबाबाच होय. या राम-चंद्रबाबाजवळच पुढें सदाशिवराव भाऊ, महादोबा पुरंदरे, नाना पुरंदरे इत्यादि माणसें तयार झालीं. यापुढील पिढी सखाराम बापू, रामाजी अनंत,

गंगाधर यशवंत, नाना फडणविस ही होय. या मंडळींनीसुद्धां रामचंद्रबाबाचाच कित्ता गिरविला होता. फड ह्मणजे हिशेबी कचेरी, ही कचेरी पुण्यास असून तिचा जो मुख्य तो फडणविस होय. नानास आपल्या बापाचा दस्त मिळाला असून तो सदाशिवरावाजवळ हिशेबाचें काम शिकला. सर्व हिशेबांचें एकीकरण पुण्यास होत असे. व इतर ठिकाणीं कारकुनी पेशाचे लोक याच फडांतून पुरविले जात. नाना फडणविसास मुत्सद्दी ह्मणण्यापेक्षां उत्तम कारकुन ह्मणणें वस्तुस्थितीला अधिक धरून होईल. असो. सारांश, फडणिशीची मुख्य स्थापना पेशवाईमध्यें रामचंद्रबाबानेंच केली.

१२ रामचंद्रबाबा सक्तीच्या खुषीनें राज्यकारभारांतून निवृत्त झाल्यावर वारंवार पंढरपुरास जात असावा असें दिसतें. मरणापूर्वींही तो असाच पंढरपुरास गेल्याचें वर आलेंच आहे. तेथें बाबाच्या नोकराची व एका गृहस्थाची कांहीं कारणानें बाचाबाची झाली तेव्हां त्या गृहस्थानें नोकराच्या तोंडावर बाबासही शिव्यागाळी केल्या असें बाबांस समजतांच बाबानें संतापून माणसें जमवून त्यांच्याकडून त्या गृहस्थास चांगला चोप देवविला. यावरून बाबाच्या तापट स्वभावाबरोबरच आपल्या चाकरमाणसांविषयींही प्रखर अभिमान बाळगण्याचा स्वभाव देखील दृग्गोचर होतो.

१३ रामचंद्र मल्हार हा आरंभीं यःकश्चित् एक कुळकर्णी असून, स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर पेशवाईची व्यवस्था बघण्यास समर्थ झाला. हा त्याच्या बुद्धीचा तर प्रभाव खराच, पण त्यावेळच्या स्वराज्याचाही हा परिणाम होय. स्वराज्यामध्यें बुद्धिमान् व कर्तृत्वशाली माणसें हटकुन जशीं पुढें येतात तसा प्रकार पारतंत्र्यांत होणें शक्य नसतें, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. याप्रमाणें रामचंद्रबाबाचें हें अल्प चरित्र वाचकांस सादर केलें आहे.

अनुक्रम
विभाग
२५६
नों. दि.
ग्रंथालय, ठाणे.

# रामदासपंत.

मृत्यु ता. ७-४-१७५२.

> सत्यानृता च परुषा प्रियवादिनी च
> हिंस्रा दयालुरपि चार्थपरा वदान्या ।
> नित्यव्यया प्रचुरनित्यधनागमा च
> वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा ॥ भर्तृहरि.

अठराव्या शतकामध्यें दोन शक्ती एकमेकांविरुद्ध प्रयत्न करीत होत्या. दोनही शक्ती कांहीं कालपर्यंत तुल्य बलाच्या व तुल्य कर्तृत्वाच्या होत्या. पण पुढें कालवशात् एकीचा जोर दुसरीपेक्षां अधिक होऊन दुसरी हतप्रभ झाली व नामशेष होण्याच्या पंथाला लागली. या दोन शक्ती म्हणजे एक मराठे व दुसरी निजाम ह्या होत. शाहूकालीन निजाम म्हणजे कमरुद्दिनखान हा होय. याचा जन्म तारीख ११-८-१६७१ रोजीं झाला असून, तारीख २१-५-१७४८ रोजीं हा आपल्या वयाच्या सत्याहत्तराव्या वर्षीं मरण पावला. सतत अनेक पिढ्या पराक्रमी निघाल्याचीं जीं थोडीं उदाहरणें हिंदुस्थानांत आहेत, त्यांपैकीं निजामाचें एक होय. हा निजाम फार मोठा मुत्सद्दी व पराक्रमीही होता. औरंगजेबानेंच हें घराणें पुढें आणिलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

२ पहिला बाजीराव एवढा पराक्रमी असून व त्यानें निजामाला दांतीं तृण धरावयास लाविलें असून निजामशाही त्यानें कां बुडवून टाकिली नाहीं, असा एक प्रश्न वारंवार विचारण्यांत येतो. बाजीरावानें मनांत आणिलें असतें तर खरोखरीच निजामशाही त्यानें बुडविली असती, अशी कित्येकांची समजूत आहे हीच मुळीं चुकीची आहे. एकादें राज्य जिंकणें ही गोष्ट तें राज्य नामशेष करणें या गोष्टीहून फार भिन्न आहे. निजामाचा पाठीराखा दिल्लीचा बादशहा असून तो शाहूच्या वेळीं पुष्कळच बलिष्ट होता. बाजीराव

कितीही पराक्रमी असला तरी दिल्लीच्या बादशहाशीं सामना करण्याची कांहीं त्याची तयारी नव्हती. शिवाय आपल्याला वाटतें तेवढा बाजीराव स्वतंत्रही नव्हता. त्याला शाहूच्या तंत्रानें सर्वस्वी चालावें लागे. बाजीराव हा शूर होता, मुत्सद्दी नव्हता म्हणून त्याला ब्रह्मेंद्रासारखीं कांहीं संधानेंही ठेवावीं लागत. बाजीराव नेहमींच कर्जबाजारी असे. 'आपण कर्जानें गांजलों आहोंत, मृत्यु येईल तर बरें होईल' इत्यादि वाक्यें त्याच्या पत्रव्यवहारांत इतस्ततः वापरलेलीं दिसतात. शिवाय शाहूचा विश्वासही बाजीरावावर बेताचाच होता. त्यामुळें कोणतेंही काम त्याला स्वतःच्या जबाबदारीवर उरकणें शक्य नव्हतें; आणि म्हणून बाजीरावानें निजामाला नेस्तनाबूद करणें शक्य नव्हतें, हें आपण विसरतां कामा नये.

३ आतां यावर असा प्रश्न उत्पन्न होईल कीं, शाहूनें तरी निजामाची ब्याद दक्षिणेंत कां राहूं दिली? ही जळत शेगडी छातीवर ठेविण्यांत शाहूचा तरी काय शहाणपणा होता? होय, यांत शाहूचा शहाणपणा नव्हता. परंतु शाहू दक्षिणेंत आल्यावर बरींच वर्षें इकडेस मराठी साम्राज्याच्या आधिपत्याबद्दल यादवी माजून राहीली होती आणि तिचा बींमोड करण्यांतच शाहूला सर्वस्वीं आपलें बळ खर्च करणें अपरिहार्य होतें. शिवाय शाहू झाला तरी त्यालासुद्धां औरंगजेबाच्या पश्चात्‌ही बादशाही फौजेशीं झुंजण्याचें सामर्थ्य नव्हतें; आणि शाहूला बादशाहीबद्दल आपलेपणा वाटत असे. कारण औरंगजेबाच्या सन्निध शाहूनें आपलें वीस वर्षांचें आयुष्य घालविलें होतें व तो दक्षिणेस परत आल्यावरसुद्धां आपण बादशहाचे मांडलिक आहोंत, आपण स्वतंत्र राजे नाहीं, या गोष्टीची त्याला पूर्ण जाणीव असे व दिल्लीच्या बादशाहीबद्दल त्याला एक प्रकारचा अभिमान वाटत असे. अर्थात् शिवाजीची महाराष्ट्र राज्यसंस्थापनेची भावना शाहूच्या ठिकाणीं नव्हती. दिल्लीहून येतांना शाहूनें, ज्या झेबुन्निसा बेगमेनें त्याचा प्रतिपाल केला तिच्या स्मरणार्थ म्हणून, मुसलमानी खतीब व पंजे साताऱ्यास आणिले होते व त्यांचा तो कायम खर्च चालवी. तात्पर्य, मराठे लोक हे मोगलांप्रमाणें नसून स्वभावतःच कृतज्ञ

असल्यानें शाहूच्या ठिकाणीं त्यांच्या बादशाहीबद्दल पूर्णपणें आदर वसत असे. अशा दिल्लीच्या पादशाहीचा प्रतिनिधि म्हणून निजाम दक्षिणेंत वावरत होता. सारांश, बाजीरावानें व शाहूनेंही निजामशाही न बुडविण्याचीं कारणें याप्रमाणें असून तीं विचारणीयही आहेत.

४ शाहूच्या पश्चात् मराठ्यांची सर्व सत्ता नानासाहेब पेशव्यांच्या हातांत आली; व बाजीरावाच्या वेळचीं अनेक अर्धवट [illegible] पडलेलीं प्रकरणें त्यानें भराभर निकालास लाविलीं. त्या अनेक प्रकरणांपैकींच निजामाचें एक प्रकरण होय. जेव्हां निजामाचें प्रकरण नानासाहेबानें हातांत घेतलें, तेव्हां निजामशाहींत एक विलक्षण मनुष्य कारभारावर होता. तोच रामदासपंत होय. नानासाहेबासारख्या चाणाक्ष व राजकारणकुशल मुत्सद्यालासुद्धां या रामदासपंतानें कित्येक दिवस नुसत्या थापावर झुलविलें, यावरूनच त्याच्या धूर्ततेची परीक्षा होते. या रामदासपंताचें चरित्र आतां सांगावयाचें आहे.

५ रामदासपंत हा शिकाकोलचा ब्राह्मण असून प्रथम नासिरजंगाजवळ नोकरींत होता. नासिरजंगानें कर्नाटकावर जेव्हां चाल केली, तेव्हां रामदासपंत त्याचे बरोबर होता. नासिरजंगाची तयारी पाहून फ्रेंचांचा मुख्य जो डुप्ले तो घाबरला. त्यानें पाश्चात्य पद्धतीप्रमाणें नासिरजंगाला एकदम नाहींसें करून टाकण्याचा घाट घातला, व पौरस्त्य पद्धतीप्रमाणें हा रामदासपंत डुप्लेच्या त्या कारस्थानास सामील झाला. असो. याप्रमाणें नासिरजंग नाहींसा झाल्यावर डुप्लेनें या विश्वासघातकी रामदासपंतास मुजफरजंगाची दिवाणगिरी देऊन 'राजा रघुनाथदास' ही पदवीही दिली. रामदासपंताची पूर्वपीठिका याप्रमाणें आहे. बी. ए. ची परीक्षा पसार झाल्यावर ज्याप्रमाणें एकाद्यानें किती वर्षें कॉलेजांत अभ्यास केला व किती वेळां परीक्षांतून त्याला अपयश आलें हें विचारण्याचा प्रघात नाहीं, त्याचप्रमाणें मनुष्य एकदां प्रसिद्ध झाला, म्हणजे त्याचें पूर्वचरित्र मुद्दामच लोक विसरून जातात. किंबहुना लोकांनीं असें पूर्वचरित्र विसरून जावें म्हणूनच 'नदीचें मूळ आणि ऋषींचें कुळ, कोणीं शोधूं नये,' अशी म्हण प्रचारांत आली असावी.

६ शाहूच्या मृत्यूनंतर जी स्थिति मराठशाहीची झाली, तीच स्थिति निजामाच्या मृत्यूनंतर निजामशाहीची झाली. मराठशाहीवर कर्तृत्वशून्य असा रामराजा आला, तरी सर्व सत्ता नानासाहेबांकडेस असल्यानें तिचा बोजवारा उडाला नाहीं. निजामशाहींत नानासाहेबासारखा कर्ता पुरुष कोणीही पुढें न आल्यानें फ्रेंचांना आपला हात निजामशाहींत शिरकविण्याची उत्तम संधि प्राप्त झाली. शाहूच्या मरणानंतर नानासाहेबानें मराठशाहीचा पुढाकार घेतला नसता तर त्याचवेळीं परकीयांचा हात मराठ्यांच्या राज्यकारभारांत शिरला असता, असें म्हणण्यास हरकत वाटत नाहीं.

७ निजामाच्या राज्यांत फ्रेंचांचा बुसी हाच निजामकर्ता (King-Maker) होता. हिंदुस्थानांत आल्यावर बुसीची मिजास फारच वाढली होती. सेइरे मुताखरीनकर बुसीचें वर्णन पुढीलप्रमाणें करतोः—

"बुसीच्या अंगावर नेहमीं भरजरी उंची पोषाख असून डोक्यावरची विलायती टोपीसुद्धां जरीच्या बुट्टीनें मढविलेली असे. त्याचा राहता तंबू तीस फूट उंचीच्या भव्य ओट्यावर उभारलेला असून, आंत सहाशें माणसें मावतील एवढा विस्तीर्ण होता. या तंबूच्या एका टोंकास उंच व्यास-पीठावर भरजरी मखमलीचा गालीचा आंथरून त्याजवर सिंहासनाकार राजचिन्हांकित भव्य हातखुर्ची ठेवून त्याजवर बुसीची स्वारी विराजमान होत असे. खुर्चीच्या मागें व उजवे-डावे बाजूस इतर दरबारी मंडळी खुर्च्यांवर बसे. समोर फ्रेंच स्वारांचा व मागें तुर्की शिपायांचा पाहरा त्या तंबूत खडा असे. भोजनास चांदीचीं भांडीं व नानाप्रकारच्या पक्वान्नांची चंगळ असे. बुसीची स्वारी पालखींत अगर घोड्यावर बसून बाहेर जाई, तेव्हां पुढें चोबदार ललकारत व भाटलोक त्याचे गुणानुवाद गात."

सारांश, बुसी हिंदुस्थानांत बादशाही इतमामानें राहूं लागला होता. रामदासपंत व बुसी हे एकत्र होऊन त्यांनीं नासिरजंगाच्या पश्चात् मुजफर-जंगाला निजामाचे गादीवर बसविलें; परंतु तो लवकरच मृत्यु पावल्यानें या उभयतांनीं सलाबतजंगास निजामी दिली. यांवेळीं सलाबतजंग कर्नाटकांत

होता. तो फ्रेंचांच्या साहाय्यानें दक्षिणेंत येण्यास निघाला. हा निजामशाहींतील खेळखंडोबा पाहून, स्वारी करण्यास ही संधी उत्तम आहे असें ठरवून, नानासाहेबानें एकदम निजामावर स्वारी करण्याचा विचार केला. नानासाहेबाच्या या बेताची कुणकुण रामदासपंतास लागतांच, त्यानें पेशव्याच्या वकीलास गोडगोड भाषणानें खूष करून आपल्याविषयीं पेशव्याचा ग्रह चांगला व्हावा अशी युक्ति केली. 'रामदासपंत फार उदार आहेत, आपला व त्यांचा अकृत्रिम स्नेह आहे' अशी भावना पेशव्याच्या वकीलाची झाली. इतकेंच नव्हे, पण ती त्यानें नानासाहेबास लिहूनही पाठविली. ही रामदासपंताची हुषारी पाहून पेशव्याच्या तोंडास पाणी सुटलें व त्याला वाटलें कीं, असला कर्ता पुरुष आपल्या नोकरींत असावा. या हेतूप्रमाणें नानासाहेबानें दीक्षिताच्या मार्फत कांहीं खटपटही केली, पण स्वराज्याला रामदासपंताचा उपयोग होण्याचा योगायोग नव्हता असें दिसतें.

८ नानासाहेब हा कर्जानें गांगरून गेला असून द्रव्यलोभीही विशेष आहे, ही गोष्ट रामदासपंताच्या तेव्हांच ध्यानीं आली. त्यानें लागलीच जानोजी निंबाळकर या नांवाचा एक गृहस्थ आपल्यातर्फे पेशव्याकडे पाठविला व त्यांस असें कळविलें कीं, 'तुमचें सगळें कर्ज मी वारतों. कर्जाची तुम्हीं यत्किंचितही काळजी करूं नये. तुमच्या हातून कर्ज निवारण झाल्यावर मोहरांची दक्षिणा ब्राह्मणांस देववीन.' हा निरोप ऐकून नानासाहेब थक्कच झाला, व निजामाविरुद्ध चालू केलेले मनसबे त्यानें मागें टाकिले, व आपला तारक प्रभु काय तो रामदासपंतच असें नानासाहेबास वाटूं लागलें. जानोजी निंबाळकराला रामदासपंतानें कायमचेंच पुण्यास पेशव्याकडेस ठेवून दिलें होतें. या जानोजीनें वारंवार पेशव्याची रामदासपंताच्या सच्चेपणाबद्दल खात्री करावी, असा रामदासपंतानें संकेत ठरविला होता. नानासाहेबासारखा धूर्त पेशवा जेथें चकला तेथें जानोजीसारख्याची काय कथा! जानोजी हा रामदासपंताचें कपटांत अनुकूल होता असें म्हणण्यापेक्षां, रामदासपंतानें जानोजीच्या भोळसरपणाचाच फायदा विशेष घेऊन त्याच्या मार्फत नानासाहेबास आपल्या नादीं लाविलें, असें म्हणणें अधिक योग्य होईल.

९ रामदासपंताबद्दल नानासाहेबास विशेष भरंवसा वाटण्यास एक कारण झालें होतें तें असें:—शाहूच्या पश्चात् ताराबाई आणि पेशवा यांच्या-मध्यें वैमनस्य उत्पन्न झालें होतें. ताराबाईच्या मनांतून राजसत्ता आपल्या स्वाधीन असावी असें होतें व बाळाजी बाजीरावास ती सत्ता स्वतःकडेस घेण्याची महत्त्वाकांक्षा होती. ताराबाईनें साताऱ्यावरून बाळाजीच्या पारिपत्यासाठीं गुजराथेंतून दमाजी गायकवाडास बोलाविलें होतें. आरंभीं दमाजी गायकवाडास पेशव्याच्या बळाची तितकीशी कल्पना नसल्यानें तो ताराबाईच्या आज्ञेप्रमाणें पेशव्यावर एकदम चालून आला. पेशव्याची व गायकवाडाची लढाई सन १७५१ मध्यें झाली. यावेळीं रामदासपंतानें फौज पाठवून पेशव्यास साहाय्य केलें होतें. या लढाईत पेशव्यास विजय मिळाल्यानें त्याला रामदासपंताबद्दल आदर वाटणें साहजिकच होतें. रामदासपंत आपणांस असेंच वेळोवेळीं साहाय्य करील असें पेशव्यास निष्ठापूर्वक वाटूं लागलें. परंतु रामदासपंतानें यानंतर पेशव्यास नुसत्या थापा मारून शेंवटपर्यंत चाळवाचाळवी केली व अखेर सपशेल फसविलें.

१० याप्रमाणें कांहीं दिवस गेले. एकदां मामूल वहिवाटीप्रमाणें पेशव्यांचा खजीना उत्तरेकडून पुण्यास येत असतांना, तो रस्त्यांत निजामाच्या सरदारांनीं लुटिला. खजिना सुमारें पांच लक्षांचा होता. एकट्या निजामाची किंवा निजामाच्या सरदारांची पेशव्यांचा खजीना लुटण्याची छाती नव्हती. परंतु बुसीनें नवीन पद्धतीनें शिकविलेल्या गार्द्यांच्या पलटणींचें साहाय्य आपणांस पूर्णपणें आहे अशी रामदासाची खात्री असल्यानें त्यानेंच हा खजीना लुटविला. आणि विशेष हुषारी अशी केली कीं, हा खजीना लुटण्यांत आपलें स्वतःचें अंग मुळींच नाहीं, असें पेशव्यास परोपरीनें भासविलें. जेव्हां पेशव्याच्या वकिलानें या खजीन्याबद्दलची तक्रार रामदासपंताजवळ नेली तेव्हां मानभावीपणानें त्यानें असा कांहीं आव आणिला कीं, त्यायोगें पेशव्याच्या वकीलास रामदासपंताच्या निर्दोषीपणाबद्दल खात्रीच पटली. वकीलापेक्षां नानासाहेब पेशवा फारच अधिक चाणाक्ष व मुत्सद्दी आहे,

हें रामदासपंत ओळखून असल्यानें नानासाहेबांसही चकविण्यासाठीं त्यानें लुटलेल्या पांच लक्षांच्या खजिन्यापैकीं तीन लाख रुपये पेशव्यास परत देतों असें तत्काळ कळविलें, व 'बाकीची रक्कम लवकरच परत करून टाकूं, श्रीमंतांनीं अगदीं बेफिकीर असावें, पांच लक्षांची ती बिशाद काय ? एवढ्यासाठीं श्रीमंतांनीं संशय मानण्याचें कारण नाहीं,' असें नानासाहेबांस त्यानें वकीलामार्फत कळविलें. रामदासपंताचा हा एकंदर उडवाउडवीचा प्रकार पाहून वाचकांस ' सोके भये साठ, आधे गये नाठ; दस देइंगे, दस दिलाइंगे और दसका देना क्या है ? ' या म्हणीची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. पण रामदासपंताची ही हातचलाखी फार दिवस निभली नाहीं.

११ रामदासपंताची ही उडवाउडवी पेशव्याच्या वकीलाच्या आतां कुठें ध्यानांत आली. आणि त्यानें पेशव्यास कळविलें कीं, ' रामदासपंत खजीना देऊं म्हणतात, परंतु अद्यापि देत मात्र नाहीं कांहींच. इतकेंच नाहीं पण आंतून लढाईची तयारी जोरानें करितात. फिरंग्यांची पलटणें जमविण्याचें काम चालू आहे. रामदासपंतानें आपला खजीना लुटल्यामुळें आपली फारच नाचक्की झाली आहे. हल्लीं हैदराबादेहून निजामाचा खजीना रवाना झाला आहे; तो जर आपण लुटला तर पेशव्याची जरब निजामास बसून गेलेल्या अब्रूची कांहीं तरी भरपाई होईल. निजामाचा दररोजचा लाख रुपये खर्च असल्यानें तो पुरा पाडणें रामदासपंताच्या शक्तीबाहेर गेलें आहे व म्हणून तो आतां इकडे सर्वत्रांस अप्रिय झाला आहे.' अशा आशयाचें पत्र पाहतांच नानासाहेबाचे डोळे चक्क उघडले. आणि त्यानें लढाईची तयारी केली. यापुढें नानासाहेबाला थापावर झुलविणें शक्य नाहीं, हें जाणून रामदासपंतानें बुसीच्या साहाय्यानें उघडपणें पेशव्यावर चाल केली, आणि पेशवे व निजाम यांचें युद्ध ता. २१-११-१७५१ रोजीं कुकडी नदीवर झालें. कुकडी नदी नगर जिल्ह्यांतून वाहत येऊन शिरूरजवळ घोडनदीस मिळते. या लढाईंत पेशव्याचा पराजय झाला, परंतु नुकसान कांहीं फारसें झालें नाहीं. याच लढाईंत पेशव्यास पाश्चात्य युद्धकलेची,

गार्द्यांच्या पलटणींची व फिरंगी तोफखान्याची ओळख प्रथम पटली. या लढाईंत पेशव्याचा पराजय होण्यास आणखीं एक कारण झालें, तें नमूद करून ठेविण्यासारखें आहे. लढाई चालू असतां चंद्रग्रहण आलें म्हणून, ग्रहणांत रात्रीं पेशव्याकडील मंडळी स्नानास नदीवर गेली. ही वातमी रामदासपंतानें ठेवून एकदम पेशव्यावर मारा केला. या धामधुमींत पेशव्याची पूजेचीं चांदीसोन्याचीं उपकरणीं वगैरे लुटलीं गेलीं. भलत्यावेळीं भलतें करण्याची दुर्बुद्धि आठवणें हेंच मुख्यतः सर्वनाशाचें लक्षण होय. असो. या लढाईनंतर निजामाचा व पेशव्याचा तह झाला, पण त्या योगें पेशव्याचें कांहीं समाधान झालें नाहीं. कारण या लढाईंत व तहांतही रामदासपंताचा वरचष्माच राहिला. कसेंही करून रामदासपंताची खोड मोडून त्याला धुळीस मिळवावें असा पेशव्याचा निश्चय झाला होता. त्या कामासाठीं त्यानें उत्तरेकडून शिंदे होळकरांना जय्यत तयारीनिशीं बोलाविलें. रामदासपंताला मोडण्यासाठीं अगोदरही शिंदेहोळकरांस त्यानें बोलाविलें होतें, पण ते येऊन पोंहोचले नाहींत. म्हणून या वेळीं नानासाहेबानें त्यांना फार आग्रहाचें पत्र पाठविलें होतें. रामदासपंतानें आपणांस पूर्णपणें फसविलें असल्यानें कसेंही करून एकदां त्याला मोडावा अशी प्रतिज्ञाच नानासाहेबानें केली होती. नानासाहेब म्हणतो, ‘ सर्वस्व वेचूं पण एकदां रामदासपंताची खबर घेऊं ’ यालाच म्हणतात पुरुषार्थ. ‘ अमर्षोह्येष पौरुषं ’ असें दुर्योधनाचें वचन आहे तें विचारणिय आहे. विचारणीय असून अशाच प्रसंगाला उद्देशून आहे.

१२ नानासाहेब याप्रमाणें तयारी करीत होता तेव्हां रामदासपंतही कांहीं माशा मारीत बसला नव्हता. त्यानें गार्द्यांच्या पलटणी वाढविण्याचा क्रम सुरू केला होता. गायकवाड, ताराबाई, प्रतिनिधि, रघूजी, बाबूजी इत्यादि सर्वांच्या भानगडी नानासाहेबानें आतां निरविल्या असल्यामुळें रामदासपंता विरुद्ध तयारी करण्यांत त्यास पूर्ण अवसर सांपडला होता. शिंदेहोळकरही त्याच्या मदतीला धावून येण्यास सिद्ध झाले होते. इकडे निजामाच्या दरबारीं बुसीचें वजन अतोनात वाढलें होतें. रामदासपंत बुसीच्या जोरावर

उड्या मारीत होता. परंतु या वेळीं निजामाच्या फौजेस पगार न मिळाल्यानें ती असंतुष्ट झाली होती, व भालकी येथें ता. ७ एप्रिल सन १७५२ रोजीं तिनें रामदासपंताचा एकाएकी खून केला. त्यामुळें लढाईचें पुढील अनर्थ टळले. साडेतीन शहाण्यांत प्रसिद्ध असलेला विठ्ठल सुंदर हा या रामदासपंताचाच पट्टशिष्य असून यानेंच त्यास प्रथम नोकरींत घेतलें.

१३ रामदासपंतासारख्या मुत्सद्दी व महत्त्वाकांक्षी पुरुषाचा वरप्रमाणें अकस्मिक रीतीनें शेवट झाला. असला पुरुष नानासाहेबास मिळाला असता तर मराठी साम्राज्याचे इतिहासास कांहीं निराळ्या प्रकारचेंच स्वरूप आलें असतें. ‘ ईश्वरेच्छा बलीयसी ’ हेंच खरें.

# ३ चंगीझखान.

जन्म इ. स. ११६३. मृत्यु इ. स. १२२७.

म्हणति मनुष्य नव्हे हा राक्षस कीं काळ हा खवळला हो ।
कीं आमुची कराया मूर्त प्रलयाग्नि राख वळला हो ॥ मोरोपंत.

आपल्या हिंदुलोकांत ज्याप्रमाणें चार वर्ण आहेत, त्याचप्रमाणें मुसलमानांतही सय्यद, शेख, मोगल, पठाण असे चार वर्ण आहेत. आतां यांतही पुष्कळ पोटभेद आहेत. तथापि आपण या सर्वांनाच मुसलमान म्हणून संबोधितों; आणि म्हणूनच जुन्याकाळच्या मुसलमानांविषयीं आपला बराच गैरसमज होतो. जगाच्या ओळखीचे पहिले मुसलमान म्हणजे अरब होत. कारण यांनींच आपला धर्म व आपलें राज्य पृथ्वीवर चोहोंकडे वाढविलें. तथापि पहिल्या सिंधप्रांताच्या स्वारीशिवाय हे अरब हिंदुस्थानांत आलेच नाहींत. हिंदुस्थानावर वारंवार स्वाऱ्या करून लुटालूट करणारे ते हे अरब नसून मुख्यत्वेंकरून तुर्कलोक होत. सीथियन्स, यवन, हूण, तुर्क, मोगल, पठाण इत्यादि जातींनीं मध्यआशियांतील प्रदेश व्यापिलेला असल्यामुळें तेथें लोकसंख्येची वाढ झाली कीं, एकादा धाडसी पुढारी

अग्रेसरत्व पतकरून इकडे हिंदुस्थानाकडे किंवा तिकडे यूरोपकडे लुटालूट करण्यास प्रारंभ करी. अशा पुढाऱ्यांपैकींच चंगीझखान हा एक मोगल पुढारी होता. याचा जन्म सन ११६२ मध्यें झाला. हा अत्यंत पराक्रमी निघाल्यामुळें मोगलांचा खरा इतिहास याचेपासूनच सुरूं झाला आहे. याच्या जन्मापूर्वीं म्हणजे सुमारें दहाव्या शतकापर्यंत मोगल हें नांव सुद्धां कोणास ठाऊक नव्हतें. एव्हांपर्यंत हे लोक चीनची प्रजा म्हणून राहत असत. यांचा पहिला सरदार चीनपासून स्वतंत्र होऊन सन ११७५ मध्यें मरण पावला. त्यावेळीं त्याचा तेमुजिन नांवाचा मुलगा फक्त तेरा वर्षांचा होता. परंतु हाच मुलगा फार पराक्रमी निघाल्यावर त्यानें सन १२०६ मध्यें मोगलांची प्रचंड सभा भरवून चंगीझखान हें मोठें नांव धारण केलें, व तोच आपला चरित्र—नायक होय. आरंभीं आरंभीं यानें तातार लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यांस जिंकून आपलें बळ वाढविलें, व मग फार मोठी फौज तयार करून तिला कवायत वगैरे शिकविली, आणि पुढें या फौजेच्या जोरावर तो भराभर देश जिंकीत चालला. सन १२१० पर्यंत पूर्वेस पूर्वसमुद्र, पश्चिमेस कास्पियन समुद्र व उत्तरेस व्होल्गा नदी, इतका प्रदेश त्यानें सहज जिंकिला; आणि नंतर त्याची दृष्टि दक्षिणेकडेस वळली व लागलीच बुखारा, काबूल, कंदाहार, खुरासान हे तिकडील प्रांत त्यानें सर केले. यानंतर त्यानें आपला मोर्चा इराणाकडे वळविला व तो देशही हस्तगत केला. त्यावेळीं चंगीझखानाशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य काय तें चीनलाच होतें, म्हणून एकदां चीनवर स्वारी करण्याचें मनांत आणून चंगीझखान चीनची प्रचंड भिंत ओलांडून आपलया फौजेसह चीनांत एकदम शिरला व त्यानें पेकिन राजधानी काबीज केली आणि चीनचा उत्तर भाग आपले राज्यास जोडून दिला. तिकडे यूरोपखंडांतही जमिनीवर जितके दूरपर्यंत जातां येईल तितके दूरपर्यंत चंगीझखानाचें सैन्य मुलूख काबीज करीत गेलें. अफगाणिस्तानांत खारिजम् प्रांतावर सेल्जुक सुलतान महंमद हा राज्य करीत होता. याच्या ताब्यांत अरबस्तान,

तुर्कस्तान, इराण हे देश मोडत असत. तत्कालीन पद्धतीप्रमाणें याचें राज्य बरेंच सुधारलेलें असल्यामुळें चंगीझखानाच्या रानटी टोळधाडीचा आपणांस उपद्रव होण्याची त्यास मुळींच भीति वाटत नव्हती, व म्हणून त्यानें चंगीझखानाच्या लोकांस आपल्या राज्यांत थारा देण्याचें नाकारिलें. यावरून चंगीझखानानें आपले वकील सेल्जुक सुलतान महंमदाकडे पाठविले व नुकसान भरपाईची मागणी केली. सेल्जुकनें उलट त्या वकीलांचाच शिरःच्छेद केला व चंगीझखानाशीं लढण्यास आपली फौज एक लाखपर्यंत वाढवून जय्यत तयारी ठेविली. चंगीझखानास ही बातमी समजतांच त्यानें सात मुलांस बरोबर घेऊन सात लाख फौजेसह सेल्जुकवर स्वारी केली, व त्याशीं भयंकर युद्ध करून त्याचा पूर्णपणें पराजय केला.

२ चंगीझखान हा अत्यंत शूर, धाडसी आणि महत्त्वाकांक्षी होता. याच्याइतका बलाढ्य, क्रूर व निर्दय मनुष्य कोणीच झाला नसेल. तो एक मूर्तिमंत राक्षसच होता असें म्हटलें तरी चालेल. याच्या लष्करा- एवढें मोठें लष्कर पृथ्वीवरील कोणाही एका राजाच्या ताब्यांत आजपर्यंत नव्हतें. या लष्कराच्या जोरावर त्यानें जवळ जवळ सगळें जग जिंकिलें. त्याच्या राज्याची लांबी साडेपांच हजार मैल व रुंदी तीन हजार मैल होती; म्हणजे त्याच्या राज्यांत आपल्या हिंदुस्थानासारखे पांच देश सहज सामा- वतील. चंगीझखान इतका अडाणी होता कीं, तो विद्येची व धर्माची चेष्टा करी. आशिया खंडांतील अत्युत्तम पुस्तकालयांतील पुस्तकांचा उपयोग त्यानें आपल्या घोड्यांकरितां मऊ बिछाने करण्याकडे केला. एकदां त्यानें बायबलांची होळी केली. बुखाऱ्याच्या मशीदींत कुराणही त्यानें घोड्याकडून तुडविलें. 'अग्निप्रलय पुरवला पण चंगीझखानाची धाड नको,' असें लोकांना झालें होतें. हिंदुस्थानावर मात्र चंगीझखानानें स्वारी केली नाहीं; कारण त्याला तशी सवडच मिळाली नाहीं.

३ चंगीझखान १२२७ त कास्पियन समुद्राचे कांठीं मरण पावला. तो मेल्यानंतर त्याच्या आत्म्याच्या सेवेला कोणी तरी पाहिजे म्हणून त्यावेळीं

चाळीस कुमारिकांना बळी देण्यांत आलें! असें सांगतात कीं, आपल्या आयुष्याच्या शेवटच्या वीस वर्षांत त्यानें एकंदर एक कोटी चाळीस लक्ष माणसांची कत्तल केली. चंगीझखानानें मरणसमयीं आपलें राज्य ओक्ताईखान, तुलुईखान, जूजीखान आणि झगताईखान अशा आपल्या चारही मुलांस वांटून दिलें. चंगीझखानाच्या मृत्यूनंतर बरोबर तीनशें वर्षांनीं पानिपतच्या लढाईंत विजयी होऊन हिंदुस्थानावर मोगलांचें राज्य स्थापन करणारा बाबर हा बापाकडून तैमूरलंगाचा व आईकडून याच चंगीझखानाचा वंशज होता, म्हणून त्याच्या राज्यास मोगली राज्य म्हणतात.

## ४ अहल्याबाई.

जन्म इ. स. १७२५. मृत्यु तारीख १३-८-१७९५

देवि अहल्याबाई जालीस जगत्त्रयांत तूं धन्या ।
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजी ऐकिली कन्या । मोरोपंत.

देवी अहल्याबाई या साध्वीचें नाम उच्चारितांच प्रत्येकाच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते. कधींही मनुष्याची स्तुति करावयाची नाहीं अशी ज्या मयूरकवीची प्रतिज्ञा होती, त्यानें सुद्धां या बाईस 'देवी' असें उपपद प्रथम लावून तिची सात आठ आर्यांत स्तुति केली आहे. या बाईचें चरित्र आतां आपणांस सादर करावयाचें आहे. परंतु त्यापूर्वी ज्या होळकर घराण्यांत ही नांवारूपास आली त्याची अल्प माहिती प्रथम देतों. कारण होळकर घराण्याची अशी संक्षिप्त माहिती येथेंच दिल्यानें अहल्याबाईच्या कारकीर्दीची चिकित्सा वाचकांस सुलभतेनें करितां येईल. व तसें झालें म्हणजे अहल्याबाईची थोरवी सहजच लक्षांत येईल.

२ होळकरांच्या वंशावळी या नांवाचा एक लेख रा. राजवाडे यांनीं शके १८२७ च्या ज्येष्ठ महिन्याच्या सरस्वतिमंदिरांत लिहिला आहे. त्याचा

कारणापुरता उतारा टीपेंत* दिला आहे, त्यावरून हें घराणें कोठील व कोठें आलें याची छानदार माहिती मिळते. होळकरांचें मूळ आडनांव वीरकर असून गोत्र जयवसी होय. वीरवाल्हें, चितोडगड, मुंगीपयठण, वीरवोहोळ, वोहोळमुरुम, वाफगांव, कातराबाद, चांदवड, महेश्वर व इंदूर अशा दहा निरनिराळ्या ठिकाणीं या कुळांतील पुरुषांनीं वेळोवेळीं वसती करून कांहीं ठिकाणीं पाटिलक्याही संपादन केल्या होत्या. इंदूर हें यांच्या शेंवटच्या वसतीचें ठिकाण होय. राजवाड्यांनीं वंशावळीची जी यादी दिली आहे ती वृक्षाच्या रूपांत बसवून या लेखाच्या शेंवटीं दिली आहे. त्या यादींत या घराण्याचा आजपर्यंत कोणकोणत्या घराण्याशीं संबंध झालेला आहे हेंही दिसतें. या घराण्यांत मल्हारराव हा कर्ता पुरुष होय. आजचें होळकरांचें वैभव याच पुरुषानें संपादिलेलें आहे.

३ मल्हारराव होळकर तारीख २०-५-१७६६ रोजीं मृत्यु पावला. मल्हाररावाचा जन्म ४-४-१६९३ रोजीं झाला असल्यानें मरणसमयीं त्याचें वय ७३ वर्षांचें होतें असें दिसतें. त्याच्याबरोबर द्वारकाबाई व बजाबाई या दोघी स्त्रिया सती गेल्या. येथें गौतमाबाईच्या नांवाचा उल्लेख नाहीं,

* "श्रीकुळस्वामी देव खंडेराव व म्हाळसाबाई व बानाबाई, गड जेजुरी. जानोबाई, तळकोंकण. धरमपुरी भवानी तुकाइ तुळजापुरची. तिसरी यमाई कवड्याची. चौथी, राजोबाई कवड्या डोंगराची. वीरोबा म्हाळोबा दोडीदाणुरीचा. बहिरोबा सोनेरीचा. बहेरजी नायकजी चिंगयादेव तळकोंकणचा. वोहोळमुरमाची सटवाई, वाफगांवची उदेगिरी सटवाई. माणकेश्वराची सटवाई. आहायरानीं महारानीं देव खंडेरावाचे गोंधळांत कुंभारांनीं ढाहग वाजवावी. कुळ, वीरकर. वीरवाल्ह्याचा वीरकर. दुसरें आडनांव होळकर. कुळ गोत्र जयवसी देवरुसी, कपिला गोकुळ मथुरा. दुसरी वसती, चितोडगड. तिसरी वसती, मुंगीपयठण. चौथी, वीरवोहोळ. पांचवी वसती, वोहोळमुरुम, मोंगलाई आहे. सहावी वसती, वाफगांव, पाटिलकी आहे. सातवी वसती, कातरावाद मांडवगण, पाटीलकी आहे. आठवी वसती, चांदवड. नववी वसती महेश्वर नर्मदाकाठीं. दहावी वसती इंदूर."

यावरून मल्हाररावापूर्वींच गौतमाबाई मृत्यु पावली असावी असें वाटतें. कारण ही सर्वांत वडील स्त्री असून ती जर सती न जाती तर बरें दिसलें नसतें. या तिघींशिवाय मल्हाररावास हरकूबाई या नांवाची एक खांडा-राणी होती. मल्हाररावांस खंडेरावाशिवाय उदाबाई व सीताबाई अशा दोघी मुली होत्या. होळकरांच्या कुळांत मल्हाररावापर्यंत एकाही पुरुषास एकाहून अधिक स्त्रिया नाहींत. मल्हाररावापासूनच अनेक राण्या दिसतात. यावरून 'बहुधनिकत्वात् बहुपत्नीकत्वम्' हें कालिदासाचें सूत्र अक्षरशः खरें असावें असें वाटतें. असो. आतांच सांगितलेला मल्हाररावाचा मुलगा खंडेराव हाच अहल्याबाईचा पति होय. अहल्याबाईचा जन्म कधीं झाला हें खात्री-लायक सांगतां येत नाहीं; परंतु सन १७८१ च्या एका पत्रांत 'आपण पंचावन वर्षांच्या वृद्ध आहोंत' असें बाई स्वतः म्हणते, त्यावरून या बाईचा जन्म सन १७२५ मध्यें झाला हें सिद्ध आहे. इच्या जन्मासंबंधानें यापेक्षां विशेष तपशीलवार असें कांहींच वाङ्मय उपलब्ध नाहीं. माणकोजी शिंदे या नांवाचा एक धनगर जातीचा गृहस्थ औरंगाबाद जिल्ह्यांतील बीड तालुक्यांत चोंढेगांवीं पाटिलकी करून राहत असे. त्याच्या पोटीं अहल्याबाई सन १७२५ मध्यें जन्मास आली, असें आपण गृहीत धरून चालूं. ही बाई रूपानें अगदींच साधारण अशी होती. हिला दोन भाऊ व एक बहिण होती असें दिसतें. परंतु ते सर्व तिच्या हयातींतच निवर्तले. खंडेरावाचा जन्म तारीख २८-९-१७२३ रोजीं झाला. त्याच्याशीं अहल्याबाईचें लग्न तारीख १४ मे १७३८ रोजीं झालें. त्यावेळीं तिचें वय चांगलें तेरा वर्षांचें होतें. खंडेरावांस आणखी बायका होत्या व तो बराच व्यसनी होता. अहल्याबाईस सन १७४५ मध्यें देपाळपुरास मालेराव नांवाचा एक मुलगा व सन १७४८ मध्यें मुक्ताबाई नांवाची एक मुलगी अशीं दोनच अपत्यें झालीं. पुढें तिचा पति खंडेराव हा कुंभेरीच्या वेढ्यांत ता. १७-३-१७५४ रोजीं गोळा लागून मरण पावला, तेव्हां बाईचें संसार सुख संपलें. अहल्याबाई जात्याच बुद्धिमती, चौकस व धोरणी असल्यानें मल्हारराव

होळकरावर तिचें मोठें वजन बसलें. मल्हाररावाच्या हयातींतच बहुतेक कारभार तीच करित असे. अहल्याबाईवर सर्व व्यवहार सोंपून मल्हारराव निर्धास्तपणें मुलुखगिरींत गुंतलेला असे. सन १७६६ मध्यें मल्हारराव निवर्तल्यावर साहाजिकपणेंच होळकरशाहीची जबाबदारी या बाईवर आली. तिचा मुलगा मालेराव हा वेडसर असून तोही मल्हाररावानंतर एकच वर्षानें ता. २७-३-१७६७ रोजीं इंदूर येथें वेडाच्या लहरींत आरोळ्या मारून मारून मृत्यु पावला. त्याच्या मृत्यूची हकीकत प्रसंगानुसार पुढें येणारच आहे. त्यासमागमें त्याच्या दोघी स्त्रिया सती गेल्या. पुढें अहल्याबाईची ही दुःखद व असहाय स्थिति पाहून होळकराचा दिवाण चंद्रचूड याच्या सल्ल्यानें राघोबानें बाईवर एकदम चाल केली; परंतु बाईनें एकदम गायकवाड, भोंसले वगैरेंचें साहाय्य तुकोजीस मिळवून देऊन राघोबास परत फिरविलें व एव्हांपासूनच बाईच्या स्वतंत्र कर्तृत्वास सुरुवात झाली. या वेळीं बाई चांगली चाळीस बेचाळीस वर्षांची असल्यानें व तिनें मराठशाहीचा अंतर्बाह्य कारभार पंचवीस तीस वर्षें पाहिलेला असल्यामुळें तिच्यावर सहजासहजीं कोणाचीही छाप बसणें शक्य नव्हतें.

४ मालेरावाचा मृत्यु होतांच दहा पंधरा दिवसांतच ही राघोबाच्या स्वारीची धामधुम झाली. यावेळीं बाई खरोखरी दुःखांत अगदीं चूर झालेली होती, पण अशा वेळींही तिनें आपलें दुःख बाजूस सारून होळकरांचें राज्य बचाविण्याचें कर्तव्य केलें, हें पाहिलें म्हणजे तिच्या कर्तव्य-क्षमतेची तारीफच करावीशी वाटतें. इतकें झालें तरी आनंदीबाई १७७४ मध्यें धारेच्या किल्ल्यांत येऊन राहिली तेव्हां तिला अहल्याबाईनें शक्य ती मदतच केली. राघोबानें स्वारी केली त्यावेळचा राग त्याच्या पत्नीवर काढणें बाईस मुळींच आठवलें नाहीं, यांतच तिचें साधुत्व दिसतें. यानंतर अहल्याबाईनें तुकोजीस जरी मांडीवर घेतलें नाहीं तरी एकंदर स्वाऱ्या त्यानें कराव्यात व राज्यव्यवस्था बाईनें पहावी असें ठरलें. परंतु पुढें तुकोजीस हें पारतंत्र्य न खपून त्यानें अहल्याबाईस जहागिरी देऊन स्वस्थ

बसविण्याचा बराच प्रयत्न केला, पण बाई त्याच्या बारशाला जेवलेली. तिनें त्यास मुळींच दाद दिली नाहीं. तिनें महेश्वर हें आपलें कायमचें राहण्याचें ठिकाण करून तेथील किल्ला दुरुस्त केला व त्यावर दारू गोळ्यांची तजवीज करून मोठ्या बंदोबस्तानें राहूं लागली. या व्यवस्थेनें तिला पुढें इतका आत्मविश्वास वाटूं लागला कीं, एकदां तिनें तुकोजी व महादजी या दोघांनाही युद्धास आव्हान केलें व ' उभयतां चालून आले तरी आपण कांहीं बांगड्या भरल्या नाहींत ' असें खऱ्या वीरस्त्रीस शोभतील असे उद्गार स्त्री असून काढिले. थोरल्या माधवरावानंतरचा म्हणजे नाना फडणिसाचा राज्यकारभार तिला फारसा पसंत नव्हता व नानानें हुजरात कमी केली ही मोठी चूक केली असें ती स्पष्टच बोलून दाखवीत असे. परंतु नानाच्या राजनिष्ठेबद्दल ती धन्योद्गार काढीत असे, व एकंदर पेशव्याच्या गादीबद्दल तिला फार आदर वाटत असे. तुकोजीचा कारभारी नारो गणेश हा बाईचा द्वेष करी. कारण सैन्याच्या खर्चासाठीं म्हणून बाईकडून येणाऱ्या रकमेचा हा खोटानाटा हिशेब तुकोजीस समजावून पैसे मधल्यामधें लांबवीत असे व पुनः वर बाई पैसे वेळेवर पाठवीत नाहीं अशी तकरार करीत असे. ही त्याची तकरार किती खोटी होती हें आपले सर्व हिशेब बाईनें महादजीच्या एका इसमास दाखवून महादजी शिंद्याची खात्री केली. तेव्हांपासून महादजीचें बाईविषयीं फारच चांगलें मत झालें. सारांश, बाई हिशेबांत फार चोख होती, व तिनें हा चोखपणा नाना फडणिसासही पटवून दिला होता. त्याचा प्रकार असा; सवाई माधवरावाच्या लग्नपट्टीचे दोन लाख रुपये बाईनें मागील बाकी पेटें द्यावेत असें तुकोजीनें बाईस कळविलें. तत्काळ बाईनें ' मागील बाकी कोणती ' असा उलट सवाल केला, व मागील घेणें एक कवडी निघाली तर त्याच्या पांच कवड्या देईन असें बजाविलें. पुढें तुकोजीनें आपलें म्हणणें परत घेतलें व मग बाईनें नानास रकम पाठविली. बाईच्या दानधर्माबद्दल निराळें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. पण असें होतें तरी राजकारणांत तिनें कोणाही साधु-

संताची सल्ला ऐकिली नाहीं अगर घेतलीही नाहीं. समर्थांच्या शिष्य परंपरेंतील परशरामदादा राजवाडकर हे मोठे साक्षात्कारी साधुपुरुष अहल्याबाईच्या वेळीं हयात होते. त्यांनीं एकदां स्वतः बाईकडेस नारोगणेशा-बद्दल रदबदली केली, पण बाईनें ती ऐकिली नाहीं. परंतु तुकोजीनें नारोगणेशाची पुढें जेव्हां छळणूक केली, तेव्हां बाईसच त्याची दया येऊन तिचें कोमल अंतःकरण पिळवटून गेलें. अहल्याबाई सर्वांचा विचार घेत असे, परंतु कोणाच्याच तंत्रानें चालत नसे. कामकाजही ती निरलसपणें रात्रीच्यारात्रीं जागून करीत असे. घाशीराम कोतवालासारख्यांचीं प्रकरणें नानाफडणविसाच्या कारकीर्दींत उपस्थित झालेलीं प्रसिद्ध आहेत. परंतु बाईच्या मर्जीतील म्हणून कोणीही प्रसिद्ध नाहीं व कोणाचा तसा जुलूमही आढळत नाहीं. तुकोजीचें व बाईचें पुढें फारच बिनसलें, तेव्हां सन १७७९ मध्यें तिनें पेशव्यास पंचवीस लक्ष रुपये नजराणा देण्याचें कबूल करून आपल्या मुलीचा मुलगा नथ्याबा यास दत्तक घेण्याची परवानगी घेऊन ठेविली होती. परंतु दत्तक घेतल्याचा कोठें ऊल्लेख नाहीं. कदाचित् तुकोजीला दहशत म्हणूनही हें केलें असावें. हा नथ्याबा पुढें सन १७९० मध्यें निवर्तला. सन १७९२ मध्यें बाईचा जामात निवर्तल्यानें तिची मुलगी मुक्ताबाई सती गेली, तेव्हां 'आमचें दैवीं तर दुःखेंच पहावीं' असे मोठे हृदयद्रावक उद्गार बाईच्या तोंडून निघाले आहेत. बाई आपल्या राजकीय हक्कास फार जपत असे. ठरावापेक्षां अधिक खंडणी तिनें कधीं पेशव्यास दिली नाहीं, व महादजीच्याही मदतीसाठीं म्हणून अधिक फौज पाठविली नाहीं. परंतु ती सर्वांचा परामर्ष यथायोग्य घेत असे. आप्त, स्वकीय व शास्त्रीपंडित यांस जरूर ती मदत वारंवार बाई करीत असे. मल्हाररावाच्या मृत्यूच्यावेळीं त्याजवळ चाळीसकोट रुपये शिल्लक होते असें म्हणतात. ते बाईस एकदम मिळाले व त्यांच्याच लोभानें राघोबानें बाईवर स्वारी केली होती. हें सर्व द्रव्य तिनें धर्मादायांत खर्च केलें असें दिसतें. बाईचा खासगीचा खर्च सालीना फक्त दोन लक्ष रुपयांचाच होता.

तुकोजी पुढें अर्धांग वायूनें अपंगही झाला व व्यसनीही बनला होता हें पाहून, होळकरांच्या दौलतीची आपल्या पश्चात् वाताहत होईल असें बाईस वाटत असे, व त्यामुळें ती फार कष्टी असे. तुकोजीचा मुलगा मल्हारराव तरी आपल्या आज्ञेंत सन्मार्गानें वागेल असें वाटून तिनें त्यास आपल्याजवळ ठेवून त्याचें लग्न वगैरे केलें. पण तो तर दुर्व्यसनांत 'बापसे बेटा सवाई' असा निघाला. यामुळें बाईस किती वाईट वाटत असेल याची कल्पनाच करावी. अहल्याबाईचें लग्नापूर्वीचें वय किती सुखांत गेलें हें कळण्यास आपणाजवळ कांहीं साधन नाहीं. पण त्यानंतरचें तिचें आयुष्य आरशासारखें आपणांपुढें आहे. एका दुर्व्यसनी व लहरी पुरुषाशीं तिचें लग्न झालें, एकदोन मुलें होतांच ऐन तारुण्यांत तिला वैधव्य प्राप्त झालें, मुलगा होता पण तोही वेडाच होता. आपल्या वाड्यांतील एका कुणबिणीशीं गांवांतील एका शिंप्याचा कांहीं वाईट संबंध आहे अशा नुसत्या संशयानें त्या शिंप्यास त्यानें एके दिवशीं ठार मारून टाकिलें. पण पुढें हें कृत्य फार वाईट झालें असें त्यास वाटून तो आजारी पडला, व वायूच्या लहरींत मोठमोठ्यानें आरोळ्या मारूं लागला व म्हणूं लागला, 'मी तुझा भयंकर रीतीनें सूड घेईन.' हे शब्द त्या मरून गेलेल्या शिंप्याच्या तोंडचचें असावेत व तो शिंपी समंध होऊन आपल्या पुत्रास छळतो, असें वाटून बाईनें त्यास परोपरीनें समजाविलें. पण तो स्पष्ट म्हणे, "मी निरपराधी असतांना मला तुझ्या मुलानें कां मारिलें? मला आतां दुसरें कांहीं एक नको. मी जिवास जीव बळी घेईन तेव्हां तृप्त होईन!" व शेवटीं तारीख २७ मार्च सन १७६७ रोजीं तो निवर्तला. बरें हा मुलगा जिवंत असतांना याच्यापासून बाईस सुख होतें म्हणावें तर तसेंही नाहीं. हा असा अर्धवटच असल्यानें सर्वांसच फार छळीत असे. ज्या ब्राह्मणांस अहल्याबाई पूज्य मानीत असे व दानधर्म करीत असे त्यांसच तो नानाप्रकारें त्रास देत असे. 'तो ब्राह्मणांस वस्त्रें, जोडे, भांडीं इत्यादि जिन्नस दान द्यावयास मोठ्या अगत्यानें बोलावी, पण तीं दानें त्यांस देण्यापूर्वीं

तो त्यांत विंचवासारखे विषारी प्राणी घाली. मग लोभी ब्राह्मणांनीं हीं दानें घेतलीं व दंश झालेले ह्या स्वारीनें पाहिलें कीं, त्यास वाटे, झालें! आपलें काम सोळा आणे फत्ते झालें! मग त्यास आनंदाच्या उकळया फुटत......' हे पुत्राचे चाळे पाहून अहल्याबाईचें कपाळ उठे. यापासून तिला अतोनात दुःख होई. या प्रकारांत तिचें दुहेरी दुःख असे. एक तर प्रजेचा विनाकारण छळ होत असे व दुसरें, स्वतःच्या मुलाचे वेडेचार. असे प्रकार झालेले ऐकलें कीं, तिनें कपाळास हात लावून म्हणावें, 'माझेंच मुळीं नशीब खोटें! नाहीं तर असला कुलदीपक माझ्या पोटीं कशाला जन्मास येता!" असें मुलाचें वर्णन पुरुषोत्तमानें आपल्या अहल्याबाईचें चरित्रांत केलें आहे. हा मुलगा असा दुष्ट असल्यानें अहल्याबाईनेंच त्याला हत्तीच्या पायीं देऊन मारून टाकिलें, असा एक लोकप्रवाद प्रचलित आहे, पण तो सर्वस्वी खोटा आहे. तो मुलगा आपल्या मृत्यूनेंच मरण पावला हें वर दिलेल्या हकीकतीवरून उघडच होत आहे. मुलगा निवर्तल्यानंतर बाईस राजकारणाची चिंता रात्रंदिवस वहावी लागली. पुढें तिचा जांवई निवर्तला व मुलगी मुक्ताबाई सती गेली. तिचे भाऊ व बहिणीही तिच्या देखतच हा लोक सोडून गेले. सारांश, विवाह झाल्यानंतर पुढील सर्व आयुष्य तिनें दुःखांत काढिलें; तथापि आपलें कर्तव्य कधींही बाजूस सारिलें नाहीं. अठराव्या शतकाचें शेंवटलें दशक ह्या हिंदुस्थानांत फार भयंकर गेलें. प्रसिद्ध कवि मोरोपंत, हरिपंत फडके, महादजीशिंदे, सवाईमाधवराव, अहल्याबाई, तुकोजी होळकर, नाना फडणवीस हीं सगळी कमीअधिक प्रमाणानें कर्तीं माणसें याच दशकांत निवर्तलीं व यांचे जागीं आलेलीं माणसें अगदींच निराळ्या प्रकृतीचीं होतीं. असो. अहल्याबाई शेंवटीं कांहीं दिवस आजारी पडून तारीख १३ ऑगस्ट सन १७९५ रोजीं आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षी निवर्तली. बाईनें आपल्या हयातींत अनंतफंदीला सन्मार्गाला लाविलें, राघोबाला रणांगणांतून परत फिरविलें, प्रजेला आपल्या मुलाप्रमाणें वागविलें, धर्मराजाप्रमाणें सर्वांस सारखा न्याय दिला, व प्रभासपट्टण येथें सन १०२४मध्यें

नाश पावलेल्या सोमनाथाच्या मूर्तीची पुनः स्थापना केली. अहल्याबाईनें लोकांच्या सोईसाठीं जागोजाग अन्नछत्रें, धर्मशाळा, तळीं, विहिरी व रस्ते बांधिले आहेत. तिनें काशीविश्वेश्वराचें मंदिर व गया येथील विष्णुपदाचें मंदिर यांचे जीर्णोद्धार केले, आणि कलकत्यापासून तों काशीपर्यंत भला थोरला रस्ता बांधिला. अहल्याबाईच्या औदार्याचा मासला तिच्या संस्थानांतच पहावयास मिळतो असें नाहीं, तर तो सर्व हिंदुस्थानांत मिळतो. या सर्व ठिकाणीं प्रतिवर्षी धर्मादायाबद्दल पैसा पाठविला जातो. यांपैकीं पुष्कळ ठिकाणीं तिचीं अन्नछत्रें अजून आहेत. तिनें बांधिलेल्या देवळांपैकीं कांहीं कांहीं तर फारच प्रेक्षणीय आहेत. हर्दा-हंडियाजवळ नेमावरांत तिनें जें एक देऊळ बांधिलें आहे, त्याची रचना अत्यंत नेत्रमनोहर असून, तें बाईचा इंग्रजी चरित्रकार जो मालकमसाहेब यास तर फारच आवडलें होतें. असो. आपल्या हिंदुस्थानांत अलीकडेस ज्या पुण्यशालिनी स्त्रिया होऊन गेल्या त्यांत अहल्याबाईचें नांव अग्रस्थानीं नेहमीं घालण्यांत येतें, तें किती योग्य आहे हें तिच्या या संक्षिप्त चरित्रावरून सहज कळेल. अहल्याबाई-बद्दल मालकम असें म्हणतो, 'बाईचें चरित्र अत्यंत अलौकिक आहे. ती स्त्री असून तिच्यांत अहंमन्यता मुळींच नव्हती. तिला धर्माचें वेड विलक्षण होतें. पण असें असूनही तिच्या ठायीं परधर्मसहिष्णुता तितकीच होती. तिच्या देवभोळेपणाची शिकस्त झाली होती; तथापि आपल्या हाताखालील लोकांस जेणेंकरून सुख होईल या शिवाय इतर विचार तिनें मनास शिवूं दिले नाहींत. तिनें अनियंत्रित अधिकाराचा उपयोग फारच दक्षतेनें व काळजीपूर्वक केला. ह्या कामीं तिची नम्रवृत्ति कायम असून मनुष्यानें आपल्या सदसद्विवेकबुद्धीचे आदेश पाळणें जितकें शक्य होतें तितकें तिनें पाळिलें. तिचें स्वतःचें आचरण इतकें जाज्वल्य होतें, पण तें स्वतःपुरतेंच असून ती दुसऱ्याच्या दोषांबद्दल क्षमावृत्तीच धारण करीत असे.'

# होळकरांचा वंशवृक्ष.

१ मळिबा × भागाबाई रायज्याची मुलगी.

२ गोविंदा स्त्री गंगाबाई कातरकरांची. — गोपाळा × राधाबाई पाडेयाची.

३ भवानी स्त्री भवानीबाई ज्याडकराची.

४ खंडूजी स्त्री गंगाबाई बारगळाची.

५ महादबा स्त्री रमाबाई वणव्याची.

६ भिकाजी स्त्री राहीबाई लांबहात्याची. — लक्ष्मीबाई.

७ सतूजी स्त्री सताऊ भिवयाची.

८ काशीबा स्त्री कोंडाऊ सिंद्याची. — यमूबाई.

९ मल्हारी स्त्री बाळाबाई वैदाची. — मुक्ताबाई.

१० बापूजी स्त्री बगाऊ सेळंक्याची. — सकूबाई.

११ तुकोजी स्त्री ताराबाई वाघ्याची. — यमूबाई. — भागाबाई.

१२ बजाजी ऊर्फ मालजी स्त्री रमाबाई शिकऱ्याची. — गंगाजी. — यमुनाबाई

१२ बजाजी.

१३ महादवा स्त्री गंगाबाई. चांभारगोंदे व मुंगीपयठणास गेलें.
गोविंदा स्त्री गजराबाई भागवताची. हे कातरबाद व मांडवगणास राहण्यास गेले.
सतूजी ऊर्फ देंगूजी स्त्री द्वारकाबाई बुध्याची. हा वीर वाल्ह्यास राहिला वोहोळ मुरुम वाफगांवासीं.
मुक्ता.
भवानी.

१४ खंडूजी स्त्री गंगाबाई उर्फ जिऊबाई गवळ्याची वाफगांवीं.
काशीबा कातराबाद मांडवगणास.
मालजी गोंयांस.
जिवाजी वाफगांव,
राहीबाई.

१५ मल्हारराव स्त्री १ गौतमाबाई, २ बनाबाई, ३ द्वारकाबाई, ४ हरकूबाई खांडाराणी.

१६ खंडेराव स्त्री १ अहल्याबाई शिंद्याची. २ पाराबाई वाघाची. ३ प्रीताबाई. ४ सुरताबाई ५ खांडाराणी पोपाबाई.
उदाबाई.
सीताबाई.

१७ मालेराव स्त्री मयनाबाई बहाडाची. २ प्रीताबाई वाघाची
मुक्ताबाई.

१८ तुकोजी ( जानोजीचा मुलगा अहल्याबाईनें ओटींत घेतला. ) स्त्री रखमाबाई शिकऱ्याची. २ रखमाबाई मदकराची, ३ कृष्णाबाई. ४ राधाबाई लांबहात्याची. ५ देऊबाई मेंदल्याची. ६ यमूबाई.

१८ तुकोजी स्त्री रखमाबाई शिकऱ्याची

काशीराव स्त्री १ अनपुरनाबाई, २ आनंदीबाई रावज्याची, ३ अनाईबाई दगड्याची, ४ लक्ष्मीबाई बुध्याची. — भागाबाई.

१८ तुकोजी स्त्री २ रखमाबाई.

मल्हारराव स्त्री जिज्याबाई रावळयाची.

१८ तुकोजी स्त्री ३ कृष्णाबाई.

१९ विठोबा स्त्री नरबदाबाई, २ रेवाबाई रावळयाची, ३ रमाबाई. — यशवंतराव — चिमाबाई.

२० हरिराव ( दत्तक. ) स्त्री गहिनाबाई भागवताची २ चिमाबाई ऊर्फ गहेनाबाई गिरण्याची, ३ हिरकाबाई. — मैनाबाई

२१ खंडेराव ( दत्तक. ) स्त्री देऊबाई रावळयाची. २ कडाबाई रावळयाची. ३ लाडाई फणशाची. ४ तुळसाबाई. ५ मासाहेबा. — सकूबाई.

मल्हारराव स्त्री जिजाबाई गांवड्याची, २ लक्ष्मीबाई खांडाराणी अम्हेडकराची ३ गौतमाबाई गाढव्याची. — भीमाबाई. — २२ तुकोजी

२१ खंडेराव

२२ तुकोजी ज्ञानेश्वर भाउसाहेबांचा पुत्र ( मासाहेबांनीं ओटींत घेतला. )
स्त्री रखमाबाई गिरण्याची, २ लक्ष्मीबाई खांडाराणी अम्हेडकरांची. ३ म्हाळसाबाई गुंडाची.
४ भागीरथीबाई फणशाची. ५ राधाबाई खिकऱ्याची. ६ पार्वतीबाई गुंडाची.

यशवंतराव.

२३ शिवाजीराव स्त्री वाराणसीबाई मतकराची.

सीताबाई सावित्रीबाई. भीमाबाई ठकूबाई.

२३ शिवाजीराव स्त्री २ गिरजाबाई बनसुड्याची.

लीलाबाई

२३ शिवाजीराव स्त्री सरस्वतीबाई गांवड्याची.

सुंदराबाई. २४ तुकोजी महाराज स्त्री चंद्रावती महाराणी साहेब गावडेयांची.
२ इंदिराबाई छोट्या महाराणी इंजिनियर यांची. वर्तमान १९२५

# ५ खंडो बल्लाळ.

जन्म, इ. स. १६६८.   मृत्यु, तारीख १[illegible]-९-१७२१.

दाता, वक्ता, योद्धा, तेजस्वी, मानधन, असामान्य;
अतुळें पितृप्रसादें मंडित देवव्रता असा [illegible]. मोरोपंत.

१ शिवाजीमहाराजांचा सर्वप्रसिद्ध चिटणीस बाळाजी आवजी ह्यास दुसऱ्या बायकोपासून दोन मुलगे झाले. त्यांपैकीं वडील मुलाचें नांव खंडोबा असून दुसऱ्यास निळोबा म्हणत असत. बाळाजी आवजीस पहिल्या बायकोपासून आवजी नांवाचा मुलगा झाला होता. संभाजीनें बाळाजी आवजीबरोबर हत्तीच्या पायीं दिलेला बाळाजीचा हाच मुलगा होय. बाळाजीच्या बापासही हबशानें अशाच प्रकारानें मारविलें होतें. बाळाजीस खंडोबा नांवाचा एक काका होता. तोही हबशाच्या रागास असाच बळी पडला. बाळाजीनें ह्या आपल्या काकाचेंच नांव आपल्या एका मुलास ठेविलें होतें व तोच आपला चरित्रनायक होय. मराठी साम्राज्याच्या इतिहासांत खंडोबल्लाळाची कामगिरी अनुपमेय अशी आहे म्हणून तिचें वर्णन या चरित्रांत यावयाचें आहे.

२ खंडो बल्लाळाचा जन्म इ. स. १६६८ मध्यें झाला. संभाजीचा प्रसिद्ध दिवाण कलुषा ह्याच्या मनांतून बाळाजीचा निर्वंश करावा असें होतें. थोरल्या मुलासह त्यानें बाळाजीस मारविल्यावर खंडो बल्लाळ व निळो बल्लाळ ह्यांस वाघाच्या तोंडीं द्यावयाचें ठरविलें होतें, परंतु मराठी साम्राज्याच्या सुदैवानें कलुषाचा हा दुष्ट बेत सिद्धीस गेला नाहीं. ह्याला मुख्य कारण संभाजीची पत्नी येसूबाई होय. कारण तिनें ह्या बाबतींत आपल्या पतीची चांगलीच कानउघाडणी केली. ती म्हणाली, 'बाळाजीला मारविलें हें आपण खरोखरीच ह्या राज्याचें नुकसान केलें. राज्याच्या अभिवृद्धीला जे पुरुष कारणीभूत झाले त्यांना निभवून घेण्यांतच भूषण असतें. त्यांना मारून टाकिल्यानें जिवावर उदार होऊन राज्याची नोकरी करण्यास दुसरें

लोक पुढें येत नाहींत.’ येसूबाईच्या उपदेशानें संभाजीला कृतकर्मांचा पश्चात्ताप झाला. मद्याच्या धुंदींत संभाजीच्या हातून बरेच अत्याचार होत असत. परंतु ती धुंदी उतरून गेल्यावर येसूबाईच्या उपदेशाचा तात्पुरता तरी त्याच्या मनावर परिणाम होत असे. बाळाजीला मारिलें हें आपण बरें केलें नाहीं असें वाटून त्यानें खंडो बल्लाळाची मुक्तता केली व बापाचा चिटणिशीचा दरख त्यास दिला; इतकेंच नव्हे, परंतु चिटणिसांच्या घरावरील जप्ती उठवून तें पुन्हां खंडोबाच्या स्वाधीन करून दिलें, व तेव्हांपासून खंडोबापासून चिटणिशीचें काम घेण्याची सुरुवात झाली. ह्या वेळीं खंडोबाचें वय अवघें १३-१४ वर्षांचेंच होतें. खंडोबाकडून चिटणिशीचें काम विशेषतः येसूबाईच घेत असे. राजमहालांतसुद्धां खंडोबास फार जपून वागावें लागे, कारण संभाजीचा स्वभाव अत्यंत क्रूर होता हें त्याला ठाऊक होतें. राजमहालामध्यें खंडोबा कधीं वर मान करीत नसे. आपली दृष्टी आपल्या पायाकडेच ठेवून राजमहालांत तो वागत असे. कारण त्याला नेहमीं असें वाटत असें कीं, इकडे पाहिलें तिकडे पाहिलें एवढ्याच निमित्तानें कदाचित् आपणांस प्राणास मुकावें लागेल. राजमहालांतून जाऊन घरीं आल्यावर आपला पुनर्जन्म झाला असेंच प्रत्येकवेळीं त्यास वाटे. सारांश, असि–धाराव्रत म्हणून ज्याला म्हणतात, त्या व्रताच्या आचरणांतच खंडोबा लहानाचा मोठा झाला होता. संभाजीची स्वारी नित्य शिकारीस जाई. त्याच्या बरोबर खंडोबास कमरेला कलमदान लावून व बगलेंत दहापांच कोरे कागद घेऊन चिटणिशीचा दरख संभाळण्यासाठीं धांवावें लागे. ह्यावेळीं जरी खंडोबा चिटणिशीचा दरख संभाळीत होता तरी चिटणिशीचें सर्व उत्पन्न त्यास मिळत नव्हतें; तथापि त्याचा मामा विसाजी शंकर यानें खंडोबाचें कोणत्याही प्रकारें कमी पडूं दिलें नाहीं. एकदां संभाजीची स्वारी फिरतीवर निघाली असतांना नित्याप्रमाणें खंडोबा त्याचे बरोबर होता. इतक्यांत रस्त्यांतच जासुदानें कांहीं पत्रें महाराजांस आणून दिलीं. त्यांचा जबाब तत्काळ लिहिण्यास संभाजीनें खंडोबास आज्ञा केली, व आपण पुढें

चालता झाला. पत्रांचा जाब वगैरे लिहून पत्र रवाना करण्यास अर्थात्च कांहीं वेळ लागला, परंतु तेवढ्या वेळांत स्वारी दोनतीन मैल पुढें निघून गेली. त्यामुळें खंडोबास धांवत जाऊन पालखी गांठावीं लागली. परंतु ह्या श्रमानें खंडोबास लागलीच रक्ताची उलटी झाली. हें पाहून संभाजीनें त्यास स्वारींत फिरण्यासाठीं घोड्याची आसामी करून दिली. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं संभाजीनें गोंव्यावर स्वारी केली. त्यावेळीं इतरां-बरोबर खंडोबानेंसुद्धां मोठ्या बहादरीनें समशेर गाजविली. ह्या स्वारीच्या-वेळीं सर्वांसच असें स्पष्ट दिसून आलें कीं, चिटणिशी करीत असतांना जितक्या सफाईनें खंडोबा लेखणी चालवीत असे, तितक्याच सफाईनें युद्धाच्या गर्दीमध्यें तो तरवारही चालवूं शकत असे. ह्याप्रमाणें खंडोबा दिवसेंदिवस आपली हुशारी दाखवीत थोर पदास चढूं लागला. एकदां संभाजीची स्वारी संगमेश्वरीं असतां त्याची पत्नी येसूबाई तिकडे जाण्यास निघाली, इतक्यांत रस्त्यांत मोगल सरदारानें त्यांच्यावर छापा घालून त्यांना पकडण्याचा घाट घातला. ही हकीकत खंडोबास कळतांच तो मोठ्या विचारांत पडला. परंतु लागलीच खंडोबानें आपली मावस बहीण संतूबाई हिला येसूबाईच्या ऐवजीं पालखींत बसवून पालखी रवाना करण्याची तयारी केली. इतक्यांत मोगलांचा हल्ला आलाच व ते संतूबाईस येसूबाई समजून घेऊन गेले. येसूबाईच्या ऐवजीं बसतांना संतूबाईनें तत्काळ हिरकणी खाल्ली असल्यामुळें तिची अब्रू वांचली. सारांश, खंडोबानें अशा प्रकारानें स्वराज्याची सेवा उत्तरोत्तर चढत्या प्रमाणावरच केली आहे.

३ संभाजीच्या पश्चात् स्वराज्यावर फारच मोठें अरिष्ट कोसळलें होतें. सर्वांच्या अनुमतीनें राजारामाची स्वारी जिंजीकडे जाण्यास निघाली. त्यावेळीं जी थोडी विश्वासांतील मंडळी राजारामाबरोबर होती, त्यांत खंडोबा हा एक होता. विशाळगडावरून सर्वांसच गुप्तपणें जावयाचें असल्यानें सर्वांनीं लिंगाईत कापडकऱ्यांचा वेष घेतला होता. ह्यावेळीं राजारामा-बरोबर खंडो बल्लाळ, निळो येसाजी, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, सेकजी गायकवाड व रंगाजी भोसले,

इतकीच निवडक मंडळी होती. ह्या सर्वांनीं देषांतर करून निरनिराळ्या रस्त्यांनीं पहांटेस रस्ता चालावयास लागून रात्रीं टरलेल्या ठिकाणीं जमून दिवसभराचा आपला कार्यक्रम सांगावा, असा दररोजचा संकेत ठरलेला होता. राजारामाच्या शोधासाठीं मोगलही आपली शिकस्त करीत होते. अशा या धांवपळींत व लपालपींत, एकदां राजारामास मोगलांनीं ओळखलें व त्यांस पकडण्याचा घाट घातला. त्याला कारण असें झालें कीं, एकदां रात्रींच्या वेळीं राजाराम शौचास जाऊन आल्यावर धनाजी जाधवानें त्याच्या पायांवर पाणी घातलें. पाणी घालणारा इसम नोकर असला पाहिजे, व पाणी घालून घेणारा इसम धनी असला पाहिजे व तो धनी म्हणजे राजारामच होय, असा राजारामाच्या पाळतीवर असलेल्या लोकांनीं तर्क केला आणि आपसांत कुजबुज चालवली. ही गोष्ट खंडोबाच्या लागलीच लक्षांत आली व त्या संकटांतून राजारामाचा बचाव कसा करावा, ह्या विचारांत तो मग्न झाला. इकडे कुजबुज करणारे लोक राजारामास पकडण्याची तजवीज करण्यासाठीं तेथील यवन अंमलदाराकडे गेले. हें पाहून खंडोबानें राजारामाची तत्काळ रवानगी करून दिली व पुढील संकटाला तोंड देण्यासाठीं स्वतः सज्ज होऊन बसला. ह्यावेळीं निळो येसाजी त्याच्या बरोबर असून बाकीची मंडळी निघून गेली होती. इतक्यांत मोगलांचें धरणें आलें, व त्यांनीं राजाराम तेथें नाहीं हें पाहून खंडोबल्लाळास व निळो येसाजीस यथेच्छ लाथा बुक्या मारीत पकडून नेलें व अंधारकोठडींत पांच दिवसपर्यंत कोंडून ठेविलें. ह्या पांच दिवसांत या उभयतांना अन्नपाणी मुळींच मिळालें नाहीं, इतकेंच नव्हें परंतु दुसरेही अनेक हाल सोसावे लागले. खंडोबल्लाळासारखे उपवास काढणें अथवा जिवावर बेतली असतांनाही न डगमगतां एक निश्चयानें वागणें हें तर राहूंद्या एकीकडे पण एखादें दिवशीं दोन घांस कमी झाले किंवा एकादशी झाली कीं आमची कोण धांदल उडून जाते ! मग कोठला धनी, कोठलें स्वराज्य आणि कोठलें काय ! जोंपर्यंत पदराला खार लागला नाहीं, किंवा आपल्यापर्यंत आलें

नाहीं तोंपर्यंत स्वदेशसेवा, देशबंधु, आत्मयज्ञ, स्वार्थत्याग, सत्यप्रियता, स्वदेशाभिमान, कर्तव्यजागृति, स्वराज्य–प्रेम, इत्यादि गोडगोड व चित्ता-कर्षक शब्दांची बोलण्यांत व लिहिण्यांत मोरें रेलचेल उडवून देण्यांत येते. पण किंचित् कळ सोसण्याची कां वेळ आली तर ह्या साऱ्या शब्दांचे कोशांतल्या कोशांत कसें विसर्जन होतें याचाही मासला पुष्कळ वेळां पाहण्यास सांपडतो. असो. खंडोबल्लाळादि मंडळींना यावेळीं राखेचे तोबरे सुद्धां दिले पण आपण निव्वळ जंगम कापडी आहोंत हें आपलें म्हणणें त्यांनीं अखेर पर्यंत सोडिलें नाहीं. शेवटीं त्यांना छळणारासच असें वाटूं लागलें कीं, ' हे लोक खरोखरीच कापडी असले पाहिजेत. कारण यांचा आतां प्राणच घेणें बाकी राहिलें आहे. उलटें टांगून मारणें, डोक्यां-वर धोंडे देणें, तोंडांस गरम राखेचे तोबरे लाविणें ह्या सर्व शिक्षा आपण यांस देऊन चुकलों, म्हणून आतां यांच्या नादीं लागून वेळ गमाविण्यांत कांहीं अर्थ नाहीं' असा विचार करून त्यांनीं या मंडळीस सोडून दिलें. या प्रमाणें यांची सुटका झाल्यावर हे राजारामास चंदीस येऊन मिळाले. पुढें थोड्याच दिवसांनीं खंडोबाच्या मामानें खाशास्त्रियांबरोबर खंडोबाच्या कुटुंबासही मोठ्या बंदोबस्तानें चंदीस रवाना करून दिलें. परंतु चंदीस आल्यावर खंडोबाची पत्नी म्हाळसाबाई लवकरच निवर्तली. त्या नंतर खंडोबांनीं दोन लग्नें केलीं व दोघीही स्त्रियांसह आनंदानें संसार केला. खंडोबल्लाळाची एक मुलगी मुरार बाजीच्या पुतण्यास दिली होती. राजारामानें खंडोबाच्या या जांवयास राज्यांतील पोतनिशी दिली. त्यांचेच वंशज हल्लींचे पुण्याचे पोतनीस होत. राजारामाची स्वारी जिंजीस गेल्यावर झुल्फिकार-खानानें जिंजीस वेढा दिला. जगाच्या इतिहासांत जे पांच सात प्रसिद्ध वेढे आहेत त्यापैकींच हा एक जिंजीचा वेढा होय. हा वेढा सात वर्षें होता. वेढा चालू असतांना साताऱ्यास रामचंद्रपंत अमात्याकडेस कांहीं महत्वाच्या राजकारणासाठीं राजारामानें खंडोबास रवाना केलें. यावेळीं त्याच्या बरोबर त्याचा वडील मुलगा बहिरवखंडो हा होता. तेथून परत

येतानां त्रिवेदी अरुणाचल परगण्यांत तारबियतखान नांवाच्या मुसलमान अंमलदारानें खंडोबास एकट्यासच कैद केलें. कारण बहिरव यावेळीं तेथें नव्हता. जिंजीस जाण्याची अत्यंत उत्कंठा असल्यानें या स्थितींत तो मोठ्या विचारांत पडला. यावेळीं कर्मधर्मसंयोगानें खंडोबावरील पाहरेकरी हिंदु होता. त्यास खंडोबानें मोठ्या युक्तीनें आपल्याकडेस वळवून घेतलें, तो खंडोबास सोडण्यास तयार झाला. परंतु खंडोबाच्या ऐवजीं तेथें दुसरा कोणी तरी नगास नग म्हणून पाहिजे असें त्याचें म्हणणें पडलें. खंडोबानें त्या पाहरेकऱ्याकडूनच हीं एकंदर स्थिति आपला मुलगा बहिरव यास कळवून त्यानेंच आपल्या जागीं बसावें अशी योजना केली व ती सिद्धीसही गेली. मात्र यावेळीं खंडोबानें कारागृहांतून पळून जातानां कोटावरून उडी मारल्यामुळें त्याच्या पायास मोठी इजा झाली व तो पुढें कायमचा लंगडाच राहिला. इकडे त्याचा मुलगा बहिरव यास मोगलांच्या अंमलदारांनीं मुसलमान केलें. या मुलाचें पुढें काय झालें हें कळत नाहीं. कोणी म्हणतात या मुलानें पुढें मुसलमान होतांच जीव दिला. कसेंही असो, खंडोबानें या राजकारस्थानांत एक मुलगा आणि स्वतःचा पाय अशा दोन वस्तू कायमच्या गमावल्या. असो. जिंजीचा किल्ला मराठ्यांनीं सात वर्षे लढविला. परंतु मोगल कांहीं परत फिरेनात. शेवटीं तो सोडून निघून जाण्याखेरीज राजारामास दुसरा मार्ग दिसेना. यावेळीं ज्या बाजूस शिर्क्यांची चौकी होती तिकडून पळून जावें असा विचार ठरला. पण या कामीं शिर्क्यांना अनुकूल करून घेणें अवश्य होतें. संभाजीनें शिर्क्यांचा नायनाट करण्याचा प्रयत्न केल्यानें शिर्क्यांचे कांहीं वंशज मुसलमानास जाऊन मिळाले होते व भोसल्यांचा नायनाट करण्याचा त्यांचा निश्चय होता. तात्पर्य, भोसले आणि शिर्के यांचे संबंध अशा प्रकारचे होते आणि अशा परिस्थितीमध्यें गणोजी शिर्क्यांचें मन वळविण्यास खंडोबाची योजना केली. खंडोबानें हें काम मोठ्या आनंदानें पत्करिलें. योजना धूर्तपणाची होती यांत शंकाच नाहीं. कारण दुसरा

कोणी त्याच्या जागीं असतां तर शिर्क्यांनीं त्याला तेव्हांच धुडकावूनही लाविलें असतें. पण संभाजीनें ज्याप्रमाणें शिर्क्यांच्या कांहीं पुरुषांचा वध केला होता त्याचप्रमाणें खंडोबाच्या बापाचा आणि भावाचाही बळी त्यानें घेतला होता. म्हणून शिर्के झाले तरी खंडोबास काय बोलूं शकणार होते! असा हा मोठ्या मौजेचा पेंच होता व तो बिनतोड लागूं झाला. खंडोबा रात्रींच्या वेळीं शिर्केबंधूस त्यांच्या गोटांत जाऊन भेटला व राजारामास वाट देण्यासाठीं त्यांचें मन त्यानें वळविलें. ज्या प्रमाणें सर्पाला आस्तिकाची द्वाही त्याचप्रमाणें शिर्क्यांसारख्या स्वराज्यद्रोह्यांना खंडोबल्लाळाची द्वाही मोठी रामबाण असे. राजारामास शिर्क्यांनीं वाट तर दिली परंतु तिचा मोबदला म्हणून त्यांनीं खंडोबाजवळून त्याचें दाभोळचें वतन आपल्या नांवें करून घेतलें, व खंडोबानेंही तें मोठ्या आनंदानें दिलें. सर्व-स्वावर पाणी सोडण्यास तयार व्हावें तेव्हां स्वराज्याचे सुख मिळत असतें हें तत्त्व खंडोबाच्या रोमरोमीं अगदीं भिनून गेलें होतें. असो. यावेळीं जिंजीवरून राजाराम कांहीं निवडक लोकांसह निघून साताऱ्यास आला. जनानखाना सुद्धां यावेळीं बरोबर आणिला नाहीं. जिंजीवरून राजाराम निघून जातांच झुल्फिकारखानानें आपला वाहुटा तेथें लाविला व मराठ्यांचा कबिला कैद केला. यांत खंडोबल्लाळाची मंडळीही कैद झाली. मोगला-मध्यें सुद्धां कांहीं माणसें थोर मनाची होऊन गेलीं त्यांपैकींच झुल्फिकार-खान हा एक होता. खंडोबल्लाळाबद्दल त्याचें मन फारच अनुकूल होतें म्हणून त्यानें खंडोबाच्या मंडळीस कैदी या नात्यानें सुद्धां चांगल्या प्रकारें वागविलें. खानाच्या बेगमेचें नांव सरसबाई असें होतें. खानास मूलबाळ कांहींच नव्हतें. खंडोबास यावेळीं एक मुलगी दीड दोन वर्षांची होती तिला सरसबाई आपल्याडेऱ्यावर रोज खेळण्यास घेऊन जात असे. पुढें सरसबाईला त्या मुलीचा फार लळा लागला व या मुलीस द्याल तर तुमची कैदेंतून सुटका होईल असा निरोप खानानें खंडोबास पाठविला. निरूपाय म्हणून खंडोबाच्या मंडळींनीं खानाची ही मागणी मान्य केली व जिंजीवरून

आपली सुटका करून घेतली. परंतु पुढें लवकरच म्हणजे स. १६९९ मध्यें राजाराम निवर्तला व ताराबाईच्या तंत्रानें राज्यकारभार सुरू झाला. पुढें औरंगजेबाच्या मृत्युपर्यंत म्हणण्यासारखें असें विशेष कांहींच झालें नाहीं. परंतु औरंगजेब मरण पावतांच शाहूची कैदेंतून सुटका होऊन तो दक्षिणेंत आला. त्यास साताराची गादी मिळविण्यास बराच त्रास पडला. पण यावेळीं सुद्धां खंडोबल्लाळानेंच शाहूस उत्कृष्ट साहाय्य केलें. याजबद्दलचा उल्लेख शाहूनें खंडोबल्लाळाचे चिरंजीव जिवाजीखंडो यास दिलेल्या सनदेंत स्पष्टपणें केला आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं " आम्हीं साताऱ्यास यावयास निघालों असतां ताराबाईनीं आम्हावर फौजा देऊन सेनापति व परशराम त्रिंबक प्रतिनिधी रवाना केलें. त्या बरोबर खंडोबास दिल्हे असता स्वामीस ( म्हणजे शाहूस ) गुप्तरूपें भेटोन, सेनापति व सरदार यांच्या खातरजमा करून, सर्वांस स्वामीचें लक्षीं आणिलें. " या प्रमाणें खंडोबल्लाळानें आमरण स्वामिसेवा एक निष्ठेनें केली. शाहू खेमसावंतांशीं लढत असतांना एकदां उतरडी वरून घोड्यासह खालीं घसरला. मागें खंडोबल्लाळ होता त्यानें यावेळीं मोठें प्रसंगावधान राखून घोड्याचा तोल संभाळिला व शाहूच्या जिवावरील संकट टाळिलें. परंतु एवढी राष्ट्रसेवा करणाऱ्या पुरुषास शेंवटीं फार हालांत दिवस कंठावे लागले. कारण याची वतनें आंग्र्यांनीं लाटून घेतलीं तीं कांहीं परत दिलीं नाहींत. खंडोबल्लाळ आपल्या वयाच्या पांसष्टाव्या वर्षी म्हणजे स. १७२६ मध्यें निवर्तला. त्यांच्या बद्दल रियासतकार सरदेसाई हे असें लिहितात कीं ' एवढी राष्ट्र-सेवा करणाऱ्या पुरुषाची अखेरीस दैन्यावस्था कायम राहिल्याबद्दल खेद वाटल्याशिवाय राहत नाहीं. संसार वाढला, प्राप्ती नाहीं तसेंच दिवस कंठित होते. आपला वृद्धापकाळ. वतनपत्रें आंग्र्यांजवळून सोडविण्यास कुलाब्यास गेलें. वर्षभर राहून मोठ्या खुशामतीनें आंग्र्यांची वतनपत्रें घेऊन साताऱ्यास आले. पण कबूल केल्याप्रमाणें वतनाचा अंमल आंग्र्यांनीं चालविला नाहीं. दहा हजार रुपये देणें झालें. त्याच दिवसांत आयुष्य

सरलें. काळ झाला. कोणाचें मिंधे झालें नाहींत. किंवा स्वार्थ पाहिला नाहीं, म्हणून दैन्य राहिलें. पण हातून देशसेवा घडली. असाही बखरींतून उल्लेख आहे. याप्रमाणें या थोर राष्ट्रपुरुषाचें हें संक्षिप्त चरित्र आहे.

---

# ६ नानक.

जन्म इ. स. १४६९. मृत्यु इ. स. १५३८.

सत्पुरुषकथा अद्भुत रसदा इजलाच ह्मणतो सुरभी मी । मोरोपंत.

१. पंजाब प्रांतांतील लाहोर जिल्ह्यांत नांकाना ह्मणून एक खेडेगांव होतें. याच खेड्यास हल्लीं तलवंडी असें ह्मणतात. या तलवंडी गांवीं इ. स. १४६९ च्या वैशाख वद्य तृतीयेस पहांटेच्यावेळीं गुरु नानकाचा जन्म झाला असें शीख ग्रंथांवरून दिसतें. गुरूच्या पित्याचें नांव काळू व मातुश्रीचें नांव तृप्ता असें होतें. काळू हा तलवंडी गांवीं 'अकौंटंट' (हिशोबी कारकून) होता. हा जातीनें क्षत्रिय होता. नानकाचा जन्म जरी वैशाखांत झालेला आहे, तरी त्याचा जन्मोत्सव किंवा जयंति वैशाखांत न करितां कार्तिक शुद्ध पूर्णिमेस करितात. नानकाच्या जन्माच्या वेळची हकीकत शक्य तेवढ्या विस्तारानें शीख ग्रंथांत लिहून ठेवलेली आहे. त्याच्या जन्मकाळीं दौलतान नांवाची एक सुइँण हजर होती. दुसरें दिवशीं हरदयाळ नांवाचा जोशी या नूतन अर्भकाचे ग्रह वर्तविण्यास आला. तेव्हां रीतीप्रमाणें त्यानें मुलाच्या जन्मकाळीं घडलेल्या गोष्टींची चौकशी केली. त्यावेळीं त्याला दौलताना सुइणीनें असें सांगितलें कीं, 'हा मुलगा जन्मल्याबरोबर मोठ्यानें हंसला. एकादा शहाणा मनुष्य विद्वानांचे सभेंत विजयोत्साहानें जसें हास्य करितो व त्या हास्याचा ध्वनि जसा असतो, तसाच या बालकाच्या हास्याचाही होता.' हें ऐकून मुलास पाहण्याची इच्छा त्या जोश्यास झाली; व त्यानें मोठ्या आग्रहानें त्या बालकास बाहेर आणवून त्याचें निरीक्षण केलें.

नंतर तो ह्मणाला, ' हा मुलगा छत्रधर होईल. या मृत्युलोकांत व स्वर्गांतही याच्या कीर्तीचा डंका वाजेल. फक्त हिंदूच नव्हेत, पण मुसलमानही याचें शिष्यत्व पतकरून मोठ्या आवडीनें यास पूज्य मानितील. हा निराकार देवाचा भक्त ह्मणून प्रसिद्ध होईल; परंतु अतिशय दुःखाची गोष्ट ही कीं, याची कीर्ति ऐकण्यास मी जिवंत असणार नाहीं. ' इतकें सांगून हरदयाळ जोश्यानें त्या बालकाचें मोठ्या आवडीनें दर्शन घेतलें, व त्याचें नांव नानक ठेवावें असें सांगितलें. हेंच बालक, ह्मणजे हाच नानक, पुढें शीक धर्माचा आद्य संस्थापक झाला व त्यानें शेंकडों अनुयायी मिळविले.

२. गोकुळ–वृंदावनाचीं ज्यांनीं यात्रा केली असेल, त्यांस हें ठाऊकच असेल कीं, तेथें कृष्ण लहानपणीं खेळला कोठें? कृष्ण बसला कोठें? तो निजला कोठें? तो जेवला कोठें? वगैरेबद्दलची माहिती तेथील क्षेत्रस्थ ब्राह्मण यात्रेकरूंस सांगतात व कांहीं स्थळेंही दाखवितात. तीच स्थिति ' नांकाना ' अथवा ' तलवंडी ' गांवींही दिसते. नानकाच्या बालक्रीडांचीं स्थानें तेथेंही दाखविण्यांत येतात. गुरु नानकशहा लहानपणीं जेथें खेळत असे व परमेश्वराची भक्ति करीत असे, त्या जागीं रायबुलर नांवाच्या जमीनदारानें नानकाच्या स्मरणार्थ ह्मणून एक तलाव खोदविला होता. लाहोरचा सुभेदार झिकारखान हा होता व त्याचे हाताखालीं कौरामल नांवाचा एक मनुष्य होता. त्या कौरामलानें हें तळें पुढें फारच मोठें खोदवून बांधवून काढिलें. त्याच कौरामलानें शीख धर्माच्या प्रसारार्थ पुष्कळच मेहनत केली व त्याचा प्रसारही बराच केला.

३. नानक पांच वर्षांचा असतांनाच तात्त्विक बोल बोलूं लागला होता. पुढें सात वर्षांचा झाल्यावर त्याला रीतीप्रमाणें शाळेंत घातलें. परंतु त्याची बुद्धि, धारणाशक्ति, तर्क वगैरे पाहून त्याचा शिक्षक फारच खूप झाला. शिक्षकानें कांहीं शब्द वगैरे लिहिण्यास सांगितलें तर तो तत्काळ ते सर्व लिहून, प्रत्येक शब्दाचीं आद्याक्षरें घेऊन त्यांचीं उपदेशपर अशी एक कविता करीत असे. त्या कवितेचें तात्पर्य असें असे कीं, परमेश्वर एक आहे व

त्याचीच एकट्याची भक्ति करणें हा आपल्या मानवांचा धर्म आहे. नानकानें या वयांत केलेलीं काव्येंही शीखांचा पूज्य ग्रंथ जो ग्रंथसाहेब त्यांत सांपडतात. याप्रमाणें कित्येक दिवस नानक शाळेंत जात असे. एके दिवशीं नानक अभ्यासाकडेस लक्ष देत नाहीं, दुर्लक्ष करितो, असें पाहून त्याचा शिक्षक रागावला. तेव्हां नानकानें असें कांहीं ब्रह्मज्ञान सांगितलें कीं, तें ऐकून शिक्षक थक्क झाला; व " तुझ्यापेक्षां अधिक निदान मला तरी कांहीं येत नाहीं, " असें त्यानें त्यास स्पष्ट सांगितलें; व लागलीच नानकानेंही शाळेस रामराम ठोकला. यानंतर पुष्कळ वर्षें त्यानें विचार करण्यांत घालविलीं. नानकाच्या वेळीं शिक्षण असें ज्याला ह्मणत असत, तें कांहीं नानकास फारसें मिळालें होतें असें दिसत नाहीं. तथापि त्याला पर्शियन भाषा चांगली येत असावी, याला मात्र भरपूर पुरावा आहे ' नानकानें पर्शियन भाषेचा अभ्यास केल्यास आपण त्याला नोकरी देऊं ' असें रायबुलरनें नानकाच्या बापास अभिवचन दिलें होतें, व नुसत्या एकांतांत बसून किंवा जंगलांत फिरून अगर निरनिराळ्या फकीरांशीं वादविवाद करून अथवा नुसता विचार करून कांहीं आपल्या मुलाचें पोट भरणार नाहीं, हें नानकाचा बाप जो काळू त्याच्या पूर्णपणें लक्षांत येऊन चुकलें होतें. ह्मणून रायबुलरच्या सल्ल्याप्रमाणें काळूनें नानकास पर्शियन शाळेंत घातलें. परंतु हिंदी शाळेंत जो प्रकार घडला ह्मणून मी आतांच सांगितलें, तोच व तसाच प्रकार या नवीन पर्शियन शाळेंतही घडला. पर्शियन शब्दाचीं आद्याक्षरें घेऊन येथेंही या महापुरुषानें मोठमोठ्या तत्त्वविचारांनीं परिपूर्ण अशीं अनेक काव्यें केलीं. पुढें पुढें तर त्यानें पर्शियन भाषेंतच कांहीं काव्यें केलीं, व तीं ग्रंथसाहेबांत नमूद आहेत. पर्शियन शाळामास्तरानेंही या मुलापुढें जेव्हां हात टेकिले, तेव्हां अर्थातच त्यानें तीही शाळा सोडिली. सर्वांस व विशेषतः त्याच्या बापास आतां असें वाटूं लागलें कीं, आपला मुलगा वेडसर आहे. या समजुतीनें तर त्याला फारच दुःख झालें. नानकाचा नित्यक्रम, ह्मणजे दोन चारही वेळां बापाच्या मांडीशीं मांडी ठोकून जेवावें व सर्व दिवसभर

विचार करीत बसावें, असा चालू झाला. मुलगा निरुपयोगी घरीं बसून राहतो हें पाहून बापानें एक धंदा त्याचेसाठीं शोधून काढिला. तो असा कीं, त्यानें घरचीं ढोरें रानांत चारण्यास न्यावींत. दुसरे दिवसापासून त्याचा हा क्रम सुरू झाला. दिवसभर ढोरांनीं वाटेल तेथें चरावें व यानें मात्र एका झाडाखालीं बसून विचार करावा. नानकास जें पाहिजे होतें तें याप्रमाणें अनायासेंच प्राप्त झाल्यानें त्यास फारच आनंद झाला असेल, यांत संशय नाहीं. परंतु दुर्दैवानें हें सुख नानकास फार दिवस लाभलें नाहीं. एके दिवशीं गुरांनीं शेजाऱ्याचें शेत खाऊन फस्त केल्याची तकरार शेजाऱ्यानें नानकाच्या बापाजवळ आणिली; व पुढें ती क्रमानें रायबुलर याजकडेस गेली. रायबुलरनें नानकास बोलाविलें आणि हकीकत विचारिली. तेव्हां फिर्यादी म्हणाला, "महाराज! हा सकाळीं आपल्या ढोराबरोबर रानांत येतो खरा! परंतु ढोरांकडेस मुळींच लक्ष देत नाहीं, व एका झाडाखालीं मात्र डोळे मिटून सर्व दिवसभर बसतो. या याच्या अशा दुर्लक्षामुळेंच याच्या जनावरांनीं माझें शेत खाऊन टाकिलें; तरी याचा योग्य न्याय व्हावा." रायबुलरनें नानकास, त्याचें ह्मणणें या बाबतींत काय आहे, असें विचारिलें. तेव्हां तो म्हणाला, " फिर्यादीचें शेत माझ्या जनावरांनीं खाऊन टाकिल्याचें अगदीं खोटें आहे. परमेश्वराच्या कृपेनें याचें शेत जसेंच्या तसेंच आहे." या ह्मणण्याच्या सत्यतेसाठीं रायबुलरनें आपलीं माणसें तें शेत पाहण्यास पाठविलीं, व आश्चर्य हें कीं, तें शेत अगदीं जसेंच्या तसेंच पिकानें झांकून गेलेलें असें सर्वांस दिसलें! तलवंडीचें हें शेत अजूनही दाखविण्यांत येतें व त्याला "क्यारासाहेब" असें म्हणतात. नानकाच्या आयुष्यांतील हा पहिलाच चमत्कार होय.

४. आपला चरित्रनायक नऊ वर्षांचा झाल्यावर रीतीप्रमाणें त्याचा व्रतबंध करण्याची वाटाघाट सुरू झाली; व पुढें यज्ञोपवीत धारणापर्यंतचे विधीही हरदयाळ नांवाच्या उपाध्यायानें उरकून घेतले; परंतु मुख्य जें यज्ञोपवीतधारणाचें कर्म तें कांहीं नानक उरकूं देईना. जानवें घातल्याशिवाय

द्विज हा द्विजत्व पावत नाहीं; कारण तो जन्मतः शूद्र असतो, इत्यादि पुष्कळ वैदिक व पौराणिक प्रमाणें तेथें उपाध्यायानें सांगितलीं; परंतु नानकास कांहीं तीं पटेनात. तो ह्मणाला, " शरीरानें वाटेल तीं पापें करावींत, चोऱ्या कराव्यात, लुच्चेगिरी करावी, खोटें बोलावें, परंतु जर शरीरावरील जानवें तेथें कांहींच त्यास आड येत नाहीं, तर मग तें लुटुपटूचें बंधन पाहिजे तरी कशाला? मनसोक्त पापाचरण करणारानेंही जानवें घालावें व पुण्यशील मनुष्यानेंही तें घालावें, हें ढोंग आहे तरी काय? त्यापेक्षां दया हाच कापूस, शांतीचा दोरा, प्रसन्नचित्ताची ब्रह्मगांठ, आणि सत्याचे पदर यांनीं युक्त असें जानवें तयार करून आत्म्यास तें घालावें, हेंच हजारपटीनें श्रेष्ठ होय. गुरु नानकाच्या या ब्रम्हज्ञानापुढें हरदयाळाची घटपटादि खटपट सगळीच लटपटली, व तो निरुपाय होऊन निघून गेला. अर्थात् हा समारंभ असाच पुढें रखडला असें दिसतें. कोणाचाही आग्रह या बाबतींत चालला नसावा. निव्वळ नऊ वर्षांचें मूल! परंतु त्याचा आत्मविश्वास किती दर्जाचा होता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

५. नानकास नानकी या नांवाची एक बहीण होती. जयराम नांवाच्या इसमाशीं तिचें लग्न झालें होतें. नानकाच्या वयाच्या चौदाव्या वर्षी नानकानेंही लग्न झालें होतें. त्याच्या पत्नीचें नांव सुलक्षणी असें असून, तिचें माहेर गुरुदासपूर जिल्ह्यांतील बटाला गांवीं होतें. हें लग्न नानकाचा मेहुणा जो जयराम यानेंच जुळवून आणिलें असें कित्येकांचें मत आहे. नानकाच्या गृहस्थाश्रमाची फारशी माहिती उपलब्ध नाहीं. फक्त त्यास या कुटुंबापासून श्रीचंद व लक्ष्मीचंद असे दोन पुत्र झाले, एवढेंच प्रसिद्ध आहे. विवाह झाल्यावरसुद्धां नानकास ढोरें वळण्याचेंच काम करावें लागत असे. एके दिवशीं भर दोन प्रहरीं तो जंगलांत एका झाडाखालीं निजला होता व जनावरें इतस्ततः चरत होतीं. रायबुलर त्याच रस्त्यानें जात असतां तेथें कांहीं वेळ थांबून लक्षपूर्वक नानकाकडेस पाहूं लागला. तेव्हां त्याला असें दिसून आलें कीं, सृष्टिनियमाप्रमाणें इतर झाडांच्या पडछाया सूर्याच्या

विरुद्ध दिशेस असून ज्या झाडाखालीं गुरु नानक हा निद्रिस्थ होता, त्या झाडाची सांवली कांहीं तशी नव्हती. नानकास ऊन्ह लागूं नये अशाच रीतीनें त्याचे शरीरावर ती पडली. वस्तुत: हा ईश्वरी चमत्कारच होय ! कारण, प्रकाशाच्या विरुद्ध दिशेसच छाया पडली पाहिजे हा त्रिकालाबाधित सिद्धांत, परंतु नानकावरील झाडाची छाया याही सिद्धांतास अपवाद झाली. हें झाड अद्यापीही दाखविण्यांत येतें, व तें पूज्य समजून लोक तेथें दर्शनास जात असतात. रायबुलरनें ही हकीकत काळूस ह्मणजे नानकाच्या बापास सांगितली व त्याला बजाविलें कीं, 'नानक ही कोणीतरी सिद्ध कोटींतील व्यक्ति आहे. जगाविषयीं जें त्याचें औदासीन्य आहे व तो जो एवढा निःस्पृहपणानें वागतो, तो खरोखरीच कोणी महात्मा आहे. तूं अंतःकरणांत नानकासंबंधानें पूर्णपणें समाधान मानून घेतलें पाहिजे.'

६. नानकाचा असा क्रम कित्येक दिवस चालला, परंतु उपजीविकेस उपयोगी पडेल असा एकही धंदा त्याचे हातून होईना. त्याच्या मातुश्रीनें व तीर्थरूपांनीं त्यास पुष्कळ प्रकारांनीं सांगून पाहिलें, पण व्यर्थ. उलट तो आपलेंच तत्त्वज्ञान त्यांस सांगत असे. त्याचा एक मासला सांगतों. एकदां त्याच्या बापानें त्यास शेतकी करण्यास सांगितलें, तेव्हां तो ह्मणाला, 'उगीच जमीन खोदण्यांत काय अर्थ आहे? वास्तविक शरीराचें करावें शेत, त्यांत सत्कृत्याचें पेरावें बीं; त्याला नामामृताचें घालावें पाणी; आत्म्याला करावा शेतकरी; मग परमेश्वर निर्वाणाचें फळ त्या झाडास देईल. इतर शेतकी क्षणभंगुर व नश्वर असल्यानें अगदींच कुचकामी होय, ह्मणून मला ती पसंत नाहीं. मी ज्या प्रकारची शेतकी ह्मणतों त्या प्रकारची शेतकी मी हल्लीं करीत आहें, व तिचें फळ मला मिळेलच;' याप्रमाणें आपल्या सर्व आप्तांना निरनिराळ्या धंद्यांतील तात्त्विक विचार सांगून त्यानें ऐहिक सुखासाठीं कोणताही धंदा करण्याचें नाकारिलें. तो वेडा झाला असें समजून वैद्यासही त्याची प्रकृति दाखविली, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं.

७. नानकानें व्यापार करावा ह्मणून त्याच्या बापानें कांहीं रुपये एकदां त्याला दिले. ते घेऊन तो जात असतां रस्त्यांत त्याला कांहीं साधु भेटले. व त्यांनीं त्याजवळ कांहीं खाण्यास मागितलें. लागलीच नानकानें जवळचे पैसे खर्चून त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली. साधु फार खूष झाले, परंतु रुपये नाहींसे झाल्यानें बाप मात्र अतिशय रागावला व त्यानें त्याला घरांतून घालवून दिलें. नानक तेथून जो निघाला तो आपला मेहुणा जयराम यास अवचित भेटला. नानकाची विद्वत्ता त्याला ठाऊक होती, ह्मणून त्यानें मुख्य सुभेदार जो दौतराव याजवळ त्याची पंडित या नात्यानें शिफारस केली. त्यानेंही नानकास 'कोठाऱ्या' ची नोकरी दिली. नानकास जो पगार मिळत असे, त्यांतून स्वतःचें उदरपोषण होऊन जी बचत राहत असे, ती तो गरीबांच्या पोषणाकडेस खर्च करीत असे. याच वेळीं मर्दाना नांवाचा एक इसम नानकाचा खासगी नोकर ह्मणून त्याजवळ राहिला; व तोच पुढें त्याचा पट्टशिष्य झाला. आपल्या रामदास स्वामींचा जसा कल्याण, तसाच नानकाचा हा मर्दाना होय. हा नानकाजवळ बसून सतार वाजवीत असे व नानक भक्तिपर अशीं स्वकृत पदें म्हणत असे. नानक नेहमीं वेन नदीवर स्नानास जात असे. एके दिवशीं तो गुप्त झाला व तेव्हांच परमेश्वर त्याच्याशीं बोलला, असें ग्रंथसाहेबांत लिहिलें आहे. परमेश्वरानें या वेळीं नानकास अमृताचा पेला दिला व त्याला आपल्या मतांचा प्रसार करण्यास आपण स्वतः साहाय्य करण्याचें अभिवचन दिलें. यानंतर नानक परत आपल्या घरीं आला व एकसारखें आपल्या इष्ट देवतेचें भजन पूजन करूं लागला.

८. नानकास वेड लागलें, असें समजून एकदां त्याजवळ पुष्कळ लोक जमा झाले. तेव्हां गुरु नानक ह्मणाला, 'मला एकही खरा हिंदु अगर एकही खरा मुसलमान दिसत नाहीं. यावरून हिंदुमुसलमानांचा सध्यां नायनाट झाला आहे, असें मला वाटतें.' नानकाच्या या बोलण्याचा पुष्कळांस राग आला व त्यांनीं दौलतखानापर्यंत ही तकरार नेली. दौलतखानानें नानकास व एका मुसलमान काझीस कचेरीस बोलाविलें. काझीनें

सर्वांसमक्ष नानकास विचारिलें कीं, ' हिंदुमुसलमानांचा नायनाट झाला आहे, असें जें तूं ह्मणतोस याला आधार काय ? ' नानकानें सांगितलें, ' तूं मुसल्मान असल्यानें तूं आपला तुझ्यापुरताच प्रश्न कर; व मीही मुसलमानांचा नायनाट कसा झाला एवढेंच तुला सांगतों, ऐक. बाबा ! मुसलमान होणें कांहीं सोपें नाहीं. साधूंनीं जो धर्म उपदेशिला आहे, त्यावर प्रीति करणें व अभिमान टाकून देणें, हेंच खऱ्या मुसलमानाचें कर्तव्य आहे. मरणाची भीति त्यानें टाकिली पाहिजे. परमेश्वराच्या आज्ञा त्यानें मानिल्या पाहिजेत, व सर्वांभूतीं समदृष्टि तो जेव्हां ठेवील, तेव्हांच नानक त्यास मुसलमान ह्मणेल. एरव्हीं वाटेल तेवढ्या भोंदू दाढीवाल्यांस तो मुसलमान ह्मणणार नाहीं. ' याप्रमाणें त्यानें अनेक गोष्टी सांगितल्या. इतक्यांत काझीची निमाजाची वेळ झाल्यानें तो उभा राहून व बसून निमाज पढूं लागला. तेव्हां मध्येंच नानक एकदां त्याजकडेस पाहून हंसला. निमाज आटोपल्यावर भर दरबारांत काझीचा असा अपमान केल्याबद्दल नानकास जाब विचारण्यांत आला. तेव्हां तो ह्मणाला, ' जेव्हां हा काझी निमाजाची तालीम करीत होता, तेव्हां याचे मनांत निराळेच विचार चालले होते. हा येथें येतांना, यानें नुकतेंच झालेलें शिंगरूं मोकळें सोडिलें होतें तें परसांतील विहिरींत आतां पडेल काय ? अशी याला काळजी उत्पन्न होऊन याचें लक्ष तिकडेसच वेधून राहिलें होतें ह्मणून मला हंसूं आलें. ' काझीनें ही गोष्ट स्पष्टपणें कबूल केली, व नानकाचा जयजयकार होऊन बरेच लोक त्याचे शिष्य झाले. तुकाराम महाराज व मोरया गोसावी यांचीही अशीच एक गोष्ट प्रसिद्ध आहे किंबहुना साधुसंतांच्या अशा गोष्टी पुष्कळच असतात.

९. पुढें नानकाचें दैवी बळ पाहून दौलतखानानेंही गुरु नानकास सर्वस्व अर्पण करून आपण त्याचा शिष्य झाला. नानकानें या वेळीं आपली ' कोठाऱ्या ' ची नौकरी सोडिली व तो आपल्या मताच्या प्रसारार्थ पर्यटणास निघाला. त्याच्या बरोबर त्याचा पट्टशिष्य मर्दाना काय तो आपल्या सतारीसह होता. नानकाची स्वारी प्रथम सइदपुऱ्यास गेली; व तेथें लालू

नांवाच्या एका सुताराच्या घरीं उतरली. मलिकभागू नांवाच्या तेथील पठाण अधिकाऱ्यानें चातुर्वर्ण्यासाठीं एक मेजवानी दिली. परंतु नानक कांहीं तेथें गेला नाहीं. पुढें त्या अधिकाऱ्यानें न येण्याचें कारण नानकास विचारिलें, तेव्हां तो ह्मणाला, " मी कोणत्याही जातीचा अगर वर्णाचा नसल्यानें भोजनास आलों नाहीं. दुसरें, अशुद्ध अन्न मी खात नाहीं. फक्त शुद्ध अन्नच खातो." 'नीच जातीचा असलेला जो लालू सुतार त्याचें अन्न शुद्ध कसें व आपलें अशुद्ध कसें ?' असें भागूनें विचारिलें, तेव्हां नानकानें दोघांकडूनही ताट वाढून आणविलें व तीं ताटें झांकून ठेवून थोड्या वेळानें उघडून सर्वांस दाखविलीं. तों भागूकडील ताटांत रक्तमांस असल्याचें सर्वांस दिसलें व लालूकडील ताटांत दूध निघालें. नानकानें भागूस सांगितलें, तूं लांच रुशवत खाऊन व लोकांस दुःख देऊन द्रव्य संपादन करितोस. ह्मणून, इतर लोकांपेक्षां जरी द्रव्यानें तूं श्रीमान् असलास, तरीही प्रामाणिकपणाचा तुजजवळ अभाव असल्यानें, तुझें अन्न अगदीं निषिद्ध आहे. तें तूं आतांच पाहिलेंस. परकोकीं तुला याचा जाब द्यावा लागेल." हें ऐकून भागूस पश्चात्ताप झाला व तो नानक गुरूचा शिष्य झाला.

१०. याप्रमाणें उत्तरेस नानकाची स्वारी आपल्या मतांचा प्रसार करीत व विरुद्ध मतवाल्यांशीं वादविवाद करीत हिमालयापर्यंत गेली. कोठें धाकानें तर कोठें नम्रतेनें, कोठें वाद करून तर कोठें युक्तिप्रयुक्तीनें, कोठें मानवी अधिकारानें तर कोठें लोकोत्तर चमत्कारानें, नानकानें आपलें म्हणणें, आपलें धार्मिक मत, सिद्ध करून तें लोकांस ग्रहण करावयास लाविलें. मोठमोठे मुल्ला, मोठमोठे काझी, मोठमोठे अट्टल चोर, गठिये, मोठमोठे नास्तिकही त्याचे शिष्य बनले. या सर्व प्रवासाचा वृत्तांत फारच मजेदार आहे, परंतु तो सगळा सांगण्यास कांहीं स्थलावकाश नाहीं. एक दोन ठिकाणची चित्तवेधक हकीकत मात्र सांगतों. हरिद्वारास नानकाची स्वारी असतांना एकदां सकाळीं नदीवर स्नानास गेली. तों त्यास असें दिसून आलें कीं, शेंकडों ब्राह्मण पूर्वेकडेस ओंजळी भरभरून पाणी फेंकीत आहेत. नानकानें

असें करण्याचें कारण त्यांस विचारिलें, तेव्हां त्यांपैकीं एकजण ह्मणाला, 'आम्हीं ब्रह्मयज्ञ करितों, व आमच्या पूर्वजांस हें पाणी देतों.' नानक ह्मणाला, 'तुमचे पूर्वज कोठें आहेत?' तेव्हां तो म्हणाला, 'ते येथून कोट्यवधि कोस दूर आहेत.' पुढें नानकानें स्वतः नदींत स्नान केलें व सर्व ब्राह्मण पूर्वेकडेस पाणी फेंकीत होते तर आपण स्वत: पश्चिमेकडेस जोरजोरानें पाणी फेंकूं लागला. हें पाहून सर्वजण हंसूं लागले; व नानकास तसें करण्याचें कारण विचारूं लागले. तेव्हां तो ह्मणाला. "येथून शें-दोनशें कोसांवर माझें एक शेत आहे त्याला मी हें पाणी पोंचवीत आहें." हें उत्तर ऐकून तर लोक फारच हंसूं लागले, व नानकास वेडा ह्मणूं लागले. ते ह्मणाले. "हा किती मूर्ख मनुष्य आहे पहा! कुठें शेत? व कुठें पाणी! हें पाणी याच्या शेतास कसें पोंचणार?" हें ऐकून नानकानें सांगितलें, 'जर शेंदोनशें कोसांवर हें पाणी पोंचणार नाहीं अशी तुमची खात्री आहे, तर कोट्यवधि कोसांवर कसें पोंचेल? याचा तुह्मी कसा विचार करीत नाहीं? शेंदोनशें कोसांवरील स्थानासाठीं पाणी फेंकणारा जर नुसता मूर्ख असें तुह्मीं समजतां, तर कोट्यवधि कोसांवरील स्थानासाठीं पाणी फेंकणारे तुम्ही लोक महामूर्ख किंवा पढतमूर्खच असलां पाहिजेत! हें तुमच्याच मतानें व युक्तिवादानें नाहीं का ठरत! मग मलाच काय ह्मणून हंसतां? ज्या उद्देशानें तुह्मी पाणी फेंकीत अहां त्याकडेस तरी तुमचें एकाग्र चित्त कोठें आहे! तुह्मी हातानें पाणी फेंकण्याची क्रिया करीत असतां मनानें भलतेंच कांहींतरी चिंतीत आहांत, व ह्मणूनच हा तुमचा खटाटोप व्यर्थ आहे.' अशाच प्रकारचा पुष्कळ उपदेश केल्यावर अर्थात्च लोकांचें मत नानक गुरुविषयीं अनुकूल झालें व ते त्याचे शिष्य बनले.

११. नानकानें, काशी, गया, प्रयाग, मक्का, मदिना, इत्यादि ठिकाणच्या यात्रा केल्या होत्या. प्रथम सारखा बारा वर्षेपर्यंत त्यानें प्रवास केला; व नंतर मर्दानाच्या आग्रहावरून तो आपल्या जन्मभूमीस आला होता. तेथेंही फार दिवस न राहतां मातापितरांस भेटून तो पुनः धर्मप्रसारार्थ

निघाला. सर्व हिंदुस्थानभर त्यानें पायींच प्रवास केला होता. सिलोन-मध्यैंही तो गेला होता. मुसलमान बादशहा बाबर याचीही भेट गुरु नानकानें घेतली होती. नानक मकेस असतांना एकदां एका मशीदींत रात्रीं निजला तो आंतील कबरीकडेस पाय करून निजला. एका मुसलमानास हें खपलें नाहीं व तो फारच रागावला. तेव्हां नानकानें त्यास शांतपणें सांगितलें कीं, ‘ तुला हें जर आवडत नसेल, तर माझे पाय तूं उचलून फिरवून ठेव ह्मणजे झालें, यांत एवढें रागास येण्याचें कांहीं कारण नाहीं. ’ मुसलमानानें त्याप्रमाणें केलें, तों चमत्कार असा झाला कीं, ज्या बाजूला त्या मुसलमानानें पाय फिरविले, त्या बाजूला थडगेंही फिरून पायथ्याशीं आलें. हें पाहून तो मुसलमान फारच खजील झाला. असाच चमत्कार नामदेवाचा गुरु जो विसोबा खेचर यांनेंहीं नामदेवास दाखविल्याचें प्रसिद्ध आहे असो.

१२. नानकाचा पट्टशिष्य जो मर्दाना तो नानकाचे पूर्वींच कांहीं दिवस वारला होता. पुढें नानकानें मर्दानाची जागा त्याचा मुलगा जो शहाजादा त्याला दिली. खादूर नांवाच्या गांवीं लहिना नांवाचा एक मनुष्य दुर्गादेवीचा कट्टा उपासक होता. परंतु नानकाच्या उपदेशानें तो शीख झाला, व हाच पुढें नानकाच्या मागून त्याच्या गादीवर बसला. नानकानें आपल्या मृत्यूची बातमी कित्येक दिवस अगाऊच देऊन ठेविली होती. सटाण्याचे मामलतदार जे देव मामलेदार ह्मणून प्रसिद्ध आहेत, त्यांनींही आपल्या मृत्यूची वर्दी आपल्या आप्तेष्टांस अशीच अगाऊ देऊन ठेविल्याचें रा. रिसबूड यांनीं त्यांचें चरित्रांत लिहून ठेविलेलें आहे. असो. नानकानें अशी अगाऊ बातमी दिल्यामुळें, त्याच्या दर्शनास फार लोक जमा झाले होते. इ. स. १५३८ च्या आश्विन वद्य १० दशमीस नानकाचें देहावसान झालें. मृत्यूनंतर त्याचें शरीर हिंदुपद्धतीप्रमाणें जाळावें, किंवा मुसलमानपद्धतीप्रमाणें पुरावें असा त्याच्या शिष्यानें त्यास प्रश्न केला होता. तेव्हां तो ह्मणाला, कीं, ‘ माझ्या शरीरावर उजवे बाजूस हिंदूंनीं फुलें ठेवावींत व डावे बाजूस मुसलमानांनीं ठेवावींत; व मग तें शव एकें रात्र झांकून ठेवावें. पहांट

होतांच उघडून पहावें. ज्यांच्या बाजूचीं फुलें ताजीं दिसतील, त्यांच्या पद्धतीप्रमाणें माझा अन्त्यविधि करावा. हिंदूकडील फुलें ताजीं राहिलीं, तर माझें शरीर जाळून टाकावें; व मुसलमानांकडील फुलें ताजीं राहिलीं तर माझें शरीर पुरून टाकावें.' या आज्ञेप्रमाणें त्याच्या शिष्यांनीं व्यवस्था केली व सकाळीं पाहतात तों तेथें नानकाचें शरीर मुळींच नसून, दोनही बाजूचीं फुलें मात्र अगदीं ताजीं अशी दिसत होतीं. नानकाच्या आयुष्यांतील हा शेवटलाच त्यानें दाखविलेला चमत्कार ह्मणावयाचा ! श्रीरामभक्त कबीरानेंही आपल्या मृत्यूसमयीं असाच चमत्कार दाखविल्याचें प्रसिद्ध आहे.

१५. नानकाचीं मुख्य मतें अशीं होतीं कीं, ( १ ) जातिभेद असूं नये; ( २ ) मूर्तिपूजा करूं नये; ( ३ ) सर्वांनीं निर्गुणाची उपासना करून मोक्ष प्राप्त करून घ्यावा. यांपैकीं मूर्तिपूजा करूं नये हें तत्त्व कांहीं शीख लोकांनीं पाळिलेलें दिसत नाहीं. 'क्यारा साहेब,' 'ग्रंथ साहेब,' 'पंजा साहेब' वगैरे मूर्तिपूजेचीं प्रत्यक्ष उदाहरणें आहेतच. परंतु एक तर अगदींच हिडिस, चमत्कारिक व किळसवाणें उदाहरण आहे तें सांगून हें चरित्र संपवितों. शीखांचा दहावा व शेवटला गुरु गोविंदसिंग हा होता. एकदां पंजाबांतील मुक्तिसरोवर नामक गांवीं गेला असतां तेथें हा एकें ठिकाणीं शौचविधीस गेला. या शौचविधीचें ह्मणजे गुरुगोविंदसिंगाच्या विष्ठेचें प्रस्तुत त्या गांवीं एवढें प्रस्थ माजलें आहे कीं, दरसाल लोक तेथें यात्रेस जातात, व त्याचें मोठ्या भक्तिभावानें दर्शन घेतात. हा शौचविधि ऊर्फ ही विष्टा 'लेंडीसाहेब' या नांवानें प्रसिद्ध आहे. मूर्तिपूजेच्या विरुद्ध असलेल्या गुरु नानकाच्या भक्तांनीं हल्लीं कोणकोणत्या मूर्तींची पूजा चालविली आहे हें जर आतां प्रत्यक्ष नानक येऊन पाहील, तर त्यास काय वाटेल बरें ? नानकाचा समकालीन आपल्याकडील नामदेव हा होय. नामदेवानेंही पुष्कळ प्रवास केला असून उत्तर हिंदुस्थानांत त्याचीं देवळें आहेत. ग्रंथसाहेब या ग्रंथांत नामदेवाचींही कांहीं कवनें सांपडतात असें शोधकांचें ह्मणणें आहे. असो. याप्रमाणें गुरु नानकाचें संक्षिप्त चरित्र आहे.

# ७ अहंमदशहा अबदाली.

जन्म इ. स. १७२४.        मृत्यु जून इ. स. १७७३.

दाढीके रखनेवाले । काबूलकंदाहरवाले ॥
खांडेसे लढनेवाले । जंगसे न हटनेवाले ॥
सूं सूं सणणण बाणोंकी । बरसात बरसनेवाले ॥

दु. आ. तिवारी.

मराठ्यांच्या इतिहासामध्यें पानिपत प्रकरण अत्यंत महत्त्वाचें असल्या तें सर्वत्रांस परिचित् असें आहे. सन १७६१ च्या जानेवारीच्या १४ व्य तारखेस पानपतावर मराठे आणि गिलचे यांचें शेंवटचें युद्ध होऊन मराठ्यांच पराजय झाल्याची हकीकत इतिहासप्रसिद्ध आहे. या युद्धामध्यें मराठ्यांच्य तर्फे मुख्य सेनापति सदाशिवराव भाऊ असून मुसलमानांच्या बाजूनें कंद हारचा बादशहा अहंमदशहा हा होता. या अहंमदशहाचें चरित्र आ वाचकांस सादर करावयाचें आहे.

## पूर्वचरित्र.

हयातखान—अब्दुल्लाखान—दौलतखान—झमानखान—अहमद, अश ही परंपरा आहे. हयातखान हा १७१४ च्या सुमारास हिरातच्या अस मंताद्भागीं येऊन राहिला व त्यानें तेथें लवकरच अब्दाली या जातीच्य लोकांचें आधिपत्य स्वीकारिलें. या अबदाली लोकांची वसत हिरात जवळील डोंगरी मुलुखांत असे. अबदाली जातीमध सद्दोझाई नांवाची एक पोटजात आहे. या सद्दोझाई जाती इतर लोक पूज्य मानितात. चरित्रनायक अहंमदशहा हा या सद्दोझा जातीचा होता, व ह्मणून याचा पूर्वज जो अब्दुल्लाखान यास आपल बापाच्या मार्गे लवकरच पुढें येण्यास वाव मिळाला. परंतु राजा होण्याच

त्वाकांक्षेमुळें अब्बासकुलीखान नांवाच्या हिरातच्या सुभेदारानें अब्दुल्ला-नास कैदेंत टाकिलें. पुढें लवकरच कझलबाशी लोकांनीं अब्बासकुली-नास हिरातमधून हाकलून लाविल्यामुळें अब्दुल्लाखानाची सहजच कैदें-तून सुटका झाली. अब्बासकुलीखानानंतर जाफरखान हा सुभा झाला. परंतु अब्दुल्लाखानानें थोडेंसें सैन्य जमवून जाफरखानाचा पराजय केला व त्यास कैदेंत टाकून स्वतःच तेथील सुभा बनला. पुढें कित्येक वर्षांनीं नादिरशहानें हिरात काबीज केल्यावर त्याला तेथें झुल्फिकारखान अबदाली व अहंमदखान अबदाली हे दोघे बंधु कैदेंत असलेले आढळले. नादिरशहानें त्या उभयतां बंधूस गिलजाइजांच्या कैदेंतून मुक्त करून माझिंदरत येथें जहागीर देऊन त्यांनीं शांततेनें राहावें अशी तजवीज केली. परंतु त्यांच्यावर पूर्णपणें लक्ष ठेविलें होतें. अहंमदखान हा लहानपणापासूनच शूर, चाणाक्ष व चतुर आहे अशी नादिरशहाची खात्री झाल्यानें अहंमदखानाबद्दल नादिरशहाच्या मनांत फार आदर वसत होता. नादिरशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां अहंमदखान त्याचे बरोबर होता. हाच अहंमदखान पुढें अहंमदशहा या नांवानें प्रसिद्ध झाला. याचा जन्म सन १७२४ चे सुमारास झाला असावा असा अंदाज आहे.

अहंमदशहा स्वतंत्र झाल्यावर त्यानें आपलें अब्दाली हें नांव बदलून दुराणी हें नवीन नांव घेतलें. असें करण्यांत विशेषतः कांहीं धर्मभोळेपणा होता असें म्हणतात. म्हणजे अब्दाली हें नांव अपेशी असून दुराणी हें नांव जयशाली व यशस्वी आहे अशी त्याची समजूत होती. या अशा समजुती सर्व देशांत सर्वच काळीं असतात, तेव्हां त्याबद्दल कोणीं कोणास नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. तारीख १९ जून १७४७ रोजीं नादिरशहाचा खून झाल्यावर, अहंमदशहा स्वतंत्र झाला व लवकरच त्यानें दिग्विजयास सुरवात केली. प्रथम कंदाहार काबीज करून त्यानें नादिरशहाची तीस लक्ष रुपयांची ठेव स्वाधीन करून घेतली. या स्वारीचे वेळीं दुराणी, कझलबाशी, बलुची व हजारा या जातींच्या लोकांची अहंमदशहास फार मदत झाली.

सन १७४७ चा हिंवाळा त्यानें कंदाहार येथें राहून तेथील राज्यव्यवस्
सुरळीतपणें चालू केली. नंतर सन १७४८च्या वसंतऋतुंत बारा हजार दुराण
फौज बरोबर घेऊन तो कंदाहारहून निघाला. त्यानें प्रथम गझनीवर स्वार
करून नादिरशहाचा तेथील सुभा पिटाळून लाविला. अहंमदशहाचं
महत्त्वाकांक्षा हिंदुस्थान जिंकण्याची होती. हिंदुस्थान जिंकल्यानें त्यास द्रव्य
व कीर्ति अशा दोनही गोष्टींचा फायदा होणार होता, शिवाय नादिरशहाचे
स्वारीचे वेळीं प्रत्यक्ष हिंदुस्थान पाहून ठेविलें होतें, म्हणून त्यानें मोठ्य
पराक्रमानें काबूल–पेशावर काबीज करून सिंधु नद उतरून एकदम हिंदु-
स्थानांत अटक येथें प्रवेश केला व तें काबीज केलें. त्यानंतर तेथून त
लाहोरास आला. हें पाहून तेथील सुबा शहानवाजखान यानें एकदम दिल्लीस
पलायन केलें. अहंमदशहानें लाहोर सावकाशपणें लुटलें. नंतर अहंमदशह
सरहिंदपर्यंत आला, तेथें दिल्लीच्या बादशहाच्या सैन्याची व त्याची मोठी
लढाई होऊन त्याचा पूर्णपणें पराजय झाला. यामुळें अब्दालीनें हिंदुस्थानांत
पुढें येण्याचा बेत रहित करून एकदम तो स्वदेशास निघून गेला. या वेळीं
पंजाबांत शिखांनीं त्याच्या फौजेच्या पिछाडीवर हल्ले चढवून त्याला अगदीं
जर्जर करून टाकिलें व पंजाब प्रांत त्याच्या हातून सोडविला. अहंमदशहाची
ही हिंदुस्थानावरील पहिली स्वारी होय.

अहंमदशहा याप्रमाणें पहिल्या वेळीं परत गेला, परंतु या 'प्रथमग्रासे
मक्षिकापातानें' तो हताश होणारा नव्हता. हिंदुस्थानांतील अगणित संपत्ति
त्याला हिंदुस्थानाचा नाद सोडूं देईना. त्यानें सन १७४८ च्या हिंवाळ्यांत
पुनः हिंदुस्थानावर दुसरी स्वारी करण्याचा विचार करून तो कंदाहारहून
निघाला. या वेळीं पूर्वी अब्दालीचा पराजय करणारा मीरमन्नू हा लाहोरचा
सुभा होता. त्याच्या अहंमदशहाशीं थोड्याश्या चकमकी झाल्यावर मीर-
मन्नूच्या लक्षांत आपलें दौर्बल्य आलें व त्यानें अहंमदशहाशीं तह करून
पंजाबमधील कांहीं प्रांतांची खंडणी त्यास देऊं करून परत लावून दिलें.

मीरमन्नूनें याप्रमाणें लाहोरची सुभेदारी मिळविल्यावर तेथें कडक
अंमल बसविला, इतकेंच नव्हे पण अहंमदशहास कबूल केलेली खंडणीही

देण्याचें त्यानें नाकारिलें. यामुळें सन १७५१–५२ मध्यें अहंमदशहानें हिंदुस्थानावर तिसरी स्वारी केली. अहंमदशहा चिनाबच्या कांठाकांठानें बराच पुढें आला व त्यानें आपला वकील सुखजीवनमल दिवाण यांस मीरमन्नूकडेस बोलणें करण्यासाठीं पुढें रवाना केलें. मीरमन्नूनें वकीलास आपण स्वतंत्र असल्याबद्दल स्पष्टपणें कळवून अबदलीस खंडणी देण्याचें नाकारिलें. परंतु अहंमदशहा ज्या अर्थी इतक्या दूर आलाच आहे, त्या अर्थी आपण त्यास कांहीं तरी देऊं; पण यानंतर त्यानें पुनः हिंदुस्थानांत येऊं कामा नये अशी कबुली मागितली, व लागलीच सैन्याची तयारी करून तो अबदालीच्या सामोरा झाला, व रावी नदी उतरून अलीकडेस आला. दुराणीनेंही समोरच्याच बाजूस तळ दिला. लहान लहान चकमकी कांहीं दिवस झाल्या, पण त्यापासून म्हणण्यासारखा मीरमन्नूचा कांहींच फायदा झाला नाहीं. मात्र या अवधींत दुराणी फौजेनें रावी आणि चिनाब यांमधील प्रदेश अगदीं लुटून तळपटपान करून टाकिला. शेवटीं दुराणीनें एकदम मीरमन्नूवर चाल केली, तेव्हां मीरमन्नू घाबरून मागें सरला व त्यानें लाहोरचा आश्रय केला. परंतु सरतेशेवटीं त्याच्या सैन्यांत भयंकर दुष्काळ पडला. अहंमदशहानें सर्व बाजूंनीं त्याला वेढून टाकिलें व बाहेरचा धान्याचा एक कणही आंत जाऊं न देण्याचा कडेकोट बंदोबस्त केला. अहंमदशहाच्या या व्यवस्थेनें मीरमन्नू अगदीं मेटाकुटीस आला. सरतेशेवटीं त्याच्या उपासमार झालेल्या फौजेची व दुराणीच्या फौजेची तारीख १२ एप्रिल सन १७५२ रोजीं जंगी लढाई झाली. तींत आरंभीं कांहीं वेळपर्यंत मीरमन्नूच्या फौजेचा जय होता; पण मीरमन्नूचा सेनापति कौरामल हा हत्तीवर बसून युद्धाच्या धामधुमींत असतांना एकदम हत्तीचा पाय एका खाड्यांत गेला व त्यामुळें तें जनावर एकदम खालीं बसलें. इतक्यांत एका शिपायानें येऊन कौरामलाचें डोकें कापून नेलें. समरांगणावर भारतीय युद्धांत कर्णाचा रथ असाच खाड्यांत पडल्याचें वाचकांस या प्रसंगीं स्मरण झाल्याशिवाय राहणार नाहीं. याप्रमाणें सेनापतीचा वध होतांच मीरमन्नूच्या फौजेंत पळापळी सुरू झाली

व त्याचा पराजय झाला. यानंतर मीरमन्नूनें अहंमदशहास प्रत्यक्ष भे
तह केला. या प्रत्यक्ष भेटींत या उभयतांमध्यें जो संवाद झाला तो
गमतीचा आहे म्हणून येथें देतों.

अहंमदशहा:—मी तुझा धनी असून तूं या पूर्वींच खंडणी देण्यास
आमचे पुढें कां हजर झाला नाहींस ?

मन्नू:—मला दुसऱ्या धन्याची चाकरी करावयाची होती म्हणून ये
आलें नाहीं.

अहंमद:—मग तो तुझा दुसरा धनी तुला या संकटांतून मुक्त करावय
कां आला नाहीं ?

मन्नू:—आपला चाकर स्वत:चें संरक्षण उत्तम प्रकारें करूं शके
अशी त्याची खातरी होती.

अहंमद:—या युद्धांत मी जर हारलों असतों व तुझ्या हातांत सांपडों
असतों तर तूं मला कसें वागविलें असतें.

मन्नू:—आपलें डोकें कापून तें मीं माझ्या धन्याकडेस नजराणा म्हण
पाठवून दिलें असतें.

अहंमद:—मग आतां तूं माझ्या हातीं सांपडला आहेस, मीं तुझें क
करीन अशी तुझी अटकळ आहे ?

मन्नू:—जर आपण व्यापारी असाल तर माझी गुलाम म्हणून वि
करा, जर आपण जुलमी राज्यकर्ते असाल तर माझें डोकें कापून टाका; प
जर आपण खरोखरीच नृपति असाल तर मला राजासारखी दया दाख
व माझा जीव वांचवा.

अहंमदानें मीरमन्नूचें हें समयसूचक, धीटपणाचे व उमद्या स्वभाव
दर्शक असे जबाब ऐकून खूष होऊन त्याला फर्जंदखान बहादुर रुस्तमे-हि
हा किताब दिला. मीरमन्नूनें अहंमदशहास पन्नास लक्ष रुपये व ह
घोडे वगैरे देऊन स्वदेशास रवाना केलें.

पुढें स. १७५६ मध्यें मीरमन्नू घोड्यावरून पडून मरण पावला. तेव्हां
ाद बेगम नांवाच्या त्याच्या बायकोनें आपला तीन वर्षांचा मुलगा लाहोरचा
ना करून स्वतः राज्यकारभार करूं लागली. मुराद बेगम जरी याप्रमाणें
भेगिरी गाजवूं लागली, तरी तिला एवढा मोठा अधिकार चालविण्याची
वरशक्ति नव्हती, हें तेव्हांच दिसून आलें. तिच्या नवऱ्याच्या वेळच्या
कही उमरावावर तिचा विश्वास नव्हता. तिच्या दरबारीं मीर विखारखान
वाचा एक मोठा सरदार बेगमेचा कारभारी होता, व एक वेळीं त्यावर
ची मर्जीही होती. परंतु एके प्रसंगीं तिनें या मीर विखारखानाला जनान-
ान्यामध्यें दासीकडून इतका कडक मार देवविला कीं, त्या योगें तो
ाकर प्राणास मुकला. स्त्रीजातीनें कधींही क्षमा न करण्यासारखा कांहीं
ात्तिक अपराध मीरच्या हातून झाला होता असें म्हणतात. कांहींही असो,
ामेच्या या कृत्यानें लाहोर दरबारचे अमीर उमराव फारच नाराज झाले
त्यांनीं दिल्लीस ही तकरार नेली. या वेळीं गाझीउद्दीन हा दिल्लीच्या दर-
रीं सुभा होता, व तो मुराद बेगमेचा भावी जामात होता, म्हणून त्यानें
पला एक हस्तक लाहोरास व्यवस्थेसाठीं पाठविला. परंतु त्याचें बेगमेपुढें
हीं चालेना. व बेगमही त्याचें कांहीं ऐकेना. या इसमास येथून दूर करावें
ाीही तिनें दिल्लीस मागणी केली इतकेंच नव्हे, पण तिनें परभारें अहमद-
हाकडेस अशीही तकरार केली कीं, दिल्ली दरबारानें लाहोरप्रांत गिळंकृत
ला आहे, तरी तुह्मीं तावडतोब सैन्य घेऊन माझ्या मदतीस यावें. मुराद
ामेचें हें कारस्थान उमगल्यामुळें गाजीउद्दीन यानें एकदम लाहोरवर
ल केली व मोठ्या युक्तीनें बेगमेस कैद केलें, आणि लाहोरास अदिनाबेग-
ान यास आपल्यातर्फें सुभा नेमिलें. मुराद बेगमेस हें अर्थातच आवडलें
हीं व तिनें दिल्लीच्या बादशाहीस सपाटून शिव्याशाप दिले. गाझीउद्दीन
तकेंच करून थांबला नाहीं. त्यानें बेगमेच्या मुलीशीं आपलें लग्न तिच्या
छेविरुद्ध केलें व बेगमेस फारच वाईट रीतीनें वागविलें. इतक्यांत
बातमी अफगाणिस्थानांत अहंमदशहा अबदालीस कळली व त्यानें

इ. स. १७५५–१७५६ च्या सालीं हिंदुस्थानावर चौथी स्वारी केली. त्यानें एकदम सिंधुनदी उतरून अदिनाबेग खानाला लाहोराहून हांकलून लाविलें व तो एकदम कांहींही अडथळयाशिवाय दिल्लीपर्यंत येऊन धडकला. दिल्लीस त्यानें नादिरशहाच्या छळाची लोकांस पुन: आठवण करून दिली व मोठमोठ्या अमीर उमरावांस द्रव्यासाठीं मनस्वी छळिलें. अहंमदशहा या वेळीं दिल्लीस दोन महिने राहिला. परंतु इतक्या अवधींत त्यानें दिल्लींतील तमाम मोठमोठे वाडे द्रव्याच्या तृष्णेनें अगदीं जमीनदोस्त केले. याप्रमाणें दिल्लींतील उमरावांना कंगाल केल्यावर ही स्वारी बालमगड किल्ल्यावर चालून गेली व तो हस्तगत होतांच तेथून तो एकदम मथुरेस गेला. तेथेंही त्यानें भयंकर कत्तल केली व मोठमोठीं मंदिरें मातींत मिळवून तेथील हजारों हिंदूंना गुलाम करून बरोबर घेऊन हा दुष्टकर्मा अहंमदशहा आगऱ्यावर चालून गेला. परंतु तेथें त्याची डाळ न शिजल्यामुळें त्यानें जाटाच्या मुलखांत घुसून मोठा धुमाकूळ माजवून दिला. यानंतर तो पुन: दिल्लीस आला. त्यानें दिल्लीच्या बादशहाच्या मुलीचें लग्न आपला मुलगा तैमूरशहा याशीं लाविलें व स्वत:चें लग्नही बादशहाच्या दुसऱ्या एका मुलीशीं उरकून घेतलें. यानंतर पुष्कळशी खंडणी घेऊन त्यानें आलमगीर यास पुन: दिल्लीच्या तख्तावर बसविलें, व पंजाब आणि सिंध हे प्रांत आपला मुलगा जो तैमूर याचे नांवें बादशहाकडून करवून घेतले. नादिरशहानें हिंदुस्थानच्या नाशास जो आरंभ केला होता, तो याप्रमाणें अहंमदशहानें पूर्णतेस नेल्यावर, हा राक्षस स. १७५७ मध्यें परत स्वदेशास जाण्यास निघाला. या वेळीं शीख लोकांनीं अहंमदशहाच्या फौजेस बराच त्रास दिला, पण त्याला तुर्कस्थानांत जाण्याची घाई असल्यामुळें तो तडक चालता झाला. त्यानें सिंधूच्या कांठचे प्रदेश व मुलतान, लाहोर वगैरे मिळविलेल्या प्रांतांच्या संरक्षणासाठीं आपला मुलगा तैमूरशहा व भरंवशाचा शूर सेनापति जहानखान यांस हिंदुस्थानांत ठेविलें व या उभयतांस शीख लोकांचा समाचार घेण्याची आज्ञा केली. या उभयतांच्या हाताखालीं

दुराणी व इराणी फौजा ठेविल्या होत्या, परंतु त्या कांहीं फार महत्त्वाच्या नव्हत्या. याशिवाय त्यानें हिंदुस्थानांत आल्यावर कांहीं फौज जमविली होतीच, तीही यांचे ताब्यांत दिली होती; त्याचप्रमाणें सरहिंद, दुलभ वगैरे ठिकाणीं त्यानें आपलीं माणसें नेमिलीं होतीं. याप्रमाणें बंदोबस्त करून अहंमदशहा स्वदेशांत निघून गेला.

## अहंमदशहा व मराठे.

अहंमदशहाचा याप्रमाणें दिल्लीच्या बादशाहीस वारंवार त्रास होऊं लागल्यामुळें बादशहास कोणाचा तरी आश्रय घेणें प्राप्त झालें. या वेळीं हिंदुस्थानांत मराठे फार बलाढ्य म्हणून प्रसिद्धीस आले होते. मराठ्यांची सत्ता या सुमारास शिगेस लागली होती, व त्यांचीं सूत्रें पुण्याहून नाना-साहेब पेशवा मोठ्या कुशलतेनें हालवीत होता. पेशव्यांचेतर्फें उत्तरेकडेस शिंदे–होळकर मराठ्यांचें वर्चस्व स्थापन करण्याच्या प्रयत्नांत गुंतले होते. दिल्लीच्या बादशहानें यांच्याशींच करार केला. राजवाड्यांच्या पहिल्याच खंडांत हा करार प्रारंभींच देऊन त्या खालीं पुढील प्रमाणें टीप दिली आहे.

‘ हा अहदनामा ह्मणजे करारनामा दिल्लीचा पातशहा आणि मराठ्यां-कडील सरदार मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांच्यामध्यें झाला, असें या करारनाम्यांतच लिहिलेलें आहे. हा करारनामा बहुश: सन १७५० सालांत झाला असावा. ह्या वेळीं दिल्लीचा पातशहा अहंमदशहा तख्तावर होता.’

‘ पातशहाचा मुख्य वजीर सफदरजंग ह्यानें रोहिल्यांचा व अहंमदशहा अबदाली ह्यांचा दंगा मोडण्याकरितां मराठ्यांना मदतीस बोलाविलें. मुलतान, पंजाब, सिंध, रजपुताना व रोहिलखंड इतक्या विस्तीर्ण प्रदेशावर चौथ वसविण्याचा हक्क मराठ्यांना ह्याच करारनाम्याच्या जोरावर प्राप्त झाला, व ह्या हक्काच्या संरक्षणार्थ पुढें सहा वर्षे अबदालीशीं, रोहिल्याशीं व रजपुतांशीं यांना झुंजावें लागलें.’

याप्रमाणें मराठे व रोहिले यांचा सामना सुरू झाला. अहंमदशहाचे स्वारीचा रंग दिसूं लागतांच वजीराकडून मराठ्यांस मदतीसाठीं पाचारण

येतांच रघुनाथरावास फौजेसह तिकडे जावें लागे. पण कर्मधर्मसंयोगानें अब्दाली व रघुनाथराव यांचा प्रत्यक्ष सामना होण्याचा प्रसंगच आला नाहीं. रघुनाथरावानें एकदम अहंमदशहावर चालून जाऊन त्याशीं प्रत्यक्ष रणांगणावर गांठ घालावी म्हणून पुण्याहून मुत्सद्यांचीं निकडीचीं पत्रें जात. रघुनाथराव फौजेची जमवाजमव करण्यांत गुंतलेला असे व अशी जमवाजमव होतांच आपण चालून जातों म्हणून उत्तर पाठवी. या प्रसंगाचें रघुनाथरावाचें एक पत्र सुंदर असल्यानें या खालीं देतों:—

"आजी (ता. १६–२–१७५७) इंदुरास आलों. होळकराची भेट झाली. पुढें दर मजल दिल्लीस जात असों. अब्दाली दिल्लीस आला, यास्तव चहूंकडून राजे व जमीनदार व रांगडे लोकांच्या नजरा फिरल्या. सांप्रत एखादा मनसुबा करून मुलूख अथवा रुपये मिळवावयाची सोय दिसत नाहीं. अब्दालीचें पारिपत्य होईल तेव्हांच वरकड दबतील. त्याचें पारिपत्य करावें तरी फौज अद्यापि जमा जाहली नाहीं. आम्हीं, विठ्ठल शिवदेव, मल्हारबा, समशेरबहादर, अंताजी माणकेश्वर, नारो शंकर मिळून पंधरा सतरा हजार फौज आहे. ज्यास्त फौज न आलिया जातां येत नाहीं. रुपये पावावयास दिवस लागले. महिना दीड महिन्यांत पोंहोचतील. जर अब्दाली दिल्लीस राहिला अथवा अलीकडे आला, तर गांठ पडेल. तमाम राजे व सुजाउदौला वगैरे सर्वांचीं राजकारणें त्याजपाशीं आहेत. जाठ तर झुंजूं लागला. सांप्रत मनसुबा भारी आहे. फौजही त्याची भारी आहे. कजाख शिपाई आहे. पारपत्यास भारी सामान असावें यास्तव जर दत्तबाची रवानगी इकडे लवकर जाहली तर जमाव लवकर पडेल" ( खंड १–५२ ).

१० रघुनाथरावाची याप्रमाणें तयारी होतांच तो कूच करी; परंतु याच सुमारास अहंमदशहा स्वदेशास जावयास निघे. रघुनाथरावाच्या तयारीची बरोबर बातमी ठेवून ती आपल्यापेक्षां अधिक आहे असें पाहूनही अहंमदशहा निघून जात असेल. कारण अहंमदशहानें पुष्कळ लढाया पाहिल्या असल्यानें, सेनापति या नात्यानें त्याची योग्यता रघुनाथरावाहून यत्किंचितही

कमी नव्हती. असो. याप्रमाणें या उभयतांचे डावपेंच चालू होते. अहमद-शहा प्रत्येक वेळीं घाईघाईनें स्वदेशास निघून जाई व मागें योग्य व शक्य तो बंदोबस्त करून ठेवीत असे. याप्रमाणें याही वेळीं त्यानें आपल्यामागें योग्य ती व्यवस्था करून मग स्वदेशीं प्रयाण केलें.

११ अहमदशहा निघून गेल्यानंतर मागें तैमूरशहानें पंजाबमध्यें शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. शीख लोकांस त्यानें कडक शिक्षा करून पादाक्रांत केलें व निरनिराळ्या लुटारू लोकांवरही वचक बसविला. हें पाहून अदिनाबेगखान यानें शीख फौज जमवून दुराणी लोकांशीं सामना देण्याचा घाट घातला. या वेळीं रघुनाथराव पेशवा दिल्लीच्या किल्ल्यास वेढा घालून बसला होता. अदिनाबेगनें रघुनाथरावास कूच करतील त्या दिवशीं एक लाख रुपये व मुक्काम करतील त्या दिवशीं पन्नास हजार रुपये याप्रमाणें देण्याचें कबूल करून आपल्या मदतीस बोलाविलें. रघुनाथराव एकदम अदिनाबेगखानाच्या मदतीस गेला. मराठे व शीख यांच्या फौजा सतलज नदीचें कांठीं एक होऊन त्यांनीं पहिल्या धडाक्यासरशीं अबदुल समद-खानाच्या वीस हजार रोहिल्यांचा पराभव करून सरहिंद काबीज केलें. सरहिंद काबीज केल्यावर मराठ्यांनीं एकदम लाहोरवर चाल केली. तैमूर-शहा आणि त्याचा सरदार जहानखान हे दुराणी फौजेसह कच्ची सराई येथें तळ देऊन राहिले होते. त्यांचाही मराठ्यांनीं पूर्णपणें पराभव केला व लाहोर शहर सावकाशपणें लुटलें. याप्रमाणें शिवाजी महाराजांनीं भविष्य केल्या-प्रमाणें रघुनाथरावानें भीमथडीच्या तट्टांनां सिंधुनदीचें पाणी पाजून मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेपार फडकाविला यांत मुळींच संशय नाहीं. या वेळीं रघुनाथरावाचा सरदार सखाराम हरी यानें फारच शौर्य गाजविल्या-मुळें त्यास दिल्लीच्या बादशहाकडून आंबे गांव हें जहागीर मिळालें व तें अद्यापिही ( १९२५ ) त्याच्या वंशजाकडेस चालत आहे. ही गोष्ट सन १७५८ च्या मे महिन्यांत झाली. अदिनाबेगखानास रघुनाथरावानें पंजाबचा सुभा देऊन इतर ठिकाणीं आपलीं माणसें ठेविलीं व मग हें मराठी

सैन्य नानासाहेबाच्या निकडीच्या बोलाविण्यावरून दक्षिणेंत रवाना झालें. या वेळचें रघुनाथरावाचें पत्रही वाचकांच्या सोईसाठीं पुढें देतों:—

“ लाहोर, मुलतान, काश्मीर वगैरे सुभे अटके अलीकडे येथील बंदोवस्त करून अंमल बसवावा. त्यास कांहीं झाला, व कांहीं होणें तोही लवकरच करितों. अहंमदखान अब्दाली याचा पुत्र तैमूर सुलतान व जहांखान याचा पाठलाग सरकारचे फौजेनें करून त्याची फौज लुटून घेतली. कांहीं थोडीशी फौज झडत पडत अटकेपार पेशावरास जहानखान व तैमूर-सुलतान पोंहचले. खासा अबदाली इस्पहा इराणच्या पादशहावरील फौज सुद्धां चालून गेला होता त्यास इराणचा पादशहा जबरशहा तिकडून अबदालीचे फौजेवरून चालून येऊन हल्ला करून फौज लुटून घेतलीं. खासा अबदाली मात्र बारा चौदा हजार फौजेनिशीं इस्पहानांतून अलीकडे कंदाहारास आला. इराण्याची फौज याचा पाठलाग करीत आली आहे. अबरदस्तखान व मुकरबखान वगैरे सरदार व जमीनदार त्या प्रांतीचे अबदालीचे जबरदस्तीमुळें रजू होते, तेही बदलोन हंगामा करितात. हल्लीं त्यांच्या अरजा रफीक होऊन सेवा करून दाखवून अबदालीस तंबी करून ऐशा आल्या आहेत. चहूंकडून अबदालीवरी हंगामा झाला आहे याजमुळें त्याचा धर सुटला आहे. त्याचें साहित्य उपराळा कोणी करीत नाहीं. इकडून जोरा पोंहचवून सरकारचा अंमल अटकेपार करावा. अहंमदखान अबदाली याचा पुतण्या अब्दुल रहीमखान अबदालीचे दौलतीचा वारस स्वामीपासीं आला तो स्वामींनीं आम्हांकडे पाठविला होता. त्यास अटके अलिकडे कांहीं थोडीशी जागा बसावयास देऊन अटकपार काबूल पेशावरचा सुभा देऊं. अबदालीची फौज अबदुल समदखान सरहिंदेंत होता तो पाडाव सरकारांत आहे. तो व आणखी या प्रांतेची फौज इराणी मोगल येऊन देऊन मशार-निल्हेची रवानगी करितील. लाहोर प्रांतीं राजेश्री रेणको अणोजी व रायाजी सखदेव असे ठेविले. गोपाळराव गणेश यांचाही पैगाम आहे तेही राहातील. पुढें स्वदस्तुर इराणचे पादशहाचे कागदहा आम्हांस व मल्हारबांस आ॰

होतें कीं लवकर कंदहारास यावें आणि याचें पारिपत्य करून अटकेची हद्द करावी. परंतु आम्ही तरी काबूल व कंदाहार हे अटकपारचे सुभे हिंदुस्थानांत अकबरापासून अमलागीर पावेतों होते ते विलायतेंत का द्यावें,आम्हीं कंदाहार पावेतों अंमल बसवून तूर्त गोडच जाब पाठविणार झाहोंत. तूर्त माघारें फिरावयाचा डौल स्वामींच्या आज्ञेवरून धरिला आहे. याजमुळें जें होतें तेंच करितों. तटीं लावीत नाहीं. तूर्त या प्रांतीं आदिनाबेग मोगल मातबर व प्रामाणिक आहे त्याजवर सारा यकतियार दिला आहे. लाहोर त्यासच कमाविशीनें दिलें आहे." (हें पत्र इतिहास संग्रहांत ऐतिहासिक स्फुट लेख ११ येथें असून त्याची तारीख ४ मे १७५८ ही आहे).

१२ यावेळीं रघुनाथरावानें,अदिनाबेगखानानें मराठ्यांस दरसाल पाऊण-कोटी रुपये द्यावे असा त्याचेंपासून करार करून घेतला, परंतु अदिना बेगखान तारीख १५ सप्टेंबर १७५८ शुक्रवारीं मरण पावला त्यामुळें पंजाबमध्यें फारच अव्यवस्था झाली.

१३ तैमूरशहाच्या पराजयाची वार्ता अहंमदशहास कळतांच त्यानें नुरुद्दीनखान नांवाचा आपला सेनापति मोठ्या फौजेसह तैमूरशहाच्या मदतीस पुढें रवाना करून दिला व आपण स्वतः सन १७५९ च्या हिंवाळ्यांत हिंदुस्थानांत येण्यास निघाला. ही अहंमदशहाची हिंदुस्थानावर पांचवी स्वारी होय. यावेळीं अहंमदशहा जो हिंदुस्थानांत आला तो सुमारें दोन वर्षें इकडेसच राहिला. मराठ्यांना ज्याप्रमाणें त्याच्याशीं गांठ घालण्याची खुमखुमी होती त्याचप्रमाणें त्यानेंही यावेळीं मराठ्यांस सामना देण्याचा निश्चय केला होता असें दिसतें. प्रथम शिंद्यांच्या सैन्याची व त्याची गांठ पडली. मल्हारराव स्वतः जरी शिंद्यांच्या मदतीस आला नव्हता तरी त्याची कांहीं फौज शिंद्यांच्या फौजेस येऊन मिळाली होती. या झटापटींत मराठे हरले व पळूं लागले. याप्रमाणें एक दोन वेळच्या अनुभवावरून दुराणीची खात्री झाली कीं, मराठे हे ठासून उभे राहून लढण्यांत कच्चे आहेत; कांहीं वेळ लढून दमतांच पळ काढितात. दुराणीची याप्रमाणें खात्री होतांच त्यांचा

धीर वाढला व मराठ्यांचा धीर अर्थातच खचला. गनिमी काव्यानें आपण शत्रूस जेरीस आणूं असें शिंदे होळकरांस वाटत होतें. पण शत्रू थकण्यापूर्वी गनीमच थकून जाऊं लागले. दत्ताजी शिंदे व अहंमदशहा यांची गांठ पडून दत्ताजी मारला गेला. तेव्हांपासून शिंद्यांच्या फौजेस दुराणीची दहशत बसली. मोठमोठ्या मजला मारण्यांत मराठ्यांचीं फार प्रसिद्धी होती. पण अहंमदशहाच्या दुराणी फौजेपुढें मराठ्यांची दौड फिकी पडली. " इकडे मल्हारराव व जनकोजी शिंदे यांनीं कूच करून मारवाड प्रांतास गेले. तों दुराणीनें पाठलाग केला. गिलचे तिकडे येतांक्षणींच हे पाणिपत कर्णाळकडे गेले. मोंगल तिकडे जातांच गनीम दिल्लीस पोंचले. अबदुलअली तेथें येतांच शिंदे, होळकर आगरियास आले. आविंध आगरियास येतांच हे जयनगर प्रांतांत गेले. तिकडे मोंगलांची दौड पोंचतांच हे उदेपुरचे सुमारें गेले. गनीम केवळ सडे नदार. या प्रकारें गनीमी कावा करून गिलचा हारीस आणावा म्हणोन उपाय केले, परंतु दुराणीची हिंमत यांजहून भारी. गनीमच पिटून दमास आणविलें. " गनिमी काव्याच्या लढाईत याप्रमाणें मराठे अहंमदशहापुढें मेटाकुटीस आले, तेव्हां कोणातरी मातबर खाशास उत्तरेकडे पाठविल्याविना काम भागणार नाहीं, अशीं उत्तरेकडून पत्रें आलीं व अहंमदशहावर कोणास पाठवावें याजबद्दल खल सुरू झाला. रघुनाथरावास पाठविण्याचें प्रथम ठरलें. पण पडदूर मुक्कामीं मोठी वाटावाट होऊन अखेर सदाशिवरावभाऊस पाठविण्याचें मुक्रर झालें. उत्तरेकडील कामगिरी जशी व्हावयास पाहिजे होती तशी रघुनाथरावाचे हातून होत नसल्यानें तो तिकडील मोहिमेस नालायक ठरविण्यांत आला विशेषतः उत्तरकडेस नजीबखान रोहिला नांवाचा जो प्रख्यात कारस्थानी मुसलमान होता, त्याचा समाचार रघुनाथराव हा होळकराच्या भिडेमुळें घेईना म्हणून, व इतरही अशाच बारीक कारणांमुळें रघुनाथरावास यावेळीं उत्तरेकडेस न पाठवितां सदाशिवरावास पाठविलें. सदाशिवरावभाऊनें यावेळीं आपल्या बरोबर इभराहिमखान गारदी याचा

उत्कृष्ट तोफखाना घेतला होता. गनिमी काव्यानें अबदाली जेरीस येत नाहीं हें पाहून मुद्दामच हा तोफखाना बरोबर घेण्यांत आला होता. या तोफखान्यानें आरंभीं कामगिरी चांगलीच केली. दिल्ली हस्तगत केल्यावर अबदालीशी गांठ घालण्याचा विचार होता पण तो यमुनेच्या परतीरीं असल्यानें व यमुनेस पाणी फार आल्यानें तिकडेस जाणें भाऊसाहेबांस अशक्य झालें. पाणी उतरून जाईपर्यंत वाट पाहात बसणें भाऊसाहिबांस योग्य न वाटल्यानें त्यांनीं पुढें कुंजपुऱ्यावर चाल केली. भाऊसाहेब पुढें निघून गेल्यावर अबदालीनें यमुना उतरून अलीकडच्या तीरीं तळ दिला. ही हकीकत कुंजपुरा सर केल्यावर सदाशिवरावास कळली. तत्काळ मराठे सैन्य मागें फिरलें व त्यानें पानपतावर तळ दिला. अबदाली याप्रमाणें मध्येंच ठाणें देऊन बसल्यामुळें मराठ्यांस रसद वगैरे पोचेंनाशी झाली व दोन अडीच महिने तेथें हीं दोनहीं सैन्यें राहिल्यावर मराठे अन्नाच्या अभावीं अगदीं जर्जर होऊन गेले. आणि शेवटीं तारीख १४ जानेवारी १७६१ रोजीं मराठे व गिलचे यांचें भयंकर युद्ध होऊन अहमदशहास विजय मिळाला. या प्रमाणें या दीर्घसूत्री लढाईंत जरी अहंमदशहास जय मिळाला तरी त्याचा म्हणण्यासारखा फायदा झाला नाहीं. ही अहंमदशहाची हिंदुस्थानावर पांचवी स्वारी होय. तिसऱ्या स्वारीच्या वेळीं मीर मन्नूवर लाहोर येथें ज्या युक्तीनें अहंमदशहास जय मिळाला होता त्याच युक्तीनें याही वेळीं तो विजयी झाला. ती युक्ति म्हणजे शत्रूचा चोहों बाजूंनीं कोंडमारा करणें ही होय. पानिपतचा घोर संग्राम झाल्यावर अहमदशहानें उत्तर हिंदुस्थानांत बराच धुमाकूळ उडवून दिला व बरीचशी लूट घेऊन तो स्वदेशास निघून गेला. जातांना त्यानें खाजा ओबेद यास लाहोरचा सुभा सोंपिला होता.

## अहंमदशहा व शीख.

१४ अबदालीची पाठ वळतांच लाहोर, सरहिंद वगैरे ठिकाणीं शिखांनीं वंडाळी माजवून अहंमदशहाचा अंमल उधळून लाविला. ही हकीकत शहास कळतांच त्यानें पुनः नुरुद्दीनखानास सातहजार घोडेस्वारानिशीं सन १७६२

च्या प्रारंभीं हिंदुस्थानांत पाठविलें, परंतु शीख फौजांनीं त्याचा पराभव केला, व सरहिंद वगैरे प्रांत स्वतःच्या ताब्यांत घेतले. ही हकीकत शहास कळतांच तो सन १७६२ च्या नोव्हेंबरमध्यें हिंदुस्थानांत येण्यास निघाला; ही त्याची हिंदुस्थानावर सहावी स्वारी होय.

१५ जंदियालाच्या किल्ल्यास शीख वेढा घालून बसले असतांना एकदम शहा आपल्या फौजेनिशी त्यांच्या समोर येऊन धडकला. त्याला पाहतांच ते एकदम वळून सरहिंद येथें गेले. त्या वेळीं झेनखान हा सरहिंद येथें सुभेदार होता. त्याची व शीखांची लढाई चालूंच होती. इतक्यांत अहंमदशहा एका रात्रींत लाहोराहून सरहिंद येथें झेनशहाच्या मदतीस धांवून गेला. या वेळीं दुराणी व शीख फौजांची फार मोठी लढाई होऊन सुमारें बारापासून तीस हजार शीख लोक यांत कामास आले व शहास जय मिळाला.

१६ शीखांच्या बाजूनें या वेळीं अनेक प्रमुख सरदार लढत होते. त्यांत पतियालाचा राजा अलासिंग हा होता. या लढाईत पराजय झाल्यावर अलासिंगास कैद करण्यांत आलें. पण शहावलीखान वझीरानें मध्यस्थी करून चार लक्ष रुपये खंडणी अगर नजराणा देववून अलासिंगास मुक्त केलें. शीखांच्या शौर्यानें अहंमदशहा फार खूष झाला होता. त्यानें अलासिंगाची मुक्तता करून त्याचा फार मोठा सत्कार केला व त्यास राजा हा किताबही दिला. या नंतर त्यानें पंजाबमधील कित्येक मोठ मोठ्या जमीनदारांना बोलावून त्यांजकडून पुष्कळसा नजराणा उकळण्याचा क्रम सुरूं केला. अमृतसरला जाऊन तेथील शीख मंदिराला धुळीस मिळवून काश्मीर येथील बंडखोर सुभेदारास देहान्त शासन करून ही स्वारी सन १७६२ च्या अखेरीस अफगाणिस्थानास परत गेली. यावेळीं काबूलमध्यें कांहीं बंडाळी उत्पन्न झाल्याचें त्यास कळल्यानें काबुलीमल नांवाच्या एका हिंदूस त्यानें या वेळीं घाईघाईनें लाहोरचा सुभा सांगून येथील काम एकदम आटोपतें घेतलें. अहंमदशहाची पाठ वळतांच शीखांनीं पुनः बंडाळी उडवून दिली. त्यांनीं कासूर लुटून पालेकोटलाही

काबीज केलें. यानंतर त्यांनीं सरहिंदवर चाल केली व तेथील सुभेदार झेनखान याचा पराजय करून त्यास युद्धांत ठार मारिलें, व सरहिंद कायमचें काबीज केलें. त्यानंतर त्यांनीं लाहोरवर चाल केली व तेथील हिंदु सुभेदारास शहरांत कोंडून शहरांतील गाईंचा वध करणाऱ्या कसायांची मागणी केली. काबुलीमल या वेळीं मोठ्या संकटांत पडला. हिंदु असल्यानें कसायांचें रक्षण करणें त्याला शक्य नव्हतें व अबदालीचा हस्तक बनल्यानें कसायांस शिखांच्या ताब्यांत देणें त्यास कठिण वाटूं लागलें. अशा कातरींत तो या वेळीं सांपडला होता. शेवटीं त्यानें कसायांचे नाक कान कापून त्यांस लाहोर मधून हांकलून देण्याचें कबूल करून शिखांचें समाधान केलें. या वेळीं त्याचा अंमल लाहोरच्या चार भिंतींमध्येंच काय तो कायम राहिला होता. ही आपल्या लोकांची दुर्दशा अफगाणिस्थानांत अहंमदशहास कळली. तेव्हां तो एकदम तेथून निघून स. १७६४ च्या जानेवारींत लाहोरास येऊन दाखल झाला. ही त्याची हिंदुस्थानावर सातवी स्वारी होय. या स्वारींत त्यानें शीख लोकांचा अतोनात छळ केला. त्यांचीं घरेंदारें सुद्धां पाडून जमीनदोस्त केलीं. खेडींच्या खेडीं उजाड करून गव्हाचीं उभीं पिकें सुद्धां त्यानें उपटून अगर जाळून टाकिलीं. आपला धाक बसविण्यासाठीं या प्रमाणें जाळपोळ करीत असतां त्यास काबूलमध्यें कांहीं बंडाळी उपस्थित झाल्याचें कळलें ह्मणून शिखांचें पूर्ण पारिपत्य करण्यापूर्वींच त्यास एकदम स्वदेशास जावें लागलें. जातांना त्यानें अलासिंग स पंजाबचा सुभा नेमिलें व त्यानें सालीना साडेतीन लक्ष रुपये खंडणी द्यावी असें ठरविलें. तो परत जात असतां त्यास शीख लोकांनीं मनस्वी त्रास दिला.

१७ अहंमदशहा निघून गेल्यावर इकडे शीख लोकांनीं पुनः उचल खाल्ली, व अहंमदशहानें जिंकिलेला सर्व मुलूख आपल्या कबजांत घेतला. या वेळीं शीख लोकांनीं फार मोठी तयारी केली होती. परंतु आपल्या मुलुखाची अशी दुर्दशा झालेली शहास काबूल येथें कळतांच त्यानें सन १७६७ मध्यें हिंदुस्थानावर आठवी स्वारी केली. हिंदुस्थानांत येतांच त्यास अलासिंगाचा

नातू अमरसिंग हा जाऊन भेटला. कोट्याचा रजपूत राजाही या वेळीं अहंमदशहास जाऊन मिळाला. या प्रमाणें सामदामानें आपला अंमल बसविल्यावर अहमदशहा किंचित् स्वस्थ झाला. यावेळीं अहमदशहास नासुर हा व्याधि झालेला असल्यानें त्यायोगें तो फार कष्टी होता. या वेळीं त्यानें युद्धापेक्षां शांततेवर अधिक भरंवसा ठेविला होता व त्यामुळें त्याचा अंमल दिवसेंदिवस वाढतच चालला. या प्रसंगीं अहमदशहानें जें दयाळूपणाचे वर्तन केलें त्यायोगें बरेच रजपूत राजे त्याचे स्नेही झाले; त्याचप्रमाणें अमरसिंहास पतियालाचें राज्यावर बसविल्यानें माळव्यांतील शीख लोकही फार संतुष्ट झाले. पुढें काश्मीरचा सुभा सर्फराजखान यास न्होडस येथें आपलें जवळ बोलावून अहंमदशहा सरहिंद येथें गेला. तेथें येतांच शीख लोकांनीं सरहिंदाची धूळधाणी केलेली पाहून त्याचे मनास फार वाईट वाटलें. त्या नंतर तो लाहोरास आला, तेथें आबेदुल्लाखान यास त्यानें सुभा नेमिलें. याच सुमारास त्याची बारा हजार दुराणी फौज एकदम परत काबुलास जाण्यास निघाली, यामुळें त्याला आपले सर्व मनोरथ बाजूस ठेवून त्या फौजेबरोबर काबुलास परत जाणें भाग पडलें. यावेळीं सुद्धां त्याच्या फौजेस शीख लोकांनीं हल्ल्यावर हल्ले चढवून जर्जर करण्यास मुळींच कमी केलें नाहीं. अबदल्लीची पाठ फिरतांच शीख लोकांनीं लाहोर वगैरे अबदालीनें काबीज केलेला सर्व मुलुख गनिमी काव्याच्या पद्धतीनें आपल्या ताब्यांत घेतला. या शीख लोकांमध्यें रणजीतसिंगाचा आजा चरकसिंग हा पुढारी होता.

## अहंमदशहाचा शेवट.

१८ काबुलमध्यें अहंमदशहा परत गेल्यावर फार दिवस जगला नाहीं. खुरासान येथील बंड मोडून तो कंदाहार येथें गेला. तेथें त्याचा नासुर हा रोग फार वाढला व शेंवटीं सन १७७३ च्या जून महिन्यांत मर्घान येथें हा शूर, साहसी, उद्योगी, विजयी व युद्धशास्त्रविशारद सेनापति आणि तत्कालीन योध्द्यांमध्यें अग्रणी असा लौकिक असलेला अहंमदशहा मरण पावला. या वेळीं त्याचें वय पन्नास वर्षांचें होतें.

१९ अहंमदशहा हा आपल्या प्रतिपक्षांशीं जरी अत्यंत क्रूरतेनें वागत असे, तरी तत्कालीन इतर जेत्यांशीं त्याची तुलना करितां तो बराच उदार व उदात्त असून स्वकीयांविषयीं प्रेमळ व स्वतःच्या प्रजेशीं न्यायी असा होता. गरीबांस दानधर्म करण्यांत तो कधींही मागें पाहत नसे. आणि त्याच्या उपयोगी पडणारास तो भरपूर मोबदला देत असे. खोरासानापासून सरहिंद-पर्यंत व आक्ससपासून इराणी अखातापर्यंत त्याचा अंमल चालत होता. त्याचें नांव निघतांच त्याच्या मित्रांना धीर येत असे व शत्रूंच्या हृदयांत धडकी भरत असे. विद्वानांचा चाहता व पोशिंद असून धर्मगुरूबद्दल त्याचे मनांत आदर वसत असे; तो स्वतः चांगला सुशिक्षित असून शक्य तेथें त्यानें शिक्षणास मदतही केली आहे. त्यानें स्वतःची राज्यतृष्णा तृप्त करण्या-साठीं मनस्वी रक्तपात केला व उत्तरहिंदुस्थानावर स्वाऱ्यावर स्वाऱ्या करून तेथील लोकांस अत्यंत त्रास दिला हें जरी खरें असलें तरी तत्कालीन पद्धती-कडे व आशिया खंडांतील इतर जेत्यांकडे पाहिलें म्हणजे अहंमदशहा त्यांच्या पेक्षां पुष्कळपटीनें श्रेष्ठ असा वाटतो. त्याचें शौर्य, त्याचा सतत उद्योग व त्याचें युद्धशास्त्रांतील नैपुण्य हीं अवलोकन केलीं म्हणजे या त्याच्या गुणांबद्दल त्याची प्रशंसा केल्याशिवाय राहवत नाहीं.

---

# ८ रामशास्त्री

न्यायात् पथः प्रविचलन्ति पदं न धीरः ।

जन्म स. १७२०. मृत्यु ता. २५-१०-१७८९

रामशास्त्री या पुरुषाचें नांव आपण नेहमीं ऐकतों परंतु त्याची विशेष माहिती अशी फारच थोड्यांस असते. याचा जन्म कधीं झाला हें समजण्यास मुळींच साधन नाहीं. यानें पेशव्यांच्या दरबारांत स. १७५१ मध्यें नोकरी पतकरली असा उल्लेख आहे. हा माहुलीचा राहणारा होय.

२ याचे आईबाप लहानपणींच निवर्तले; याचा काका गरीब भिक्षुक असे. यानें लहानपणीं विद्या अशी मुळींच मिळविली नसल्यानें हा वयांत येईपर्यंत जवळ जवळ निरक्षरच राहिला होता, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ब्राह्मण भोजनांत जेवावें, खेळकर मुलांत उनाडावें व कृष्णा नदींत पोहावें असे याचे लहानपणीं त्रिविध व्यासंग असत. चांगला पंधरा सोळा वर्षांचा झाल्यावर हा कांहीं द्रव्यार्जन करीत नाहीं असें पाहून याच्या काकानें याला घरांतून घालवून दिलें, त्यामुळें निराधार होऊन यानें उदरंभरणार्थ साताऱ्च्या अनगळ सावकाराकडेस शागिर्दाची नोकरी धरिली. या नोकरींत असतानां एके दिवशीं पाय धुण्यास बसल्यावर त्याच्या पायावर रामा पाणी घालीत असतां त्याचें लक्ष सावकाराच्या कानांतील भिकबाळीकडेस गेलें, तेव्हां सहजच पाण्याची धार नीट पायावर न पडतां बाजूस पडूं लागली; तेव्हां सावकार म्हणाला, ‘ कायरे रामा, कुठें लक्ष आहे ?’ हें ऐकतांच रामा चटकन म्हणाला “ आपल्या कानांतील भिकबाळीकडेस माझें लक्ष गेल्यानें पाणी टाकण्यांत दुर्लक्ष झालें. ” यावर सावकारानें ‘ अशी भिकबाळी तुला पाहिजे काय ? ’ अशी पृच्छा करितांच रामा ‘ होय ’ म्हणून लागलाच म्हणाला. तेव्हां सावकार त्याला हिणवून म्हणाला, ‘ अरे, असे सोन्यामोत्याचे दागिनें श्रीमंत, विद्वान् किंवा शूर पुरुष यांनाच शोभतात. तुझ्या सारख्या शागिर्दास ते कसे शोभतील ?’ हें मर्मभेदक भाषण ऐकून रामास फार वाईट वाटलें व त्यानें काशीक्षेत्रीं जाऊन विद्याभ्यास करण्याचा निश्चय केला. अर्थातच यावेळीं त्याचें वय चांगलें वीस वर्षांचें झालें असावें.

३ रामा दाक्षिणात्य असूनही केवळ आरंभशूरच नव्हता.त्यानें विद्यार्जनाचा आपला निश्चय ताबडतोब आपल्या यजमानास कळविला व यजमानांनींही उदार बुद्धीनें रामास साहाय्य करून त्याची काशीस रवानगी करून दिली. साताऱ्चे अनगळ सावकार कोट्यधीश असून मोठे धर्मात्मेही होते. काशी-पासून रामेश्वरापर्यंत अनेक ठिकाणीं यांनीं केलेल्या धर्मकृत्यांची थोरवी अद्यापिही वर्णन करण्यांत येते. कोठें घाट, कोठें धर्मशाळा, कोठें देवालयें,

कोठें निबिड अरण्यांत विहिरीं अशीं अनेक लोकोपयोगी स्थलें त्यांनीं बांधिलीं आहेत व अशा कित्येक स्थलांचे त्यांनीं जीर्णोद्धारही केले आहेत. सारांश, अशा धर्मकृत्यांत त्यांनीं लक्षावधी रुपये खर्चून आपलें नांव चिरंजीव करून ठेविलें आहे. माहुलीस कृष्णा व वेण्या यांच्या संगमावरील अनगळांचा घाट फार प्रसिद्ध आहे. शेवटल्या रावबाजीच्या मनांतून असा घाट आपण बांधावा असें फार होतें परंतु अनेक अडचणीमुळें हा त्याचा हेतु सिद्धीस जाईना. तेव्हां त्यानें अनगळांच्या वंशजास एक लाख रुपये देऊन घाट बांधण्याचें पुण्योदक आपल्या हातावर घालण्यास सांगितलें. यावेळीं अनगळांचें घराणें अगदींच खालावलें होतें. तथापि अशाही विपत्तिमध्यें घाटाचें पुण्योदक त्यांनीं बाजीरावाचे हातावर सोडण्याचें साफ नाकारिलें यांतच त्यांचा थोरपणा व्यक्त झाला, असो.

४ रामा जेव्हां काशीस गेला, तेव्हां तेथें प्रख्यात वैय्याकरण बाळंभट पायगुंडे यांची पाठशाळा फार प्रसिद्ध होती. रामानें बाळंभटास भेटून आपली सर्व हकीकत सांगितली व त्यांच्या पाठशाळेंत तो प्रविष्ट झाला. हा वीस वर्षांचा झाला असून अद्यापि याला रूपावळीसमासचक्रही येत नाहीं हें पाहून पाठशाळेंतील विद्यार्थ्यांस फारच आश्चर्य वाटलें. परंतु याचा दृढ निश्चय पाहून गुरुजींनीं यास आपल्या घरीं ठेवून घेतलें. बाळंभटजींच्या पाठशाळेचा सालीना खर्च सुमारें एक लाख रुपये असून तो जयपुर संस्थानाकडून पुरविला जात असे.

५ या पाठशाळेंत रामा दाखल झाल्यावर त्याला त्याच्याच सारखा बाणेदार सहाध्यायी तेथें मिळाला. त्याचें नांव अनंतभट्ट होय. हा अनंतभट्ट बाळंभट पायगुंड्यांचा भाचा असून बाळंभट्टानें यासच आपली मुलगी दिली असल्यानें हा त्यांचा जांवईही होता. बाळंभट्टाच्या घरीं असा प्रघात असे कीं, त्यांचे जे शिष्य चतुःशास्त्री, षट्शास्त्री असे नामांकित विद्वान् असत त्यांस रोज पंक्तींत चांदीचीं ताटें मांडीत असत व बाकीच्यांस केळीचीं पानेंच असत. अनंतभट्ट फक्त जांवईच होता, विद्वान् नव्हता म्हणून त्यासही

केळीचे पानावरच बसावें लागे. एके प्रसंगीं हे जांवईबुवा आपणांस चांदीचे ताटच पाहिजे असा सासूबाई जवळ हट्ट घेऊन रुसून बसले. सर्व मंडळी आपआपल्या पात्रावर येऊन बसली परंतु अनंतभट्ट न आल्यानें खोळंबा झाला, म्हणून गुरुजींनीं तपास केला, तेव्हां त्यांस जांबइबावाच्या रागावण्याचें कारण समजलें. 'आजचा सणाचा दिवस आहे, आज जांवईबोवास चांदीचे ताटांत वाढावें' अशी सासूबाईनींहीं आंतून शिफारस केली त्यावर गुरुजी ह्मणाले, 'आमच्या पंक्तींत चांदीच्या ताटाचा मान जांवयासाटीं नाहीं. फक्त विद्वानासच आहे. तुमच्या जांवयास चांदीचे ताटांतच वाढावयाचें असल्यास सैंपाकघरांत चुलीजवळ खुशाल त्यांचें पान मांडा, आमची त्याला मुळींच हरकत नाहीं. येथें विद्वानांच्या पंक्तींत मात्र त्यांना चांदीचे ताटांत बसतां येणार नाहीं. कारण ते स्वतः निरक्षर असल्यानें त्यांस चांदीचे ताट दिल्यानें विद्वानांचा अपमान केल्यासारखें होईल.' गुरुजींचें हें स्पष्ट व निश्चयात्मक भाषण ऐकतांच अनंतभट्ट मुकाट्यानें केळीच्या पानावर जेवावयास येऊन बसला. परंतु हा प्रकार त्यास फार लागला व तेव्हांपासूनच दृढ निश्चयानें व एकाग्रतेनें अभ्यास करण्यास त्यानें आरंभ केला अनगळांच्या घरचा रामा व हा अनंतभट्ट या दोघांचाही स्वाभिमान अपमानानें जागृत झाला व जवळ जवळ ते समवयस्क असल्यानें त्यांची गट्टी जमली. या उभयतांनीं आपला विद्याभ्यास पूर्ण होईपर्यंत पाठशाळा, गंगानदी व व काशीविश्वेश्वराचें देऊळ या व्यतिरिक्त चवथ्या स्थळाचें दर्शन घेतलें नाहीं.

६ रामशास्त्री जसा प्रख्यात धर्मशास्त्री झाला तसाच अनंतभट्टही मोठा वेदान्ती म्हणून प्रसिद्धीस आला. विश्वगुणादर्श काव्याचा कर्ता व्यंकटाध्वरि हा द्वैतवादी असल्यानें याच्या व अनंतभट्टाच्या वादाची एक दंतकथा प्रसिद्ध आहे. हा कवि पुण्यास कांहीं दिवस राहत असतांना मोठ्या थाटानें रोज संध्याकाळीं फिरावयास जात असे. त्यावेळीं मस्तकावर सुवर्ण किरीट, दंडांत बहुभूषणें, मनगटांत सुवर्णवलयें, पायांत रुप्याचे खडाव, अंगावर बहुमोल शाल असा एकंदर याचा डौल असून याच्यापुढें सुवर्ण दंडधारी

भालदार ‘ महाभाष्यखंडन कर्तारः समायातारः ’ असें ललकारत धांवत असत. हा याच्या स्वारीचा बडेजाव व दंभ एकदां रामशास्त्र्यानें प्रत्यक्ष पाहिला; तेव्हां त्या अत्यंत निःस्पृह पुरुषास याचा फार राग आला व त्यानें महाभाष्याचें खंडन अनंतभट्टापुढें करण्यास व्यंकटाध्वरीस आव्हान केलें. ठरविलेल्या पहिल्या दिवशीं अनंतभट्ट एकाएकीं आजारी झाल्यानें वाद तहकूब राहिला. दुसरा दिवस मुकरर केला तेव्हां हा व्यंकटाध्वरि पळून गेला. ही जुनी ऐतिहासिक गोष्ट भारत वर्षांत दिली आहे. परंतु अनंतभट्ट हा अठराव्या शतकांतला असून व्यंकटाध्वरि सतराव्या शतकांतला आहे. तथापि यावरून इतकें दिसतें कीं, कोणातरी तत्कालीन द्वैतवाद्यांशीं अनंतभट्टाचा वाद होऊन त्याचा वरप्रमाणें प्रकार झाला असेल व त्या वाद्याचें व्यंकटाध्वरि हेंच कदाचित् नांव असेल. कसेंही असो, अनंतभट्ट पुढें नामांकित विद्वान् झाला असें या दंतकथेवरून दिसतें.

७ शिक्षण संपादन केल्यावर रामशास्त्री स. १७५१ मध्यें पेशव्यांचे दरबारांत धर्मखात्यांत चाकरीस राहिला. नानासाहेब पेशव्याच्या अंतापर्यंत त्याची विशेष प्रसिद्धी दिसत नाहीं. तथापि स. १७५९ मध्यें बाळ कृष्णशास्त्री निवर्तल्यावर यालाच न्यायाधिशीच्या जागीं नेमिलें असें डफ म्हणतो. थोरल्या माधवरावानें मात्र त्याला स. १७६४ मध्यें मुख्य न्यायाधीश नेमिलें यांत शंकाच नाहीं. त्याच्या न्यायैकशीलतेबद्दल इतकी प्रसिद्धी आहे कीं, तिचें वर्णन करण्याचें मुळींच कारण नाहीं. त्याचे निवाडे अद्यापिही सर्वमान्य समजले जातात. डफनें त्याची केलेली स्तुति योग्य आहे इतकेंच नव्हे पण खरेंच सांगावयाचें तर ती थोडीच आहे असें म्हटलें तरी चालेल.

८ थोरल्या माधवराव पेशव्याचा दरारा सर्व प्रसिद्धच आहे. पण हा पेशवासुद्धां रामशास्त्र्यास फार मानीत असे. स्वारींत असतांना स्वारींतील प्रत्येक महत्वाची बाबत तो शास्त्रीबोवास नियमितपणें कळवीत असे. हैदरावरील स्वारींत असतांना माधवरावाची प्रकृति फार बिघडली, परंतु स्वारी पूर्ण केल्याशिवाय जेव्हां तो परतेना तेव्हां रामशास्त्र्यानें त्याच्या प्रकृतीच्या

अस्वास्थ्यामुळें एकदम परत फिरावें असें लिहून पाठविलें. हें पत्र येतांच 'आपल्या आज्ञे बाहेर काय आहे' असें कळवून तत्काळ सैन्यासह तो परत फिरला अगदीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्या मातुश्रीच्या खालोखाल आदर माधवरावास रामशास्त्र्याबद्दल असे. माधवरावानें आपल्या राज्यांत ज्या सुधारणा केल्या त्यास रामशास्त्र्याची अनुमती असे. आणि इतर कोणत्याही पेशव्यापेक्षा माधवरावाचा स्वभाव जो एवढा न्यायनिष्ठुर दिसतो त्याला रामशास्त्रीच कारण असावा असें वाटतें.

९ थोरला माधवराव पेशवा ब्रह्मकर्मांत फार वेळ घालवूं लागला हें पाहून रामशास्त्र्यानें त्याचा निषेध करून प्राप्त कर्तव्याची त्याला जाणीव करून दिली, माधवराव पेशव्याची पत्नी रमाबाई हिनें रामशास्त्र्याच्या कुटुंबास एकुदां वस्त्राभरणांनीं लेववून घरीं पाठविलें असतां तीं वस्त्राभरणें रामशास्त्र्यानें तत्काल परत केलीं, इत्यादि रामशास्त्र्याच्या निःस्पृहपणाच्या गोष्टी प्रसिद्धच आहेत. पण सर्वांहून खडतर अशी त्याच्या नि:स्पृहपणाची परीक्षा नारायण-रावाच्या खुनाच्या वेळीं झाली. नारायणरावाच्या खुनांत राघोबाचें अंग आहे असें सप्रमाण सिद्ध होईपर्यंत राघोबाच्या पेशवेपदाला रामशास्त्र्यानें सुद्धां हरकत घेतली नव्हती. परंतु खुनी इसमाचा तपास मात्र तो बारकाईनें करीत होता. खुनानंतर सुमारें सहा आठवड्यांनीं त्याला पुरावा मिळतांच तो ताबडतोब राघोबास जाऊन भेटला व त्यानें या दोषाबद्दल राघोबास देहान्तप्रायश्चित सांगितलें इतकेंच नव्हे परंतु राघोबा पेशवाईवर असेपर्यंत आपण पुण्यास पाणी पिण्याससुद्धां थांबणार नाहीं असें सांगून तो लागलीच माहुलीस निघून गेला. राघोबा पेशवेपदावर असतांना हें रामशास्त्र्याचें वर्तन कोणीही लिहून ठेविण्यास अगर बाहेर पाठविण्यास धजला नाहीं यामुळें ही हकीकत नारायणरावाच्या बखरीशिवाय इतर कोठेंच लिहि-लेली आढळत नाहीं. नानाफडणवीस, सखाराम बापु वगैरे मुत्सद्दी मंडळीही ज्यावेळीं राघोबाला थरथरां कांपत होती त्यावेळीं रामशास्त्र्यानें राघोबाच्या पदरीं दोषाचें माप पुरेपुर टाकून स्वतः पुण्याहून माहुलीस ताबडतोब चालता

झाला. राघोबा जनतेच्या मनांतून निखालसपणें उतरण्यास व नानाबापूंना राघोबाविरुद्ध कारस्थान रचण्यास हा न्यायदेवतेचा खंबीर दोषारोपच मोठा आधार झाला. बारभाईचें कारस्थान सिद्धीस गेल्यावर सवाई माधवरावाचा जन्म होऊन राज्यकारभार सुरळीत चालू लागतांच रामशास्त्र्यास पुनः बोलावून पुण्यास न्यायाधीशीवर नेमण्यांत आलें, व तें काम त्यानें शेवट पर्यंत केलें. रामशास्त्र्या सारखा निःस्पृह रामशास्त्रीच होय.

१० परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या बयाबाई नांवाच्या सात वर्षांच्या कन्येचा पुनर्विवाह करण्यास रामशास्त्र्यानें संमति दिली. तसेंच प्रभूंच्या ग्रामण्याच्या बाबतींत त्यानें प्रभूंच्या तर्फे निकाल दिला, या गोष्टी त्याच्या प्रागतिक मताची साक्ष देतात. पुनर्विवाहास संमति दिल्याबद्दल लेखी पुरावा अद्यापि सांपडत नसल्यानें ही दंतकथा अविश्वसनीय असावी असें कित्येकांचें ह्मणणें आहे. परंतु रामशास्त्र्या सारख्यांची संमति मिळवूनही ज्याअर्थी हा पुनर्विवाह घडवून आणण्यास परशुरामभाऊ आप्तेष्टांच्या भीतीनें धजला नाहीं त्या अर्थी ही मिळविलेली संमति व एतत्संबंधीं कागदपत्रेंही त्यानें नष्ट करून टाकले असणें शक्य आहे.

११ रामशास्त्री एवढा निःस्पृह व न्यायैकशील होता तथापि त्यावरही लांच खाल्ल्याचा आरोप कित्येकांनीं केल्याचा उल्लेख सांपडतो. यावरून एवढेंच सिद्ध होतें कीं, जग कोणालाही नांवें ठेविल्याशिवाय राहत नाहीं. जोशी व पाध्ये यांच्या वादांतील रामशास्त्र्यानें दिलेलें निवाडपत्र आतां प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून वतनावर जोश्यांचा हक्क सिद्ध झाला असून पाध्ये खोटे ठरले आहेत. या निवाड पत्रांत पाध्यांनीं खोटीं ताम्रपत्रें केल्याचाही आरोप रामशास्त्र्यानें पाध्यांवर केला आहे. वाद सुरू होण्यापूर्वी तीस चाळीस वर्षें तें वतन जोश्यांकडेस चालत असून त्यापूर्वी हें वतन आपणांकडेस चालत होतें असें पाध्यांचें म्हणणें होतें परंतु तेंही सिद्ध झालें नाहीं. तथापि सिद्ध झालें असें समजलें तरीही तीस चाळीस वर्षांचा जोश्यांचा भोगवटा काढून टाकून तीं वतनें पाध्यांस दिलीं नाहींत, या बद्दल रामशास्त्र्याला दोष देणें न्याय्य होणार नाहीं.

१२ सन १७५१ सालीं रामशास्त्री नोकरींत राहिला. त्यावेळीं त्यास दौड-माही रु. ४७ व त्याशिवाय तैनात, श्रावणमासची दक्षिणा व कापड या बाबती मिळून वर्षाचे अखेरीस. रु. १४४१ [illegible] उल्लेख आहे. म्हणजे दरमहा सरासरी एकशे वीस रुपये पगार असे असें दिसतें व त्याच्या पगाराची हीच सरासरी शेंवटपर्यंत कायम असलेली दिसते. कधीं त्यास सालीना हजार तर कधीं तीनशें साठापर्यंतही हा पगाराचा आकडा खालीं आलेला दिसतो. स. १७६४ सालीं मात्र त्याला पालखीची असामी दिली व तेव्हां पासून सालीना दोनहजार रुपये त्याचे नांवें खर्च पाडल्याचे नमूद आहेत. या शिवाय स. १७६६ सालीं त्याचें कर्ज वारण्यास पांच हजार रुपये दिल्या-चाही दाखला आहे. सन. १७६४ नंतर त्याच्या पगाराची रकमही तीनहजार पर्यंत वाढल्याचें दिसतें. या शिवाय स. १७७९ सालीं शास्त्री यांची पत्नी निवर्तली तिचे उत्तरकार्यास रु. १५०० व शास्त्र्याच्या दुसऱ्या लग्नास तीन-हजार रुपये खर्च पडल्याचें हिशेबांत नमूद आहेत. रामशास्त्र्यानें आपल्या वयाच्या सुमारें साठाव्या वर्षीं दुसरें लग्न केलें हा तत्कालीन धर्म समजुतीं शिवाय इतर कसलाही परिणाम नसावा. ब्राह्मणानें सदोदित कोणत्या तरी आश्रमांत राहिलें पाहिजे ही धार्मिक समजूत, व अनेक कारणांनीं चतुर्थाश्रम घेणें आपणांस अशक्य ही खात्री वाटून रामशास्त्र्यानें पुन: लग्न केलें असलें पाहिजे. असो. या नंतर स. १७८५ सालीं कर्ज वारण्यासाठीं म्हणून पुन: रामशास्त्र्याला पंधराहजार रुपये दिल्याचा उल्लेख असून स. १७८६ सालीं मुलाचे लग्नास सामान दिलें असाही दाखला सांपडतो. रामशास्त्री स. १७८९ सालीं ता. २५ ऑक्टोबर रोजीं मृत्यु पावला, तेव्हांही उत्तर कार्यास दोन-हजार रुपये व त्याच्या गोपाळशास्त्री नामक मुलास वस्त्रें देऊन हजार रुपये सालाचा तनखा बांधून दिला व ही रकम पुढें तीन हजारपर्यंत वाढविली.

रामशास्त्र्यानें पेशव्यांच्या दरबारांत सरासरी चाळीस वर्षे नोकरी केली व या चाळीस वर्षांत त्याचे नांवें पगार, कापड, पालखी, श्रावणमास दक्षिणा, तैनात, कर्जनिवारण, पत्नीचें उत्तर कार्य अशा अनेक बाबती मिळून अवघे

पंचावनहजार नऊशें अडुसष्ट रुपये खर्च पाडल्याचे पेशवे दसरांत नमूद आहेत. म्हणजे सरासरी सालीना चौदाशे रुपये पडतात. या वरून आरंभीं त्याला दरमहा एकशे वीस रुपये पगार स. १७५१ मध्यें पडल्याचें जें लिहिलें आहे तोच त्याचा दरमहा एकशे वीस रुपये पगार आमरण त्यास पावलेला दिसतो. माधवराव पेशव्याच्या वेळीं राज्याचा एकंदर वसूल सुमारें अठरा कोटी व सवाई माधवरावाच्या कारकीर्दीच्या शेवट भागीं तीस कोटी होता हें लक्षांत ठेविलें आणि रामशास्त्री त्यांचा मुख्य न्यायाधीश होता हें पाहिलें म्हणजे त्या स्वराज्याच्या काळांत स्वस्ताई असल्यामुळें किती थोड्या पगारावर कितीतरी मोठ्या योग्यतेचीं माणसें मिळत असत हें स्पष्ट दिसतें.

---

# ९ भास्करराम.

### मृत्यु स. १७४४.

बाळाजी विश्वनाथाच्या उदयानंतर जीं चित्पावन घराणीं उदयास आलीं त्यांपैकीं कोल्हटकरांचें एक घराणें होय. रामाजी नारायण कोल्हटकर या नांवाचा एक पुरुष निव्वळ साधुवृत्तीचा होता. त्यास भास्कर व कोन्हेर असे दोन मुलगे होते. यांपैकीं भास्कर हा शूर असून कोन्हेर हा मुत्सद्दी होता. हे उभयतां बंधु रघूजी भोसल्याच्या पदरीं होते, व रघूजीचाही या घराण्यावर फार लोभ असे. कारण रघूजीनें लहानपणीं भास्करपंताच्या मातुश्रीचें स्तनपान केलें होतें.

२ शाहूच्या पश्चात् मराठी राज्याचीं सूत्रें नानासाहेब पेशव्यांच्या हातांत आलीं तेव्हां त्यास बाबूजी नाईक, दमाजी गायकवाड, तुळाजी आंग्रे, रघूजी भोसले, प्रतिनिधि, ताराबाई वगैरेंनीं फार जोराचा विरोध केला. या विरोधकांपैकीं एकाच्या म्हणजे रघूजी भोसल्याच्या पदरीं भास्कर

राम हा सेनापति असल्यानें त्याच्याबद्दल नानासाहेब पेशव्यास कधींच आदर वाटला नाहीं. तथापि भट—पटवर्धनाप्रमाणेंच हें कोल्हटकरांचें घराणेंही तेव्हां शौर्यांत नांवाजलें गेलें होतें यांत शंका नाहीं,

३ रघूजी आणि पेशवा यांचा युद्धप्रसंग होऊन तह झाल्यावर रघूजीस मुलुखगिरासाठीं फक्त बंगाल प्रांतच मोकळा राहीला होता. या बंगाल्यांतील स्वाऱ्यांत भास्करराम आणि कोन्हेरराम यांनीं रघूजीस फारच उत्कृष्टपणें सहाय्य केलें. स. १७४२ पासून सन १७५१ पर्यंत रघूजीनें बंगाल प्रांतांत एकंदर चार स्वाऱ्या केल्या. यावेळीं अलीवर्दीखान हा बंगालचा नबाब होता.

४स. १७४१ मध्यें अलीवर्दीखानानें बंगाल बहार आणि ओरीसा-उरसा ओड्या—प्रांत मिळविला. या वेळीं मीर हबीब नांवाचा एक मनुष्य ओरीसाचे कारभारावर होता. या इसमास अलीवर्दीनें हाकून देऊन तेथें आपला नातू सिराजउद्दौला यास ठेविलें. नागपुराहून बंगाल्यांत जातांना रस्त्यावर हा ओरीसा प्रांत लागतो. याप्रमाणें मीर हबीब पदच्युत होतांच त्यानें रघूजीजवळ मदत मागितली. यावेळीं रघूजी कर्नाटकांत असून भास्करराम हा वऱ्हाड नागपुराकडेस होता. रघूजीनें लवकरच भास्कररामास ओरीसावर पाठविण्याची तजवीज केली.

५इकडे सिराजउद्दौल्यानें ओरीसामध्यें फार जुलमी वर्तन केल्यामुळें तेथील प्रजा बिथरून गेली. अशा संधींत आपण स्वारी केली तर आपला कार्यभाग होईल अशा हेतूनें भास्कररामानें ओरीसाकडे कूच केलें. परंतु भास्करराम तेथें जाऊन पोंचण्यापूर्वींच अलीवर्दीखानानें ओरीसांतील बंड मोडून टाकिलीं व तो परत जाण्यास निघाला, परंतु वाटेंतच त्यास भास्कररामाच्या आगमनाची खबर मिळाली. भास्कररामाबरोबर अवघी दहा हजार फौज होती. पण भास्करराम हा स्वत:उत्कृष्ट सेनापति असल्यानें तो आपल्या फौजेची अशी कांहीं व्यवस्था लावी कीं शत्रूस ही फौज चाळीस पन्नास हजार आहे असें वाटे. ज्या प्रमाणें एकटा नेपोलियन म्हणजे एक लाख सैन्य त्याच प्रमाणें एकटा भास्करराम म्हणजे चाळीस हजार फौज होय असें यावरून सिद्ध होतें.

भास्कररामानें पहिल्या धडाक्यांत पंचायत परगणा लुटून अलीवर्दीखानाच्या फौजेशीं गांठ घालून तिचा फडशा उडविला. याप्रमाणें अलीवर्दीचा पराभव होतांच तो मोठ्या शिकस्तीनें खटव्यापर्यंत मागें हटला. यावेळीं या उभयतांमध्यें तहाची वाटाघाट चालूच होती. लढाई होण्यापूर्वी भास्कररामानें अलीवर्दीखानाजवळ ओरीसाच्या चौथाईबद्दल दहा लक्षांची मागणी केली, पण खानानें ती अमान्य केली. लढाई हरल्यावर ही मागणी त्यानें कबूल केली, पण यावेळीं भास्करराम विजयी झाला असल्यामुळें त्यानें आपली पूर्वीची मागणी एक कोटीपर्यंत वाढविली. ही मागणी खान कबूल करीना. त्यास भास्कररामाचा फार राग आला. त्याच्या पदरीं अफगाण फौज होती ती यावेळीं बिथरली होती. पण खान मोठा मानी असल्यानें त्यानें भास्कररामास शरण जाण्याऐवजीं फौजेचीच मनधरणी केली व कसाबसा जीव बचावीत खटव्यापर्यंत जाऊन त्यानें तेथें मुक्काम केला. भास्करपंत त्याच्या पाठीवर होताच त्यास बरद्वान शहर रस्त्यांत लागलें, तें त्यानें मनसोक्त लुटलें. या लुटींत भास्कररामास अगणित द्रव्य मिळालें. इतक्यांत पावसाळा सुरूं झाला. तेव्हां भास्कररामानें परत नागपुरास जाण्याचा बेत केला. परंतु ज्या मीर हबीबनें भास्कररामास येथपर्यंत बोलाविलें होतें तो मीर हबीब त्यास असें अर्धेंच काम टाकून परत जाऊं देईना. शिवाय मीर हबीबचा भाऊ अलीवर्दीच्या कैदेंत होता. त्याचीही सुटका अद्यापि झाली नव्हती. निदान त्याची सुटका करून मग भास्कररामानें जावें असें मीरचें म्हणणें होतें. मीरनें आणखी असेंही कळविलें कीं, अलीवर्दीचा पराभव करून मुर्शिदाबाद शहर लुटण्यास मिळालें तर अपार संपत्ति प्राप्त होईल. मीर हबीबनें नुसतें वरप्रमाणें सांगितलें इतकेंच नव्हे पण एकदम मुर्शिदाबादेवर एकट्यानें चाल केली व आपल्या भावाची मुक्तता केली. यानंतर त्यानें मुर्शिदाबादेंतील प्रसिद्ध सावकारांस गांठून अडीच कोट रुपयांची लूट मिळविली व तो पुन: भास्कररामास येऊन मिळाला. भास्कररामानें हा मीर हबीबचा विजय पाहून तिकडेसच पावसाळ्याची छावणी करण्याचें ठरविलें. त्यानें पुढें

मिदनापुरपर्यंतचीं ठाणीं काबीज केलीं. मध्यें हुगळी नदीस पूर आला असल्यामुळें अलीवर्दीखान भास्कररामाच्या तडाख्यांतून सुटला. नाहींतर भास्कररामानें याचवेळीं त्याची चटणी उडवून दिली असती. अलीवर्दीखान याप्रमाणें निसटल्यावर उगीच स्वस्थ बसण्यापेक्षां कांहीं तरी करावें या हेतूनें मीर हबीबच्या सल्ल्यानें भास्कररामानें नाबडतोब हुगळी शहर हस्तगत केलें पुढें ओरीसांतील बालासोर बंदरही त्यानें घेतलें. भास्कररामानें या स्वारींत बहुतेक बंगालप्रांत आपल्या कबजांत घेतला. गंगेच्या पूर्वतीरावरील प्रांत व मुर्शिदाबाद येथेंच कायतो नबाबाचा अधिकार राहिला होता. मराठ्यांच्या पराक्रमाचा दरारा यावेळीं भास्कररामानें बंगालवर फारच कडक बसविला. या वेळीं भास्कररामाच्या हल्ल्यापासून आपलें संरक्षण व्हावें म्हणून इंग्रजांनीं कलकत्त्यास किल्ला बांधिला आणि त्या किल्ल्याभोंवती एक फार मोठा खंदक खणण्यास सुरुवात केली. या खंदकास ‘ मराठा डिच ’ अशी संज्ञा अद्यापिही आहे. भास्करराम भराभर विजय मिळवीत गेल्यानें त्याला मागचा पुढचा फारसा पोंच न राहून त्याच्या फौजेची फारच पांगापांग झाली. बंगाल्यांत नवरात्रामध्यें दुर्गापूजेचा फारच मोठा समारंभ करीत असतात. पावसाळा संपल्यावर भास्करपंतानें विजयानंदांत गर्क होऊन हा उत्सव फार मोठा करण्याचें ठरविलें. व यासाठीं मोठमोठ्या लोकांना त्यानें आमंत्रणें दिलीं होतीं. भास्करराम याप्रमाणें चैनींत गर्क असलेला पाहून अलीवर्दीखानानें आपलें सैन्य जवळच गंगेच्या परतीरावर आणून उभें केलें. इतकेंच नव्हे पण होड्यांचा पूल करून तें सैन्य मोठ्या बहादरीनें भास्कररामासमोर येऊन उभें राहिलें व त्यानें हल्लाही चढविला. उत्तररात्रीं अकस्मात् याप्रमाणें हल्ला येतांच भास्कररामाच्या सैन्याची फार त्रेधा उडाली. परंतु मीर हबीबनें मोठ्या हिकमतीनें मार्ग दाखवून मराठ्यांना या वेळीं बचाविलें. रघूजीनें मदतीस फौज पाठवावी म्हणून भास्कररामानें मागणी केली होती व त्याप्रमाणें रघूजी तयारी करीत आहे तोंच भास्कराराम स्वतःच हार खाऊन नागपुरास

परत आला. याचवेळीं पेशवे आणि रघूजी यांची चुरस वाढली असून त्यांचें युद्ध सुरू झालें होतें, यामुळें रघूजीस बंगालकडेस लक्ष देण्यास सवड झाली नाहीं. पुढें स. १७४४ मध्यें रघूजीनें फार मोठ्या फौजेनिशीं भास्करपंतास बंगाल्यावर पाठविलें. यावेळीं मराठ्यांशीं लढण्याचें आपलें सामर्थ्य नाहीं असें पाहून अलीवर्दीखानानें कपटानें तहाची वाटाघाट सुरू केली. ही वाटाघाट भास्करपंताच्या फौजेंतील अलीभाई नांवाच्या एका मुसलमान झालेल्या मराठ्याच्या मार्फत खानानें चालू केली होती. अलीवर्दीखानानें खटण्यास भास्करपंताचे जवळच आपला मुकाम ठेविला होता. या उभयांच्या भेटीचा दिवस मुक्रर होऊन भास्करपंत खानाच्या तंबूत त्यास भेटण्यास निवडक वीस मंडळीसह गेला. त्याचा तेथें फार मोठा आदरसत्कार झाला. आंत तंबूत जाऊन बसतांच खानानें भास्करपंडित कोणते असा प्रश्न केला. तेव्हां मंडळींनी पंडिताकडेस अंगुलिनिर्देश केला; तो पाहतांच खान एकदम ' काफरकु मारो ' असें मोठ्यानें ओरडला. लागलीच मारेकरी धावून आले व त्यांनीं भास्करपंताचा खून केला. तंबूच्या दोऱ्या कापून टाकिल्यामुळें एका ही सरदारास पळून जातां आलें नाहीं. बरोबरच्या लोकांसह भास्कररामाचा खून होतांच मराठ्यांचें सैन्य लागलेंच पळून गेलें. याप्रमाणें अलीवर्दीखानास यावेळीं यश मिळालें. ही बातमी रघूजी गायकवाड यानें नागपुरकर भोंसल्यास कळविली. या खुनाचा वचपा पुढें मराठ्यांस चार वर्षेंपर्यंत घेतां आला नाहीं. स. १७४८ मध्यें रघूजीचा मुलगा जनोजी यानें मात्र या खुनाचा वचपा अगदीं बरोबर घेऊन पाहिजे तसा तह अलीवर्दीखानापासून करवून घेतला. यावेळीं भोंसल्यांनीं कटक, ओढिया वगैरे प्रांत हस्तगत करून अलीवर्दीखानाकडून भास्कररामाच्या खुना बद्दल ' मुंडकटाई ' ह्मणून पंचवीस लाख रुपये रोख घेतले.

भास्कररामाच्या खुनाच्या वेळची आलीवर्दीखानाची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. ती अशी कीं, खुनाच्या वेळीं आलीवर्दीखान ही तंबूतच होता. तो त्या गडबडींत एकदम बाहेर पडला. त्या वेळीं त्याच्या पायांतील एक

चर्म पादुका तंबूमध्यें राहिली. त्याप्रसंगीं त्यानें आपल्या हुजऱ्यास ती पादुका आणण्यास सांगितलें. तेव्हां एक सरदार ह्मणाला, ' खावंद जोडा पाहण्याची ही वेळ नाहीं. पण खानानें त्यास उत्तर दिलें, ' छे, मी जर या वेळीं जोडा टाकून गेलों तर पुढे लोक असें म्हणतील कीं, नबाबसाहेब मोठ्या गर्दीनें आपला जोडा टाकून पळून गेले ' असें ह्मणून जोडा आल्यावर मग अलीवर्दीखान तेथून निघून गेला.

भास्करपंताचा खून झाला तेव्हां त्याची पत्नी ताईबाई ही गर्भिणी असून स्वारी बरोबरच होती. तिला एका पठाणाच्या बायकोनें गुप्त रीतीनें काशीस पोंचवून दिलें. तेथें तिला एक मुलगा झाला तोच काशीराव भास्कर होय. वऱ्हाडांतील सुभा रघूजीनें या ताईबाईचेच नांवें करून दिला होता.

रघूजीच्या बंगालमधील उद्योगाबद्दल व भास्कर पंताच्या पराक्रमाबद्दल नानासाहेब पेशव्यानें अगदीच उदासीनता स्वीकारिलेली दिसते. मराठी रियासत मध्यविभाग २ यांत पृष्ठ ५०२ वर रा. सरदेसाई पुढीलप्रमाणें लिहितात. ' किंबहुना भोंसल्यांच्या पदरीं राहणाऱ्या कोल्हटकरांची व पेशव्यांची आरंभापासूनच पुष्कळशी चुरस व तेढ असावी, असा बळकट संशय येतो. इतर सर्व सरदारांस त्यांच्या पराक्रमाबद्दल पेशव्याकडून प्रोत्साहन व शाबासकी देण्यांत येत असतां, व भोसल्यांच्या पदरीं कोल्हटकर घराण्यांतील पुरुष अलौकिक पराक्रम करीत असतां, व भास्करपंतासारखा मोहरा, खून होऊन गमावला असतां त्यासंबंधानें पेशव्यांनीं शब्दानें किंवा कृतीनें यत्किंचितही बरावाईट अभिप्राय दाखविला नाहीं. जणूं काय, भोंसल्यांचें राज्य व त्यांचा उद्योग हा मराठशाहीचा अंशच नव्हे...रघूजीस पेशव्यांचें पाठबळ असतें, तर भास्करामाच्या खूनाबद्दल सूड तेव्हांच घेतां आला असता...पराक्रमाच्या दृष्टीनें पाहतां पेशव्यांच्या तोडीचेंच कोल्हटकरांचें घराणें होतें. ' हा अभिप्राय फार मार्मिक व निःपक्षपातीपणाचा आहे.

पुढें रघूजीच्या मृत्यूनंतर पेशव्यांनीं या कोल्हटकरांस भोसल्यांच्या कारभारांतून हळूच युक्तीनें दूर सारून देवाजीपंत चोरघोड्यास पुढें आणिलें. असो. कोल्हटकरांच्या घराण्याची व त्यांतील प्रसिद्ध व कर्त्या भास्करपंताची हकीकत वरप्रमाणें आहे.

# मुजफरखान गारदी

मृत्यु १७५९

१ आपल्या हिंदुस्थानांत श्री शिवाजी महाराजांनीं गनिमी काव्याची लढाई विशेष प्रसिद्धीस आणिली. रात्रीं वेरात्रीं शत्रूवर छापा घालून लुटालूट करणें व शत्रू सावध होतांच निसटून जाणें हें गनिमी काव्याच्या लढाईचें मुख्य धोरण आहे. ज्याला लांब लांब मजला मारितां येतात, तो गनिमी काव्याच्या लढाईंत कधींच पराभव पावत नाहीं. शिवाजी महाराजांच्या पश्चात् या गनिमी काव्याच्या लढाईंत विशेष तरबेज असे अनेक शूर पुरुष निर्माण झाले त्यांत सर्वांत शेंवटला पुरुष म्हणजे रघुनाथराव पेशवाच होय; व या त्याच्या गुणामुळेंच त्यास राघो भरारी हें अन्वर्थक नांव मिळालें होतें. आतां त्याच्या शौर्यानें राष्ट्रास कांहीं फायदा मिळाला नाहीं उलट राष्ट्राचें नुकसानच झालें हा भाग वेगळा आहे.

२ गनिमी काव्याच्या लढाईचा बीमोड कवाइतीकंपूंनीं केला, हें जरी खरें असलें तरी गनिमी कावा आणि कवाइती कंपू या दोन युद्धपद्धतींत अमुक एक पद्धति दुसऱ्यांपेक्षां अधिक चांगली असें तज्ज्ञांमध्येंसुद्धां अद्यापि निश्चितपणें ठरलेलें नाहीं. अद्यापि त्यांच्यांत तीव्र मतभेत आहे. आपल्या भारतरायाणामध्यें गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा पूर्णपणें निषेध केलेला आहे, व या पद्धतीस अधमयुद्ध असें म्हटलें आहे. शिवाजीमहाराजांना, भारतरामायणापासून देशोद्धाराची स्फूर्ति झाली, असें कित्येक ह्मणतात, त्यांत किनपत तथ्य आहे, हे कांहीं सांगतां येत नाहीं; पण भारतरामायणांत ज्या युद्धपद्धतीचा पूर्णपणें निषेध केला आहे व जी युद्धपद्धति भारतरामायणकारांनीं पूर्णपणें त्याज्य व राक्षसी ह्मणून ठरविली आहे त्याच युद्धपद्धतीचा शिवाजीमहाराजांनीं अवलंब केला होता यांत मुळींच संशय नाहीं. सारांश भारतरामायणावरून शिवाजी महाराजांस देशोन्नतीची स्फूर्ति झाली असली तरी त्यांनी युद्धपद्धति मात्र भारतरामायणांतील त्याज्य असलेलीच स्वीकारिली होती.

३ गनिमीकाव्यापेक्षां कवाइती कंपू श्रेष्ठ होत अशी जी आपली समजूत झाली आहे तिला खरें कारण असें आहे कीं, कवाइती कंपूच्या निष्णात सेनापतीचा गनिमीकाव्याच्या अर्धकच्च्या सेनापतीशीं युद्धप्रसंग होऊन त्यांत अर्धकच्च्या सेनापतीचा पराभव झाला, व त्यामुळेंच गनिमीकाव्याच्या पद्धतीविषयीं आपला प्रतिकूल समज झालेला आहे. दोनही बाजूंच्या निष्णात सेनापतींची गांठ सबंद महाराष्ट्राच्या इतिहासांत एकदांच पडली होती; व तेव्हां कवाइतीकंपूच्या सेनापतीस गनिमीकाव्याच्या सेनापती पुढें हात टेकावे लागले होतें, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे; तो प्रसंग कोणता हें प्रथम थोडक्यांत सांगतो.

४ म्हैसुरास नंदराजा हा मुख्य प्रधान असताना त्यानें हैदरनाइकास आपला सेनापती केला होता. हैदर नाईक हा कवाइती पद्धतीमध्यें निष्णात असा सेनानी होता. कर्नाटकांतून ठरलेली खंडणी पेशव्यास न आल्यामुळें नानासाहेब पेशव्यानें म्हैसुरावर गोपाळराव पटवर्धन व मल्हारराव रास्ते यांची रवानगी केली. शौर्यामध्यें पटवर्धनांचें घराणें फारच प्रसिद्ध होतें. त्यांच्या शौर्याची कसोटी या वेळीं उत्तम लागली. गोपाळराव पटवर्धन हा गनिमीकाव्यानें लढणारा असल्यामुळें त्याजवळ तोफखाना मळींच नव्हता, लांब लांब मजला मारून तो शत्रूस हैराण करीत असे. हैदरनाइकाची शिताफी कांहीं वेगळीच असें एका मजबूत ठिकाणाहून कवाइती पायदळ व तोफखाना बरोबर घेऊन शत्रूस सुगावा लागूं न देतां बारा बारा कोसांची मजल मारून पहाटेच्या सुमारास पहरे गैरसावध असतां तो गोपाळरावाच्या फौजेवर चालून येई. याप्रमाणें या उभयतां सेनापतींचा सामना सुरू झाला. गोपाळराव पौर्वस्त्य (म्हणजे गनिमी काव्याच्या) युद्धपद्धतींत निष्णात होता; तसाच हैदर नाईक हा पाश्चात्ययुद्ध पद्धतींत तरबेज असा होता. याप्रमाणें या दोघां सेनापतींच्या झटापटी सन १७५९ मध्यें सुमारें तीन महिनें सतत झाल्या; व शेवटीं गोपाळराव पटवर्धनाचें युद्ध कौशल्य पाहून हैदर नाइकानें त्याच्यापुढें हात

टोकिले, व रोख बत्तीस लक्ष रुपये त्यास देऊन तह केला. तात्पर्य या वेळीं गनिमीकाव्याचा पूर्णपणें विजय झाला हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. कारण तसें नसतें तर पेशव्यांस बत्तीस लक्ष रुपयासारखी अगडबंब रक्कम हैदर नाइकासारखा पाश्चात्य युद्धकलाविशारद सेनानी कधींही देण्यास तयार झाला नसतां हें उघड आहे. असो.

५ कुकडी नदीवरील लढाईंत नानासाहेबास प्रथम कवाइती- कंपूची माहिती झाली, हें मागें पृष्ठ १६वर रामदासपंताच्या चरित्रांत सांगितलेंच आहे. तेव्हांपासून नानासाहेब पेशव्यास कवाइती पलटणीचें वर्चस्व पटून हिंदुपदपादशाहीचे आपले मनोरथ सिद्धीस नेण्यास आपणही कवाइती पलटण तयार करावी, असें वाटूं लागलें. हिंदुस्थानांत ही कवाइती पलटणीची विद्या प्रथम आणणारा फ्रेंचांचा बुसी होय. ह्मणून बुसीनें तयार केलेल्या माणसांस आपल्या नोकरींत ठेवण्यापेक्षां खुद्द बुसीसच आपल्या तैनातीस ठेवावें, असा विचार महत्वाकांक्षी नानासाहेब पेशव्यास सुचला, परंतु निजाम सलाबतजंगाच्या पदरीं बुसी हा असून त्यानें सलाबतजंगास पिंजऱ्यांतल्या पोपटाप्रमाणें पूर्ण परतंत्र केला होता हें पाहून नानासाहेबास बुसीची भीति वाटून आपण त्यास आपले पदरीं ठेविल्यास तो आपलीही अशीच अवस्था करील, असें वाटूं लागलें; व बुसीस आपल्या पदरीं ठेविण्याचा विचार त्यास रहित करावा लागला.

६ बुसीनें आपल्या तालमींत जीं माणसें तयार केलीं त्या पैकींच मुजफरखान हा एक होता. पण पुढें खानाचें व बुसीचें कांहीं कारणावरून बिथरल्यामुळें बुसीनें मुजफरखानास आपल्या नोकरींतून काढून दिलें. पेशव्यांना याच वेळीं कवाइती तज्ज्ञाची अवश्यकता असल्यानें त्यांनीं मुजफरखानास एकदम आपल्या नोकरींत ठेविलें, व त्याचे कबिले ठेविण्यासाठीं म्हणून त्यास जुन्नर प्रांतांतील वेल्हेगांव पेशव्यांनीं दिलें. बुसी हा युरोपियन आणि मुजफरखान हा हिंदी यामुळें बुसीपेक्षां मुजफरखानाच्या बद्दल जरी थोडा अधिक आपलेपणा असला तरी ही एकादें ब्राह्मण बराणें तोफ

खान्याच्या कामांत तयार करावें या उद्देशानें धूर्त व दूरदर्शी अशा नानासाहेब पेशव्यानें पानशांचें घराणें पुढें आणिलें असावें असें वाटतें. पानशे हे देशस्थ ब्राह्मण असून पुरंदर तालुक्यांत सोनेरी गांवचे राहणारे. यांचा मूळ पुरुष यशवंतराव हा शाहूजवळ तोफखान्याचा दरोगा होता. याचा मुलगा माधवराव यास नानासाहेबानें तोफखान्याचा अंमलदार नेमिलें. याप्रमाणें या घराण्यास पुढें आणिलें. असो. पुढें सन १७५४ तारीख २४ आक्टोबर पासून सन १७५५ तारीख १२ एप्रिल पावेतोच्या मुदतींत नानासाहेबानें निजामावर स्वारी केली होती, त्या स्वारींत मुजफरखान तोफखान्यासह हजर होता. या स्वारींत महादजी अंबाजी पुरंदरे हा मुख्य होता. त्याचें व मुजफरखानाचें, हाताखालील लोकांच्या हजिरीवरून भांडण झालें. गारदी हे पहिल्यापासूनच चढेल असल्यानें त्यांना कोणाच्याच ताब्यांत वागणें आवडत नसे. बहुधा पुष्कळ लोकांची कागदावर हजिरी दाखवून प्रत्यक्ष नोकरींत कमी माणसें ठेवून पगार मात्र अगदीं हजिरीप्रमाणें मिळाला पाहिजे असें मुजफरखानाचें ह्मणणें असावें. कारण मुजफरखान हा लोभी व लहरी असे. पुरंदऱ्यांचें घराणें याच्या अगदीं उलट असे, पुरंदरे हे कर्तव्यदक्ष, राजनिष्ठ व इमानी असत. अर्थात् या उभयतांचें पटणें केव्हांच शक्य नव्हतें. पुरंदऱ्यांचें व मुजफरखानाचें वर सांगितल्याप्रमाणें भांडण झाल्यावर मुजफरखान लागलीच पेशव्याची नोकरी सोडून गेला, तो प्रथम श्रीरंगपट्टणास जाऊन राहिला; व तेथून सावनूरच्या नबाबाच्या नोकरींत शिरला.

७ याप्रमाणें मुजफरखान सावनूरच्या नबाबाच्या नोकरींत राहिल्यावर त्यानें तेथें नवीन तोफा ओतविल्या; आणि पेशव्याशीं लढाई देण्याची तयारी चालविली. हें पाहून पेशव्यांनीं सावनूरच्या नबाबाकडेस मुजफरखानाची मागणी केली. परंतु ती त्यानें नाकारिली. कारण या वेळीं त्याला मुजफरखानाचा चांगलाच पाठिंबा होता; व असल्या बाडीराख्याला गमाविण्यांत शहाणपण नाहीं, असें त्यास वाटत होतें नानासाहेब पेशवा एवढ्यानें

कांहीं गप्प बसणारा पुरुष नव्हता. त्यानें सावनूरच्या नवाबाची खोड मोडण्याचा निश्चय करून बुसीला आपल्या मदतीला बोलावून मोठ्या तयारीनिशीं सावनूरवर चाल केली. व मुजफरखानाचा पाडाव केला. पुढें सावनूरकरांचा व पेशव्यांचा तह झाला. त्यांत मुजफरखानास आपल्या ताब्यांत द्यावें असें बुसीचें मागणें होतें; पण मुजफरखान तेथून सटकून गेला. सावनूरच्या नवाबानें पुनः मुजफरखानास नोकरींत ठेवूं नये असे ठरलें. कांहीं दिवस इकडे तिकडे भटकून मुजफरखान पुण्यास आला व आपणांस पुनः नोकरींत ठेविण्यासाठीं पेशव्याची विनवणी करूं लागला. मुजफरखानासारख्या निमकहरामास आपल्या नोकरींत ठेवूं नये, असें सदाशिवरावभाऊचें आग्रहाचें म्हणणें होतें; पण नानासाहेबानें तिकडे दुर्लक्ष्य करून त्यास पुनः नोकरींत ठेविलें. यावरून नानासाहेब किती स्वतंत्र विचाराचा होता व सदाशिवरावभाऊचें सुद्धां न ऐकतां स्वतःच्या मतास जें योग्य दिसेल त्याप्रमाणें चालणारा होता हें उघड दिसतें. कोणत्याही पुरुषाचा योग्य तो उपयोग करून घेणें हें राज्यकर्त्यांचें ध्येय असावयास पाहिजे व तें तसें नानासाहेबांचें होतें म्हणूनच त्यास फार हुशार व दूरदर्शी पेशवा असें म्हणतात. असो. सन १७५६ च्या पावसाळ्यांत मुजफरखान पुनः पेशव्यांच्या नोकरींत शिरला सन १७५७ च्या शिंदखेडच्या मोहिमेंत तो होता. सन १७५८ त त्यानें जव्हार व त्रिंबक किल्ला हस्तगत केला. याप्रमाणें तो पेशव्यांच्या बहुतेक स्वाऱ्यांत हजर असे. सन १७५९ मध्यें ता. २८ ऑक्टोबर रोजीं त्यानें सदाशिराव भाऊ गारपिरावर डेऱ्यांत असतांना मुजफरखानानें आपला जांवई हैदरखान याचेकडून सदाशिवरावाचा खून करण्याच्या इराद्यानें त्यावर हत्यार चालविलें, त्या वेळीं नागोजी गुजर नांवाचा एक शिलेदार जवळ होता. त्यानें सदाशिवरावाचा बचाव केला व खुनी हैदरखानास पकडलें. या झटापटींत सदाशिरावास कुशींत लहानशी जखम झाली. पुढें नानासाहेबानें फारशी चौकशी न करितां हैदरखान व त्याचा सासरा मुजफरखान अशा दोघांचाही शिरच्छेद करविला.

८ या प्रकरणासंबंधानें बऱ्याच गोष्टी मुग्ध असल्यानें निश्चयात्मक असा कांहीं तर्क करितां येत नाही. सदाशिवराव भाऊ हा नानासाहेब पेशव्याचा उजवा हात होता. किंबहुना सदाशिवराव भाऊचा वचक नानासाहेब पेशव्याससुद्धां होता. तेव्हां अशा सदाशिवराव भाऊचा खून करण्याचा प्रयत्न मुजफरखानाने कां केला? मुजफरखानास नोकरींत ठेवूं नये असें सदाशिवरावाचे म्हणणें होते. तेवढ्याच वरून मुजफरखानानें हा खुनाचा प्रयत्न केला असेल असें ह्मणावें तर एवढ्यासाठीं त्याला तीन वर्षें कां वाट पाहावी लागावी? कारण मुजफरखानास नोकरींत ठेवूं नये असे सदाशिवराव सन १७५६ च्या पावसाळ्यांत ह्मणाला; व मुजफरखानानें सदाशिवरावाच्या खुनाचा यत्न सन १७५९ च्या हिवाळ्यांत केला, अर्थात् तीन सव्वातीन वर्षेंपर्यंत मुजफरखानासारखा तिरसट मनुष्य मुकाट्यानें बसणें शक्य नव्हतें. सन १७५९ मध्यें मुजफरखान हा सुरते जवळील एका कोळी राजाचें पारिपत्यास गेला असतां मागें सदाशिवरावानें मुजफरखानाचा एक आप्त इब्राहिमखान यास नोकरीस ठेविलें. हें तो परत आल्यावर त्यांस समजलें तेव्हां एवढ्यावरून मुजफरखान चिडला असे काव्येतिहास संग्रहकारांचें ह्मणणें आहे. पण असेंही ह्मणवत नाहीं. कारण इब्राहिमखान एकतर त्याचा आप्त होता व दुसरें हा इब्राहिमखान मुजफरखानाएवढा कांहीं हुपार नव्हता. अर्थात् इब्राहिमखानाचें तेज मुजफरखाना पुढें पडणें शक्य नव्हतें. नानासाहेब पेशव्यानें या खुनाच्या कटाची यत्किंचीतही चौकशी न करतां मुजफरखान व त्याचा जांवई हैदरखान या दोघांचा फक्त शिरःच्छेद करविला व रामचंद्र नारायण प्रभु या नांवाचा एक इसम या कटांत सामील असल्याच्या आरोपावरून त्यांस मरेपर्यंत कैदेंत ठेविलें. एवढीच माहिती आजला उपलब्ध आहे.

९ नानासाहेब पेशव्याची बायको गोपिकाबाई ही फार दुष्ट असून तिच्या मनांतून सदाशिवरावभाऊ विषयीं फार द्वेष होता. नानासाहेबानें याप्रकरणाचा चौकशी केली नाहीं व गोपिकाबाईच्या मनांतून सदाशिवराव

आपल्याजवळ असूं नये असें होतें, त्याअर्थी हा कलह या बाईनेंच केला असावा व याच बाईनें सदाशिवरावावर मारेकरी घातले असावेत असा ग्रांडडफ्चा तर्क आहे. या एकंदर प्रकरणाचा बारकाईनें विचार करितां व गोपिकाबाइचे एकंदर वर्तन पाहतां हा डफ्चा तर्क खरा असावा असें वाटतें, पण यास लेखी आधार कांहींही अद्यापि प्रसिद्ध झाला नाही.

१० भाउसाहेबांची कैफियत या नांवाचें एक लहानसें पुस्तक हा खुनाचा प्रयत्न झाल्यानंतर सुमारें तीस बत्तीस वर्षांनीं म्हणजे सन १७९१ मध्यें लिहीलें आहे. त्यांत पुढील आशयाची हकीकत आहे. एके दिवशीं सदाशिवराव डेऱ्यांत कांहीं लिहीत बसला असतांना एकदम हैदरखानानें त्यावर कट्यार चालविली पण ती चुकली. इतक्यांत तेथें, महिपतराव चिटणीस, शिदोजी कुंजर, बळवंतराव बाबा व सटवाजी राऊत ही मंडळी धाऊन आली व त्यांनीं खुनी इसमास पकडलें. त्याची चौकशी करतां असें कळलें कीं, निजामअलीनें मुजफरखानास एक लक्ष रुपयाची जहागीर देण्याचें कबूल करवून हा खून घडवून आणण्याचें ठरविलें. मुजफरखानानें आपली मुलगी या हैदरखानास देण्याचें ठरवून त्यास मारेकरी तयार केला, पण सुदैवानें वारच चुकला व सगळे पकडले गेले. चौकशींत मुजफरखानानें आपण निरपराधी आहोंत असें पुष्कळ शपथा आणा वाहून सांगितलें. व प्रथम आपली मुलगी या हैदरखानास देण्याचें ठरविलें होतें परंतु मागाहून तो विचार बदलून दुसरें स्थळ पाहिल्यानें हा हैदरखान आपल्यावर सूड उगवीत आहे असें ही जाहीर केलें. पण कांहीं कागदपत्र त्याच्या पेटींत सांपडल्यावरून त्यावर गुन्हा शाबीत केला व दोघांचाही शिरःच्छेद केला. कैफियतींतील हकीकतींत खुनी इसमास पकडण्याच्या कामांत दोनचार माणसें होतीं इतकाच विशेष आहे. असो. या प्रमाणें मुजफरखान गारद्याचें चरित्र आहे.

# तुळाजी आंग्रे.

श्रीशाहू नृप हर्षेण सरखेल समुद्भव: ।
तुळसिंहस्य मुद्रेयं सर्वोत्कर्षेण राजते ॥

मृत्यु सन १७८७

१ मोठ्या लोकांच्या गुणांनीं ज्याप्रमाणें देशास उन्नति प्राप्त होतें त्याच-प्रमाणें त्यांच्या चुकांनीं देश अधोगतीस जातो, हें विसरतां कामा नये. चुकी होऊन गेल्यावर मागाहून तिची कबुली दिली म्हणजे त्या चुकीचें परिमार्जन होत नसते. एवढ्याचसाठीं कोणतीही गोष्ट फार विचारपूर्वक आणि दूरदर्शि-त्वानें करणें हें राष्ट्राच्या नेत्याचें आद्य कर्तव्य होय. सेनापतीची अल्पशी नजर चुकी झाली तरी हजारो लोक तिकडे रणभूमीवर मारले जातात तद्वत्च नेत्याच्या चुकीनें राष्ट्रांतील कर्त्या पुरुषांची व तरुणांची दिशाभूल होऊन ते पुढें राष्ट्राच्या कार्यास नालायक बनतात. हा आजपर्यंतचा इतिहास असून त्याचा जर आपण उपयोग करून न घेतला तर आपल्याहून अधिक मूर्ख इतर कोणी असतील, असें मानण्याचें कारणच राहणार नाहीं. हे विचार आज सुचण्याचें कारण, अठराव्या शतकांतील प्रसिद्ध मुत्सद्दी व सार्थ राजकार्यधुरंधर अशा नानासाहेब पेशव्याच्या हातून एक विलक्षण चुकी झाली, व तिच्यामुळें एकंदर या देशाचें राजकीय चक्र फिरण्यास कशी मदत झाली हें पाहून मन थक्क होऊन गेलें, हें होय.

२ अठराव्या शतकामध्यें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर इंग्रज व पोर्तु-गीज अशा उभयतांचा वावर होता; पण सन १७३९ मध्यें चिमणाजी अप्पानें पोर्तुगीज सत्तेचा नायनाट केल्यावर सगळा पश्चिम किनारा इंग्रजांस मोकळा झाला; व अनायासानेंच त्यांचा एक शत्रु नाहींसा झाला; पण समुद्राच्या बाजूनें मराठी साम्राज्याचें रक्षण आंग्रे हे करीत असून स. १७४२ पासून तुळाजी आंग्रे हा तें काम प्रामुख्येंकरून पाहत होता. तुळाजीचा दरारा फार विलक्षण असे. पश्चिम किनारा तुळाजीनें स. १७५५ पर्यंत फारच उत्कृष्टपणें सांभाळिला.

होता, अर्थात् इंग्रजांना तोंपर्यंत तिकडेस कांहीं गडबड करितां आली नाहीं; ह्मणून त्यांनीं १७५५ पर्यंत पूर्व किनाऱ्यावर राहून फ्रेंचसत्तेचा नायनाट करण्याचा प्रयत्न केला. जोंपर्यंत आंगऱ्यांच्या कुटुंबांत एकी नांदत होती, तोंपर्यंत त्यांचा इंग्रजांस फार वचक असे. ती एकी नाहींशी होतांच त्या घराण्याची दुर्दशा झाली; इतकेंच नव्हें, पण मराठी साम्राज्याच्या बचावाचें साधन अस्तंगत झाल्यामुळे तें साम्राज्यही मृत्युपंथास लागलें: व याला मुख्य कारण नानासाहेब पेशवा झाला, हें आज वाचकांस निवेदन करावयाचें आहे.

३ तुळाजी आंगरे हा कान्होजीच्या एका राखेचा मुलगा होय. संभाजी व मानाजी हे त्याचे भाऊच होत. आंगऱ्यांचें मूळचें आडनांव संकपाळ. हे आंगरवाडीचे राहणार म्हणून आंगरे असें नांव त्यांस मिळालें. आंगरे हे आपणांस छत्रपतींचे अंकित म्हणवीत असत, परंतु पेशव्यांची स्वतंत्र सत्ता ते मानीत नसत. विशेषत: कान्होजी आंगऱ्याचे मुलांत तंटे उपस्थित झाले, त्यांचा निकाल न लागतांच शाहू मरण पावला. त्यामुळें पेशवे जवळ जवळ स्वतंत्र झाले व त्यांचे आणि आंगऱ्यांचें वैर विकोपास गेलें. शाहूच्या मृत्यूनंतर मराठेशाहीची राज्यसूत्रें नानासाहेबाच्या तंत्राने पुण्याहून हालूं लागलीं; परंतु त्यास रघूजी भोसला, दमाजी गायकवाड, यांच्याप्रमाणें तुळाजी आंगऱ्यानेंही विरोध केला. इतकेंच नव्हे पण पेशवे आणि ताराबाई यांच्यांत भांडण उपस्थित झालें, तेव्हां तुळाजीनें पेशव्याच्या विरुद्धच उचल केली. तो पेशव्यास जुमानीनासा झाला, हें पाहून तुळाजीची खोड मोडण्याचा नानासाहेबानें निश्चय केला; परंतु तुळाजी हा दर्यावर्दी फौजबंद असल्यानें एकट्या नानासाहेबास तुळाजीशीं झगडण्याचें सामर्थ्य नव्हतें.

४ एका इंग्रजी व्यापाऱ्यानें तुळाजी आंगऱ्याचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें केलें आहे, 'तुळाजी हा निमगोरा, परंतु देखणा असून उंच व भव्य होता. तो फार रुबाबदार दिसत असे. त्याला पाहिल्याबरोबर मूर्तिमंत शौर्यच आपणांपुढे उभे आहे कीं काय, अशी कल्पना होत असे. त्याची कृतिही

त्याच्या शौर्यास साजण्यासारखीच असे. पश्चिम किनाऱ्यावर कोणतेंही जहाज सहसा त्याच्या तावडींतून निसटून जात नसे.' याप्रमाणें तुळाजीची कर्तबगारी व दरारा असल्यामुळें इंग्रज व्यापारी त्याला थरथरा कांपत असत. तुळाजीची शक्ती व तयारी अपूर्व होती. त्याच्या ताब्यांतील बंदरें भरभराटींत असून त्याची रयतही सुखी असे. तीस हजार फौज त्याच्यापाशीं जय्यत तयार असे. त्याच्या तोफखान्यावर युरोपियन कामगार असत. त्याच्या आरमारांत सुमारें साठ लढाऊ जहाजें होतीं. याशिवाय दारुगोळाही त्याजपाशीं भरपूर असे.

५ आंगरे आणि पेशवे यांचें वैर फार दिवसांचें होतें. बाळाजी विश्वनाथ व कान्होजी यांचें सख्य होतें पण तेव्हां कान्होजी बलिष्ट असल्यानें त्याचें सख्य संपादन करणें बाळाजी विश्वनाथास भाग पडलें. कान्होजी आंगरे व शाहू यांचें मित्रत्व बाळाजी विश्वनाथानें जुळवून दिलें, पण त्या कामीं कान्होजीनें मागितलेला प्रदेश त्यास निमूटपणें देणें भाग पडलें. तो मुलूख देऊन त्यास जवळ जवळ स्वतंत्र होण्याची संधी बाळाजी विश्वनाथानें दिली ती कांहीं खूषीनें दिली नव्हती. कान्होजी हा शूर व बलिष्ट असल्यानें तशी संधी देणें बाळाजी विश्वनाथास भाग पडलें. या वरून बाळाजी विश्वनाथाच्या मनांत कान्होजी विषयीं प्रेम म्हणजे सक्तीचा राम राम होता. कान्होजीच्या पश्चात् बाजीरावानें आंगऱ्यांच्या घरांत कायमची फूट पाडून एकाला हाताशीं धरून आंगऱ्यांच्या राज्याचे भाग पाडून ते दोघा बंधूंस वाटून दिलें. तुळाजीच्या व नानासाहेबाच्या वैराचा उल्लेख या प्रकरणांत आलाच आहे. त्यावरून आंगरे व पेशवे यांचें वैर पिढीजाद होतें असें दिसतें. दुसऱ्याचा उत्कर्ष पेशव्यांस कधींच सहन होत नसे. बाळाजी विश्वनाथापासून सर्वच पेशवे परोत्कर्षासहिष्णु असत. बाळाजी विश्वनाथ आणि कान्होजी आंगरे यांचें सख्य नव्हतें. पुढें बाजीराव व मानाजी आंगरे यांच्यांत तह ठरला, पण बाजीरावाचा मृत्यु होतांच तो तह नानासाहेबानें मोडिला. पोर्तुगीझांच्या ताब्यांतून वसई काबीज करण्यासाठीं

चिमाजी आप्पानें वसईवर स्वतंत्रपणें स्वाऱ्या केल्या; पण आंगऱ्यास मदतीस बोलाविलें नाहीं; असें करण्यांत चिमाजीचा हेतु स्पष्टच दिसतो कीं, आंगऱ्यांच्या मदतीशिवाय आपण पोर्तुगीझांसारखा शत्रुही नासोहरम केला, हें आंगऱ्यांच्या व इतरांच्याही प्रत्ययास आणून द्यावें. पोर्तुगीझांचा पाडाव झाल्यानंतर पेशवे निष्कारण आंगऱ्यांच्या मागें हात धूऊन लागले. विशेषत: कोंकणपट्टी सांभाळण्याचें काम दर्यावर्दी कामांत प्रवीण असलेले आंगरे जितकें उत्कृष्टपणें करीत होते तितक्या उत्कृष्टपणें तें दर्यावर्दीपणांत अनभिज्ञ असलेले पेशवे कधींच करूं शकले नसते हें उघड आहे. पण आंगऱ्यांचा नि:पात करण्याच्या दुष्ट हेतूमुळें ही गोष्ट एकाही पेशव्याच्या लक्षांत आली नाहीं. संभाजी, मानाजी, तुळाजी या आंगऱ्यांच्या पुरुषांस पेशव्यांनीं बरेंच छळलें. या सर्वांचें उसनें तुळाजीनें उगविलें असें दिसतें. तुळाजी आत्याच क्रूर असल्यानें त्यानें पेशव्यांचे हे सर्व अपराध स्मरून त्यांच्याशीं तसेंच वर्तन ठेविण्याचा क्रम आरंभिला. तुळाजी, पेशव्याशींच असें क्रूरपणाचें वर्तन ठेवी असें नाहीं; तो आपल्या भावाशीं सुद्धां वाईट रीतीनेंच वागे. त्यांच्या बायकांमुलांस कैदेंत ठेविणें, त्यांचें द्रव्य लुटणें, त्यांस पोटापाण्यासही न देणें, त्यांचा हिस्साही त्यास देण्याचें नाकारणें, इत्यादि अनन्वित प्रकार तो नेहमींच करीत असे. या बद्दल ब्रह्मेंद्रस्वामी एका पत्रांत तुळाजीची काम उघाडणी करतो, ती अशी:—" तुझे सहस्र अन्याय झाले, तुजला पत्र न लिहितों, परंतु मानसिंगाची व तुमची गोडी व्हावी, महत्कार्य सिद्धीस जावें याजकरितां पत्र लिहिलें आहे. तरी कबिले बायका जे तुम्हांकडे मानाजीची आहेत, तीं रवाना करून द्या.वीं....तुम्हीं आतां लेकुरबुद्धी न करणें, दोघे भाऊ एक होऊन एखादे आभाळास हात घालणें. " परंतु या पत्राचा कांहींच उपयोग झाल्याचें दिसत नाहीं. तुळाजीच्या या अशा वर्तनांत पेशव्याशीं त्याचा पिढीजात असलेला वैरभाव अधिक भर टाकण्यास कारण झाला.

६ संभाजी आंगऱ्याच्या मृत्यूनंतर त्याचा सावत्र भाऊ तुळाजी यानें बाणकोटापासून सावंतवाडीपर्यंतच्या मुलुखांत वहिवाट करण्यास प्रारंभ केला. पेशवे ब्राह्मण असल्यानें व पेशव्याशीं त्याचें वैर असल्यानें, तो इतर

ब्राह्मणांसही छळूं लागला. खंडणीच्या स्वरूपाची दरसाल सरकारांत भरावी लागणारी रकमही त्यानें देण्याचें बंद केलें. समुद्रावर तर त्यानें आपली एकतंत्री सत्ता स्थापन केली. एकदां पेशव्यानें खंडणी वसूल करण्यासाठीं आपले कांहीं वकील त्याजकडेस पाठविले होते. तेव्हां त्यानें त्या वकीलांचीं नाकें कापून त्यांस आपल्या हद्दींतून हांकून दिलें. याप्रमाणें तुळाजीच्या उद्दामपणाची अगदीं सीमा झाली. तुळाजीच्या वर्तनानें नानासाहेबाच्या तळव्याची आग मस्तकास जाणें असंभवनीय नाहीं, पण नुस्तें रागावण्यानें तुळाजीचें कांहींही वांकडे होणें शक्य नव्हतें, हें नानासाहेब जाणून होता, म्हणून तो तुळाजीचा सूड कसा उगवावा या विचारांत होता, इतक्यांत एक विलक्षण गोष्ट घडून आली, ती अशी.

७ रामाजी महादेव बिवलकर या नांवाचा एक मनुष्य पेशव्यांचा कोंकणांतील सुभेदार होता. हा रामाजी महादेव पेशव्यांच्या विश्वासांतील असून त्याला कोंकणांतील राज्यकारभाराचीं सर्व बिंगें ठाऊक होतीं. हा रामाजी कल्याणास राहत असे. ठाण्याचें हल्लींचें कौपीनेश्वराचें देवालय आणि जड्जकोर्टाची इमारत, या रामाजी महादेवानेंच बांधिलेल्या आहेत. या रामाजीचें व तुळाजी आंगऱ्याचें काय वैर होतें, हें कळत नाहीं, पण इंग्रजांनीं या रामाजीस वश करून घेतलें, आणि आंगऱ्याची तळी भरण्याचें कारस्थान सुरूं केलें. रत्नागिरी आणि सुवर्णदुर्ग हे दोन किल्ले पेशव्यांनीं तुळाजीकडेस मागितले. तुळाजीनें अर्थात्‌च ते देण्याचें नाकारिलें. मानाजी आंगऱ्यांचा किल्ला रामाजी महादेवानें कपटानें घेतला होता. त्याबद्दल तक्रारी होऊन पेशव्यांनीं मानाजीस किल्ल्याऐवजीं दरसाल चाळीस हजार रुपये द्यावे असें ठरलें होतें. पण ही रक्कम मानाजीस कधींच मिळाली नाहीं. जंजिऱ्याचा सीदी आणि मानाजी यांच्या चकमकी चालूच होत्या. याप्रमाणें मानाजी अडचणींत सापडला असतां त्यानें तुळाजीची मदत मागितली. पण तुळाजी अत्यंत उन्मत्त झाला असल्यानें व आंगऱ्यांच्या घराण्यांत अलीकडेस बरींच वर्षें कलह सुरूं असल्यानें तुळाजीनें मानाजीस

मदत तर केली नाहींच, पण उलट त्याची निर्भत्सना मात्र भरपूर केली. तुळाजीच्या या कृत्यानें मानाजीस साहजीकच राग आला, व त्यानें रामाजी महादेवामार्फत पेशव्यांशीं बोलणें सुरू केलें. याच सुमारास इंग्रजांशीं केलेलें कारस्थान अगदीं परिपूर्ण झालें होते. म्हणजे इंग्रज, मानाजी आंग्रे आणि पेशवे अशा तीन शक्ति तुळाजी विरुद्ध यावेळीं एकत्र झाल्या. तत्कालीन परिस्थितीप्रमाणें तुळाजी समुद्रावर चांचेगिरी करीत असल्यामुळें इंग्रजांचें एकही जहाज त्याच्या तडाख्यांतून धड सुटून जात नसे. यामुळें इंग्रजांच्या मनांतून तुळाजीचा कांटा नाहींसा करावयाचा होताच, परंतु एकट्या इंग्रजास तें सामर्थ्य नव्हतें. कारण तुळाजीवर आपण स्वारी केली तर पेशवे कदाचित् तुळाजीस मदत करतील ही भीति त्यांस होती. व स्वत: तुळाजीही एकट्या इंग्रजांस भीक घालील असा नव्हता. पेशव्याचें त्यांस साहाय्य झाल्याबरोबर या उभयतांनीं तुळाजीवर स्वारी करण्याचा निश्चय केला.

८ सन १७५५–५६ मध्यें इंग्रज आणि पेशवे यांच्या जहाजांनीं आंग्र्यावर चाल केली. यावेळीं इंग्रजांच्या जहाजांवर व फौजेवर कमांडर जेम्स् कर्नल क्लाइव्ह, ॲड्मिरल् वॅटसन वगैरे नामांकित अंमलदार होते. क्लाइव्ह हेस्टिंग्ज वगैरे मंडळी हिंदुस्थानांत अशा संधीची वाटच पाहत असत. बुसीची माहिती मागें पृष्ठ १२ वर दिली आहे. क्लाइव्ह संबंधानें सियर-मुताखरीनकार पुढें दिल्याप्रमाणें लिहितो:—

क्लाइव्हचा पेशा सर्वथैव लष्करी असे. तो लष्करी पोषाखांत घोड्यावर बसून जाई. भोजनांत पदार्थांची चंगळ असे, पण पक्वान्नें वगैरे फारशी नसत. रेशमी किंवा भरजरी पोषाख क्लाइव्ह सहसा वापरीत नसे. हेस्टिंग्ज तर अगदींच साधा इंग्रजी पोषाख करी. त्यास जर किंवा वेलबुट्टी बिलकुल पसंत नसे. हेस्टिंग्जचा लवाजमा बारा स्वारांहून कधीं जास्त नसे. पुढें चोपदार चालत. परंतु ते काय शब्द उच्चारतात हे समजून घेण्याची हेस्टिंग्जनें कधीं चौकशी केली नाहीं. त्याची बसण्याची खुर्ची साधी असून

जवळ तशाच इतर मंडळींच्या खुर्च्या असत. हेस्टिंग्जचें खाणें अगदीं साधें व बेताचें असे. त्याच्या वर्तनांत ऐट किंवा ताठा बिलकुल नसे. लोकांशीं तो अगदीं सलगीच्या व बरोबरीच्या नात्यानें वागे.

पेशव्यांच्या आरमारावर नानापंत या नांवाचा कोणी एक गृहस्थ होता. पहिली चकमक होतांच तुळाजीला शत्रूच्या बळाची कल्पना झाली. गेल्या महायुद्धांत इंग्रज व जर्मनी यांची जटलंड येथें समुद्रांत जी चकमक झाली, तसलीच चकमक आंगरे आणि इंग्रज यांची ता २९ मार्च स. १७५५ रोजीं होऊन जटलंडच्या युद्धांत ज्याप्रमाणें जर्मनी निसटला त्याचप्रमाणें तुळाजी या युद्धांत पळून गेला. समुद्रावरचें युद्ध ज्यास्तींत ज्यास्त आठ दहा तासापेक्षां अधिक वेळ टिकत नाहीं. तेवढ्यांतच सोक्षमोक्ष लागून तह घडून येतो. समुद्रावरचें युद्ध वर्षानुवर्षे कधींच चालत नाहीं. जमिनीवरील युद्धांत मदत पाठविणें शक्य असतें, पण समुद्रावरील युद्धांत तें बहुधा अशक्यच असतें. त्याचप्रमाणें जमिनीवरील युद्धांत हरलेल्या पक्षांस पळून जातां येतें पण समुद्रावरील लढाईत तें शक्य नसतें. तथापि जटलंडच्या लढाईत इंग्रजांना अधिक आरमाराची कुमक येते, असें पाहून जर्मनीचें आरमार पळून गेलें, तेव्हां सर्वत्रांस मोठें आश्चर्य वाटलें, व आरमाराच्या युद्धांत पळून जाण्याचा प्रयत्न यशस्वी झाल्याचें तें पहिलेंच उदाहरण म्हणून मोठमोठे लेखकही त्यांचें कौतुक करूं लागले. जर्मनीच्या आरमारावर त्यांची विमानें उडत असल्यामुळें त्यांनीं इंग्रजांची कुमक येते हें पाहून वेळींच जर्मनीस सूचना दिली, त्यामुळे जर्मनीच्या आरमारास पळून जाणें शक्य झालें, असें मागाहून प्रसिद्ध झालें. ही गोष्ट १९१८ सालांतील होय. त्यापूर्वी सुमारे १६० वर्षे अगोदर विमानांचें वगैरे कसलेंही साहाय्य नसतांना इंग्रज व पेशवे यांच्या संयुक्त आरमाराच्या तडाख्यांतून तुळाजीचें आरमार निसटून गेलें. यावरूनच तुळाजी आंगरे हा दर्यावरील युद्धांत किती प्रवीण होता, हें सहज दिसून येतें. पुढें काय कारण झालें तें कळत नाहीं, सुवर्णदुर्ग किल्ल्यांतील दारूखाना एकाएकीं पेटला, व नंतर तुळाजीच्या आरमारांतील दारूगोळाही एकदम भडकला. आतां हा किल्ला व हे

आरमार शत्रूच्या स्वाधीन होणार असें तुळाजीस वाटून त्यानेंच त्या दारूगोळ्याला आग लाविली असण्याचा संभव आहे. असें करण्याचा हेतु उघडच दिसतो कीं, आपलें आरमार व आपला दारूगोळा शत्रूच्या स्वाधीन झाल्यास शत्रू अधिक बलिष्ट होईल. व या युद्धापूर्वी तुळाजीचें आरमार आपआपसांत वाटून घेण्याचा पेशवे व इंग्रज यांनीं करारहि केला होता. जर्मनीनें सुद्धां असेंच आपलें सर्व आरमार बुडवून टाकिलें हें लक्षांत ठेविण्यासारखें आहे. तात्पर्य, तुळाजीची पडती एकदम आली. त्यानें पेशव्यांची मदत मागितली, पण त्या मागणीचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. पेशव्यांनीं आपले सर्व अधिकार रामाजीपंतास दिले होते, व रामाजीपंतास राष्ट्रीय दृष्टि मुळीच नसून तो एक धूर्त, कावेबाज व स्वार्थसाधू पुरुष होता. इंग्रजांच्या साहाय्यानें तुळाजी आंगऱ्याचें अजिंक्य आरमार नाहींसें तर केलें. पुढें मराठी साम्राज्याचें रक्षण समुद्राकडून कोण करील, व मराठी साम्राज्याचें संरक्षण समुद्राकडून कोणींच न केलें तर दर्यावर्दीपणांत जें राष्ट्र बलिष्ट असेल, तेंच हिंदुस्थानचें स्वामित्व पटकावील ही दूरदृष्टि रामाजीपंतासारख्यास नव्हती यांत आश्चर्य कीं, तत्कालीन मुत्सद्यांत अग्रगण्य ह्मणून नांवाजलेला नानासाहेब पेशवा यासही ती दृष्टि नव्हती यांत आश्चर्य ? आणि म्हणूनच असें निश्चितपणें वाटतें कीं, नानासाहेब पेशवा हा फार परोत्कर्षासहिष्णु होता.

९ या संयुक्त आरमारानें सुवर्णदुर्ग काबीज केला. पण तुळाजी तेथून पळून विजयदुर्ग किल्ल्यावर गेला. कारण विजयदुर्ग अद्यापि तसाच होता. इंग्रजांस या किल्ल्यापेक्षां स्वत: तुळाजीचें महत्त्व विशेष वाटत होतें, व कसेंही करून तुळाजीस पकडून मुंबईस आणून ठेवावें, असा त्यांचा प्रयत्न होता. इकडे आरमाराचें युद्ध चालू असतांना पेशवे यांच्या फौजेनें तुळाजीच्या मुलुखांतही खंडोजी माणकराच्या हाताखालीं सारखा लुटालुटीचा सपाटा चालविला होता. तात्पर्य, तुळाजीला याप्रमाणें सगळीकडून पेशवे-इंग्रजांनीं जर्जर करण्याचा सतत प्रयत्न केला, व तुळाजीच्या दुर्दैवानें तो सिद्धीसही गेला. पुढें स. १७५६ च्या फेब्रुवारींत विजयदुर्ग किल्ल्यावर

ग्रंथालय, ठाणे. अनुक्रमांक ३०७८६ ... २६९६ ... वाचनालय

समुद्रांतून वॉटसननें आणि जमिनीवरून क्लाइव्हनें चाल केली. या किल्ल्याची पाहणी करण्यास अगोदर एक जहाज आलें होतें. या जहाजानें सर्व पाहणी काळजीपूर्वक केली व तुळाजीनें या जहाजास पकडण्यासाठीं जेव्हां आपल्या लोकांस हुकूम केला तेव्हां हें जहाज त्यांच्या हातून निसटून गेलें. ज्या तुळाजीच्या हातून मोठमोठी लढाऊ जहाजेंही निसटून जाणें दुरापास्त त्याच तुळाजीच्या तडाख्यातून हें साधे जहाज निसटून गेलें यावरून त्याचें दैवच फिरलें असें म्हटलें पाहिजे. पुढें रीतीप्रमाणें युद्ध होऊन तुळाजीचा पाडाव झाला व तो तेथूनही पळून गेला व त्यानें पेशव्याचा आश्रय केला. तुळाजीस दोन बायका व दोन मुलें होतीं. त्यांस त्यानें किल्ल्यांतच ठेविलें होतें. तुळाजी निघून गेल्यावर दोन दिवसानीं तो किल्ला शत्रूंच्या स्वाधीन झाला. ॲडमिरल वॉटसन यानें त्या किल्ल्यांत जेव्हां प्रवेश केला तेव्हां त्यास तेथें फारच हृदयद्रावक देखावा दिसला. त्यास पाहतांच किल्ल्यांतील तुळाजीची मंडळी ढळढळां रडूं लागलीं, तेव्हां वॉटसन त्यांस म्हणाला. 'तुम्ही घाबरूं नका, आतां तुम्हांस कोणतीही इजा पोंचणार नाहीं. आमचा आश्रय तुम्हांस आहे.' हें ऐकतांच त्या मंडळींनीं वॉटसन यांस वंदन केलें. तुळाजीच्या आईसही फारच गहिंवर आला ती म्हणाली, 'आतां आम्हास कसचा राजा आणि कसची मुलें व या मुलांस बाप तरी आतां कसला आला आहे?' तेव्हां वॉटसन पुनः म्हणाला, मीच आतां तुम्हां सर्वांचा संरक्षक आहे! त्याबरोबर तुळाजीचा सहा वर्षांचा मुलगा होता तो वॉटसनचा हात धरून म्हणाला, 'तुम्हीं तर आतां माझे बाबा झालां.' हे त्या मुलाचे शब्द ऐकून वॉटसनलाही गहिंवर आला या सर्व मंडळीस वॉटसनच्या मनांतून मुंबईस घेऊन जावें असें फार होतें, पण नानाजीनेंच त्यांस आपणांकडेस बोलावून घेतलें असो इंग्रजांनीं तो किल्ला यथास्थित लुटला किल्ल्यामध्यें आठ इंग्रज, दोन स्कॉच आणि तीन डच इसम कैदेंत होते, असें आढळलें. या वेळीं इंग्रजांनीं विजयदुर्ग काबीज केला, तो पुढें फार प्रयासानें नानासाहेब पेशव्यास परत मिळाला विजयदुर्ग ताब्यांत घेतांना पडलेले प्रयास पाहून नानासाहेबांची

इंग्रजांच्या असत्य वचनाबद्दल व बालिष्टपणाबद्दलही खात्री झाली, आणि हें आंग्र्यांचें आरमार बुडविण्यांत आपली फार मोठी चुकी झाली, असें त्याला निःसंशय वाटूं लागलें असावें. पुढें, तुळाजी, पेशव्यांच्या ताब्यांत सांपडला त्यास त्यांनीं मरेपर्यंत कैदेतच ठेविलें. तो बहुधा १७८७ मध्य मृत्यु पावला असावा, असें वाटतें कैदेंतून सुटून जाण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला, पण जों जों तो असा प्रयत्न करी तों तों त्याची कैद अधिक कडक होई. तात्पर्य, तुळाजीच्या बेफाट उन्मत्तपणामुळें व पेशव्यांच्या अतिरिक्त स्वाभिमानामुळें शिवाजीनें मोठ्या चातुर्यानें उभारलेलें मराठ्यांचें आरमार रसातळास गेलें, व समुद्राच्या बाजूनें मराठेशाहीची इमारत दुर्बळ झाली. आतां नानासाहेब पेशव्यानें तुळाजीचें आरमार नाहीसें केलें नसतें, तर इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानांत प्रस्थापित झाली नसती, असें मुळींच नाहीं. हें जरी खरें असलें तरी तेवढ्यानें नानासाहेबाच्या या अक्षम्य चुकीवर कांहीं पांघरूण घालितां येणार नाहीं. कारण तुळाजी-सारखा मोहरा व्यर्थ गेल्यानें फार मोठी राष्ट्रीयहानी झाली, व या हानीस नानासाहेबच जबाबदार होय, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये.

---

# १२ रंगो बापूजी.

राजा म्हणे " कवण तूं ? कोणाचा पुत्र ? काय गे वदसि ।
का च स्मृतिरपि तापसि मैवं प्रल्पपात्र भूभुजः सदसी ॥ मोरोपंत.

१. सातारच्या प्रतापसिंह महाराजांना शेवटच्या बाजीरावाच्या कैदेंतून सोडवून इंग्रज बहादुरांनीं सातारच्या गादीवर बसविलें व १८२२ मध्यें त्यांना संपूर्ण अधिकार देण्यांत आले. प्रतापसिंह हे फार चतुर, मुत्सद्दी व राज-कारणी पुरुष होते परंतु दुर्दैवानें त्यांचे सद्गुण त्यांच्या ऊर्जितावस्थेस

कारणीभूत न होतां कालाच्या विपरीत ओघांत ते त्यांच्या अधःपतनासच कारण झाले.

२. नागपूरच्या पदच्युत राजाशीं पत्रव्यवहार करणें, बंडासाठीं शिपायांस फितविणें, व गोंव्याच्या गव्हर्नराशीं इंग्रजांविरुद्ध पत्रव्यवहार करणें, असले आरोप यांच्यावर ठेवून त्यांची गुप्तपणें चौकशी करून इ. स. १८३९ मध्यें त्यांना पदच्युत करून काशी क्षेत्रीं नेऊन ठेविलें. प्रतापसिंह महाराजांबद्दल इतिहासामध्यें आजला प्रसिद्ध असलेली हकीकत एवढीच आहे.

३. प्रतापसिंहावरील आरोपांच्या सिद्ध्यर्थ पुढें आलेल्या पुराव्याची छाननी करून सत्यासत्याचा निर्णय करण्याचें काम यथाकाल इतिहास शोधक करतील तो सुदिन. आपणांस तूर्त त्याशीं कांहींएक करावयाचें नाहीं.

४ प्रतापसिंहाच्या कारकीर्दींत ग्रामण्य प्रकरणास फार ऊत आला होता. प्रभूंस वेदोक्ताचें अधिकार असावेत किंवा नसावेत, हा त्यावेळीं मुख्य प्रश्न होता तत्कालीन शंकराचार्यांनीं प्रभूंना हे अधिकार दिले होते, व कित्येक प्रभूंनीं अग्निहोत्रेंही घेतलीं होतीं. कांहीं ब्राह्मण समुदाय त्यांच्याविरुद्ध होता, व बाळाजीपंत नातू हे ब्रह्मवृंदांच्या तर्फे प्रभूविरुद्ध पुढ्यास राहून खटपट करीत होते. या बाळाजीपंतास प्रतापसिंहाची दिवाणगिरीही मिळविण्याची उत्कट महत्वाकांक्षा होती.

५. ब्राह्मण आणि प्रभु यांच्या या ग्रामण्यासारख्या सामाजिक तंट्याच्या पायीं उत्पन्न झालेल्या वैराग्नींत प्रतापसिंह महाराज होरपळून निघाले. प्रतापसिंहांनीं प्रभूंचा पक्ष घेतला होता, ह्मणून या ग्रामण्याचें पर्यवसान प्रतापसिंहाच्या पदच्युतींत झालें. ब्राह्मणांच्या पक्षास बाळाजीपंत नातू, चिंतामणराव सांगलीकर अशासारख्या वजनदार व श्रीमंत पुरुषांचें साहाय्य मिळालें. सामाजिक पक्षभेदांत राजानें किती धूर्तता वापरली पाहिजे. हें या उदाहरणावरून शिकण्यासारखें आहे.

६ 'कठिण समय येतां कोण कामास येतो ?' हें जरी खरें असलें तरी अशा कठिण समयींही प्रतापसिंहांचें म्हणणें विलायतेच्या पार्लमेंट पुढें मांडण्यासाठीं त्यांच्या तर्फें कांहीं मंडळी विलायतेस मोठ्या कष्टानें गेली. परंतु तेथेंही त्यांची तीव्र निराशा होऊन एका पुरुषा शिवाय बाकीचे सर्वजण लवकरच परत आले. जो पुरुष तेथें चौदा वर्षें राहिला, त्याचे नांव रंगो बापूजी हें होय. या रंगो बापूजीच्या उद्योगाची व वंशाची हकीकत आज वाचकांस सादर करावयाची आहे.

७. रंगोबापूजी हा विलायतेस चौदा वर्षें राहिला. त्यास इंग्रजी मुळींच येत नव्हतें. एका हिंदी जाणणाऱ्या युरोपियना मार्फत तो आपलें म्हणणें इतरांस समजावीत असे. विलायतेची सर्व हकीकत लिहून ती रंगोबापूजींनीं तेथेंच मोडी लिपींत शिळा प्रेसवर सन १८४७ मध्यें छापविली, ती आज क्वचित् उपलब्ध आहे. सदरहू पुस्तकाची सुमारें २२५ पृष्टें आहेत. पुस्तक लेखनाच्या अर्वाचीन पद्धतीला रंगो बापूजा हा अनभिज्ञ असल्यानें त्यांत हल्लींच्या दृष्टीनें पुष्कळच दोष आहेत, असें ह्मणतां येईल. कित्येक ठिकाणीं द्विरुक्ति झालेली आहे. पुस्तकाला अनुक्रमणिका नाहीं. हें पुस्तक ह्मणजे रंगोबापूजींनीं आपले विचार–अव्यवस्थितपणें–कागदा वर नमूद करून ठेवणें, हें होय. अशी जरी स्थिति आहे. तरी सुमारें ७५ वर्षां पूर्वी तें एका इंग्रजी न जाणणाऱ्या हिंदी गृहस्थानें लंडन येथें छापविलें, यांतच त्याचें महत्व मोठें आहे. या पुस्तकांतील मजकुराचा सारांश भारत सेवकाच्या ऑक्टोबर १९१७ च्या अंकांत वाचकांस सादर केलाच आहे. तो असा:—

८. " आमच्याजवळ सुंदर मोडी अक्षरांनीं लिहून शिळेवर छापिलेलें असें एक पुस्तक आहे. या पुस्तकावर त्याचें अगर त्याच्या कर्त्याचें नांव नाहीं त्याची बांधणी कापडी असून पुट्टा इतका मळकट झाला आहे कीं, ता मूळचा कोणत्या रंगाचा असावा हें सांगणें कठीण झालें आहे. याची बांधणी मजबूत आहे, व यांतील कागद कांहीं पातळ व कांहीं जाड असे दोन प्रकारचे आहेत. सदरहु पुस्तकांत कांहीं मजकूर बालबोध लिपींतहि

लिहिलेला आहे. परंतु असा मजकूर फारच थोडा थोडा आहे. बालबोध लिपींतील कांहीं भाग चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंस शंकराचार्यांकडून मिळालेल्या आज्ञापत्रांतील असल्यामुळें साहजिकच तो संस्कृतांत लिहिलेला आहे. सदरहु पुस्तकाच्या पहिल्या चार पृष्ठांवर क, ख, ग, घ, आणि a, b, c, d, असे वर्ण अनुक्रमांकाच्या ऐवजीं लिहिलेले आहेत. त्यानंतर १ ते ६५ पावेतोंच्या पृष्ठावर मराठी व इंग्रजी अशा दोन्ही प्रकारचे अंक घातले असून त्यापुढें १५३ पृष्ठावरहि एक ते चार अंक वरप्रमाणेंच दोनहि लिपींत आहेत. याप्रमाणें या पुस्तकांत एकंदर ( ४ + ६५ + १५६ )=२२५ पृष्ठें आहेत. याशिवाय या पुस्तकाच्या प्रारंभीं व शेवटीं दोन मोठमोठीं पत्रकें सबंध कागदावर लिहून चिकटविलेलीं आहेत. पैकीं पहिलें पत्रक एका बाजूनें व दुसरें मात्र दोन्ही बाजूंनीं लिहिलेलें आहे. आंतील मजकुरावरून असें दिसतें कीं, पहिलीं चार पृष्ठें प्रस्तावना असून ६५ पृष्ठें मुख्य मजकुराचीं आहेत. व त्यांनंतरचीं १५६ पृष्ठें कांहीं पत्रव्यवहार आहे. आरंभींच्या पहिल्या मोठ्या कागदावर पुराव्याचा मजकूर पत्रकरूपानें तयार केला असून शेवटच्या मोठ्या कागदावर लेखकाच्या म्हणण्यास पुष्टि देणारा अस्सल पुरावा नमूद केला आहे. पुस्तकाच्या आंतील प्रत्येक पृष्ठावर बारीक मोडी अक्षरांनीं लिहिलेला अठ्ठाविस ओळीपर्यंत मजकूर आहे. सदरहु पुस्तक सन १८४७ मध्यें लंडन येथें छापिलेलें आहे असें आंतील मजकुरावरून वाटतें. पहिल्या पत्रकावर इंग्रजीमध्यें Printed on stone by C. Moody High Holborn Street, London, असें उजव्या बाजूस आडवें छापिलेलें आहे. व त्याचप्रमाणें पत्रकावर शेवटीं " सही रंगो बापूजी प्रभु वकील नि॥ छत्रपति सरकार: हा कागद लंडन मुक्कामीं दगडावर छापविला. मेस्तर सी. मुडी, घरचा नंबर २६७. पहा इंग्रजी सही या पत्रकावर" असें लिहिलेलें आहे.

९ या पुस्तकांतील मजकूर जुन्या मराठी भाषेमध्यें लिहिलेला असल्यामुळें मजकूराची पुष्कळच पुनरावृत्ति झालेली आहे. इंग्रजी शब्दांना

मराठी रूपें देऊन ते यांत घातले आहेत. विशेषतः इंग्रजी विशेषनामें फारच विकृत झालेलीं आहेत. याप्रमाणें या पुस्तकाच्या बाह्यांगाचें वर्णन आहे. अशा या पुस्तकांत काय मजकूर आहे, त्याची माहिती विशेषत: रंगो बापूजींच्या शब्दांमध्यें वाचकांस सादर करावयाची आहे.

१०. सातारचे प्रतापसिंह महाराज हे शेवटच्या बाजीरावाच्या कैदेंत होते. परंतु पुढें इ. स. १८१७ मध्यें खडकीच्या लढाईंत पेशव्यांचा पराजय झाला व ते ससैन्य पळाले. त्या वेळीं बाजीरावानीं प्रतापसिंहासहि आपले बरोबर घेतलें होतें. पण एवढ्या मोठ्या सैन्यानिशीं पलायनाचा उद्देश पार पडणें शक्य नव्हतें व प्रतापसिंहांनाहि राज्यपद पाहिजेच होतें म्हणून ते थोडक्याशा मध्यस्थीनें इंग्रजांच्या स्वाधीन होऊन सातारच्या गादीवर विराजमान झाले. परंतु राज्याचा पूर्ण अधिकार मात्र १८२२ पर्यंत त्यांना मिळाला नव्हता. शिवाजी महाराजांनंतर भोंसल्यांच्या कुलांत प्रतापसिंहा-एवढा कर्तृत्वसाली, दूरदृष्टि व राज्यकार्यधुरंधर राजा कोणीच झाला नाहीं. प्रतापसिंहाला काल अनुकूल नव्हता; इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानांत दृढमूल होण्याच्या बेतांत होती; बाळाजीपंत नातूसारखे त्याच्या दरवारीं डोळ्यांत तेल घालून त्याचीं नसतीं छिद्रें पहात बसले होते; त्याच्या दरबारांत मुत्सद्दी व कुशल मंत्र्यांचा अभाव होता; आणि त्याच्या पाठचा सख्खा भाऊही त्याच्या बिरुद्ध वाटेल ती खोटीनाटी साक्ष देण्यास तयार होता. अशा अत्यंत हीन स्थितींत राज्यपद प्राप्त झाल्यानें त्याला आपल्या कर्तृत्वाचा कांहींच उपयोग करितां आला नाहीं, हें देशाचेंच दुर्दैव म्हटलें पाहिजे. प्रतापसिंहाची राज्यव्यवस्था उत्तम होती यांत कांहीं संशय नाहीं. मराठी दसर रुमाल १ यांत पृष्ट १५६ वर प्रतापसिंहाचें वर्णन आहे तें:—

" प्रतापसिंह महाराज छत्रपति यांचा स्वभावगुण व वर्तणूक कशी होती ? त्यांची बुद्धि फार विशाल असून ते बोलके उत्तम प्रकारचे होते. आणि धूर्तता चांगली होती. व घोड्यावर बसणें व शिपाईगिरींत शूर व सर्व गुण जाणते. ते सर्व विद्याप्रवीण होते. व त्यांचें अंतःकरण निर्मळ

असून पदरचे लोकांचा अभिमान फार होता. कामाची युक्ति लक्षांत ठेवून इनसाफाचें काम वगैरे वक्तानशीर करोन जातीचे अक्कलेनें राज्यकारभार सुरक्षित चालविला. कोणी अपराध केला तो शरण आल्यावर क्षमेविसीं औदार्य फार होतें. रयत सुखी राखोन व स्वारशिबंदी कामगार वगैरे यांचा पगार दरमहाचे दरमहा ज्याचा त्यास देऊन सर्व लोक हुषार ठेविले होते. ( त्यांनीं ) यवतेश्वराचा नळ बांधून शहरांत पाणी नेलें. जलमंदिर व बाग व तलाव ( बांधिले. )"

११. प्रतापसिंहाना राज्यपद अर्पण केल्याबद्दल ग्रँट डफ् लिहितो:-- " ता. ५ एप्रिल सन १८२२ रोजीं प्रतापसिंहाना पूर्णपणें राज्याधिकार अर्पण करण्यांत आले. कंपनी सरकारांनीं शिवाजीच्या वंशजाला ही जी देणगी दिली तिच्यायोगें प्रतापसिंह व त्याचे आप्तस्वकीय यांना तर आनंद झालाच. परंतु सर्व राष्ट्रालाही कंपनी सरकारचें हें कृत्य कौतुकास्पद वाटलें " इतकें लिहून डफसाहेब कंपनीच्या या औदार्याच्या भवितव्यतबद्दल आपला अभिप्राय असा व्यक्त करितात कीं, " परंतु कंपनीच्या या दातृत्वाचा परिणाम कंपनीला अथवा प्रतापसिंहाला कायमचा हितावह होईल किंवा कसें, याचा निर्णय ( आपोआप प्रसंगानुसार पण ) कालावधीनें होईल. "* प्रतापसिंहांना पदच्युत करण्यांत त्याचे बंधु शहाजी राजे यांनीं इंग्रजसरकारास मदत+ केल्यामुळें प्रतापसिंहाशीं सन १८१९ मध्यें जो तह केला होता, त्यांतील कांहीं कलमांची फिरवाफिरव करून शहाजीशीं कंपनीनें

* The entire powers of the State were formally delivered over to him (Pratap Sinh) on the 5th April 1822, at which period the boon, thus conferred by the British Nation on the descendant of Shivaji, was certainly approved by the country generally, as well as his relatives and himself: but time must prove whether this liberal experiment on the part of the authorities of the East India Company will be attended with any lasting good effect to the Governors or the governed. (Grat Duff. Vol. III page 492)

+ जॉन फार्बेज एस्क्वायर, डायरेक्टर नि. ईस्ट इंडिया कंपनी यांचे डिसेंट ( decent ) ता ८ एप्रिल १८४० पार्लमेंटरी बुकर, पान १२५९.

सन १८३९ मध्यें नवीन तह केला. त्यायोगें प्रतापसिंह, शहाजी, कंपनी अथवा साताऱ्याचें राज्य यापैकीं कोणाचा अवघा १७ वर्षांच्याच कालावधीनें कायमचा फायदा झाला हें इतिहासज्ञांस पूर्णपणें समजून चुकलें आहे. या वेळीं लॉर्ड ऑकलंड हे गव्हर्नर जनरल होते. व सर रॉबर्ट ग्रँट हे मुंबईचे गव्हर्नर असून त्यांनीं साताऱ्याचे दरबारांत कर्नल चार्लस वोविन्स ( Ovins ) यास रेसिडेंट नेमिलें होतें. प्रतापसिंहांनीं नागपूरकर भोंसले व विशेषतः गोंव्याचे पोर्तुगीज गव्हर्नर डॉन इमॅन्युएल यांशीं हिंदुस्थानांतून इंग्रजांचें उच्चाटन करण्याचीं कारस्थानें केलीं व इमॅन्युएल यांस फौजेच्या तयारीसाठीं पन्नास लक्ष रुपये देण्याचें कबूल करून एक घोडाहि नजर केला व फौजेंत फितूर केला. या एकंदर तीन प्रकरणांचें कागदपत्र व दस्तऐवजी पुरावा बाळाजी नारायण नातू याच्या मदतीनें कर्नल वोविन्स यानीं मिळवून मुंबई सरकारच्या मार्फत पार्लमेंटांत रुजू केला. व गुप्त चौकशी करून "[1]प्रतापसिंहमहाराज छत्रपति यांजवर इंग्रजी सरकारांत रुपयाच्या सोळा साक्षी घेऊन बाळाजीपंत नातू यांनीं राज्यांतून" प्रतापसिंहास पदच्युत करवून काशी दाखविली. रंगो बापूजी ह्मणतात, "महाराज छत्रपतीविषयीं मुंबई गव्हर्नमेंटांनीं फार रागास येऊन द्वेष करण्याचें मुख्य मूळ तरी काय ह्मणाल तर पहा:—छत्रपती सरकारच्या जहागीरदाराच्या मुलुखाविषयीं सरहद्दीचा तंटा प्रथम याच गव्हर्नमेंटांनीं खटला उत्पन्न करून राज्याचे जहागीरदार घेण्याचा दगेबाजीनें मतलब केला. त्याजवरून महाराज छत्रपतींनीं तहनाम्यांतील ठरावाप्रमाणें जहागीरदार आपले आहेत असें मुंबई गव्हर्नमेंटाशीं वारंवार बोलत असतां तें न एकतां कांहीं जहागीरदारांचा मुलूख याच मुंबई गव्हर्नमेंटांनी घेतला." त्याजवरून महाराजांनीं या बाबतींत कोर्ट ऑफ डिरेक्टर्स जो ठराव करतील तो आपणांस कबूल असल्याचें लिहून कळविलें. "त्यावरून पुढें काम चालून कोर्ट ऑफ डिरेक्टर्स यांनीं राज्याचे हक्काविषयीं तहनाम्याचे कराराप्रमाणें हे जहा-

---

१ मराठी दप्तर रुमाल १ ला, पृष्ठ १६६.

गीरदार राजाचे आहेत असा करून लिहून पाठावेलें. परंतु ह्या ठरावाचें पत्र मुंबई गव्हर्नमेंटानें समजूनउमजून गुप्त ठेविलें,[२]" प्रतापसिंह महाराजाकडेस कांहीं पाठविलें नाहीं व त्याचा अम्मलही केला नाहीं. प्रतापसिंह महाराजांस याजबद्दल फार वाईट वाटलें व त्यांनीं आपली हकीकत विलायतेस कळविण्यासाठीं "आपले तर्फेनीं मजकूर बोलण्यास वकील लंडनास" पाठविण्याचा विचार केला. व "या वेळेपासूनच नशीबानें मार्ग घेतलें." या वेळीं राजाचे दरबारांत रेसिडेंटचे कामावर जनरल लडविक (Ludwik) होते. त्यास प्रतापसिंहांनीं आपला वकील पाठविण्याचा मनोदय कळविला. तेव्हां त्यानें "आपले मनांत विचार करून सांगितलें कीं या कामावरून महाराजांस कांहीं चांगले फळ निर्माण होणार नाहीं. याजकरतां महाराजांनीं असें करूं नये. याजवरून या वेळीं महाराज छत्रपतींनीं वकील लंडनास पाठविण्याचें मना केलें." तथापि मुंबई सरकारच्या मनांतील क्रोध कांहीं नाहींसा झाला नाहीं. त्यांनीं साताराच्या राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठीं मि. विलोबी व कर्नल वोविन्स यांचें गुप्त कमिशन ता. १० आक्टोबर स. १८३६ रोजीं साताऱ्यास पाठविलें. या उभयतांनीं गुप्त रीतीनें सुमारें १०५ दिवस पावेतो चौकशी करून आपले मतें प्रतापसिंहावर राजद्रोहाचा आरोप प्रस्थापित केला व नंतर त्यास आपल्या बंगल्यावर येण्याबद्दल पाचारण केलें. साताऱ्यासारख्या अधिपतीला कमिशनाच्या मेंबरांनीं आपल्या भेटीस आपल्या बंगल्यावर बोलवावे हा फक्त त्या राजाचा अपमान नसून सबंध राष्ट्राचा अपमान होय. परंतु करणार काय? बडोद्याच्या मल्हाररावांच्या वेळीं ज्याप्रमाणें येथील रेसिडेंटाला मुंबई गव्हर्नराचें पूर्णपणें पाठबळ होतें त्याचप्रमाणें कर्नल वोविन्स यालाहि सर रॉबर्ट ग्रँटचें होतें. प्रतापसिंह आणि मल्हारराव या २५ वर्षांच्या अंतरानें होऊन गेलेल्या दोन मराठी संस्थानिकांचें इतिहास परस्परांशीं पुष्कळ अंशांनीं जुळतात. प्रतापसिंह बाजीरावाच्या कैदेंत होते तर मल्हाररावांना

२ ता० २६ सप्टेंबर सन १८३४. पार्लमेंटरी बूक १ तें पान ४९५.

खंडेरावांनीं प्रतिबंधांत ठेविलें होतें. तात्पर्य दोघांनाही इंग्रज सरकारांनींच प्रतिबंधांतून मोकळें करून राज्यपद दिलें. राज्याची चौकशी करण्यासाठीं ज्याप्रमाणें बडोद्यास सर रिचर्ड मीडचें कमिशन बसलें होतें, त्याचप्रमाणें सातार्‍यास कर्नल वाविन्सचें कमिशन नेमले होतें. सातार्‍यास कमिशनचे मदतनीस बाळाजीपंत नातू होते तर बडोद्यास भाऊ पुणेकर होते. इंग्रज सरकारच्या प्रतिनिधीला म्हणजे रेसिडेंटाला विषप्रयोग केल्याचा आरोप मल्हाररावावर होता तर सबंध इंग्रज सरकारालाच हिंदुस्थानांतून नेस्तनाबूत करण्याचा आरोप प्रतापसिंहावर होता. तात्पर्य, दोघांचेहि इतिहास जवळ जवळ सारखे असल्यानें काळजीपूर्वक पाहण्यासारखे आहेत. आतां मल्हारराव महाराज कर्तृत्वहीन व क्षणिक बुद्धीचे असल्यानें त्यांच्यावरील आरोपाची चौकशी वाटेल तशी प्रसिद्धपणें झाली व प्रतापसिंह फार हुशार राजा असल्यानें इंग्रज सरकारांनीं त्याची चौकशी फारच गुप्तपणानें केली. असो.

१२ कमिशनच्या बोलाविण्याप्रमाणें प्रतापसिंह त्यास जाऊन भेटले. तेव्हां त्यांना त्यांच्या वरील आरोपीची माहिती देण्यांत आली. ती ऐकून कमिशनपुढील साक्षीदारांच्या साक्षीच्या मराठी नकला मिळण्याबद्दल प्रतापसिंहांनीं मागणी केली. परंतु त्या नकला त्यांस मिळाल्या नाहींत. नकला मिळण्याबद्दल प्रतापसिंहांनीं सुमारें पांच महिने वाट पाहून ता. २३ मार्च सन १८३७ रोजीं मुंबई गव्हर्नरास एक पत्र पाठविलें. व त्यांत लिहिलें कीं, " आपल्या हुकमाप्रमाणें कमिशनची भेट घेतली. त्यासमयीं जबान्या इंग्रजींत वाचून दाखविल्या. तेव्हां कमिशन यास आम्हीं सांगितलें कीं, या लोकांच्या हिंदवी कच्च्या मजकुराच्या जबान्यांच्या नकला पाठवाव्या. परंतु कमीशन नकला न देतां व न भेटतां निघून गेलें. आणि या कामाची मुदतहि फार झाली. हा अंदेशा आणून विलायतेचें व कलकत्त्याचें उत्तर एक प्रकारचेंच आल्यास आणि मग आम्ही बोलल्यास तुम्ही कां अगोदर बोलला नाहीं ? असा प्रश्न आम्हांस होईल. " सदरहु पत्र सातारच्या

दरबारांतून रंगो बापूजीबरोबर मुंबईस रवाना झालें. परंतु मुंबई गव्हर्नरानें रंगो बापूजींची भेटहि न घेतां चीफ सेक्रेटरी वॉथिन् यांचे मार्फतीनें पत्र घेऊन दोन दिवस तें ठेवून रंगो बापूजीकडेस परत पाठविलें. व हें पत्र आपण स्वीकारीत नाहीं, असा त्यास तोंडीं जबाब धाडिला. हें मुंबई गव्हर्नराचें उत्तर ऐकून "राजा लाचार होऊन (त्यास) आश्चर्य वाटलें." नंतर त्यांनीं गव्हर्नर जनरल लॉर्ड ऑकलंड यांस ही सर्व हकीकत लिहून डॉ० मिलनमार्फत तरी या प्रकरणाची माहिती मिळवावी अशी विनंती केली. व्हाइसरॉय साहेबांनीं ता. ७ आगष्ट सन १८३७ रोजीं डॉ० जॉन मिलन यांस पत्र लिहून कळविलें कीं, सातारचे राजाची मर्जी आहे कीं, तुम्ही त्यांचा सर्व मजकूर समजून घेऊन लॉर्ड साहेबांस निवेदन करावा. याविषयीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल फार खुषी आहेत. परंतु तुमचीं पत्रें येणें तीं मुंबई गव्हर्नर इन्-कौन्सिल यांजकडून शिरस्तेप्रमाणें यावीं." याप्रमाणें डॉ० मिलन यांस पत्रें गेल्याची हकीकत मुंबई सरकारास कळतांच त्यांनीं ता. २५ सप्टेंबर सन १८३७ रोजीं त्यांस एक पत्र पाठवून सूचना दिली कीं, "तुम्ही साताऱ्यास जाण्याविषयीं लिहिलें, त्यास तिकडून पुनः उत्तर आल्याशिवाय हुकूम देऊं शकत नाहीं." याप्रमाणें डॉ० मिलन यांस हुकूम पाठवून नंतर थोडे दिवसांनीं पुढील आशयाचें दुसरें पत्र त्यास धाडिलें.

"डॉ० मिलन यांस जाहीर व्हावें कीं, तुम्ही कंपनीचे पेन्शनर आहां. याकरितां सातारचे राजाविषयींचे मजकुराचें कांहीं एक कागदपत्र पाठवूं नयेत." आणि राजास अथवा त्याचे वकीलासहि "तुम्हीं त्यांशीं बोलणें जनजाहीर अथवा गुप्तमार्गी केव्हां कधींहि भाषण तुम्हीं त्यांशीं करूं नये."

(सही:)

१ फेरिस ( Ferris. )

२ हेंडरसन ( Henderson. )

३ दणलॉप ( Dunlop. )

याप्रमाणें मुंबई सरकारनें जिकडे तिकडे नाकेबंदी करून टाकली. रंगो बापूजी विचारितात, "जर प्रतापसिंह खरोखरी गुन्हेगार होते, त्यांज वर राजद्रोहाचा आरोप शाबीत झाला होता, त्यांचेंविरुद्ध भरभक्कम पुरावा होता, तर प्रथम गुप्त रीतीनें झालेली चौकशी व घेतलेल्या जबान्या मागाहून जाहीर रीतीनें प्रसिद्ध करण्यास मुंबई सरकार कां भीत होतें ? महाराजांची पदच्युति जर गुप्त नव्हती, तर तिचें कारण तरी अप्रसिद्ध कां असावें ? डॉ० मिलनसारख्या निःस्पृह व सत्यप्रिय गृहस्थाची नेमणूक गव्हर्नर जनरलनें केली असतां ती कां रद्द करविली ? एकंदर कामांत झालेल्या साक्षीच्या नकला प्रतापसिंहास देण्यास कां इन्कार केला ? प्रतापसिंहांनीं जर कबुलीजबाब लिहून दिला, तर त्यांचें राज्य त्यांजकडून हिसकावून न घेतां त्यांजकडेस ठेवण्यांत येईल, अशी लालूच कां दाखविण्यांत आली ? तात्पर्य, एकंदर काम जर खरें होतें, तर तत्सिद्ध्यर्थ असले खोटे मार्ग कां स्वीकारले ? व यावरूनच अशी खात्री होते कीं, प्रतापसिंह पूर्णपणें निरपराधी होते, त्यांच्या निरपराधित्वाबद्दल त्यांच्यातर्फे निराळा पुरावा देण्याची कांहीं गरज नाहीं. वाचकांना येथेंही पुनः मल्हाररावांवरील आरोपाची आठवण होईल. सार्जंट बॅलेंटाईन या प्रसिद्ध बॅरिस्टरानें देखील मल्हाररावांतर्फे त्यांच्या निर्दोषित्वाचा पुरावा दिला नाहीं. फिर्यादीतर्फेच्या साक्षीच इतक्या अविश्वसनीय, असंबद्ध व अतएव असत्यपरिपूरित होत्या कां, त्यावरूनच मल्हारराव निर्दोष असल्याबद्दलची बॅलेंटाईन यांनीं कमिशनरांची खात्री पटविली. ज्याप्रमाणें विलायतेचा बॅलेन्टाईन यानें हिंदुस्थानांत येऊन मल्हाररावांना न्यायसभेंत निरपराधी ठरविलें, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील ( रंगो बापूजी या ) बॅलेन्टाईननें प्रतापसिंहांना विलायतेच्या जनतेपुढें निरपराधी ठरविलें. हा एक कालाचा महिमाच म्हणावयाचा ! कारण या दोनही गोष्टी एकाच शतकांतल्या असून फक्त सुमारें तीस वर्षांच्या अंतरानें घडलेल्या आहेत.

१३. प्रतापसिंहावरील कमिशनांत मि० लडविक हे अध्यक्ष होते. हे प्रथम साताऱ्यास रेसिडेंट होते. हा मनुष्य फार निःस्पृह व सत्यवक्ता

होता, असें त्याच्या वर्तनावरून दिसतें. असला मनुष्य आपल्या उपयोगी नाहीं, म्हणून मुंबई सरकारनीं त्याची बदली करून त्याचे जागीं त्यांचें हेतु पार पाडील असा दुसरा रेसिडेंट ( Colonel Ovins ) नेमला. कमिशनमधील गुप्त चौकशीची संक्षिप्त हकीकत जनरल लडविक् यानें जनरल कोर्टांत ता० १५ जुलै सन १८४१ रोजीं सांगितली. ती एशियाटिक जर्नलमध्यें पान ७२ वर दिली आहे. ती अशी:—

" मी साताऱ्यास होतों तेव्हां या पंचाइतींत माझे समक्ष झालेला मजकूर जो मला माहीत आहे तोच मी आतां न भितां दिल मजबूत करून तुम्हांस सांगतों कीं, हें कमिशन म्हणजे पंचाईत यथान्यायेंकरून सत्य पाहतां अगदीं योग्य नाहीं. त्या समयींचा मजकूर असा आहे कीं, तेविसावे पलटणचे शिपाई लोकांचे अंमलदारास हूकुम झाला कीं, तुम्ही कमिशनकडे जाऊन रुजू होणें. त्याप्रमाणें हे साक्षीदार येऊन हजर झाले. ते समयीं मी त्यांच्या यथायोग्य खरा मजकूर समजण्याबद्दल पुरसीस उलटपालट इन्साफाच्या शिरस्त्यान्वयें कसोशीनें घालून चौकशी करावी ह्मणून प्रयत्न केला. आणि प्रथम एक असामीस बोलावून मी सवाल करतांच तो साक्षीदार घाबरा होऊन मोठा भयभीत झाला. तेव्हां कर्नल वोविन्स व मिस्टर उलबीनें पाहून त्या साक्षीदारास मदत करून मधीं शिरून मला सांगितलें कीं, यास तेडेबाके संवाल करून विचारूं नये. परंतु या साक्षीदाराची पुर्तेपणें अद्दल नीतींनीं जर चौकशी केली असती तरी मला पुरती खातरजमा होती कीं, या साक्षीचे तुकडे तुकडे होऊन तेव्हांच मोडून खालीं जमिनीस पडते. दुसरें, या शिपायाचे अम्मलदाराविषयीं साफ आणि सत्य सांगतों कीं, जेव्हां हा अम्मलदार साक्ष देत होता, त्यासमयीं या साक्ष देणाराचा चेहरा प्रेताप्रमाणें दिसला. हा साक्षीदार खोटा यास्तव त्याचा चेहरा मृतवत् झालेला होता. हें मीं दुसरे दोघे कमिशनर यांस त्याचसमयीं दाखविलें. परंतु त्या उभयतां कमिशनरांनीं माझें सांगणें व बोलणें दिलांत आणलें नाहीं. व अदलइनसाफाच्या शिरस्ते-

प्रमाणें या साक्षदारास सवालजबाब घालून मला पुढील पुरी चवकशी या उभयतांनीं करूं दिली नाहीं. म्हणून मी त्याच वेळीं बोललों कीं, राजावर गुन्हा ठरविण्यास व फितुराची शाबिती करण्यास हे दस्ताऐवजी* कागद अगदीं समूळ खोटे आहेत."

१४. प्रतापसिंहाबरील आरोपाच्या चौकशीचा वस्तुविन्यास वरप्रमाणें आहे. मि० लडविक यांच्या या हकीकतीच्या प्रसिद्धीकरणानें इंग्लंडमध्यें बराच बोभाटा झाला होता. गोंव्याच्या ज्या गव्हर्नराशीं प्रतापसिंहानें हें फितुरी कारस्थान केल्याचा आरोप होता, त्या गव्हर्नरानेंहि या बाबतींत पार्लमेंटचे मेंबर मि० ह्यूम, यांच्या साक्षीनिशीं यापूर्वींच खालील आशयाचे पत्र प्रसिद्ध केलें होतें.

"लिस्बन, ता० २५ एप्रिल इ. स. १८४१ इ॥

आमचे अब्रूनें आणि खरेपणानें आमचे अब्रूचे स्वच्छतेकरतां इन्साफाचे पुरवणीबद्दल आम्हीं अगत्य सांगतों कीं, ज्या वेळेपासून आम्हीं हिंदुस्थानांत पोर्तुगीज यांच्या महालीं मुलुखीं गोंव्यांचे गव्हर्नरीवर होतों, त्यास प्रथमपासून अखेरपावेतों सातारच्या राजाचे कागद आम्हांस अगर आमचा कागद राजास तेथें आम्हीं हुकमत केली तेव्हां कधींहि राजकारणीं फितूरी कामाबद्दल आम्हीं लिहून पाठविला नाहीं व सातारचे राजाचाहि आम्हांस आला नाहीं. व परस्परें बोलणें भाषणहि झालें नाहीं. असें असतां आमचे सहीचे जे कांहीं दस्ताऐवजीं कागदपत्र राजकारणाविषयीं छापून झाले आहेत, ते सारे खोटे व लबाडीचे आहेत."

साक्ष:- सही:-

१ ह्यूम, एस्क्वायर, मेंबर पार्लमेंट. दोनमनायेल, दि पोर्टुगाल इकासत्रो.

---

* पहा. पार्लमेंटरी बुकाचीं पानें ३२७, ३३०, ३३१, ३४२, ३४३, ८७२, १८६१.

१५. सर रॉबर्ट ग्रँटनंतर सर जेम्स कॉर्नाक हे मुंबईचे गव्हर्नर होऊन आले. त्यांनीं "मोठ्या जलदीनें एक कागद कलमबंदीचा लिहिला. त्या कागदांत पूर्वींची एक कथा तर्कटीची होती तिचा आरंभ केला. याचा मतलब काय होता म्हणाल तरी साताराचे राजाचे मुकदम्याची समाप्ति करावी. म्हणून हे हंडरसन (Hunderson,) वुल्बी (Wolbey,) व कॉर्नाक (Cornack) सातान्यास मुद्दाम जाऊन त्यांनीं राजास काय सांगितलें तें पहा. या गव्हर्नरानें महाराज छत्रपतीस बोलावणें पाठविलें. तेच क्षणीं छत्रपती येऊन गव्हर्नरास भेटले. तेव्हां कॉर्नाक यांनीं सदरहू तर्कटाच्या आरंभाचा कागद राजास वाचून दाखविला. आणि महाराज छत्रपतींस सांगितलें कीं, "तुम्हीं या कागदावर सही करून द्यावी." त्यानें असा प्रारंभ केला होता कीं, महाराजांनीं फितूर केले म्हणून कबूल करून लिहून द्यावें. आणखी पहा, मोठ्या जोरानें महाराज छत्रपतीपाशीं या फितुराचे तर्कटाचे कबुलायत लिहून मागितलें. कॉर्नाक यानीं सांगितलें कीं, तुम्हीं फितूर केलें म्हणून कबूल होऊन आम्हीं सांगतों त्याप्रमाणें आम्हांस लिहून देऊन नंतर महाराजांनीं आपले राज्याचे सिंहासनावर कायम निरंतर राहावें. तेव्हां ही गोष्ट छत्रपतींनीं अनाहूत ऐकून त्यांस फार आश्चर्य वाटून मोठा अचंबा होऊन संकट प्राप्त झालें. व त्यांनीं उत्तर केलें कीं, "आम्हीं फितूर केला नाहीं, आणि तुमचे सांगण्यावरून आम्ही या खोट्या कागदावर सही करणार नाहीं. तुम्ही आम्हास तहनामा तोडिला म्हणतां. त्यास आम्हीं काय काय केलें तें सांगा." तेव्हां कॉर्नाक यांनीं उत्तर केलें कीं, तुम्हीं नागपूरचे काढलेले राजाशीं फितूर केला. त्या राजाचे अस्सल कागद इंग्रजी गव्हर्नमेंटाचे हातीं सांपडले आहेत. हे कागद नागपुराहून गेलेले राजांनीं सातान्यास महाराजाकडेस पाठविले, ही गोष्ट शाबीत झाली आहे, असें असतां तुम्ही कसें नाहीं म्हणतां? तेव्हां महाराज छत्रपतींनीं त्यांस उत्तर केलें कीं, कोणी एखाद्यानें कोणाकडे कागद पाठविला, परंतु ज्यास पाठविला त्यास जर माहीत नसला तर तो उत्तर काय सांगेल? आणि अशावरून कोणी अन्यायदार शाबूत होत नाहीं. नागपूरचे राजास आमचें उत्तर कोठें

आहे, तें दाखवावें. मेस्तर हंडरसन येथें आहे आणि तिकडून त्याजकडे कोणीं कागद पाठविला, व त्यास तो माहीत नाहीं, तर हंडरसन उत्तर काय सांगतील ?*"

१६. याप्रमाणें या फितूराच्या चौकशीचें काम ता. १ जुलै सन १८३७ पासून ता. १३ जून १८३९ पर्यंत म्हणजे सुमारें साडेतेवीस महिने चालून शेवटीं ता. ५ सप्टेंबर १८३९ रोजीं छत्रपतीस साताऱ्याहून काढून त्यांची काशीस रवानगी केली. रंगो बापूजी सांगतात, "राजानें फितूर केला म्हणून म्हणणारे ते कोण म्हणाल ? तरी ती नामावली पहाः—

१. बोर्ड ऑफ कंट्रोल म्हणतात, "कोर्ट डिरेक्टर्स यांनीं केलें तें आम्हांस कबूल आहे."

२. कोर्ट डिरेक्टर्स म्हणतात, "हें काम गव्हर्नर जनरलाचें आहे."

३. गव्हर्नर जनरल म्हणतात, "तें मुंबई गव्हर्नमेंटानें केलें."

४. मुंबईचे गव्हर्नर हे दाखवितात, बुलबी सेक्रेटरीकडे बोट.

५. बुलबी सांगतो ओविन्स रेसिडेंटाचें नांव.

६. आणि ओविन्स रेसिडेंट म्हणतात. "या तर्कटाचा शिरोमणी बाळाजी नारायण नातू हा होय."

तात्पर्य—प्रत्यक्ष आपण भूत पाहिल्याचें ज्य प्रमाणें कोणी सांगत नाहीं त्याचप्रमाणें प्रतापसिंहावरील आरोपसिद्धीची वरील ढकलाढकली आहे. आतां नातूनें प्रतापसिंहाच्या विरुद्ध कारस्थान करावयाचीं कारणें रंगो बापूजीच्या मताप्रमाणें दोन आहेत. पहिलें, चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंचा संकेश्वरच्या शंकराचार्यांनीं वेदोक्ताचा अधिकार मान्य केला हें होय. चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन सांगलीकर आणि नातू यांस स्वामीचें हें कृत्य

---

* कॉर्नाक आणि छत्रपती यांच्या मुलाखतीची हकीकत कॉर्नाक यानेंच लिहिली आहे. ती पार्लमेंटरी बूक १ लें, पान २६८ वर पहा.

मुळींच पसंत नव्हते. प्रतापसिंहांनीं प्रभूंचे हे वेदोक्तांचे अधिकार काढून घेऊन आपल्या मनाप्रमाणें या ग्रामण्याच्या प्रकरणाचा निकाल लावावा, असा या उभयतांचा मानस होता; परंतु प्रतापसिंहांनीं हें ऐकिलें नाहीं. त्यामुळें या उभयतांनीं ही राजद्रोहाची घोरपड प्रतापसिंहांवर आणली. ×

"दुसरें कारण, "एक ब्राह्मण त्याचें नांव सर्वत्रांस माहित आहेच. तो बाळाजी पंत नातू, गव्हर्मेंट सांगेल तें करावयास त्वरित सिद्ध आहे. आणखी हा माणूस आपले दीलापासून हरएक तरकटी कामें करण्यास निरतर गव्हर्नमेंटचें हुकुमास हजर आहे. पाहा याचे स्वज्ञातीचाच जो पूर्वीचा धनी पेशवे मुख्य प्रधान बाजीराव रघुनाथ त्याशीं यानें दगेब जो केली. त्या कामाबद्दल मुंबई गव्हर्नमेंटांनीं यांस मानमरातब अब्रू देऊन इनाम व बक्षीस, पेनशन्सह दिलें. हाच निमकहराम खोटा दगलबाज, याचे मनांत असें होतें कीं, आपण साताराच्या राजाचें मुख्य दिवाण व्हावें. आणि महाराज छत्रपतीपाशीं या नातूनीं दिवाणगिरी मागितली. परंतु नातूस दिवाणगिरी दिली नाहीं. व याजपासून चाकरी घेणें हेंहि कबूल केलें नाहीं. त्याजवरून महाराज छत्रपतीविषयीं या नातूचे चित्तांत फार द्वेषाची मनोवृत्ति होऊन त्यानें तरकटी खोलखोल कामें केलीं. आणखी ऐका, हा दुष्मनी करण्यास कधीं विसरावयाचा नाहीं. असें प्रसिद्ध असतां यासच या तरकटाची सरदारी मुंबई गव्हर्नमेंटानीं दिली."

१७ या फितूरी कामाचा पुरावा म्हणून, "कर्नल ओविन्स यांनीं" रंगो बापूजी लिहितात; "खोटे कागद अठ्ठतीस खरेदी घेतले आहेत. बाळकोबा केळकर हा चोरांचा नाईक यास चारशें रुपये देऊन ते घेतले. या कागदांत बहुतेक कागद दोन्हीं तर्फेचे या एका मनुष्यापाशींच आहेत.

---

× जनरल रॉबर्टसन डिरेक्टर्स ईस्ट इंडिया कंपनी आणि पेशाजी रेसिडेंट सातारा यांचें बोलणें जनरल कोर्ट इंडिया हाऊस ता. १६ जुलै सन १८४१. एशियाटिक जनरल पहा.

हे तरकटी एकएकाच मनुष्यानें दुतर्फा आपआपल्या हातानींच लिहिलें म्हणोन कबूल केलें आहे. या पत्राचे सारे लेखक नागो देवराव याचे आप्त कोणी भाचा व पुतण्या व काका व मेहुणे वगैरेच आहेत. मोरो बल्लाळ जोशी व हरी बल्लाळ फाटक व नाना फाटक हे दोघे बहिणीचे दोन (मुलगे) व हा केळकर बायकोचा भाऊ अशा ह्या खोट्या साक्षी जमाव करून घेतल्या. स्पूना ( Spooner ) कलेक्टर रत्नागिरी याचें पत्र सेक्रेटरी याथीन मुंबई यास ता. २३ सप्टेंबर सन १८३७ पार्लमेंटरी बूक २ पान ६८२ यांतील तात्पर्य--मी गव्हर्नर सह कौन्सिलास लिहून कळवितो कीं, बाळाराम चप्राशी निसबत ॲक्टिंग रेसीडेंट वोविन्स सातारा, यास सांवताचे वाडींतील सरदारास मजकूर विचारावयास पाठविला होता. त्यास हल्लीं हा वकील आम्हांपाशीं बोलला कीं, बाळकोबा केळकर यास माफी करून साफ खुलासा करण्याचा हुकूम देऊन सोडावा '' याप्रमाणें या केळकरास माफीचा साक्षीदार करून वाटेल तो अव्यवस्थित मजकूर लिहून घेतला व तोच पुराव्यास ग्राह्य धरून प्रतापसिंहास पदच्युत केलें. महाराजास पदच्युत करून घेऊन गेल्याची हकीकत फारच हृदयद्रावक आहे. ती रंगो बापूजीच्याच शब्दांत खालीं देतों:--

तारीख ४ सप्टेंबर सन १८३९ रोजीं रात्रीं विलायती गोरे टोपीवाले व शिपाई बहूत जमा करून कर्नल वोविन्स यांनीं शहरांत चालविले. कारण राजवाडा चहूंतर्फे घेरून बंदोबस्तानें जप्ती करून घ्यावा असें त्याच्या मनांत होतें. त्यास येण्याजाण्यास रात्रीस कोणतेहि प्रहरांत कोणीहि बंदी करूं नये म्हणोन महाराजानीं आपले शहरचे शिपाई लोकांस ताकीद करून ठेविली होती. त्यासी मारामारी करूं नये व रक्ताचा बुंदहि जमीनीस पडूं नये म्हणून महाराजांनीं आपलें सारे फौज व सरदारापासून हत्यारें घेऊन ठेविलीं. व शहरांत साऱ्या तोफा दारूनें भरल्या होत्या, त्यांतील दारूगोळे काढून रिकाम्या करून ठेविल्या, व दारूखान्यांत जेथें दारू ठेविली होती त्या दारूत पाणी घालून ती भिजवून टाकिली. महा-

जांनीं कामदारास हुकूम करून राजवाडा उघडा ठेविला. हा बोविन्स शहरांत शिरला तो राजवाड्यांपाशीं येऊन दुसरे आमलदार बरोबर घेऊन महाराजांचे वाड्यांतील कचेरींत देवघरापुढें खासे खोलींत शिरला. तेव्हां महाराज छत्रपति एकटे आपले बिछान्यावर निद्रिस्त होते. त्यानें निद्रेच्या वस्त्रानें छत्रपतीस राजवाड्याचे पहाऱ्याखालीं मोठ्या घाईघाईनें चालविलें. अर्धा मेणा उघडा ठेवून त्यांत त्यांस घालून साताऱ्यापासून एक जागा सुमारें आठ मैल होतीं त्या ठिकाणीं पहिले दिवशीं त्यांस ठेविलें. ती जागा (म्हणजे) गाई व गुरें बांधण्याचा गोठा होय. यावेळीं महाराजांचे आंग उघडें होतें. निजण्याचा चोळणा मात्र पायांत होता. त्याशिवाय दुसरें वस्त्र कांहीं नव्हतें. रस्त्यानें कोणी माणसानें एक शाल आणून महाराजांचे आंगावर टाकिली. हें केवळ जगप्रसिद्ध आहे कीं, ज्या जागेंत राजास ठेविलें होतें त्या जागेंत उंदीर वगैरे दुष्ट जीव पिसवादी सारे भरलेले होते. अशा त्या खराब जागेंत राजास ठेविलें होतें. महाराजांस ज्या जागेंत प्रथम कैदेंत ठेविलें होतें, तेथें महाराजांची राणी व कुटुंबाचीं मनुष्यें मागाहून आलीं. नंतर महाराजांची कन्या सौभाग्यवती गोजरासाहेबहि तेथें आली. तिनें हें मोठें भयंकर महान् अरिष्ट पाहून ती (खरोखरीच) गर्भगळीत झाली. (म्हणजे) नऊ महिने पुरे न होतां त्या जंगलांत ती प्रसूत झाली. महाराज छत्रपति सरकारचे नोकर रयत लोक सुमारें बाराशें आपले खुषीनें महाराजांचे मागें गेले. हल्लीं महाराज जेथें कैदेंत आहेत, ती जागा साताऱ्यापासून सुमारें ९०० मैल दूर आहे तेथें जाऊन पोहोंचण्यास राजास पांच महिने लागले. तेथें जात असतां एका मजलींत महाराजांचे चुलत बंधु यांच्या स्त्रीस त्या चालते मजलींत प्रसूतकालच्या वेदना होऊं लागल्या, त्यासमयीं महाराज छत्रपतींनीं त्या बाईसाठीं मुक्काम करण्यास सांगितलें. परंतु महाराजांचें सांगणें निष्ठुरपणानें कोणीं कबूल केलें नाहीं व ती बाई शेवटीं रस्त्यांतच प्रसूत जाहली.

दुसरें, दुष्ट कर्म मोठ्या आश्चर्याचें सांगतों. चालत्या मजलींत बोविन्स रेसिडेंट यांनीं कित्येक हत्यारबंद शिपायांची टोळी पाठविली. त्या टोळीनें

महाराजांबरोबर जात असलेल्या बाळासाहेब सेनापतीस आडविलें. बोबिन्स-च्या हुकूम असा होता कीं, सेनापतीकडे हजारो पौंडांचें देणेदाराचें येणें आहे. तो ऐवज त्याजपाशीं मागितला जर सेनापतीनीं हा ऐवज न दिला तर या टोळीनें त्यास तत्काळ कैद करून माघारें साताऱ्यास आणावें. सेनापतीपाशीं जो ऐवज मागितला त्याच्या तिप्पट ऐवज साताऱ्यास ( त्यांच्या घरीं ) होता, परंतु या मागण्याप्रमाणें देणेदाराच्या पुरवणीसाठीं या नामदार सरदारानीं आपले कुटुंबापाशीं जें कांहीं होतें ते व मुलांचे अंगावरील जड-जवाहिर व रुप्याचीं भांडीं वगैरे सर्व मागून घेऊन यांच्या हवालीं केलें. परंतु पहा, पुरें शाबूत खास आहे कीं सेनापतींनीं कोणाएकाचे कांहीं एक देणें नव्हतें. या संकटामुळें व बेदादीवरून हा नामदार मोठा सरदार बहादुर शिपाई कोपाविष्ट होऊन फार लज्जित व दुःखित झाला व त्याच्या शरीरास फार क्लेश झाले. त्यामुळें त्याची प्रकृति बिघडून अति अवस्था झाली म्हणून मुक्काम करण्यास पुन्हां महाराजांनीं सांगितलें. परंतु महाराजांच्या सांगण्याप्रमाणें पुन्हांहि मुक्काम करण्याचें दुष्ट कामगारानें कबूल केलें नाहीं. तेव्हां त्या चालते मजलीच्या दिवसाच्या कूचांत शेवटीं मुक्कामाचे वेळीं जेव्हां पालखी उघडून पाहिली तेव्हां तो सरदार मृत्यु पावला होता व त्याचें प्रेत लांब निर्जीव होऊन पडलें होतें.''× याप्रमाणें प्रतापसिंहांचे स्वारीची हकीकत आहे.

१८. प्रतापसिंहावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याची गुप्त रीतीनें चौकशी झाली होती. परंतु ती फक्त एकतर्फीच होती. प्रतापसिंहाच्या तर्फेचा पुरावा कमिशनला नको होता. ही गोष्ट जेव्हां स्पष्टपणे प्रतापसिंहाच्या लक्षांत आली, तेव्हां त्यांनीं आपल्या तर्फेची हकीकत इंग्रज सरकारास कळविण्याची तजवीज केली. कोणीहि युरोपियनानें या साताऱ्याच्या प्रकरणांत मध्यस्ती करूं नये, असा मुंबई सरकारनें ठरावच करून टाकिला

× तारीख ५ जुलै सन १८४७ पार्लमेंटरी डिबेट बुक पान ५० व पार्लमेंटरी बुक पान ३८८. राजकारणीखातें नंबर ३१६.

होता कीं काय न कळे. परंतु प्रतापसिंहाला कोणी योग्य युरोपियन वकील मिळेना, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. अशा बिकट प्रसंगीं एकुणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत म्हणजे ज्या वेळीं इंग्रजी सत्ता नुकतीच प्रस्थापित झाली होती, त्या वेळीं त्या शहाण्या व दूरदर्शी राजानें, "विचार करून दिलांत आणिलें कीं, जें आपण प्रथम आरंभिलें होतें त्याअन्वयें हल्लीं वकील लंडनास पाठवावे; आणि आपला कच्चा मजकूर तेथें इंग्रजी दरबारांत समजावून चांगला बंदोबस्त करून घ्यावा. सदरहुविशीची खबर रेसिडेंटास कळतांच त्यानीं आपले गव्हर्नमेंटास पत्र+ लिहून कळविलें कीं महाराजांची मसलत झाली आहे. एक फ्रेंच मुंबईंत आहे. त्याच्या हवालीं आपले वकील करून देऊन इंग्लिश स्थानांत राहणें करावें. त्या फ्रेंचाचें नांव दिऊलमार. हा ह्या वकीलास मुंबईहून विलायतेस जलमार्गें म्हणजे समुद्रांतून जहाजांतून नेणार. आणखी पहा, फेब्रुवारी सन १८३९ सालाचे प्रारंभीं (महाराजांचे आप्त येशवंतराव हे मुख्य व इतर) वकील व चाकर दुभाषी सुद्धां असामी आठ हे सारे लोक मुंबईस आले होते. त्यांनीं लंडनास येण्याबद्दल जहाजास भाडें साडे पांचशें पौंड म्हणजे साडे पांच हजार रुपये देऊन पावती घेऊन फ्रेंचाच्या तारवांतून निघून येण्याची तयारी केली."

१९. या वकीलांनीं विलायतेस जाऊं नये म्हणून रेसिडेंटानें नाना युक्तीप्रयुक्ती केल्या. मॅजिस्ट्रेटाकडून त्यास कैदेची भीति दाखविली. धाकदपटशाहा दिला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सातारच्या राजास याप्रमाणें परभारें आपले वकील लंडन येथें पाठवितां येत नाहींत, असाहि एक कायदेशीर बूट मुंबई सरकारानें उपस्थित करून त्यावर आपला प्रतिकूल अभिप्राय नमूद करून ठेविला. रंगो बापूजी पृच्छा करितात, "मी तुम्हांस विचारितों, या लंडनांत या गव्हर्नमेंटाचे (ब्युरॉक्रसीचे) धणी किंवा चाकर आहेत, तें सांगा बरें. आणखी पहा, मुख्य माजिस्ट्रेट कंपनीचे नोकर, त्याचे हुकुमतींतले लोक, व ॲडव्होकेट जनरल इंग्रजी लॉयर म्हणजे

+ तारीख २८ नोव्हेंबर सन १८३८ पार्लमेंटरी पान बूक ४५०.

मुख्य सुप्रीम कोर्टाचे वकील, आणि हे मुंबई गव्हर्नमेंटास यथान्याय करून सल्ला देणार. पहा त्याची याद. व सेक्रेटरी व ॲक्टिंग सेक्रेटरी हे कंपनीचे नोकर गव्हर्नमेंटास उपदेश करून खुणेनें दाखवून अशीं जीं सूचनापत्रें ( तीं ) गुप्त दाबून ठेवणार. हे कोण लोक ह्मणाल तरी समुद्राचे बेट बंदरचे महसुलदार कंपनीचे नोकर. यांच्या या तरकटी कृती तुह्मीं पहा. अशा अनेक प्रकारच्या हिकमती करून हरतऱ्हेनीं राज्याचे वकील लंडनास जातात, त्यास हरकती अटकाव करून जाऊं देऊं नये. हिंदुस्थानांत मनुष्यें ( पुरुष ) सुमारें पंधरा कोटी आहेत. त्या सर्व मनुष्यांची तोंडें बांधून त्यांच्या कानांत बोळे घालून बहिऱ्या व मुक्या व आंधळ्याप्रमाणें करून ठेवावीं. आणि त्यांस या मुलखांतील कांहीं मजकूर कळूं देऊं नये. जोरांनीं धमकावून दाबून गुप्त ठेवण्याविषयीं या मुंबई गव्हर्नमेंटाची इच्छा आहे. मी या कंपनीच्या गव्हर्नरास साफ विचारतों कीं, हीं पंधरा कोट मनुष्यें हिंदुस्थानांत आहेत, ते सारे मालमिळकतसुद्धां या फरीस गव्हर्नराचे बंदे गुलाम आहेत कीं काय ?" असो, वकील परदेशीं जातात त्यासंबंधीं मुंबईच्या कौन्सिलांत बरीच भवती न भवती होऊन शेवटीं सर्वांनुमतें असें ठरलें कीं, "या सर्व कागदांच्या नकला गुप्त कमिटींत ईस्ट इंडिया कंपनीचे डिरेक्टर्स यांजकडे रवाना करून त्यास लिहून कळवावें कीं, हे वकील ज्या वेळीं लंडनास पोहोंचतील त्यासमयीं तेथें कोर्ट डीरेक्टर्स ब्रिटिश गव्हर्नमेंटानीं या लोकांस राज्याचे वकील म्हणून बोलावूं नये. आणि यांच्या वकिलाचें कामहि कबूल करूं नये. म्हणून आपण त्यास विनंती करावी." व याप्रमाणें मुंबई सरकाराकडून विलायतेस लिहून गेलें.

२०. मागें सांगितल्याप्रमाणें सातारचे राजाचे वकील जहाजांत बसून रवाना होण्याचे पूर्वी, "फ्रेंच याचें जहाजाचे धन्यानीं मुंबई बंदरांतून हें जहाज नेण्याबद्दल" लोकांची नांवनिशी दाखवून, "कलेक्टर याजपाशीं परवानगी मागितली, तेव्हां कलेक्टर यानें या जहाजाचें टिपेंत वकीलांचीं नांवें पाहून जाण्यास रजा दिली नाहीं. परंतु पाहा हे सातारच्या राजाच्या

वकिलांनीं या जहाजाचें भाडें देऊन करार ठरला असतां कप्तान यांस कलेक्टर यांनीं जातीनें वारंवार सांगितलें कीं, तुमचे जहाजावर जोंपावेतों हे वकील आहेत, तोंपर्यंत तुम्हांस जाण्यास हुकूम होणार नाहीं. आणि सरहद्दीचे दस्तकहि तुम्हास देणार नाहीं. कप्तानांनीं जाण्याबद्दल रजा मिळण्याविषयीं प्रयत्न तितका केला. परंतु गव्हर्नमेंटांनीं हें जहाज हिंदुस्थानचे बंदराबाहेर अगदीं जाऊं देऊं नये, असा पक्का बंदोबस्त करून हुकूम दिला नाहीं. तेव्हां या फ्रेंच जहाजाच्या धन्यांनीं या वकीलास जाइजांत न घेतां टाकल्याशिवाय दुसरी तोड उरली नाहीं. त्याचा उपाय थकला. यास्तव वकीलास सोडून देऊन आपले जहाज त्या बंदरांतून घेऊन तो निघून गेला." व वकीलांनीं भाड्याचे दिलेले साडे पांचशें पौंड ठार बुडाले. रंगो बापूजी बजावितात, "सदरहू जहाजांस भाड्याचा ऐवज दिला हा मजकूर मुंबई गव्हर्नमेंटास पुरा माहित होता." याप्रमाणें वकीलास निष्कारण भूर्दंड भरावा लागला. यापुढें रंगो बापूजी कथन करितात, "नंतर वकिलांनीं लंडनास येण्याबद्दल दुसरें इंग्रजी जहाज लिव्हरपुलचे बंदरास येणोर, त्यास तार देऊन इकडे निघण्याची तयारी केली. या कंपनीचे चाकरांनीं या जहाजास अटकाव करण्यास मुंबई गव्हर्नमेंटचे हाती जोर नाहीं. तेव्हां या जहाजावरून वकील मुंबईहून अखेर शेवटीं लंडनास आले." याप्रमाणें मोठ्या शर्थीनें वकील लंडन मुक्कामीं पोहोंचल्यावर त्यास आपण कृतकृत्य झालों असें वाटलें. त्यांची अशी खात्री होती कीं, हिंदुस्थानांतील इंग्रजी अधिकारी वर्गाच्या सुलतानीची खरी व सप्रमाण हकीकत ईस्ट इंडिया कंपनीचे डिरेक्टरास कळवितांच तत्काल त्यांची दाद लागून न्यायाच्या धारवाडी कांट्यानें अपराध्यास शासन होईल. परंतु या वकिलास लंडन येथें याच्या अगदीं उलट अनुभव आला. रंगो बापूजी बोलतात, "ईस्ट इंडिया कंपनीचे डिरेक्टर्स यास पेशजी फेरीस ॲक्टिंग गव्हर्नर व मुंबई कौन्सिलदारनीं लिहून पाठविलें, त्याप्रमाणें कोर्ट डिरेक्टर्स यांनीं शिस्त ठेऊन या वकिलास ओळखिलें नाहीं." इतकेंच नव्हे तर त्यांचा "धिःकार केला" तेव्हां "वकील मोठे दंग होऊन" आश्चर्यचकित झाले. पुढें "कांहीं

दिवस ते तेथें राहून पुन्हां इन्साफ देण्याविषयीं ( त्यांनीं ) कोर्टास विनंति केली, ती व्यर्थ झाली." तेव्हां सरतेशेवटीं "लाचारीने सारे वकील परत निघून हिंदुस्थानांत गेले," रंगो बापूजी सांगतात, "त्यांतून नुसता एकटा मी येथें राहिलों. आणि बहुत दिवस सहा वर्षे कष्ट, मेहेनत व दुःख सोसून या मुक्कामीं राहून मोठ्या कारागृहाचे दिवस काढले."

२१. हिंदुस्थानाला होमरुल प्राप्त करून घ्यावयाचा असला तर इंग्लिश जनतेची प्रार्थना केली पाहिजे. त्याशिवाय आपली दाद लागणार नाहीं, अशी जी आज हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांची समजूत आहे, तीच सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी इंग्रजी विद्येचा गंध व पाश्चात्य विचारांचा यत्किंचित्‌ही संसर्ग नसलेल्या रंगो बापूजींचीही पूर्णपणें होती. म्हणून त्यांनीं छत्रपति प्रतापसिंहावर गुजरलेल्या जुलुमाची हकीकत लंडन येथें सुमारें पंचवीस निरनिराळ्या ठिकाणीं सभा भरवून जाहीर केली. ही हकीकत "जागोजागी बोलण्याबद्दल प्रथम मराठींत लिहून नंतर हिंदुस्थानी भाषेनें सांगून इंग्रजी तर्जुमा केला." एवढा द्राविडी प्राणायाम, प्रयत्नामध्यें भगीरथासही विस्मयचकित करणाऱ्या रंगो बापूजींनीं कोणामार्फत करविला, याचा या पुस्तकांत उल्लेख नाहीं. मात्र त्या भाषणाचेंच मराठी भाषांतर या पुस्तकांतील ६५ पृष्ठें व्यापून राहिलें आहे.

२२. वर सांगितल्याप्रमाणें रंगो बापूजींचा क्रम सुरू झाल्यावर अर्थात्च लंडन मुक्कामीं मोठी चळवळ उडून गेली. व शेवटीं ता० २ डिसेंबर सन १८४६ रोजीं "हनोवर, स्कायर क्विन कंसल्ट रूम" मुक्काम लंडन येथें मोठी सभा जमवून तिचे पुढें साताराच्या राजाच्या मुकदम्याचा मजकूर जगजाहिर प्रगट करून समजाविला. 'बुची निसीन सर दिलेसी येवेन्स' हे या सभेचे अध्यक्ष होते. या सभेंत पार्लमेंटचेहि बरेच मेंबर हजर होते, कंपनीच्या डिरेक्टरांसहि मुद्दाम बोलाविणें केलें होतें, परंतु ते आले नाहींत. या सभेंत रंगो बापूजींचें म्हणणें रोटण या नांवाच्या कोणी एका गृहस्थाने समजावून सांगितलें. तेंच मराठीमध्यें मोडी लिपींत

आमच्याजवळील पुस्तकांत दिलें आहे. इन्साफ मिळण्याबद्दल रंगो बापूजींनीं लंडन मुक्कामीं काय काय तजविजी केल्या त्या त्यांच्याच शब्दांत खालीं देतों:—

१. मुंबई गव्हर्नमेंटांनीं खोटे तर्कटी फितूर राज्याचे जहागीरदार घेण्याबद्दल उभे केलें, म्हणून गव्हर्मर जनरल यास लिहून पाठविलें. परंतु इन्साफ मिळाला नाहीं. त्याजवरून छत्रपति सरकारचे आज्ञेप्रमाणें या [ लंडन ] मुक्कामीं मी व माझे दोस्त येऊन प्रथम ऑनरेबल कोर्ट डिरेक्टर्स यांसीं बहुत वेळां इन्साफ करण्याविषयीं बोललों. परंतु कोर्टाचें उत्तर मुंबई गव्हर्नमेंटांनीं खरें अगर खोटें केलें तें आम्हांस कबूल आहे.

२. दुसरें, कोर्ट कंट्रोल यांसीं बोललें त्याचे उत्तर, कोर्टानें केलें तें फिरावयाचें नाहीं.

३. तिसरें, प्रिव्ही कौन्सिल येथें काम चालवावें तों वकील बालिस्टर म्हणतात, राजा पादशहा [ चा ] इन्साफ या कौन्सिलांत चालण्यास मॅजेस्टी क्वीनचा हुकूम पाहिजे.

४. चौथें, मॅजेस्टी क्वीन व्हिक्टोरियास अर्जी दिली, परंतु उत्तर नाहीं. क्वीनची हुकमत पहावी तों मोठें नांव. धणी. सारी हुकमत वजीर बारभाई यांच्या हातीं.

५. पांचवें, क्वीन सबजेक्टस व कॅबिनेट कौन्सिल येथें प्रयत्न करून खोटे फितुराचे पुराव्याचे कागदपत्र दिले, परंतु उत्तर नाहीं.

६. सहावें, हाऊस ऑफ लॉर्ड्स या दरबारांत अर्ज्या दिल्या परंतु उत्तर नाहीं.

७. सातवें, मोठी कुदरत व अदल इन्साफ मागण्याचा दरबार मुख्य पार्लमेंट येथें मोकदमा बोलण्यासमयीं चाळीस मेंबरहि हजर रहात नाहीं.

याप्रमाणें ठिकठिकाणीं प्रयत्न करून हताश झाल्यावर शेवटीं रंगो बापूजी निराशेनें उद्गार काढतात, "येणेंप्रमाणें इंग्लिश दरबार हा बाजार,

दाद न लागे. तेव्हां इंग्लिश प्रांतीचे चालीवरून पाहतां सर्वत्र मुलखी लोकांची कुदरत हुकमत पार्लमेंटचे मेंबरावर मोठी. सबब विचार करून पाहतां इंग्लिश प्रांतीं सर्व जनांस सदरहू मोकदम्याचा मजकूर जाहीर करावा असें चित्तांत ठरवून दरबारी लोकांस आधीं खबर देऊन " पार्लमेंटचे मेंबर मि. ह्यूम यांचे मार्फत मुख्य वजीर लॉर्ड जॉन रसूल यासही हकीकत जाहीर केली. परंतु दाद लागली नाहीं. तेव्हां सदरहु मजकूर ठिकठिकाणीं जाहीर सभांतून कळविण्यांत आला. आपल्या भाषणांत शेवटीं रंगो बापूजी इंग्रजी जनतेस विनवितात कीं, "पार्लमेंटांत तुमचे वकील मेंबर लोक आहेत. ते तुमचे जाग्याचे मसलतदार, तुम्ही सर्वत्रांनीं प्रमुख करून ( दिले म्हणून ) ते राजसभेमध्यें बसतात. त्यांजवर तुमची हुकमत अशी आहे कीं, त्यांस त्या न्यायाधिशींत राजकीय सभेच्या पदावर वाढवून तुम्ही पार्लमेंटचें मेंबर करून त्या ठिकाणीं त्यांस चढविलें. त्यांनीं तुमचे आज्ञे-प्रमाणें चालवून न्याय बनावून दाखवावा, असा शिरस्ता आहे. त्याजवरून माझी विनंति तुम्हां सर्वत्रांपाशीं आहे कीं, माझे छत्रपती सरकारचा मोक-दमा त्या पार्लमेंटचें दृष्टीपुढें नेण्याविषयींची तजवीज करून मेंबर लोकांचा मला आश्रय मिळून पुन्हां चवकशी व्हावी."

२३. सरतेशेवटीं पार्लमेंटमध्यें दाद लावून घेण्यासाठीं वर सांगितले-ल्या सभेंत पन्नास मेंबरांची एक कमिटी स्थापन होऊन तिच्या अध्यक्षाच्या जागीं जॉन विलियम चर्च वॉर्डन यांची योजना झाली. परंतु या कमिटीच्या प्रयत्नांस पुढें कांहींच यश आल्याचें दिसत नाहीं. कारण महाराज प्रताप-सिंह काशीक्षेत्रांत राजपदहीन स्थितींत इंग्रजांच्या बंदीवासांतच मरण पावले, हें प्रसिद्धच आहे व प्रतापसिंहाच्या मागें त्यांचे बंधु शहाजी राजे निवर्तल्यावर सातारचें राज्यही खालसा करण्यांत आलें.

२४. विलायतेस राहून रंगो बापूजींच्या प्रयत्नांस कांहीं यश आलें नाहीं, व पुढें हिंदुस्थानांत आल्यावर त्यांचा कोणीही त्राता न राहिल्यानें त्यांना फार हालअपेष्टेंत दिवस कंठावे लागले. परंतु त्यांची पुढची हकीकत

फारशी उपलब्ध नाहीं. विलायतेहून परत येतानां तेथील मंडळीनें त्यांस एक चांदीचें तबक नजर केलें होतें. तें तबक हल्लीं भिसोटाईपचे प्रख्यात जनक रा. शंकरराव आबाजी भिसे यांच्याजवळ असून दादरचे कुळकर्ण्यांनीं त्याचा फोटोही काढिलेला प्रसिद्ध आहे.

९. रंगो बापूजी हे सातारकर चिटणविसांच्या पदरीं होते; व प्रतापसिंहाना गादी मिळवून देण्यांत ज्यांनीं अत्यंत परिश्रम केले त्यांत रंगो बापूजींचें नांव प्रामुख्यत्वें करून आहे. तथापि हा पुरुष दुर्दैवी होता, यांत कांहीं संशय नाहीं. प्रतापसिंहांना गादी मिळाल्यावर सुमारें १० वर्षांनीं ह्मणजे सन १८३१ मध्यें त्यांना एक लांबलचक अर्ज रंगो बापूजींनीं पाठविलेल्या रा. राजवाड्यांच्या १५ व्या खंडांत ले० ३२३ मध्यें छापिला आहे. त्यावरून त्यांच्या दीर्घोद्योगाची कल्पना होते, त्या लेखाचें तात्पर्य खालील प्रमाणें आहे.

२५. रंगो बापूजी यांचें सबंध नांव 'रंगोजी बापूजी रोहिडखोरेकर गुप्ते देशपांडे' असें आहे. शेवटच्या बाजीरावाच्या कारकीर्दीत शेवटीं शेवटीं पुण्यांत अल्पिस्टन हा इंग्रजांचा वकील होता त्याचे मार्फतीनें रंगो बापूजींनीं प्रतापसिंहास बंधुमुक्त करण्याचें कारस्थान रचिलें, इत्यादि प्राथमिक हकीकत देऊन प्रतापसिंहांचें पत्र साहेबास नेऊन देण्यासाठीं आपण काय केलें त्याची माहिती रंगो बापूजी लिहितात:—" (महाराजांच्या स्वदस्तूरची चिठ्ठी तात्या नारोळकर यांनीं ) आणून मजपाशीं दिली. ती चिठ्ठी खालीं नेण्याबद्दल पायास कुतरें चावलें असा बाहणा करून पायास भोंक पाडून जखम करून रक्त न पुसतां व त्यावर चूना लावून कांहीं झाड पाल्याची पेंड बांधून गोसाव्याचा वेष घेऊन" ती चिठ्ठी खालीं आणून अल्पिस्टन साहेबाकडेस पोंचविली. या चाकरीच्या मोबदला रंगो बापूजींचा व महाराजांचा असा करार ठरला होता कीं, महाराजांस राज्य मिळाल्यावर "माझें वतन ता। रोहिडखोरें येथील देशकुलकर्णाचें वगैरे पेशजी......जबरदस्तीनें सचिवपंत यांणीं घेतलें......तरी या मसलतीस यश आल्यावर माझें वतन

मज मिळावें. सचिवपंत जबरदस्त, विश्राज चालत नाहीं, त्यास आपण हल्लीं मनांवर घेऊन वतन देवावें. वरें बोलून वचन दिलें......" परंतु हें वचन कांहीं पूर्ण झालें नाहीं. सदरहू अर्जाच्या शेवटीं रंगो बापूजी कळवळून लिहितात: "--( आज दहा वर्षें महाराजांस राज्य प्राप्त होऊन झालीं, परंतु माझी दाद लागत नाहीं. ) मी संकट समयीं सेवा केली, परंतु माझा जीर्णोद्धार झाला नाहीं......हल्लीं कोणी माझें बोलणें बोलून बंदोबस्त करून देवितील असा भरंवसा वाटत नाहीं. सरकारांनींच कृपा करून बंदोबस्त करून दिल्यास......होईल, नाहींपेक्षां दारिद्र्यानीं व्यापिलें आहे, ......माझी सरकारांत ओळखसुद्धां नाहीं असें जाहलें आहे....—" इ० सदरहू पत्र फार मोठें आहे, परंतु अत्यंत हृदयद्रावक आहे. वाचकांनीं तें मूळांतूनच वाचावें ह्मणजे रंगो बापूजींची किंमत त्यांस कळेल. ( खंड १५वा, पृ. २३५, लेखांक २२३ पाहा. ) ज्याप्रमाणें प्रतापसिंह रंगो बापूजीला विसरले होते, त्याच प्रमाणें दुष्यन्तही शंकुतलेस विसरला होता म्हणूनच त्यावेळीं तिला उद्देशून त्यानें काढिलेले उद्गार प्रारंभीं दिले आहे. वर जो वतनाचा उल्लेख आला आहे त्याची संक्षिप्त हकीकत अशी आहे कीं, हें वतन रंगो बापूजीचे पूर्वज दादाजी नरसी यांस त्यांनीं शिवाजी महाराजांस साहाय्य केल्यामुळें इनाम मिळालें होतें. शिवाय शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रचण्ड उद्योगांत दादाजी हे इ. स. १६४५ च्या सुमारांस सामील झाले. ही हकीकत विजापुर दरबारांत कळतांच त्यांना शाहाचें खालील फर्मान आलें होतें:— "शिवाजी यांस तूं सामील" झालास. " सिरवली अमीनासी रुजू राहत नाहींस...... त्यास हे नामाकुल गोष्ट तुझे जमेदारीचे इज्जतीस आहे. तरी ...... अमीनासीं रुजू राहणें......हें न झालियास खुदावंत शहा तुजला विजापुरीं नेऊन गरदन मारतील......हें मनीं समजणें." ( राजवाडे खंड. १५, ले. २६७ ). या सुलतानी हुकमाची खबर शिवाजी महाराजांस लागतांच त्यांनीं दादाजीस धीर दिला कीं " श्री रोहिरेश्वरानें......आम्हांस यश दिलें व पुढें तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे......

रा. दादापंताचे विद्यमानें ( नरसी ) बाबाचें व तुमचें व आमचें श्रीपासीं इमान झालें तें कायम वज्रप्राय आहे. त्यांत अंतर आम्हीं व आमचे वंशज लेकराचे लेकरीं वतन वगैरे चालविण्या विसी कमतर करणार नाहीं. हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे......" (रा. खं. १५, ले. २६८). सारांश, ज्या थोड्या व्यक्तींनीं निधड्या छातीनें शिवाजी महाराजांना स्वराज्य-स्थापनेच्या उद्योगांत मदत केली, त्यांच्यापैकीं एका घराण्याचा शेवटचा पुरुष रंगो बापूजी होय. वरील वचनाप्रमाणें दादाजी वतन अनुभवीत असतां इ.स.१६८३मध्यें औरंगजेबानें दक्षिणेवर स्वारी केली. ते वेळीं ह्मणजे स. १६९० मध्यें दादाजीची काय कथा? मराठ्यांचा मुख्य जो छत्रपति राजाराम हा सुद्धां आपलें राज्य सोडून कर्नाटकांत पळून गेला होता, इतकी ही औरंगजेबाची स्वारी प्रखर होती. या नंतर लवकरच संकजी नारायण सचिव यांनीं दादाजीचें वतन बळकाविलें, तें पुन्हां केव्हांही पुढें सोडिलें नाहीं; व त्यामुळें दादाजीस पुढें फार विपत्तींत दिवस कंठावे लागले.

२६ संभाजीच्या वध नंतर महाराष्ट्र फार अडचणींत सांपडला होता. जो बलिष्ट असे तो बलहीनांना नागवीत असे. 'बळी तो कान पिळी' हा न्याय तेव्हां सर्वत्र सुरू झाला होता. इ. स. १६८९ पासून इ. स १७०० पर्यंत मराठ्यांचें नेतृत्व राजारामाकडे होतें. परंतु त्याचेही हुकूम धाब्यावर बसविण्या इतके कांहीं सरदार उन्मत्त झाले होते. जमीनदार व वतनदार लोकांची त्यावेळची दैना फारच हृदयद्रावक होती. जगदाळ्यांचें वतन परत देण्याबद्दल राजारामाची आज्ञा झाली असतांही तिची सुंदर तुक-देवानें प्रथम उपेक्षाच केली. संताजी घोरपड्यानें जगदाळ्यांस साहाय्य केलें ह्मणून धनाजी जाधवानें जगदाळ्यांचें वतन यादवांस देवविलें. हा प्रकार शाहूच्या वेळीं झाला. यावरून शाहूनें सुद्धां असल्या सरदारांपुढें हात टेंकले होते असें दिसतें. ( रा. खं. १५, ले. ६०. पान ११०-१११), असो. अशा धामधुमीच्या काळांत दादाजी प्रभूचें वतन सचिवांनीं आपल्या

ताब्यांत घेतलें आणि राजारामास असें कळविलें कीं, नरसीबाबास औरस संतति नसल्यानें हें वतन आमच्या कडेस राहूं द्यावें. दादाजी हा खरा औरस पुत्र नसून 'अफलादीचा वंश' आहे.

२७. सचिवांचा दादावरील हा आरोप मिथ्या होता. असला आरोप करण्याचें कारण एवढेंच होतें कीं दादाजी हे दत्तक होते. नरसीप्रभूंनीं चार स्त्रिया केल्या, परंतु पुत्र झाला नाहीं. दादाजी प्रभू हे सहा महिन्यांचे असतांच वेळवंड येथें त्यांचे तीर्थरूप भानजीबावा नवज्वराच्या आजारानें मृत्यु पावले; व दुष्टांच्या भयानें दादाजींची मातु:श्री या सहा महिन्याच्या अर्भकाला टाकून माहेरीं पळून गेली. तेव्हां दुसरे दिवशीं इतर लोकांनीं या मुलास नरसीबाबाकडेस पोंचवून दिलें. नरसी व भानजी हे सावजीचे पुत्र असल्यानें व नरसीस संतति नसल्यानें त्यांनीं दादाजीस ह्मणजे आपल्या पुतण्यास दत्तक घेतलें. ही दादाजीची मूळ कथा. हा दत्तक कबूल करणें शंकराजी नारायण सचिवास सोयीचें नसलें तरी दादाजीनें स्वत:च्या शास्त्रोक्त दत्ताविधानाबद्दल राजारामासुद्धां सर्वांची खात्री पटवून दिली होती. दादाजीचें वय तीस वर्षांचें झाल्यावर त्याचा विवाह झाला, ही गोष्ट येथें नमूद करून ठेवण्यासारखी आहे. असो. इ. स. १६९० मध्यें दादाजी नरसी आपलें वतन सोडून गेल्यावर "या प्रांतीं रामचंद्रपंत अमात्य व संक्राजी नारायण सचिव यांनीं राहून किल्ले कोटाचा बंदोबस्त केला, तेव्हां वतनावर फिरोन यावें तरी मार्गांची सुवत्ता नाहीं, वाट चालेना. राजेक्रान्त त्यांत दुष्काळ पडला. ते समयीं कागल प्रांतीं राहून गुजरान केली. मागें जेधे देशमुख यानीं संक्राजीपंत सचिवा जवळून कांहीं द्रव्य घेऊन दादाजींचें वतन जें संक्राजीपंतांनीं घेतलें तें पुन: केव्हांही परत केलें नाहीं. ही हकीकत राजारामास कळतांच याच सालीं हें वतन परत देण्याबद्दल संक्राजीपंतास राजारामाचा हुकूम आला तो:—" ......तुम्हीं प्रभूवर बलात्कार करून घरांतून कागद नेले त्यास हाली दादाजी प्रभू हुजूर......आले...... सर्व कैफियत कळाविली......तुम्हीं गैरवाका हुजूर विनंति लिहिली......

तुम्ही व जेधे व लोहकर वगैरे मिळोन हें वतन नाहक घेतलें......हें तुम्हांस उचित नाहीं. तरी या उपरी याचे वतनाचे कागद पत्र नेले त्या सुद्धां परत देऊन त्याचें वतन त्याजकडे चालत असल्या प्रमाणें चालवणें ......यांनीं कैलासवासी थोरले राजश्री स्वामीपासी फार शर्तीची चाकरी हरवक्त हुजूर राहून धारका रियात मर्दुमी मोठी धाडसें जिवाची परवा न धारितां केली......पेशजी व हल्ली या जातीनें फार मर्दुम्या करून राज्य मेळविलें, स्वामीकरितां खराब झाले व मारिले गेले. तुम्ही......आपले मनीं मोठेपणा वागवितां व पाहिजे ( तें ) करितां......हें वतन परत देणें......वतन न दिल्या हा बोभाटा आल्यास तुमचे आबरूस व पदास धक्का येईल......अशी करणी तुम्ही केली यांत स्वामीद्रोहाचेंच करणें... उगीच भलते भरी न भरणें. पुढें उर्जित होय तें करणें. हें न केलीया केले कामाची फळें ज्याचे ते भरतील......" ( खं. १५, पृ. २९४, ले. २८६ ). याप्रमाणें स्पष्ट हुकूम केला असतांही संक्राजीपंतानें तिकडे कानाडोळाच केला. दादाजीच्या पश्चात् त्याचे चिरंजीव कृष्णाजी व येसाजी यांनाही वतन मिळविण्याच्या प्रयत्नांत यश आलें नाहीं. कृष्णाजी व येसाजी यांस अनुक्रमें रामाजी व चिटको असे पुत्र होते, मागें सांगितलेल्या अर्जांत रंगो बापूजी लिहितात, " या वतनानिमित्त रामाजीबावा माजे-आजे-पेशवे यांजकडे फिर्याद गेले. तें वेळीं ( पेशवे ) पानपतावर जावयास निघालें. ते काळीं त्यांनीं सांगितलें कीं तुम्ही बराबर चलावें. ही मसलत जालियावर तुमचें वतन पंताकडून देववूं. पुढें ( रामाजीबावा ) पानपतावर तिकडेच गर्दीत मारले गेले, व वाद तसाच राहिसा. " ( राजवाडे खं. १५; ले. ३२३ ).

२८. याप्रमाणें १ दादाजी, २ कृष्णाजी, ३ रामाजी, ४ बापूजी, व ५ रंगो अशा पांच पिढ्या वतनासाठीं भांडतां भांडतां दिवंगत झाल्या. परंतु सचिवांनीं वतन कांहीं परत दिलें नाहीं. पांचही पिढ्यांनीं अधिक अधिक निष्टेनें उत्कृट राजसेवा केली. ही सेवा करण्यांत त्यांनीं जिवाची मुळींच पर्वा केली नाहीं. त्यांचे दोन पुरुष पानपतावर गेले होते; एक तेथें

पडला, एक पत्र आला. परंतु दुर्दैवानें त्यासेवेचा मोबदला त्यांना कधींच मिळाला नाहीं. या राजनिष्ठ घराण्याची वंशावळ रा. राजवाडे यांच्या १५ व्या खंडावरून तयार केलेली खालीं टिपेंत दिली आहे* भगीरथाच्या तीन पूर्वजांच्या तपश्चर्येनें स्वर्गांतील भागीरथी या भूलोकावर आली अशी पौराणिक कथा आहे. परंतु रंगो बापूजी व त्याचे चार पूर्वज अशा पांच पुरुषांच्या तपश्चर्येनेंही त्यांचें या भूलोकावरील वतन त्यांस परत मिळालें नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शिवाजी महाराजांचे साहाय्य करणाराच्या वंशजाला पुढें अन्नान्न स्थिति यावी, याहून अधिक शोचनीय अशी कोणती गोष्ट आहे ?

२९. होऊन गेलेला प्रकार बदलतां येत नसला तरी प्रस्तुतच्या ऐतिहासिक जागृतीच्या काळांत दादाजी नरसी प्रभूपासून रंगो बापूजीपर्यंत ज्या घराण्यानें एक निष्ठपणें तनुमनोधनें करून स्वराष्ट्र सेवा बजावली त्यांच्या देश बांधवांना या घराण्याचें नुसतें स्मरण सुद्धां असूं नये काय ?

Some frail memorial......Implores the passing tribute of a sigh.

(Gray's Elegy).

यांत म्हटल्याप्रमाणें रंगो बापूजींचें अद्वितीय स्मारक जें त्यांचें पुस्तक त्याच्या स्मरणानें तरी वाचकांनीं या घराण्याबद्दल निदान एकतरी दुःखोद्गार काढावा, या आशेनें प्रस्तुतचा चरित्र लेख त्यांस सादर केला आहे.

# वंशवृक्ष.

अनुक्रमांक ... दिनांक ... क्रमांक २५६७ नों. दि. ... वाचनालय

- भिकप्रभु.
  - हरप्रभु.
    - बालप्रभु
      - मानप्रभु
        - भाऊप्रभु
          - सावप्रभु
            - नरसप्रभु
              - दादाजीप्रभु
                - कृष्णाजीप्रभु
                  - रामाजीप्रभु
                    - बापूजी
                      - रंगो. ( हेच रंगो बापूजी. )
                - येसाजीप्रभु.
                  - चिटको प्रभु.
              - भानजी उर्फ भास्करजी प्रभु ( दत्तक भानजीचा पुत्र व शिवाजीचा साहाय्यकर्ता )
        - नरसप्रभु.
    - बाबाजीप्रभु.

( रामाजी व चिटको भाऊ साहेबांबरोबर पानपतावर गेले होते. पैकीं चिटको परत आले.

# १३ इभराहिमखान गारदी.

मृत्यु इ. स. १७६१.

हिंदुमुसलमानांच्या एकीचें चित्र इभराहिमखानाच्या चरित्रांत दिसून येतें. गारद्यांची पलटण हिंदुस्थानांत प्रथम मूसा बुसीनें तयार केली. हा इभराहिमखानही त्याजवळच तयार झाला. मुजफरखानावर सदाशिवरावाची खपा मर्जी झालयावर त्याला प्रतिस्पर्धी म्हणूनच याची नेमणूक करण्यांत आली असावी असें वाटतें. यापूर्वी इभराहिमखान निजामाच्या नोकरींत होता. तेथें त्यास लाख रुपये दरमहा मिळत होता. सन १७५७ मध्यें पेशव्यांनीं निजामावर स्वारी केली तेव्हां इभराहिमखान निजामाचे बाजूनेंच पेशव्यांशीं लढत होता. ही लढाई संपल्यावरच इभराहिमखानानें निजामास सोडिलें व पेशव्यांनीं त्यास आपल्या नोकरींत ठेवून घेतलें असें खालील पत्रावरून दिसतें. या लढाईंतील तारीख २२–१०–१७५७चें पत्र सदाशिवराव भाऊनें लिहिले आहे तें असें:—

श्री

"सेवेसीं विज्ञापना. मोगलाचया लस्करांतून एका ग्रहस्थानी सांगोन पाठविलें कीं, इब्राहीमखान गाडदी यानें नबाबापासून विडा उचलला आहे कीं आज खामखाये सडी फौज...पे...जातों. याप्रमाणें वर्तमान आलं आहे. आजच्या रात्रीं बहुत खबरदार राहिलें पाहिजे. पुढें चौक्या गेल्या आ...हि...ही आपल्या ठिकाणी रात्रीचें खबरदार असावें. आलें वर्तमान सेवेशीं लिहिलें असे. सत्यमिथ्य ईश्वर जाणें. परंतु आपण आपल्या ठिकाणीं सावधानी केलिया उत्तमच आहे. त्याच्यानें तो बाहिर येवत नाहींच. परंतु आपले जागा खबरदार असावें हें उत्तम आहे. सेवेसीं श्रुत होय हें विज्ञप्ती."

सय्यद गुलाम हुसेनखान या गृहस्थानें आपल्या सियर–मुताखरीन या ग्रंथांत इभराहिमखान गारद्याचें वर्णन येणें प्रमाणें केलें आहे: —

" इभराहिमखान अंगानें अगदीं किरकोळ व वर्णानें काळा असून, देवीच्या वणांनीं त्याचें तोंड अत्यंत विद्रुप झालेलें होतें. पांडिचरि येथें ड ब्यूरी नांवाचा एक कामगार होता, त्याच्या पालखीपुढें छडी घेऊन धांवणारा एक लहानसा शिपाई म्हणून इभराहिमखान नोकरीस लागला. त्यास थोडेंसे पोर्तुगीज येत असल्यामुळें कांहीं लष्करी कवाईत माहीत होतांच ड ब्यूरीनें इभराहिमखानास शिपायांचा नाईक केलें. त्यानंतर लवकरच त्यास फौजेंत अंमलदारी मिळून, त्याच्या हाताखालीं दोन हजार पायदळ व दोनशे स्वार जमा झाले. अशा रीतीनें फ्रेंच फौजेंत अंमलदारी मिळतांच पुष्कळसे इसम स्वतंत्र उद्योग करूं लागत, तदनुसार इभराहिमखानानें फ्रेंचांची नोकरी सोडिली, आणि निरनिराळ्या दरबारांत स्वेच्छेनें शिरकाव करून घेतला." ( भाग २ पृ. ३५५ )

इभराहिमखानास पेशव्यांनीं आपल्या नोकरींत सन १७५९ मध्यें ठेविलें व थोड्याच दिवसांनीं सदाशिवराव भाऊनें उत्तरेकडेस अबदालीवर स्वारी केली. या स्वारींत भाऊबरोबर इभराहिखान आपल्या तोफखान्यासुद्धां होता. मराठ्यांना मुसलमान लोक तेव्हां गनीम असें म्हणत. व त्यामुळें मराठेही स्वतःस गनीम याच संज्ञेनें संबोधीत असत. गनिमी काव्यानें लढण्यांत मराठ्यांची प्रसिद्धी असल्यानें तोफखान्यासारखें अवजड सामान ते सहसा बरोबर फिरवीत नसत. शत्रू बेसावध असेपर्यंत त्यावर हल्ला चढवून त्याची दाणादाण करणें व त्याच्या गोटांत लूटफाट करणें हें मराठ्यांचें गनिमी युद्ध. शत्रू सावध होऊन लढाईस सज्ज झाला कीं ही गनिमांची फौज पळून जावयाची. इभराहिमखानाला भाऊनें बरोबर घेतलें तेव्हां त्या उभयतांत पुढीलप्रमाणें संभाषण झाल्याचा उल्लेख भाऊसाहेबांच्या बखरींत आहे.

" इभरामखान गारदी यास समागमें घेतलें ते वेळेस इभरामखान गारदी यानें भाऊसाहेबांस जाबसाल केला कीं; ' तुम्हीं गनीम लोक दहावेळ पळाल व दहावेळ उभे राहाल. आम्हीं गारदी लोक केवळ पाय-

उतारे, आह्मांस पळावयास पाय नाहींत आणि गांठ तों रोहिल्याची पडणार. त्याची आज्ञा काय, ते समयीं भाउसाहेब यांनीं इमान दिलें कीं, ' निदान प्रसंग पडला तरी तुम्हांस सोडून निवणार नाहीं. तुह्मीं गाडून उभे रहाल तेथें मीही उभा राहीन. यास अंतर करणार नाहीं. ' ह्मणोन बेल भांडार दिला. त्याजपासून साजक रोटी आपण घेतली. आणी कूच केलें. " याप्रमाणें इभराहिमखान आणि भाऊसाहेब यांची आणभाक झाली. या वेळीं दहा हजार गारदी इभराहिमखानचे हाताखालीं होते. व शंभर तोफांचा तोफखाना होता. अशा तयारीनिशीं भाउसाहेबांची स्वारी अहमदशहा आबदालीवर चालून गेली.

भाऊसाहेबांची स्वारी उत्तरेकडे बऱ्हाणपुर, सिरोंज, खेचीवाडा, ग्वाल्हेर, मथुरा, दिल्ली या मार्गानें गेली. दिल्ली काबीज केल्यावर अबदालीवर चालून जावयाचें; परंतु त्यावेळीं मराठ्यांच्या दुर्दैवानें अबदाली यमुनेच्या पलीकडील तीरास होता. यमुनेला त्यावेळीं फार मोठा पूर आला असल्यानें मराठे आणि गिलचे यांपैकीं कोणी कोणावर चालून जाणें शक्य नव्हतें. अर्थात यमुनेचा उतार होईपर्यंत भाऊसाहेबांस दिल्लींतच बसून रहाणें अवश्य होतें. परंतु दिल्ली काबीज झाल्यानंतर भाऊसाहेबांसारखा कार्यक्षम पुरुष निष्कारण वेळ गमावीत बसणें मुळींच शक्य नव्हतें. म्हणून पुढें कुंजपुऱ्यावर चालून जाण्याचें भाऊसाहेबांनी ठरविलें. कुंजपुऱ्यावर मराठ्यांनीं चालून जाऊं नये, असें ते वेळीं सुरजमल जाट वगैरेंचें म्हणणें होतें पण या ह्मणण्याला सयुक्तिक असें कारण कोणासच न सांगतां आल्यानें अर्थातच तें सदाशिवराव भाऊस पटलें नाहीं. त्यांनीं एकदम कुंजपुऱ्यावर चाल केली. सर्वांच्या पुढें शिंदे, होळकर यांना रवाना करून मागाहून स्वत: भाऊसाहेब व इभराहिमखान निघाले. यांचा मुक्काम कुंजपुऱ्याजवळ गेला तेव्हां त्यांना गिलचाकडील कांहीं पत्रें वाटेंत मिळालीं त्या पत्रांवरून असें दिसलें कीं, कुंजपुऱ्यांत कुतुबशहा आणि शहामतखान कझलबाज असे दोघे आडकले आहेत, त्यांस लवकरच म्हणजे एकदोन दिवसांत अहमदशहा

अबदाली कुमक पाठविणार आहे. ही खबर भाऊसाहेबास मिळतांच सदाशिवरावानें "निकड करून इभराइमखान गारदी मागें सहा कोशांवर होता त्याजला जलदीनें स्वार पागेचे पाठविले कीं, पत्र पावतांच स्वार होऊन येणें, आम्हींही कुंजपुऱ्यास पोचलों. ते दिवशीं रात्र झाली. दुसरे दिवशीं सर्वत्रांस ताकीद करून किल्ल्यावर हल्ला केला. इभरामखान रातोरात कूच करून प्रातःकाळींच दाखल झाले. परभारें येऊन किल्ल्यास झगटला. श्रीमंतांनीं इभरामखान यास सांगोन पाठविलें कीं, मुहूर्तास तीन घटका अवकाश आहे तूर्त न उठावें. त्याणें सांगोन पाठविलें कीं, मुहूर्त कशास पाहिजे? आह्मीं किल्ला फत्ते करितों आणि हुजूर येतों. साहेबी धीर धरून एक प्रहर बसावें. परंतु यांणीं ऐकिलें नाहीं. सर्वत्रांस ताकीद देऊन हल्ल्यास उठले ... किल्ला फत्ते झाला." या वेळची इभराहिमखानाची कामगिरी मोठी लक्षांत ठेवण्यासारखी आहे. किल्ल्यांतील लोकांस अहंमदशहा अबदालीकडून लवकरच मदत येणार होती. मराठ्यांनीं किल्ला सर केला तेव्हां बाहेर दोन चार कोसावर अहंमदशहाची फौज येऊनही ठेपली होती. तत्कालीन समजुतीप्रमाणें भाऊसाहेबानें हल्ल्यास महूर्त ठरविला होता. व तो तीन घटकांनीं लागणार होता. अर्थात् किल्ल्यांतील फौजेस व कुमक आलेल्या फौजेसही तीन घटका तयारी करण्यास मुहूर्ताच्या नादीं इभराहिमखान लागला असता तर मिळाल्या असत्या. परंतु ही मुहूर्ताची दुर्बुद्धी भाऊसाहेबाप्रमाणें इभराहिमखानाला सुचली नाहीं इतकेंच नव्हे पण त्यानें मुहूर्तासाठीं खोळंबून बसण्याच्या सूचनेला धुडकावून दिलें आणि लगेहात किल्ल्यावर हल्ला चढवून दिला आणि म्हणूनच बाहेरची मदत येण्यापूर्वीच किल्ला मिळाला. सदाशिवराव भाऊनें या मुहूर्ताच्या नादीं लागून पानिपतच्या संग्रामांत मराठ्यांच्या तयारीस अपयश दिलें असें 'दुर्दैवी रंगूत' नानासाहेब वैद्यांनीं लिहिलें आहे. परंतु हा त्यांचा तर्क असल्यानें संशयास्पद आहे. कारण सदाशिवरावाची एकंदर कामाची लडफ पाहतां तो मुहूर्तासाठीं अडून

बसणारा वीर नसावा असें वाटतें. या उत्तरेकडच्या स्वारीसाठीं सुद्धां तो मुहूर्तांची वाट पाहत बसला नाहीं. स्वारीस मुहूर्त पाहतां तो बऱ्याच लांबचा निघाल्यानें दररोज असणाऱ्या शिवालिखिताच्या मुहूर्तावरच त्यानें कूच केलें हें प्रसिद्ध आहे. कसेंही असो, बखरींत तरी कुंजपुऱ्यासंबंधानें वरील हकीकत दिली आहे. असो.

याप्रमाणें कुंजपुरा हस्तगत करून यमुना ओलांडून अबदालीवर जाण्याचा भाऊसाहेबांचा विचार होता. परंतु इतक्यांत अबदालीच यमुना उतरून अलीकडच्या तीरास आल्याची बातमी भाऊस मिळाली, तेव्हां मराठे परत फिरले आणि त्यांनीं पानपतावर मुक्काम केला.

याप्रमाणें पानपतावर मुक्काम झाल्यावर तीन युद्धें मोठीं झालीं. त्यावेळीं इभराहिखानानें चांगलाच पराक्रम केला. परंतु पानपतावरील दीर्घकालिक मुक्काम अखेर मराठ्यांस फारच भोंवला. सैन्यांत दाणावैरण मिळेनासें झालें. मनुष्यें व जनावरें खाण्यापिण्यावांचून पटापट मरूं लागलीं. तेव्हां शेंवटीं या संकटांतून कसें पार पडून जावें याचा विचार सर्व सरदारांसमवेत त्यांनीं केला. त्यांत असें ठरलें कीं, दिल्लीच्या रोंखें आपण कूच करून निघून जावें. परंतु अबदालीची फौज मध्यें वाटेंत असतां तिच्या अंगावरून जाणें शक्य नाहीं असें मल्हारराव होळकरादिकांचें म्हणणें पडलें. तेव्हां शेवटीं कसेंही झालें तरी निघून जावेंच ' याप्रमाणें मनसबा ठरवून इभ्राहिमखान गारदी यास बोलावूं पाठविलें. यासही हा विचार पुसला. तों इभराहिम-खान गारदी यानें जाबसाल केला कीं, " भाऊसाहेब तुम्हीं जे समयीं इकडे यावयाची मसलत केली ते समयीं तुमचें आमचें इमान प्रमाण जाहलें तेंच करार आहे. आमचें गैर इमान असतें तरी आम्हीं आजपर्यंत येथें तुह्मां-पाशीं न ठरतों. तुह्मांस मिथ्या भासेल तरी प्रचीत दाखवितों. ' ह्मणोन बोलोन दुराणी व नजीबखान रोहिला व सुजाउद्दौला यांचीं पत्रें पंचवीस दाखविलीं कीं, ' तुह्मीं आह्मीं एकजात आहों. या समयीं आम्हांकडे यावें ह्मणजे तुह्मांस पंचवीस लक्षांचा मुलूख देऊं. पातशाही

उमरावी देतों.' ह्मणोन पत्रें दाखविलीं. प्रविष्ट केलीं. भाऊसाहेबांनीं वाचून पाहिलीं तेव्हां इभराहिमखान गारदी याची निखालसता देखिली. उत्तर दिलें कीं, 'तुमचें आमचें इमान आहे तेंच करार ( शाबूद ) आहे. परंतु आतां दिल्लीस जाऊन पोंचावयाची मसलत कोणती करावी ? निभावणी कैशी होईल ? याची मसलत काय ? याप्रमाणें पुसतांच इभराहिमखान गारदी यानें उत्तर केलें कीं, 'तुम्हीं गनीम लोक, तुम्हांस हिम्मत पुरवणार नाहीं. तुह्मीं आह्मांस घेऊन आलां ते कांहीं निभावणी करावयाची दिसत नाहीं. रणांत आह्मांस सोडून जाल. आह्मांस मात्र मृत्यूनें गांठिलें; हेंच खरें.' असें ऐकून मागती भाऊसाहेबीं दुसरें इमान दिलें कीं, 'तुह्मांस सोडून आह्मीं कदापि जाणार नाहीं. तुह्मीं जेथें उडी टाकून उभे राहाल तेथें आह्मींही कत्तल होऊन जाऊं. परंतु रण सोडून जाऊं हें घडणार नाहीं.' ह्मणोन इमान प्रमाण दिलें. तेव्हां इभराहिमखान याणें निखालसता मसलत दिली कीं, 'हरयत्नें दिल्लीस पोंचावें हें खरेंच आहे. आतां जावयास उपाय सांगणें, त्या रीतीनें तर अवघेंच पार पडून जाऊं. याची मसलत एक आहे कीं, देशीं मोंगल निजामअल्ली नवाब तुह्मांशीं लढाई हमेशा करितो, त्याचप्रमाणें गोल बांधून मध्यें बुणगें घालावें व भोंवताला आरावा वाटून द्यावा. चहूंकडे चार सरदार मातबर देऊन जिकडील तिकडे बाजवा वाटून द्याव्या. आणि कोस दोन कोस लढत भांडत दिल्लीस जाऊन पोंचावें." ही इभराहिमखानाची मसलत सर्वांस पसंत पडली. या मसलती प्रमाणें दुसरे दिवशीं सकाळीं 'खासा आपण व विश्वासराव अंबारींत स्वार झाले. सौभाग्यवती पार्वतीबाई व नाना फडणवीस यांची मातुश्री व स्त्री एका अंबारींत पार्वतीबाईचे नजीक होती. आणि तोफखाना ( व ) इभराहिमखान गारदी (पुढें) उजवे बाजूस शिंदे होळकर होते. डावे बाजूस दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व विठ्ठलराव शिवदेव व समशेर बहाद्दर व आणखी लहान थोर पथकें डावे बाजूस होते. मध्यें खाशे व हुजरात होती. कितीएक पथकें पिछाडीस बुणगे मध्यें घालून

होते.' याप्रमाणें मराठ्यांचें लष्कर दिल्लीस जाण्यासाठीं आपला तळ सोडून निघाले. ही बातमी अबदालीस पोंचतांच तोही आपली फौज तयार करून युद्धासाठीं सिद्ध होऊन उभा राहिला. अबदालीची ही तयारी पाहतांच दिल्लीस निघून जाण्याचा पूर्वीचा बेत भाऊसाहेबांनीं एकदम सोडून दिला व अबदालीशीं लढाई देण्याचें ठरविलें. "रात्रीं मनसबा केला होता तो राहिला. आणि पुढें होणार 'विनाशकालीं विपरीत बुद्धी' निर्माण झाली. ते समयीं सर्वत्रांस सांगून, आराबा अवघा मागें टाकून, निशाणें सोडून, फौजा पुढें चालिल्या. तेव्हां फौज जमूनही नव्हती. मुजऱ्यास धारसा भरावा तैसा फरा बांधोन उभी राहिली. तेसमयीं इभराहिमखान गारदी याणें हें पाहून चित्तांत विचारणा केली, कीं 'रात्रौ भाऊसाहेब यांणीं मनसबा केला काय? आणि कतऽ हें केलें काय? असो. आतां मसलतीस धक्का पुरता बसला. उपाय अवघाच राहिला. भाऊसाहेबांच्या बोलण्याची शाश्वती पुरती समजली. असो. आम्हीं भाऊसाहेब यास इमान दिलें आहे. त्यापेक्षां आतां मागें पुढें पहावें तरी आपले पूर्वजास बोल लागेल. भाऊसाहेब जें करतील, त्यास सादर न होतां गत तर नाहीं. दैवीं असेल तैसें घडेल. परंतु रणांत विन्मुख व्हावयाचें नाहीं. असो, आपले आयुष्याची सीमा होऊन शंभर वर्षे आतांच पूर्ण भरलीं, हें खरें. आतां 'आपलें बळें घालावी कास, कोणाची न धरावी आस' तैसें घडलें. इभराहिमखान गारदी याणें आराबा सोडून बोही डावे बाजूस आला.' यानंतर लढाईस तोंड लागून इभराहिमखानाच्या तोफखान्यानें नांवजण्यासारखी कामगिरी केली. त्याच्या तोफांच्या माऱ्यांत अबदालीच्या फोजेचा चक्काचूर होऊन गेला. नजीबखान, बरखुरदारखान इत्यादि नामांकित योध्यांचीही त्यानें त्रेधा उडवून दिली. गिलच्याची एवढी मोठी कजाख फौज, परंतु ती ही हा मारा सहन करीना. इभराहिमखानानें याप्रमाणें पराक्रम करून गिलच्याच्या फौजेस मागें फिरविलें तेव्हां 'इभराहिमखान गारदी याजवर खासा दुराणी व रोहिला यांणीं चालून

घेतलें. यांची एक रंजक उडाली. तिकडील ( गिलचांकडील ) लोक बहुत पडले. परंतु जाग्यावरून हालले नाहींत. तैसेच नेट धरून मारीत आले. आणि इभराहिमखान गारदी याजवरी चालोन आले. इभराहिमखान गारदी याजवरीच पडले.' या वेळीं दमाजी गायकवाडानें इभराहिमखानाची कुमक फार उत्तम प्रकारें केली. याप्रमाणें लढाई मोठ्या रंगांत आली. विठ्ठल शिवदेव, अंताजी माणकेश्वर, मल्हारराव होळकर, जनकोजी व तुकोजी शिंदे, यशवंतराव पवार हे सगळे वीर एकदांच चोहोंकडून उठले. 'इकडे हुजरातीनें व इभराहिमखान गारदी याणें कडनिकड करून, एक वेळ त्यांस ( गिलचांस ) मोडून त्यांचे जाग्यापावेतों तुडवीत तुडवीत नेलें.' तेव्हां गिलचांकडूनही बरखुरदारखान, अमीर बेगखान, दुंदेखान रोहिला, हाफीज रहमतखान, शहा पसंदखान, नजीबखान रोहिला, अहंमदखान बंगष, वजीर शहावलीखान ही मंडळी मराठ्यांवर चालून आली. यावेळीं मराठ्यांनीं आपल्या पराक्रमाची शिकस्त केली. 'परंतु फौज जमून नाहीं. यास्तव सर्वांचेच उपाय हरले. पोंवार यांचें मुंडमोचन करून इभराहिमखान गारदी याजवर तोंड लागलें. ( इभराहिमखानानें ) जिवाचा निधडा करून शिपायगिरी ह्मणावी तैसी केली. कित्येक गारदी कामास आले. परंतु कुमक कोणाची झाली नाहीं. मग एके क्षणांत पांच हजार गारदी ठार झाले. होते कीं नव्हते असे केले. हुजरातीचे जवळच लोक पळों लागले. तोफखाना बंद झाला. जातीनिशीं शिकस्त त्याणें ( इभराहिमखानानें ) पुरती केली. जाऊन गिलचाच्या लष्करांत मिसळला. आणि दहा पांच नामांकित सरदार मारून ठार केले. भोंवताला वेढा गिलचे यांचा पडला. अंगावरी जखमा भारी चढल्या. दुराणी पळोन गेले होते ते माघारे आले. गारदी यांचे मुद्यांचे ढीग पडले. इभराहिमखान गारदी याचा पुत्र व भाचा होता तो ठार झाला. खासा इभराहिमखान गारदीही रणांत घायाळ झाला. असें असतां लढतच होता. यत्न चालेना तेव्हां हत्यार राहिलें. मग धरून नेला......जाग्यावरच इभराहिमखान गारदी होता कीं नव्हता असें जाहलें.'

बहुतेक मराठे योद्धे या पानपतच्या युद्धांत नामोहरम झाले. दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव, मल्हारराव होळकर, अंताजी माणकेश्वर, महादजी शिंदे, असलीं धेंडें पानपतावरून पळून गेलीं. हे सरदार पेशव्यांच्या जिवास जीव देणारे ह्मणून प्रसिद्ध होते. पण ही त्यांची प्रसिद्धी या वेळीं चांगलीच कसोटीस लागली. इभराहिमखानानें मात्र आपलें इमान शेवटपर्यंत शाबूद ठेविलें. सर्वांचा मोड झाल्यावर तुकोजी शिंद्यांचा व सदाशिवराव भाऊचा पुढील संवाद बखरींत वर्णिला आहे. " तेव्हां तुकोजी शिंदे ह्मणों लागले कीं, ' महाराज क्षत्र—धर्माची शर्थ जाली. चोहींकडून अभाळ फाटलें. या उपरी निघावें यांत उत्तम आहे. ' तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं, ' तुकोजीबाबा, आतां कोणीकडे जावें ? ' काय तोंड नानासाहेबांस दाखवावें ? रावसाहेबांची ( विश्वासरावाची ) गत काय झाली ती पाहावी. आणि इभरामखान गारदी यास इमान दिलें तें काय ? ' असें ऐकून सागतीं तुकोजी शिंदे याणीं उत्तर केलें कीं, ' भाऊसाहेब, तुम्हीं वांचलां तरी अवघ्यांचा सूड घ्याल. नाहीं तर तुमचे मागें अवघ्याच गोष्टी आटोपल्या. ' असें ऐकून भाऊसाहेब बोलले कीं, ' पुणियांत नाना साहेबांस तोंड काय ह्मणोन दाखवावें ? निघावें अशी गोष्ट घडणार नाहीं. रणाचे ठायीं ईश्वरसत्तेकरून जें घडणार असेल तें घडेल, परंतु कदापि नामोहोरम व्हावयाचें नाहीं. " व सदाशिवराव भाऊनें हा आपला शब्द कायम ठेवून शेवटीं खरा करून दाखविला. ज्याप्रमाणें इभराहिमखानानें आपलें वचन पाळिलें. त्याचप्रमाणें सदाशिवरावानेंही आपलें वचन अक्षरशः पाळिलें. व्यक्तिशः कां होईना पण हिंदु मुसलमानांची एकी याला ह्मणावें.

" या नंतर दोन च्यार रोजांनीं दुराणीही मागें इकडे दिलीस पोंचला. तेव्हां इभराहिमखान गारदी रणांत घायाळ त्यांजकडे सांपडला होता. त्यास आपणांकडेस चाकरीस राहावें ह्मणोन रदबदली घातली. परंतु त्यास चाकरीस राहावयाचें अनुकूल पडलें नाहीं. ' भाऊसाहेब यांचे व आमचे वचनाचें इमान प्रमाण झालें आहे. यास्तव अशी गोष्ट आपणांकडून कदापि घडणार नाहीं, ' ह्मणोन साफच जाबसाल केला. "

इभराहिमखान गारदी याची माहिती भाऊसाहेबांच्या बखरीच्या आधारानें जेवढी मिळाली तेवढी वर सादर केली आहे. व तीही विशेषतः बखरीच्या शब्दांत दिलेली आहे. या वीर पुरुषाचा अंत पुढें फारच वाईट रीतीनें झाला कारण अबदालीनें त्याचा तत्काल शिरःच्छेद केला.

या पानपतच्या युद्धांत सदाशिवरावाच्या अनेक चुका झाल्या आहेत. मराठ्यांनीं उत्तरेस कुंजपुऱ्यापर्यंत जाणें, दिल्लीचें तख्त फोडणें, पानपतावर दोन तीन महिने तळ देऊन पडून राहणें, युद्धाच्या पूर्वरात्रीं सुजाउद्दौल्यास तहाबद्दल चिठ्ठी पाठविणें, शिलकी फौज मुळींच न ठेविणें, गोल बांधून निघून जाण्याचा पूर्वरात्रीचा विचार अगदीं ऐन वेळीं बदलणें, विश्वासराव पडल्यावर स्वतः बेहोष होणें, सर्वांशींच अत्यंत उद्दामपणानें वागणें, युद्धांत बरोबर बायका ठेविणें अशा अनेक चुकांचा परिणाम मराठ्यांच्या पराजयांत झाला. इभराहिमखानानें मराठ्यांच्या छावणीभोंवतीं जो खंदक खणला होता तो खणूं नये असें मल्हाररावादिकांचें म्हणणें होतें. व इभराहिमखानाच्या सल्ल्यानें भाऊसाहेब वागत असून त्यांनीं हा खंदक खणला ही इतर चुकांबरोबरच आणखी एक मोठी चूक केली असें कित्येक म्हणतात. परंतु हें त्यांचें म्हणणें बरोबर आहे असें वाटत नाहीं. कारण मल्हारराव होळकर आणि इभराहिमखान गारदी यांच्या युद्धपद्धति अगदीं भिन्न होत्या. मल्हारराव हा गनिमी काव्याच्या पद्धतीचा पुरस्कर्ता असून इभराहिमखान हा कवाइती पद्धतीचा अभिमानी होता. पानपतच्या शेवटच्या संग्रामापूर्वीं अबदालीनें मराठ्यांशीं दोन तीन सामने केले. त्या प्रत्येक वेळीं अंताजी माणकेश्वर व शिंदे होळकर यांचा सर्वांचा मोड झालेला आहे. अर्थात् गनिमी काव्याच्या पद्धतीनें अबदाली जेरीस येणें शक्य नव्हतें हें सदाशिवरावभाऊ पूर्णपणें समजून चुकला होता. कारण गनिमी काव्यांत दौड करण्याचें सामर्थ्य अधिक असावयास पाहिजे असतें. हें सामर्थ्य मल्हाररावांत जरी कांहींसें होतें तरी दुराणीच्या फौजेंत हें त्यापेक्षां अधिक होतें. पळतां पळतां मराठे थकत असत परंतु गिलचे थकत

नसत हा अनुभव आलेला होता. त्याचप्रमाणें इभराहिमखानाच्या तोफखान्याचा प्रभाव सदाशिवरावानें अगदीं शेवटीं शेवटीं सुद्धां कुंजपुऱ्यावर पाहिला होता. तेव्हां अवदालीशीं झगडण्याच्या मसलतींत त्यानें इभराहिमखानाच्या मसलतीस जर प्राधान्य दिलें असलें तर त्यांत कांहीं त्याची चुकी झाली होती असें ह्मणतां येणार नाहीं. आतां हा असा खंदक खणल्यामुळें पुढें हजारों माणसें त्या खंदकांत पडून मेलीं हें जरी खरें असलें तरी त्याचा दोष इभराहिमखानाकडेस न येतां ऐनवेळीं ठरलेली मसलत बदलल्यामुळें सदाशिवरावाकडेसच येतो. इतकेंही करून होळकरासारख्या मातबर सरदारांनीं जर रणांतून पळ काढिला नसता व इभराहिमखानाप्रमाणें मरून जाण्याचा निश्चय केला असता तर त्या युद्धांत अबदालीस यश आलेंच असतें असें ह्मणवत नाहीं. आतां ऐनवेळीं बदललेला हुकूम यांस कळला नसेल व ह्मणून हे पुढें दिल्लीच्या रोखें निघून गेले असतील असें कोणी म्हणेल पण सदाशिवराव, विश्वासराव आणि जरी पटका हे तर त्यांस तेथें दिसत होते ना? मग या सर्वांना सोडून त्यांनीं निघून जावें हें कसें उचित ह्मणतां येईल? तात्पर्य हे पळून गेले हेंच सर्वांहून फार वाईट झालें व सर्वांहून मोठी अशी मराठ्यांची चुकी ह्मणजे ते पळून गेले हीच होय. इभराहिमखानाच्या तोफखान्याच्या माऱ्यापुढें पहिल्या प्रथम दुराणीची फौजही अशीच पळून जाऊं लागली. तेव्हां स्वतः अहमदशहानें तीची कत्तल करण्याचा हुकूम दिला, व कित्येकांची कत्तल केलीही. हेंच उदाहरण होळकरासारख्यांनीं या वेळीं गिरवून दाखविणें हें त्यांचें कर्तव्य होतें. कसेंही असो. गोष्ट होऊन गेली तिला आतां कांहीं इलाज नाहीं पण इभराहिमखानानें कांहीं आपलें इमान सोडिलें नाहीं हें मात्र लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आणि म्हणूनच त्याची योग्यता पळून आलेल्या सरदारांपेक्षां अधिक ठरते.

—— :०: ——

# १४ सखाराम हरि.

जन्म इ. स. १७२०. मृत्यु इ. स. १७७९.

सखाराम हरि हा चांद्रसेनीय कायस्थ प्रभु याचें आडनांव गुप्ते हें होय. हा शूर, करारी व बाणेदार पुरुष असून राघोबावरील व्यक्तिनिष्ठ प्रेमामुळें याचे हे सर्व सद्‌गुण जवळ जवळ वाया गेले. याचा वडील भाऊ बाबुराव हरि हा पहिल्या बाजीरावाच्या पदरीं होता. सन १७३५ मध्यें बाजीरावानें जंजीऱ्यावर स्वारी केली तेव्हां बाबुराव हरि व सखाराम हरि असे उभयतां बंधु आपआपल्या सरंजामासह सैन्याबरोबर होते. या वेळीं सखाराम हरीचें वय लहानच म्हणजे पंधरा सोळा वर्षांचें होतें. अर्थात् त्याचा जन्म सन १७२० च्या सुमाराचा असावा असें वाटतें. या स्वारींत सखारामाचें शौर्य बाजीरावाच्या नजरेस भरलें. कारण त्यानें सीदीचे फौजेवर जोराचा हल्ला करून सीदी रहेमान ज्या हत्तीवर बसला होता तोच हत्ती हस्तगत करून वळवून आणिला. अशा लहान वयांत एवढा पराक्रम केलेला पाहून बाजीरावानें खूष होऊन तो जिंकून आणिलेलाच हत्ती सखारामास बक्षिस दिला व बाराशे स्वारांचें पथक नेमून दिलें. याप्रमाणें सखाराम स्वतः स्वतंत्र सरंजामी सरदार झाल्यामुळें पुढील बहुतेक मुलुखगिरींत याचा पराक्रम आढळतो. सन १७३८ सालीं बाजीरावानें निजामावर केलेल्या स्वारींत सखाराम हजर होता व गनिमी काव्यानें त्यानें निजामास त्यावेळीं जेरीस आणिलें. यावेळीं सखारामानें दाखविलेल्या युद्ध कौशल्यानें बाजीरावास फार समाधान वाटलें व त्यानें त्यास फौजेची बक्षीगिरी, सरदारीच्या बंदोबस्ताचा सरंजाम व कारभार असे तीन अधिकार करून दिले. या वेळेपासूनच सखाराम हरीचा व रघुनाथराव दादाचा स्नेह जमला. किंबहुना सखाराम हरि म्हणजे राघोबाचाच सरदार असें सर्व समजूं लागले. बाजीरावाच्या पश्चात् नानासाहेबास पेशवेपद प्राप्त

झालें. नानासाहेबाच्या कारकीर्दींतही सखारामानें राघोबाबरोबर सर्व स्वाऱ्यांत हजर राहून पराक्रम गाजविलेला आहे. सखाराम हरीच्या चढत्या पराक्रमावर नानासाहेबही खूष झाला व त्यानें त्यास सन १७४५ मध्यें खर्चाच्या नेमणुकीसह खासगी सरंजामसुद्धां सालीना तीन लक्ष रुपये रोकड व सहा लक्षांच्या वराती देण्याचा ठराव केला. सरंजाम हा सरदाराच्या फौजेसाठीं असून वराती सरकारी फौज सरदाराच्या हाता-खालीं देऊन तिच्या खर्चासाठी दिलेल्या असतात. सन १७४५ पासून ज्या अर्थी दर साल सहा लक्षांच्या वराती देण्याचा हुकुम आहे त्या अर्थी लहानश्या फौजेचा सखाराम हरि हा सेनापति म्हणूनच नेमिला गेला असें दिसतें.

२ सन १७४९ पासून अहंमदशहा अबदालीच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या, त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं नानासाहेबानें राघोबास सन १७५८ मध्यें अबदालीवर पाठविलें. या वेळीं सखाराम हरि राघोबा बरोबर होता. राघोबा फौजेची जमवाजमव करून आपल्यावर चालून येत आहे असें कळतांच अबदली स्वदेशास परत निघून गेला, परंतु त्यानें जिंकलेल्या मुलुखाच्या बंदोबस्तासाठीं मोठी फौज मागें ठेविली होती राघोबानें या फौजेवर चाल करून तिचा अगदीं धुव्वा उडवून दिला व अटकेपार मराठ्यांचा झेंडा रोंवला. यावेळीं बिनीवर म्हणजे आघाडीवर बाबुराव हरि व सखाराम हरि स्वतः आपल्या फौजेसह असून त्यांनींच अबदलीच्या फौजेचा अटकेपार पाठलाग केला होता हें त्यांचें शौर्य पाहून दिल्लीच्या बादशहानें त्यांस पुण्याजवळील मुशेखोऱ्यांतील आंबेगांव वंशपरंपरेनें इनाम करून दिलें व तेव्हां पासूनच सखाराम हरीचें आंबेगांवकर हें नांव प्रसिद्ध झालें. ही आंबेगांवची सनद या उभयतां बंधूंच्या नांवची आहे. या उभयतां बंधूंनीं शौर्यानें कमविलेल्या गांवाच्या नांवावरून प्राप्त झालेलें आडनांव ज्या गृहस्थांच्या वंशजास आज आहे त्यांनीं आंबेगांव हरतऱ्हेनें आपणांकडेसच जतन करून ठेविणें त्यांस भूषणावह होय. आज (१९२५)

या गांवापैकीं बहुतेक भाग सावकारांकडेस गहाण असून कायमचा त्यांच्या ताब्यांत जाणाच्या तयारींत आहे. व खरोखरीच जर तो कायमचा गेला तर मग आंबेगांवकर हें पोकळ नांव लाविण्यांत कांहींच अर्थ उरणार नाहीं.

३ पेशव्यांची फौज उत्तरेकडेस आली कीं अबदली स्वदेशास निघून जात असे आणि ती परत फिरली कीं तो पुन: हिंदुस्थानांत परत येई हा अबदलीचा क्रम सतत बारा वर्षें चालला होता. सन १७६० मध्यें सदाशिवराव असाच मोठ्या फौजेसह अबदलीवर चालून गेला. त्यावेळीं राघोबा व सदाशिवराव यांच्यांत कांहीं बेदनाव झाला होता. स्वारीवर जातांना सदाशिवरावानें राघोबाजवळ सखाराम हरीची मागणी केली पण राघोबानें ती मान्य केली नाहीं.

४ थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं राघोबानें बरीच बंडाळी सुरू केली होती. परंतु पुढें लवकरच या काका पुतण्यांचें सख्य झालें. 'सन '१७६३ चे सुमारास मोरोबा फडणवीस, सदाशिव रामचंद्र, भवानराव प्रतिनिधी आणि गोपाळराव पटवर्धन अशी सर्व मंडळी रघुनाथराव दादासाहेब यांचे विरुद्ध होऊन हैदराबादचे निजामास जाऊन मिळाली, तथापि दादासाहेब यांणीं सखाराम हरि वगैरे आपले प्रामाणिक सरदारांवर पूर्ण भरंवसा ठेवून निजामावर स्वारी केली. त्यावेळीं दादासाहेब यांणीं निजामाच्या सैन्याचा पुष्कळ वेळां मोड केला. परंतु एका प्रसंगीं तर दादासाहेबांवर असा प्रसंग गुदरला कीं, ते आपल्या सैन्यापासून अगदीं वेगळे पडले आणि शत्रूनें त्यास एकाएकीं घेरून घेतले. अशा भयंकर प्रसंगांतून ते मोठ्या सुदैवानें ( व थोरल्या माधवरावाच्या चातुर्यानें ) सुटले. त्यावेळीं त्यांचे जवळ मात्र त्यांचे शूर विश्वासू व जीवप्रिय सखाराम हरीच होते या वेळीं दादासाहेबांनीं सखाराम हरीचे फारच उपकार मानिले. आणि त्यांची पूर्वीची नेमणूक खेरीज करून पांच हजार फौजेचा नवीन बंदोबस्त त्यांचे स्वत:चे अंमलांत करून दिला.' सखाराम हरीवर दादासाहेबांची मेहेरबानी दिवसेंदिवस अशी वाढत चालली. तरी थोरल्या माधवरावांनीं

पेशवाईचीं सूत्रें हातीं घेतल्यावरही सखाराम हरीनें त्यांच्या नेतृत्वाखालीं मोठ्या बहादुरीच्या स्वाऱ्या शिकाऱ्या केल्याचा उल्लेख आहे. हैदराच्या अचाट पराक्रमामुळें त्याचा सर्वत्र दरारा बसला होता. कवाइती कंपू व गनिमी कावा या दोनही युद्धपद्धतींत तो मोठा निष्णात होता त्याचें शौर्य व धाडस शिवाजी महाराजां प्रमाणें अद्वितीय होतें. त्याची कल्पकता व दूरदृष्टि त्या वेळच्या इंग्रजांसही चकित करीत असे. सारांश अशा पराक्रमी हैदर नाइकाची खोड थोरल्या माधवरावानें गोपाळराव पटवर्धन, त्रिंबकराव मामा, सखाराम हरि, मुरारराव घोरपडे अशा अत्यंत शूर सरदारांच्या साहाय्यानें पूर्णपणें मोडिली. हैदरावरील मोहीम सुरू असतांनाच गोपाळराव पटवर्धन जलोदराच्या विकारानें मृत्यु पावला व परशुराम भाऊही छावणीस कंटाळून पळून येण्याचा विचार करीत होता. अशा भयंकर हैदरखानाची बिनी पहिल्या धडाक्याला सखाराम हरीनें लुटली. हैदरखानाजवळ चाळीस पन्नास हजार स्वार, दो दोनशे तोफा, पांच सात कवाइती कंपू असें साहित्य नेहमीं जय्यत असे. रात्रीच्या वेळीं मोठ मोठ्या मजला मारून पहाटेच्या सुमारास तो मराठ्यांच्या गोटावर अचानक येऊन घाला घालीत असे. सारांश हैदराच्या स्वारीला सगळें मराठी लष्कर कंटाळून गेलें होतें. परंतु सखाराम हरीनें अशाही स्थितींत हैदरावर छापे घालण्यास व त्यास जर्जर करण्यास कमी केलें नाहीं. या वेळचे एक पत्र सुंदर असल्यानें येथें देतो. हें पत्र तारीख ३ मार्च १७७१ सालचें म्हणजे हैदरावरील तिसऱ्या स्वारींतील आहे. ' राजश्री सखाराम हरी बातमीस मेलकोटेकडे गेले होते. ( त्यांनीं ) थेट हैदरखानाच्या लष्करापर्यंत जाऊन कांहीं लुटली. उंटें व तट्टें व पांच सात हजार बकरीं वळवून गोटाच्या आसपास कोसाच्या अंतरें भालयांस पासोड्या बांधोन मातबर फौज आली अशी दिखाई देऊन आनंदराव तोफखाने व भवानजी जाधव यास वाट तीट पाहावयास पाठविलें. चैत्रागिरीस आवाडीस, पश्चिमेस मेळकोटा, येणें प्रमाणें हैदर उतरला आहे. तोंडाशीं झाडी मात्र थोडी थोडी आहे. डावे उजवे बाजूस मैदान

मातबर आहे. सखाराम हरी यांजबरोबर फौज मातबर असतां तर काम पोक्तें झालें असतें. बातमीस तीनशे राउतासहीत गेल्यासारखें त्यांनीं काम असल्यांत करून माघारे नाग मंगलास येऊन गांव मारून तलफ करून मनस्वी लुटिलें. हैदरखानाच्या गोटांत नगारे होऊन गडबड झाली. एक दोनी तोफांचे बार झाले. तेथें राहिल्यास निभाव नाहींसा पाहून माघारे चार पांच कोस बेळुरास आले." यांत अवघ्या तीनशे स्वारांनिशीं सखाराम हरीनें हैदराचा गोट लुटल्याची हकीकत आहे ती त्यांच्या अत्यंत शूरत्वाची निदर्शक आहे. सखाराम हरी जरी रघुनाथरावाचा सरदार होता तरी थोरल्या माधवरावाच्या अंतापर्यंत स्वराज्याच्या नोकरींत अगर मुलुखगिरींत त्यानें यत्किंचितूही दुर्लक्ष्य केलेलें दिसत नाहीं, हें यावरून व सखाराम हरीच्या यावेळच्या इतर पराक्रमावरून दिसतें.

५ "इकडे गुजराथप्रांतीं बडोद्याचे गादीबद्दल गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंहराव गायकवाड या उभयतांचा बखेडा चालत होता. त्याबद्दल त्या उभयतांपैकीं गादीचा अधिकार कोणास मिळावा एतद्विषयीं पुणें मुक्कामीं पेशवे सरकारांत विचार चालला होता. तेथें विचारांतीं असें समजलें कीं, दमाजीराव गायकवाड यांचे थोरले चिरंजीव सयाजीराव गायकवाड यांस दमाजीचे पश्चात् गादीचा अधिकार मिळाला. आणि फत्तेसिंगराव यांस मुतालिकीचा अधिकार मिळाला. पुढें सयाजीराव वारल्यानंतर त्यांचे पश्चात् फत्तेसिंगराव गादी बळकावून बसले. अशाप्रकारे व्यवस्था चालत असतां दर्म्यान गोविंदराव गायकवाड हे पुणें मुक्कामीं आपण स्वतः श्रीमंताचे साधन ठेवून राहत असत. तेथें सखाराम हरी यांचें, राज्यांत तेज जास्ती पाहून त्यांची भेट घेऊन त्यांशीं त्यांहीं स्नेह केला. एका प्रसंगीं गोविंदराव गायकवाड सखाराम हरीस म्हणाले कीं, आपला व माझा स्नेह फारच, व या राज्यांत आपलें तेज व मान्यता विशेष म्हणून आपणास सांगण्याचें कीं, आम्हीं त्रिवर्गबंधू त्यांत माझी मातुश्री श्रेष्ठ आणि सयाजीराव व फत्तेसिंगराव यांची मातोश्री कनिष्ठ.

तेव्हां गादीचा अधिकार कोणाचा हें उघडच दिसतें. आतां सयाजीराव यांस गादीचा अधिकार मिळाला होता. त्याचें कारण एवढेंच कीं, त्यावेळीं मी फार अल्पवयी व अज्ञान होतो, परंतु आतां फत्तेसिंगराव यांस म्हणजे कनिष्टेच्या वंशास गादीचा अधिकार असणें हें कसें? ह्या प्रसंगीं तुम्हांशिवाय दुसरा कोणाचा वशिला नाहीं. तर ह्याजबद्दल सरकारांत यथार्थ न्याय होण्यासाठीं आपण श्रम घेऊन तजवीज करावी. तेव्हां सखाराम हरी यांनीं उत्तर दिलें कीं, माझ्याकडून होईल तितका मी प्रयत्न करतों. ह्या गोष्टीस बरेच दिवस लोटल्यावर सखाराम हरी श्रीमंताजवळ सहज बोलत बसले असतां म्हणाले कीं, एक पुरुषास दोन स्त्रिया, त्यांत प्रथम स्त्रीचा मुलगा वयानें लहान व दुसरीचा मोठा, तेव्हां विशेष अधिकार कोणाचा. ह्याप्रमाणें विनंती केल्यावरून श्रीमंत पेशवे सरकार व दादासाहेब पेशवे या उभयतांहीं सखाराम हरीस विचारिलें कीं, असा प्रकार कोठें आहे? त्यावर सखाराम हरी याणीं गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंगराव गायकवाड या उभयतांची हकीकत निवेदन केली. तेव्हां श्रीमंतांनीं रामशास्त्री प्रभृति विद्वान मंडळींना बोलावून सभा जमविली. तींत सर्वानुमतें असें ठरलें कीं, प्रथम स्त्रीचे पुत्रास अधिकार असावा. हें वर्तमान फत्तेसिंगराव यांचे वकीलास कळल्यावरून त्यानें वडे ह्यास लिहून कळविलें कीं, गोविंदरावबाबांस पदाधिकारी करून श्रीमंत माधवराव साहेब यांनीं त्यांस वस्त्रें देण्याचें ठरविलें. या कामांत सखाराम हरी यांची बहुतप्रकारें मदत आहे. तशांत श्रीमंतांची त्यांजवर पूर्ण कृपा असून त्यांचा भरंवसाही सरकारास विशेष आहे. तेव्हां त्यांचें बोलणें न फिरतां त्यांणीं केलेले काम निःसंशय सिद्धीस जाईल, असें पूर्णपणें दिसलें. अशा प्रकारचें पत्र पाहून फत्तेसिंगराव गायकवाड यांणीं सखाराम हरीस मोठ्या आदरानें पत्र लिहिलें कीं, जसा आपला व गोविंदरावबाबा यांचा स्नेह त्याचप्रमाणें माझा व आपला असें मी समजतों. मी आपणास अगदीं अंतर देणार नाहीं. आपल्यास दरबार खर्चाबद्दल २,००,००० दोन लक्ष रुपये व स्नेहाचे नात्यानें ५,००,००० पांच

लक्षांची चिठ्ठी व सिनोर महाल वंशपरंपरें करून देतों. परंतु गोविंदरावबाबांचा पक्ष स्वीकारून आमचे अगदींच विरुद्ध होईल असें करूं नये. अशा मजकुराचें पत्र बडोद्याहून त्यांचे पुण्यांतील वकीलास आलें, तें त्यानें सखाराम हरीस वाचून दाखविलें. पत्रांतील सर्व मजकूर एकाग्रतेनें ऐकून सखाराम हरी वकीलास म्हणालें "मी द्रव्य लोभी नाहीं. मजला न्यायावर लक्ष देऊन चाललें पाहिजे. सरकारांत मी कधींही अप्राणपणें वागण्याचा व बोलण्याचा मार्ग ठेविला नाहीं. गोविंदरावबाबा हे ज्येष्ट स्त्रीचें पुत्र होत. तेव्हां त्यांचा गादीचा अधिकार यथार्थ आहे. तशांत तुम्हीं माझें काय बिघडलें ? अथवा तुमचा माझा कांहीं कारणावरून द्वेष आहे असेंही नाहीं. मी हा तुम्हांस स्नेह्याप्रमाणेंच मानतों. परंतु मी श्रीमंतास विनंती करून रामशास्त्री वगैरे विद्वान मंडळीची सभा भरविली तींत जो शास्त्रार्थ ठरला त्यांत माझा निरूपाय आहे. असें बोलल्यावर, वकील मुकाम्यानें घरीं जाऊन फत्तेसिंगराव गायकवाड यांस सदरहू मजकुराचें पत्र लिहिलें त्याचें उत्तर आलें कीं, आपले दरबारची व सर्व संस्थानिकांची प्रसिद्ध चाल आहे कीं, सरकारास नजराणा देऊन आपला अर्थ साध्य करून घ्यावा. त्याप्रमाणें श्रीमंतास नवसरी महाल नजराणा कबूल करून रोकडही पांच पन्नास लक्ष रुपये कबूल करावेत आणि सखाराम हरीसही सिनोर व तेलाडी महालांची जहागिरी देण्याचें कबूल करावें. अशा मजकुराचें पत्र पुणें मुक्कामीं वकिलांस पावतांच त्याणें ते घेऊन सखाराम हरीकडे नेऊन त्यांस त्यांतील इत्थंभूत मजकूर विदित केला. तो ऐकिल्यानंतर सखाराम हरी त्यांस रागाऊन म्हणालें कीं, "द्रव्यलोभानें मी तुमचें ऐकेन असें कधींही होणार नाहीं. गोविंदराव ज्येष्ट स्त्रीचे पुत्र, तेव्हां त्यांचाच अधिकार. हाच न्याय. बाकी त्याजपासून मजला मोठा अर्थ प्राप्त होणें असें मुळींच नाहीं. त्यांचा अधिकार यथार्थ असून त्यांचें वय अल्प व ते द्रव्यहीन असल्याकारणानें तें सर्वथैव संकटांत आहेत. म्हणूनच मजला त्याचा कळवळा येऊन त्यांजविषयीं श्रीमंताजवळ विनंती केली. आणि सरकारांनीं योग्य

न्यायाकडे लक्ष देऊन त्यांस अधिकार देण्याचें ठरविलें." अशा प्रकारें निष्पक्षपाताचें व योग्य उत्तर मिळाल्यामुळें त्या वकीलाचा निरुपाय झाला व तो निमुटणपणें परत आपल्या मुक्कामास गेला. इकडे गोविंदराव गायकवाड व सखाराम हरी या उभयतांचा दिवसेंदिवस इतका स्नेह जडत चालला कीं, केव्हां केव्हां गोविंदराव गायकवाड कांहीं संकटांत आहे असें पाहून यांणीं सावकार लोकांची खात्री करून त्यांजकडून त्यांजला खर्चासही कर्जाऊ पैसा देववीत असत, व सखाराम हरी व गोविंदराव गायकवाड यांचे वाडे फार जवळ व समोरासमोर असल्यामुळें दोघांच्या परस्परांशीं वारंवार भेटी होत असत. अशा प्रकारें त्या उभयतांचा स्नेह वाढत चालला. कांहीं पदार्थ भोजनांत गोड लागला कीं, सखाराम हरीनें तो गोविंदराव गायकवाड यांजकडे पाठवावा. ह्याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर गोविंदराव गायकवाड सखाराम हरीस म्हणाले कीं, मी आतां कोठपर्यंत अशा तऱ्हेचे दिवस काढावेत ? तेव्हां सखाराम हरी यांणीं पुन्हां श्रीमंतास विनंती करून गोविंदराव गायकवाड यांस बडोद्याचे गादीचीं वस्त्रें देवविली आणि श्रीमंताच्या आज्ञेनें आपण स्वतः आपला सरंजाम व सरकारी हुजुरांनीतले पांच सात हजार लोक बरोबर घेऊन मोठ्या थाटानें गोविंदराव गायकवाड यांजबरोबर बडोद्यास आले. इकडे फत्तेसिंगरावही बडोद्याची गादी बळकावून बसलेले होते, त्यांस सखाराम हरी यांणीं सांगून पाठविलें कीं, गोविंदराव गायकवाड यांस गादीचा अधिकार सोंपवून तुम्हीं मुतालिकीचा कारभार पाहवा, अशी सरकार आज्ञा आहे. ही गोष्ट फत्तेसिंगराव यांनीं जुमानली नाहीं. त्यांस वाटलें कीं, आपण प्रत्यक्ष अधिकार संपन्न आहोंत, हें सर्व देशांत प्रसिद्ध आहेच. असें असतां अधिकार घालवून प्रस्तुत मृततुल्य होणें त्यापेक्षां सामना करणें बरें. असा निश्चय करून त्यांनीं सखाराम हरीस सामना करण्याचा निरोप पाठविला. हा निरोप सखाराम हरीस कळतांच त्यांनीं लढाईची तयारी केली. पुढें त्या उभयपक्षांचें मोठे युद्ध झालें. त्या युद्धांत सखाराम हरी सर्वांचें पुढारी असल्या कारणानें

त्यांस बऱ्याच जखमा लागल्या. परंतु शेवटीं त्यांचा जय होऊन गोविंदराव गायकवाड यांस गादीचा अधिकार प्राप्त करविला, आणि श्रीमंतांची आज्ञा शेवटास नेली. ह्याप्रमाणें सखाराम हरीचे आपणावर उपकार फार झाले त्याबद्दल त्यांस स्नेहाच्या नात्यानें तरी कांहीं द्यावें असें जाणून त्यांनीं त्याच वेळेस म्हणजे सन १७७२ सालीं २०,००० वीस हजारांचीं पांच गावें जाहगीर करून दिलीं. आणि म्हणाले कीं, एवढ्यानेंच मी तुमचे उपकार फेडले असें नाहीं. आपण मजवर जे जे उपकार केले व अनेक प्रसंगी मदत केली, त्याजकडे पाहतां हें देणें तर कांहींच नाहीं. एवढेंच काय परंतु मी माझे शरिरांतील प्राण जरी तुम्हांस दिले तरी तेही थोडेच. परंतु एवढेंच कीं, मजकडून आदर स्मरणार्थ तुम्हांस कांहीं तरी असावें, असें म्हणून २०,००० वीस हजारांच्या उत्पन्नाच्या पांच गांवांची सनद करून दिली आणि श्रीमंतांस फौजेच्या खर्चाबद्दल व नजराण्याबद्दल २,००,००० दोन लक्ष रुपये पाठविले. बडोद्यास चहूंकडे शांतता झाल्यावर व अशा प्रकारची व्यवस्था झाल्यानंतर सखाराम हरी पुण्यास गेले. तेथें श्रीमंतांचीं भेट घेऊन बडोद्याकडील सर्व हकीकत श्रीमंतांस निवेदन केली. पुढें सुमारें दोन वर्षें पर्यंत गोविंदराव गायकवाड यांचा अधिकार सुरळीतपणें चालला. उपरांत फत्तेसिंगराव यांणीं फौज फितूर करून गोविंदराव यांचा अधिकार हिसकावून घेतला. हें वर्तमान गोविंदराव यांणीं, पुन्हां पुण्याचे दरबारांत जाहीर केलें."

६ पुढें सन १७७४ चे सालीं रघुनाथराव दादासाहेब हैदरअलीवर चढाई करून गेले. त्यांचे बरोबर सखाराम हरीही होते. उभय सैन्यांची गांठ कर्नाटक प्रांतीं पडली. हैदराचा मुलगा टिपू सुलतान हा ह्यावेळेस शत्रूच्या सैन्याचा अधिकारी होता. टिपू स्वतः जरी शूरवीर होता तथापि दादासाहेबांचे बरोबर त्यांचे मशहूर सरदार सखाराम हरी आहेत असें जाणून आपले कडील झांगिसखान या नांवाच्या एका सरदारास पेशव्यांचे छावणींत तहाचें बोलणें करण्याकरितां पाठविलें. त्यावेळेस सायंकाळचा

समय असल्यामुळें दादासाहेब आपले जिवलग सरदार सखाराम हरी यांस बरोबर घेऊन आपल्या सैन्याची खबर घेण्याकरितां बाहेर निघाले होते. त्यासमयीं किती एक चाकर व शिपाई लोक आपल्या धन्याच्या व त्यांचे महाशूर व प्रतापी सरदार सखाराम हरी यांच्या शूरत्वाच्या गोष्टी करीत बसले होते. किती एक मोठ्या आनंदानें श्रीमंतावर केलेल्या पोवाड्यांत त्यांचे गुण गात होते व किती एक जवळ येऊन पोहोंचलेल्या युद्धाच्या गोष्टी करीत होते. अशा समयीं झंगिसखान समोरून भरधांव घोडा फेंकित श्रीमंता पुढें येऊन ठेपला. उभयतांचा परस्पर आदरसत्कार होऊन भेटीही झाल्या. प्रथमतः त्यानें श्रीमंतांपुढें सखाराम हरीची बरीच प्रशंसा केली. त्यांत तो म्हणाला कीं, 'सखाराम हरी शूरोंके शेर्का' ह्याप्रमाणें कांहीं वेळ पर्यंत भाषण झाल्यानंतर त्यानें हैदरअल्लीकडील तहाची सूचना दादासाहेबांस प्रदर्शित केली. दादासाहेब यांनीं मागितलेल्या सर्व अटी त्यानें कबूल केल्यानंतर तो परत आपल्या छावणीत गेला. व पुढें थोडक्याच वेळानंतर दादासाहेबही आपल्या छावणींत आले. अशारीतीनें लढाईची व्यवस्था झाल्यावर दादासाहेब लवकरच पुण्यास गेले." (चा. का. प्र. इ. साधनें)"

७ सन १७७८ ह्या सालीं गोविंदराव गायकवाड वडोद्याचे गादीवर नसल्या कारणानें अधिकार पुन्हां प्राप्त हाण्याविषयीं पुणें मुकामीं पेशव्यांचें दरबारांत खटपट करीत असतां त्यांचे जवळ खंडो जिवाजी तांबेकर कामकाज करीत होते. खंडो जिवाजी यांची वर्तणूक सखाराम हरी यांचे लक्षांत बरोबर आल्यावरून त्यांनीं गोविंदराव गायकवाड यांजपासून खंडो जिवाजीस दूर केलें व त्यांचें जागीं आपले मंडळींतील व भरंवशाचे रावजी आप्पाजी फणशे प्रभू यांची गोविंदराव गायकवाड यांजपाशीं सोपवणूक केली. त्या दिवसापासून रावजी आप्पाजी गोविंदराव गायकवाड यांचे राज्य संबंधीं पेशवे सरकारचे दरबारांत श्रमसाहस करीत असत. पुढें हे रावजी आप्पाजी, गोविंदराव गायकवाड वडोद्याचे गादीवर आले तेव्हां त्यांचे दिवाण झाले.

८ पेशव्यांचे मुजुमदार नारायण नीळकंठ हे मृत्यु पावल्यावर, दादासाहेबांनी बाबुराव हरीस मुजुमदारी सन १७६२ मध्यें दिली होती व ही तुजकडून काढणार नाहीं अशी शपथही दिली होती. परंतु पुढे इ. स. १७६९ मध्यें इतर मुत्सद्यांच्या आग्रहामुळें माधवरावानें जुन्या मुजुमदारास मुजुमदारी दिली व बाबुराव हरी यास वाईट वाटूं नये म्हणून अहमदाबादचा सुभा त्यास सांगण्याचें ठरविलें. म्हणजे या उभयतां भावांवर पेशव्यांची फारच मर्जी असे व त्यांतल्या त्यांत दादासाहेबांची विशेष असे. पुण्याची एक पेठ बाबुराव हरीनें वसविली आहे.

९ नारायणराव पेशव्याच्या कारकीर्दींत सर्वच प्रभूंना फार त्रास झाला. या पेशव्यानें प्रभूपासून एक नऊकलमी याद बळजबरीनें लिहून घेतली होती. त्या यादीखालीं १ रामराव जिवाजी, २ विठ्ठलराव यशवंत, ३ रामाजी मल्हार, ४ मुरारराव दौलत, ५ बाजीराव साबाजी, ६ सोयरो वामन, ७ बचाजी खंडेराव, ८ आप्पाजी भिकाजी, ९ खंडेराव बापूजी, १० त्रिंबक महिपतराव, ११ बळवंतराव शंकर, १२ सखाराम हरी, १३ नीळकंठ रामचंद्र, १४ नारायणराव हरि, १५ बाळाजी गणेश, १६ त्रिंबक सूर्याजी. अशा त्या वेळच्या प्रमुख सोळा प्रभूंच्या सह्या आहेत. पुढें नारायणरावाचा खून झाल्यावर पुण्यास उघड दोन पक्ष झाले. त्यांत सखाराम हरीनें रघुनाथरावाचा पक्ष घेतला. कारभारी पक्षाशीं पहिली लढाई राघोबानें दिली व जींत त्रिंबकराव मामा मारला गेला त्या लढाईंत सखाराम हरीस मोठीच जखम लागली होती असें पुढील आनंदीबाईच्या पत्रावरून दिसतें. हें पत्र तारीख ९ जून १७७५ रोजीं लिहिलें आहे.

१० 'तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सर्व कळलें. तुमची निष्ठा उत्तम आहे, हे अनुभवास आली. त्यास ही गोष्ट उत्तम आहे. तुम्हांस हें योग्य आहे. ये निष्ठेनें तुमचें ईश्वर ऊर्जित करील, चिंता नाहीं. तुम्हांस जखम लागली होती, ती बरी जाली कीं नाहीं हें लिहिणें. पथ्य उत्तम प्रमाणें करीत जाणें. बहुत रक्षित जाणें. चिरंजीव राजश्री बाजीराव

सुखरूप आहेत. फितुरी यांचें (कारभारी पक्षाचें) पारपत्य होऊन हुजूरची (राघोबाची) व चिरंजीवाची (बाजीरावाची) भेट कधीं होईल हें लिहिणें.'

११ हें पत्र आनंदीबाईनें धारेच्या किल्ल्यांतून लिहिलेलें आहे. पुढें प्रसिद्ध पुरंदरच्या तहानंतर दादासाहेबांचें बंड मोडलें व त्यांच्याकडील सर्व सरदार पुण्यास येऊन राहिले. त्याबरोबरच सखाराम हरीही पुण्यास चाकरीस येऊन राहिले. यापूर्वी सवाई माधवरावाच्या भेटीचा दरबार झाला होता पण सखाराम हरीस त्या दरबारास नानानें मनाई केली होती. म्हणजे नाना फडणिसाच्या मनांत सखाराम हरीबद्दल फार मोठी तेढ होती. तथापि त्यांचा सरंजाम वगैरे पूर्ववत् चालत होता. परंतु तारीख २५ सप्टेंबर १७७६ रोजीं त्यांना पुरंदरावर शिंद्यांनीं एकदम कैद केलें. त्याज-बद्दलची सविस्तर हकीकत खरे ले. १८९४ यांत पुढीलप्रमाणें आहे.

१२ "सखाराम हरीस श्रीमंतांचीं (राघोबाचीं) पत्रें आलीं होतीं, त्यांचीं उत्तरें लिहून दिलीं. त्यांत फितवा फौजेंत केल्याचा व फौज नवी ठेवितों असे व कित्येक प्रकार लिहिले ते सांपडलें. त्याजवरून मशार-निल्हेस किल्ल्यावरी बोलावून आणिलें. 'श्रीमंतांचें पत्र आलें होतें काय ?' म्हणून पुसिलें. त्यांनी 'पत्र आलें' म्हणून सांगितलें. 'उत्तर काय दिलेंत?' 'उत्तर दिलें नाहीं.' म्हणून सांगितलें. तेव्हां पत्र त्यांच्या हातचें दाखविलें. 'हें कोणीं लिहिलें?' तेव्हां जाब काय करितात! तेच समयीं बेडी घातली. गोट त्यांचा (पुरंदर किल्ल्या) खालीं होता तेथें चौक्या पाठविल्या. पुतण्या खालीं होता तो धरून आणून कैद केला. बाबूराव हरीकडील माणसें धरावयासी जनार्दन राम वगैरे सात आठशे राऊत मावळांत गेले आहेत."

१३ या प्रमाणें सखाराम हरीस नगरच्या किल्ल्यावर, बाबूराव हरीस सिंहगडावर व बाबूराव हरीचा मोठा मुलगा दौलत बाबूराव यास चाकण-च्या किल्ल्यावर आणि धाकटा मुलगा महिपत बाबूराव यास त्रिंबकच्या किल्ल्यावर बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें. या वेळचा किल्लेदारावरचा हुकुम वाचनीय असल्यानें पुढें देतो:—

१४ "(सखाराम हरी) यांस पक्क्या बंदोबस्तानें किल्ले मजकुरी अटकेंत ठेऊन भोजन घालीत जाणें. परभू कारकुन त्यांजवळ जाऊं न देणें. चौकीस माणसें ठेवाल तीं वरचेवर बदलीत जाणें. मराठा एक माणूस खिजमतगारीस ठेवून देणें. तो पंधरा दिवसां बदलीत जाणें. धोत्रें अगर शेलापागोटें लागल्यास देणें. जेवणाची व वस्त्रपात्राची आबाळ न करणें, बेडी नेहमीं असो देणें. सखाराम हरी खेळग्या राजकारणी आहे. कोणे गोष्टीस चुकणार नाहीं. याज करितां एक कोठडी करून त्यांत घालून बाहेरून कुलुप घालीत जाणें. एकास त्याजवळ जाऊं न देणें. याचे गुण तुम्हांस ठाऊकच आहेत. या करितां फार चांगला बंदोबस्त करणें." सखाराम हरीस त्याचे शालक भास्करराव राजापुरकर यांनीं नाना फडणीसाच्या सांगण्यावरून विश्वासघातानें पकडविलें अशी एक समजूत प्रचलित असून चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या इतिहासाच्या साधनांत ती नमूद केली आहे. परंतु ती अगदींच निराधार आहे. त्याच्या बंधनाचा प्रकार वर प्रमाणें आहे. सखाराम हरीचा या प्रमाणें बंदोबस्त ठेविला तरी सखाराम हरीनें घनगड किल्ल्यावर असतांना फितूर केलाच. परंतु तो उघडकीस आल्यानें चौघांस तोफेच्या तोंडीं दिलें व दोघांचे उजवे हात कापून टाकिले व एव्हांपासूनच सखाराम हरीच्या छळास अधिक क्रूर स्वरूप प्राप्त झालें असावें. त्याच्या पायांतील बेडी वाढविणें व त्यांस पोटभर अन्नपाणीही न देणें अशा प्रकारचा छळ यावेळीं म्हणजे सन १७७८ मध्यें सुरूं झाला. व पुढें अशा विपत्ती भोगीत असतांच या शूर पुरुषाचा अंत सन १७७९ मध्यें जून महिन्या पूर्वीं केव्हां तरी झाला. शेवटीं यांच्या पत्नीनें बराचसा दंड देण्याचें कबूल करून पतीच्या भेटीची परवानगी मिळविली होती परंतु या पतिपत्नींची भेट होण्यापूर्वींच सखाराम हरी मृत्यु पावला. तथापि त्याच्या पत्नीकडून दंड वसूल करण्याची तजवीज मात्र जोरानें चालू होती. अखेर ती हृदयद्रावक बातमी महादजी शिंद्यास समजल्यावर त्यांनीं पुढील पत्र नाना फडणिसास लिहिलें व दंड माफ करविला. हें पत्र बहुधा तारीख १६ नोव्हेंबर सन १७७९ चें असावें.

श्री.

"राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसः—

दंडवत विनंती उपरीः—सखाराम हरी कैदेंत घनगडीं होते. त्यास बेडी मातबर व भोजनाचेंही यथास्थित नव्हते. याजमुळें प्राणांतिक अवस्था झाली होती. त्यावरून यांचे स्त्रीनें सरकारांत रदबदली केली कीं, बेडी हलकी करून, अन्नपाण्याची व औषधें उपाय करावयाची मोकळीक करून, मजला किल्ल्यावर जावयाची परवानगी द्यावी. त्याजवरून उत्तर झालें कीं, बारा हजार रुपये द्यावे, म्हणजे सदरहु प्रमाणें परवानगी दिली जाईल, तेव्हां त्यांनीं मोलभीक मागोन, घरोघर फिरोन बारा हजार रुपये द्यावयाचा करार करून, किल्ल्यावरी जाऊन पोहोंचेन अशी सनद द्यावी; म्हणजे कराराप्रमाणें एका महिन्याचे मुदतीनें ऐवजाचा हमीदार घेतला. त्यास सनद तिच्या हातास पोहोंचोन ती किल्ल्यावरी न जातां सखाराम हरी मृत्यु पावला. हल्लीं हमीदारास ऐवजा करितां सरकारचा तगादा लागला आहे. हमीदार तिजला तगादा करितो. ऐशियास, जो अन्यायी तो मृत्यु पावला; व बायकोची त्याची भेटीही न जाली. यास्तव बायकोस तगादा, ऐवजाचा, हमीदाराचा नसावा; व हमीदारासी सरकारांतून न व्हावा. ज्या पक्षीं अपराधी मरण पावला, त्यापक्षीं सरकारांतून माफ करून, ऐवज न घ्यावा. यांचे मुलां माणसांचें चालवून आजात करावें. वरकड बारा हजारांनीं सरकार किफायत होती ऐसें नाहीं. तशांत त्यां जवळ ऐवज आहे नाहीं. हें कळलेंच आहे. मोल मागोन ऐवज जमा करणार! तोही सखाराम हरी यांचे मरण्यामुळें कोणी ऐवज देईल हें ही नाही! सारांश, मुलां माणसांची मुक्तता होय तें करावें. हमीदारास सरकारांतून तगादा जाल्यास हमीदार बायकामुलांस तगादा करील. घरचें सर्व जप्तींत आलें असतां त्यास ऐवज मिळणें कठीणच आहे याकरितां लिहिलें असे: रवाना छ ७ जिलकाद हे विनंती." याप्रमाणें सखाराम हरिचें संक्षिप्त चरित्र आहे.

हें ... पर्यंत ... दुसरें सिद्ध ...
... स्वरूप पहिलें ...

IRBK-0100690
IRBK-0100690
अनुक्रम
विभाग
दि.

# अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें

लेखक,

**विनायक सदाशिव वाकसकर,**

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण,

श्री जुम्मादादा व्यायाम मंदिर,

**वडोदें.**

——:0:——

किंमत एक रुपया.